काव्य/संदर्भ
१८३०

४१३११
काव्य
१८३६
१५।मव

सामराज

# रुक्मिणी हरण

गोपाळ

ठा ग्रं. स्थळप्रत
वि:
ग्रंथ क्र.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. १५५६२
ठाणे

सामराजकविविरचित

# रुक्मिणीहरण

[ उपोद्घात, शब्दकोश, अर्थनिर्णायक व अवांतर टीपांसहित ]

संपादक
गोपाळ विष्णु तुळपुळे, एम्. ए.

मूल्य : रु. ६·००

व्हीनस प्रकाशन : पुणें २

८१३१ ... ९८३८ ... १५/५८

# प्रस्तावना

सामराजासारखा एक अज्ञातवासांत पडलेला प्रतिभासंपन्न कवि काव्यप्रेमी नेकांच्या समोर यावा या हेतूनें त्याच्या 'रुक्मिणीहरणा'ची सटीप आवृत्ति मीं ९२४ सालीं प्रसिद्ध केली. ती प्रसिद्ध होतांच बऱ्याच शाळांच्या व विश्वविद्या- याच्या मराठीच्या अभ्यासक्रमांत तिचा समावेश झाला, व त्यामुळें आतां कवीची मराठी वाचकांना चांगली ओळख झाली आहे. आज या काव्याची सरी आवृत्ति काढण्याचा योग आला आहे.

पहिली आवृत्ति कै. विनायकराव भाव्यांच्या 'महाराष्ट्रकवि' मासिकांतील ी-बरहुकूम छापली होती. मूळ हस्तलिखिताच्या अभावीं भावे-प्रतींतील नपाठ व अशुद्धें या पहिल्या आवृत्तींत तशींच ठेविलीं होतीं. कांहीं दुर्बोध ळें होतीं तीं टीपांत निदर्शित केलीं होतीं. मीं आपल्या प्रस्तावनेंत कै. व्यांची प्रस्तावना जशीच्या तशी उद्धृत केली होती. एका दृष्टीनें भावे-प्रत ही ली प्रत असल्यामुळें ही प्रस्तावना अभ्यासकांना महत्त्वाची आहे. यासाठीं पुढें तशीच दिली आहे.

"या '**रुक्मिणीहरण**' काव्याच्या आम्हांस दोन प्रती मिळाल्या. दोन्हीं । रा० रा० जगन्नाथ रघुनाथ आजगांवकर यांजकडून आल्या. यांपैकीं पहिली सुमारें दीड वर्षापूर्वी मिळाली. हिची लांबी ८½ इंच व रुंदी ४ इंच असून ं १३९ आहेत व दरएक पानावर ८ ओळी असून त्या स्पष्ट व सुरेख्या अक्ष- ीं लिहिल्या आहेत. या प्रतींतला पहिला सर्ग—पहिलीं आठ पानें—गहाळ झाला हे, व दुसऱ्या सर्गापासून पुढें शेवटपर्यंत पोथी शाबूत आहे. प्रतीचे शेवटीं ाके १६६६ ॥ रक्ताक्षीनामसंवत्सरे पौष शुद्ध प्रतिपदा तद्दिनी समाप्त ॥' असा ोख्या काळाचा उल्लेख केला आहे. याच प्रतीवरून आम्हीं हा ग्रंथ छापण्यास वात केली व दोन ते आठ सर्ग छापून पुरे केले. आठव्या सर्गाचे ेवटीं 'सर्गसंख्या १७९' असे शब्द आहेत. ते तसे नसून १७९ हा या ाठव्या सर्गाच्या पद्यांचा वाचक असा आंकडा आहे. १८० वा श्लोक केवळ उपसंहारात्मक आहे.

"या प्रतीवरून ग्रंथ छापल्यावर रा० आजगांवकर यांस दुसऱ्या प्रतीचा शो लागला, व ही प्रत थोड्याच दिवसांत आमचे हातीं आली. ही प्रत ८½ इंच ल व ४ इंच रुंद असून हींत १४३ पानें आहेत व हीवर दर पृष्ठास ८, क्वचित् याप्रमाणें ओळी लिहिल्या आहेत. हीहि प्रत पहिल्या प्रतीप्रमाणेंच स्पष्ट आ दोन्ही पूर्वकाली खर्ची कागदावर पोथीवजा लिहिल्या आहेत. दुसरींत शेवटी 'शके १७२४ दुंदुभीनामसंवत्सरे श्रावणकृष्णत्रयोदश्यां तद्दिनी समाप्तं हस्ताक (?)-क्षर स्मार्तोपनामक धोंडभट्टेन लि (खि) तं शुभं भवतु' असा उल्लेख आहे. या दोन्हीही तिसऱ्या एकाच प्रतीवरून केलेल्या नकला असाव्या असें दिसतें.

"या येवढ्या मोठ्या काव्यांत कवीनें आपल्या स्वतःबद्दलची माहिती किंवा ग्रंथरचनेचा कालही कोठेंच दिला नाहीं. इतकेंच नव्हे तर आपल्या नांवाचाही तो उल्लेख करीत नाहीं. 'सामराज' अथवा साम्राज्य या नांवाचा एक कवि महाराष्ट्र-काव्यवाचकांच्या परिचयाचा आहे. हा वामनाचा शिष्य असून आपणांस 'साम्राज्यवामन' म्हणवितो. 'बापु,' 'विश्वनाथ,' 'साम्राज्य' हे सर्व वामनाचे शिष्य, आपल्या गुरूचा उल्लेख काव्यांत स्पष्टपणें करतात. परंतु '**रुक्मिणीहरणा**'चा कर्ता जो 'सामराज' यानें आपल्या सबंध ग्रंथांत वामनाचा उल्लेख कोठेंही केलेला नाहीं. यावरून हा 'सामराज' वामनशिष्य जो 'साम्राज्य' याहून भिन्न पुरुष असावा असें वाटतें.

"काव्याच्या भाषेवरून व दुसऱ्या अंतःप्रमाणांवरून हा वामनाचा समकालीन असून याचा वामनाच्या काव्यांशीं चांगला परिचय असावा असें दिसतें. कोल्हापूरप्रांतीं पुढेंमागें याचे आणखी कांही ग्रंथ व माहिती मिळण्याचा संभव आहे."

माझी पहिली आवृत्ति प्रसिद्ध झाल्यानंतर या काव्यानें विद्वान् अभ्यासकांचें लक्ष वेधलें. प्रो वामनराव जोशी ह्यांनी प्रथम पाठभेदांची चर्चा 'विविधज्ञानविस्तारां'त सुरू केली. त्यांच्या मागोमाग श्री. कानिटकर, प्रो. पंगू, प्रो. चिंतामणराव जोशी, श्री. पुरंदरे व श्री. राजोपाध्ये ह्या विद्वानांनीं आपापल्या प्रकारें पाठभेद व दुर्बोध स्थलांचे अर्थ सुचविले. विशेषें करून श्री. कानिटकर यांचें संशोधन विशेष परिश्रमाचें व चिकित्सेनें केलेलें असल्याकारणें अधिक महत्त्वाचें आहे. प्रो. पंगूंनीं 'रुक्मिणीहरणा' चा चांगला अभ्यास केला आहे. या दोघांच्याहि पुस्तकांचा

'रुक्मिणीहरणा ' च्या अभ्यासकांना उपयोग होईल. त्याचप्रमाणें श्री. गोविंद रामचंद्र राजोपाध्ये यांची ' मुद्गलाख्याना ' ची सटीप प्रत उपयुक्त वाटेल. या तिन्ही विद्वान् अभ्यासकांचा मला ' रुक्मिणीहरणा ' ची प्रस्तुत आवृत्ति तयार करतांना पुष्कळ उपयोग झाला हें नमूद करतांना मला मनापासून आनंद वाटतो. त्यांनीं सुचविलेले दुर्बोध स्थलांचे अर्थ व पाठ सर्वच ठिकाणीं पसंत पडले असें नाहीं. तथापि ते जेथें योग्य वाटले तेथें त्यांचा उल्लेख केला आहे. ' रुक्मिणी-हरणा ' ची ही आवृत्ति काढतांना मला या तीन अभ्यासकांच्या व इतर विद्वानांच्या कामगिरीचा फायदा मिळाला त्याबद्दल मी या सर्वांचा आभारी आहें. तसेंच श्री. मंगेश नारायण कुलकर्णी ह्यांनीं ह्या काव्याच्या द्वितीयावृत्तीचें प्रकाशनाचें कार्य अंगीकृत करून तें अल्प कालावधींत उत्तम प्रकारें पार पाडलें याबद्दल मी त्यांचे आभार मानतों.

नौरोस्‌जी वाडिया कॉलेज, पुणें
१ जानेवारी १९४०

गोपाळ विष्णु तुळपुळे

# प्रस्तावना

## ( तृतीयावृत्तीची )

माझ्या वडिलांनीं यापूर्वीं दोनदां संपादित केलेल्या सामराजकृत ' रुक्मिणी-हरणा ' ची ही तिसरी आवृत्ति अभ्यासकांच्या हातीं देतांना मला आनंद वाटतो. हें काव्य प्रथम प्रसिद्ध करतांना कै. वि. ल. भावे यांनीं ज्या दोन हस्तलिखित प्रतींचा उपयोग केला होता त्या प्रती पूर्वींच्या दोन्ही आवृत्तींच्या वेळीं माझ्या वडिलांना मिळालेल्या नव्हत्या. त्या डॉ. वि. भि. कोलते यांच्या संग्रहांत असून मीं मागणी करतांच त्यांनीं मला त्या उपलब्ध करून दिल्या याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें. ' रुक्मिणीहरणा ' ची प्रस्तुतची तिसरी आवृत्ति या दोन हस्तलिखितांवरून संपादित केली आहे. त्यामुळें पूर्वींच्या आवृत्तींतील कांहीं विवाद्य पाठ निश्चित करण्यास मदत होईल अशी अपेक्षा आहे. या दृष्टीनें भावे-प्रत व हस्तलिखित प्रती यांतील कांहीं महत्त्वाचे पाठभेद दर्शविणारें एक परिशिष्ट या आवृत्तीच्या अखेरीस जोडलें आहे. येथें एका गोष्टीचा खुलासा करणें अवश्य आहे. ती म्हणजे, वरील दोन हस्तलिखित प्रती ज्या मूळ प्रतीच्या नकला आहेत ती ' रुक्मिणीहरणा ' ची मूळ प्रत अद्यापि उपलब्ध झालेली नाहीं. अशा परिस्थितींत वरील दोन हस्तलिखितांवर अवलंबून राहण्याशिवाय दुसरा मार्ग नसल्यानें प्रस्तुत आवृत्तींत त्याचाच अवलंब केला आहे. अर्थात् भावे-प्रतीच्या मानानें वरील हस्तलिखित प्रतींतील पाठ अधिक विश्वसनीय आहेत यांत शंका नाहीं. प्रस्तुत आवृत्तीचें संपादन करतांना वरील दोन प्रतींपैकीं शके '१६६६ मध्यें लिहिलेली ' क ' प्रत प्रमाण धरून शके १७२४ मध्यें लिहिलेल्या ' ख ' प्रतींतून महत्त्वाचे पाठभेद नमूद केले आहेत.

या आवृत्तींतील ' शब्दकोश ' सर्व शब्दांचे संदर्भ देऊन अधिक उपयुक्त करण्याचा प्रयत्न केला आहे. या कामीं पुणें विद्यापीठांतील माझ्या सहकारी प्रा० कुमुदिनी घारपुरे, एम्. ए. यांची पुष्कळ मदत झाली व त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहें.

हें काव्य माझ्या वडिलांनीं प्रथम इ. स. १९२४ मध्यें प्रसिद्ध केलें, तेव्हां मी शाळेंत जाणारा विद्यार्थी होतों व त्यांच्याच सांगण्यावरून मी तें माझ्या आईला व आजीला रोज थोडंथोडें वाचून दाखवीत असें. त्यानंतर आज ४२ वर्षांनीं सामराजाच्या या काव्याच्या तिसऱ्या आवृत्तीला माझा थोडा हातभार लागेल अशी तेव्हां मला पुसटहि कल्पना नव्हती.

पुणें विद्यापीठ, पुणें ७.
ता. १५ फेब्रुवारी १९६६

शं. गो. तुळपुळे

# उपोद्घात

प्रख्यात वाङ्मयसेवक कै. विनायकराव भावे ह्यांनी १९०५ सालीं सामराजाचें रुक्मिणीहरण काव्य ' महाराष्ट्रकवींत ' छापून प्रसिद्ध केलें. त्यानंतर १९२४ सालीं मीं या काव्याची एक सटीप आवृत्ति काढली. सामराज कवीसंबंधीं त्यावेळीं उपलब्ध असलेल्या माहितीपेक्षां आतां कांहीं अधिक माहिती मिळाली आहे, व मिळालेल्या माहितीवरून या कवीच्या कालासंबंधीं अनुमानें निघालीं आहेत. या सर्व कामगिरीचें श्रेय श्री. प्रल्हाद धोंडो कानिटकर, व श्री गोविंद रामचंद्र राजोपाध्ये, ह्या अभ्यासकांना दिलें पाहिजे. उभयतांचाहि अभ्यास परिश्रमपूर्वक केलेला असून तो सखोल व विवेचक झाला आहे.

सामराजाच्या ' मुद्गलाख्याना ' त त्यानें स्वतांविषयीं फक्त एकदां शेवटच्या श्लोकांत उल्लेख केला आहे. तो श्लोक असा :--

शाकल्यान्वयसागरीं जनि असे ज्याची महा शुद्धता,
आल्हादी द्विजराज लक्ष्मण सुधी जाणा जयाचा पिता,
काशी हे विमळा जयास जननी, मंदाकिनी सोदरी,
केली मुद्गलदैवतस्तुति पहा त्या सामराजें बरी. ॥ १ ॥

मुद्गलाख्यान, श्लोक २६०

वरील श्लोकांत कवीनें आपलें गोत्र शाकल्य, वडील लक्ष्मण, आई काशी, बहीण मंदाकिनी व कुलदैवत मुद्गल असा उल्लेख केला आहे. श्री. राजोपाध्ये व श्री. कानिटकर ह्यांनीं आपले लेख प्रसिद्ध करीतोंपर्यंत या माहितीपलीकडे सामराजासंबंधीं सर्वस्वी अज्ञान होतें, असें म्हणण्यास हरकत नाहीं. श्री. राजोपाध्ये यांनीं ह्याच कवीचें ' मुद्गलाख्यान ' विस्तृत प्रस्तावना व यथायोग्य टीपा देऊन १९३० सालीं प्रसिद्ध केलें. कोल्हापूरचे श्री. आप्पासाहेब राजोपाध्ये यांजकडून मिळालेल्या ' मुद्गलाख्याना ' च्या पोथीचा, सामराजाच्या वंशावळीचा व इतर माहितीचा राजोपाध्यांनी आपल्या 'मुद्गलाख्याना'च्या प्रतींत उपयोग केला आहे. त्यामुळें आतां आपल्याला सामराजासंबंधीं पुढील माहिती मिळते.

सामराजाच्या वंशाचे मूळ पुरुष श्रीमुद्गलाचार्य गोसावी हे असून वंशांतील तेरावा पुरुष लक्ष्मण यास दोन बायकांचे दोन मुलगे होते. वडील पत्नीचा मल्हारभट व धाकटीचा शामभट. मल्हाररावापासून साताऱ्च्या पंडितरावांची शाखा सुरू झाली, व शामभटांपासून कोल्हापूरच्या राजोपाध्यांच्या शाखेला आरंभ झाला. कोल्हापूरच्या शाखेस प्रथम पन्हाळकर असें नांव होतें व तें या शामभटापासूनच पडलें. हाच शामभट 'मुद्गलाख्याना'चा व 'रुक्मिणीहरणा'चा कर्ता सामराज. हें घराणें ऋग्वेदी आश्वलायनसूत्री, शाकल्य गोत्राचें आहे. तुळजापूरची देवी व जेजुरीचा मल्लारी ह्या घराण्याचीं कुलदैवतें आहेत. आर्धांचा मुद्गलेश्वर हाहि यांचें कुलदैवत किंवा कुलस्वामी आहे.

ह्या घराण्याचे मूळ पुरुष मुद्गलाचार्य गोसावी हे उदेपूरच्या भोसले घराण्याचे पुरोहित होते असें म्हणतात. शिवाजी महाराजांचे पणजे बाबाजी भोसले यांचे-बरोबर शामभटाचे आजे मल्हारभट हे होते. यांचे पुत्र लक्ष्मणभट ह्यांनी मालोजी भोसल्याचें लग्न फलटणचे निंबाळकर नाईक देशमुख यांच्या बहिणीशीं ठरविलें. लक्ष्मणभट मालोजीबरोबर खानदेश, नगर, सातारा वगैरे प्रांतीं फिरत असतांना शामभट त्यांचेबरोबर होते. राज्याभिषेकापूर्वी शिवाजी महाराजांनीं बाळंभट नांवाच्या ब्राह्मणाची पूजा केल्याचा उल्लेख सभासदी बखरींत आहे. या बाळंभटास शामभटाचे वंशांतील रामेश्वरभटांचे चिरंजीव प्रभाकरभट ह्यानीं दत्तक घेतलें होतें. हें दत्तकपत्र शके १५९६, आनंदनाम संवत्सर, आषाढ शु॥ ११, शुक्रवार, या मितीचें आहे. या कागदावरच्या साक्षीदारांच्या सह्यांत शामभटांची सही आहे. यावरून ते शिवाजीमहाराजांचे दरबारीं गेले असावे.

'मुद्गलाख्यानां'त सामराजानें तीर्थयात्रा प्रकरण घातलें आहे. या तीर्थयात्रेचें इतकें सुसंगत वर्णन कवीला स्वतां यात्रा किंवा प्रवास केल्याशिवाय करतां आलें नसावें. पुढें शामभट राजाराम महाराजांबरोबर पन्हाळ्यास गेले, व त्यावरून त्यांना पन्हाळकर हें नांव पडलें. शेवटीं ते राजाराम महाराजांबरोबर सिंहगडास गेले व तेथेंच त्यांचा अंत झाला.

भोसले वंशांतील बाबाजी, मालोजी, शहाजी यांचे समकालीन त्यांच्या उपाध्यायांचे वंशांतील मल्हारभट, लक्ष्मणभट व लक्ष्मणभटाचे चिरंजीव मल्हारभट हे अनुक्रमें होते. हे सरासरीनें समवयस्क मानण्यास हरकत नाहीं. श. १५७५ च्या

सुमारास, म्हणजे ' राधामाधवविलासचंपू ' त वर्णिलेल्या शहाजीच्या दरबारच्या कालाचे सुमारास शहाजीचें वय, त्याचा जन्मशक १५२४ धरल्यास, अदमासें ५० वर्षांचें होतें. शहाजी मालोजीस प्रौढ वयांत झाला होता. तो मल्हारभटापेक्षां वयानें थोडा लहान असावा. मल्हारभटाचें वय ५७।५८ असावें. त्याचा सावत्र भाऊ शामभट हा त्याच्यापेक्षां १५।२० वर्षांनीं लहान असल्यास शामभटाचें वय ४०।४२ धरावें. यावरून त्याचा जन्म श. १५३५ च्या सुमारास झाला असावा. मालोजी व शामभटाचे वडील लक्ष्मणभट हे समवयस्क मानल्यास लक्ष्मणभटाचें वय ५५।६० असावें. मल्हारभट श. १६१० चे सुमारास निवर्तला. त्याचें वय ९०।९५ असावें. शामभट श. १६२२ च्या सुमारास कैलासवासी झाले. त्यांचें वय त्यावेळीं ९० चे सुमारास असावें.*

श्री. राजोपाध्यांनीं सामराजाच्या कालाविषयीं दिलेली माहिती व तिच्यावरून त्यांनीं काढिलेली अनुमानपरंपरा विचारणीय आहे यांत शंका नाहीं. यांनीं आपला कालनिर्णय श्री. आप्पासाहेब राजोपाध्ये यांच्याकडून मिळालेल्या सामराजाच्या वंशावळीवर व इतर माहितीच्या आधारावर केला आहे.

श्री. प्रल्हाद धोंडो कानिटकर ह्यांनीं आपला कालनिर्णय ठरविण्याकरितां इतर साधनांचा उपयोग केला आहे, तो असा :

( १ ) ' रुक्मिणीहरणा ' च्या तिसऱ्या सर्गांत लग्नाच्या तयारीचें वर्णन करतांना सामराजानें फळांच्या वर्णनासाठीं ४८ व ४९ हे दोन श्लोक घातले आहेत. अशाच प्रकारचीं फळांचीं वर्णनें नागेश कवीच्या ' सीतास्वयंवरांत 'त ( श्लोक ९५, ९६, ९७ ) व समर्थांच्या ' ब्रह्मारण्यवर्णनां 'त ( ओव्या ३–१० ) आलीं आहेत. नागेश कवि कै. भाव्यांच्या म्हणण्याप्रमाणें सोळाव्या शतकाच्या तृतीय पादांत झाला. समर्थांचें ' महाबळेश्वरवर्णन ' श. १५६६ सालीं केलें आहे. तें ' शिवचरित्रप्रदीपां 'त दिलें आहे. या तिन्ही कवींच्या फळांच्या यादींत ' बादाम ' व ' कविठ ' हीं दोन नांवें महत्त्वाचीं येतात. हल्लीं या फळांना आपण 'बदाम' व 'कवठ' म्हणतों. हीं फळांचीं वर्णनें पाहतां व ' बादाम ' व ' कविठ ' हीं विशिष्ट रूपें लक्षांत घेतां हे तिघेहि कवी समकालीन असावेत असें दिसतें. समर्थांचें वर्णन श. १५६६ मधलें आहे. नागेशाचें श. १५७०–७५ च्या सुमाराचें. त्याच सुमारास सामराज

* राजोपाध्ये यांचें ' मुद्गलाख्यान ' –उपोद्घात, पृष्ठें १–४.

झाला असावा. नागेश व 'राधामाधवविलासचंपू'चा कर्ता जयराज पिंड्ये या दोन्ही कवींची भाषापद्धति समकालीन असावी. 'राधामाधवविलासचंपू' श.१५७५ ते १५८० च्या दरम्यान झाला असावा असें कै. राजवाड्यांचें मत आहे. त्या अनुरोधानें नागेशाच्या 'सीतास्वयंवरा'चा काल धरला आहे. सामराजानें 'रुक्मिणी-हरण', नागेशानें 'सीतास्वयंवर', जयराम पिंड्ये यानें 'राधामाधवविलासचंपू' व परमानंदानें 'शिवभारत' असे ग्रंथ लिहिले. 'शिवभारता'चा काल श्री. दिवेकरांच्या मतें श. १५८३ ते १५९६ असावा. तेव्हां हे चारी कवी समकालीन दिसतात. ह्या सर्व कवींचे कांहीं उल्लेख अगदीं सारखे आहेत. त्यांवरून सामराजाचा काल ठरविण्यास मदत होते.

( २ ) स्त्रियांचे अलंकारवाचक शब्द सर्वकाळीं सारखे नसतात. निरनिराळ्या काळांतील काव्यांत त्यांचीं भिन्न भिन्न वर्णनें येतात. तसेंच कांहीं अलंकार विशिष्ट प्रांताचे असतात. अलंकारवाचक शब्दांमुळें, तसेंच वस्त्रादिकांच्या वर्णनामुळें लेखकाचा काळ ठरविण्यास मदत होते. वरील कवींच्या काव्यांत नासालंकारा-करितां पर्यायवाचक शब्द आलेले आहेत. त्यांत 'मोर' हा अलंकार सर्वांनीं दिलेला आहे. सामराजाच्या काव्यांत 'नथ,' 'वेसर,' 'मोतीं' व 'मोर' हे शब्द आढळतात; नागेशांत सामराजाचे चाऱ्ही शब्द असून त्यांशिवाय तो 'फुली' हा आणखी एक वापरतो; जयराम 'मोरा'चा निर्देश करतो; व परमानंद 'मयूरिका' ( मोर ) असा त्याच अर्थी संस्कृत शब्द योजतो. नागेश भृंगीपूर ( भिंगार ) येथें राहणारा, जयराम नासिकप्रांतीं राहणारा व कवींद्र परमानंद निधिवास ( नेवासें ) येथील राहणारा. यावरून 'मोर' हा अलंकार ह्या कवींच्या काळीं नगरनाशिक-प्रांतीं प्रचारांत होता. तेव्हां सामराजही त्याच प्रांतांतला व त्या काळचा असावा.

( ३ ) सामराज, नागेश व जयराम ह्या तिघांच्याही काव्यांत फार्शी शब्द आढळतात. जयरामाच्या काव्यांत मराठी भाग थोडा आहे. नागेशाच्या काव्यांत फार्शी शब्दांचें प्रमाण अल्प आहे. त्याच्या चौपट पांचपट शब्द सामराजांत सांपडतात. ही बाब महत्त्वाची आहे. तिच्यामुळें सामराज श. १५५०–१५७५ च्या सुमारास झाला असावा ह्या विधानाला पुष्टि मिळते.

( ४ ) तुळजापूरची देवी तुकाई इचें माहात्म्य शहाजीराजे भोसले यांच्या काळीं फार वाढलें व तत्कालीन काव्यांत तिचा उल्लेख होऊं लागला. सामराज ( 'रु. ह.'

सर्ग ३, श्लो. ९६; सर्ग ६, श्लो. १०८), नागेश व जयराम या तिघांच्या काव्यांत या देवीचे उल्लेख आहेत. 'शिवभारत' तर शिवचरित्रात्मक. त्यांतील उल्लेखास या दृष्टीनें महत्त्व देतां येत नाहीं.

(५) जयराम, नागेश व सामराज या तिन्ही कवींनीं विशिष्ट शब्दांनीं यमकें साधलीं आहेत.

**नागेश :—**

बोले जळस्वामि पहा तमासा । पळून गेला उदकांत मासा ॥
लावी महामारुत लोक झासा । गुंतोनि गेला मृग काय फांसा ॥
('सी. स्व.', श्लो. १०५)

**जयराम :—**

चत्वर अंतरिं अंबर घालुन कामजुवारिजु खोलतो खासा ।
यक्ष सुरासुर रक्ष चराचर लोक विलोकिति सर्व तमासा ॥
तारगणें मुगतापण ठाउन जिंति जगत्‌त्रय लाउन झासा ।
लावियला परिधींत सुधानिधि कांस्यामधें तेणें फेरुन फासा ॥ १ ॥
'रा. मा. वि. चं.', श्लो. ८१

**सामराज :—**

घातला दृढ गुणत्रय फासा ।
लाविशी हरि किती मज झांसा ॥ 'रु. ह.', स. ४–११७

(६) सामराजाच्या 'रुक्मिणीहरणां'तील कांहीं वर्णनें एकनाथाच्या काव्य-सृष्टींतील–रुक्मिणीस्वयंवरांतील आहेत. त्या कल्पनांना सामराजानें फक्त निराळा पेहराव चढविला आहे. नाथांचे शब्द सुद्धां सामराजानें उचलले आहेत. श्री. कानिटकरांनीं बरेच उतारे देऊन सामराजानें नाथांचें अनुकरण किती हुबेहूब केलें आहे हें दाखविलें आहे; व शेवटीं एकनाथानंतर सामराज झाला हें सांगितलें आहे.

(७) तुकारामाचे अभंग चाळल्यास सामराजानें योजलेले बहुतेक फार्शी शब्द त्यांत आढळतात. वामन पंडित, बीडकर विठ्ठल व आनंदतनय ह्यांच्या काव्यांत फार्शी शब्दांचें प्रमाण फारच थोडें आहे.

'रुक्मिणीहरण' काव्यांत समर्थवाङ्मयांतील तीन गोष्टींचा उल्लेख सांपडतो.

(१) लग्नाच्या तयारींतील फळांचें वर्णनांतील साम्य. (२) तिसऱ्या सर्गांत सामराजानें केलेल्या सायंकालच्या वर्णनांतील १०१ व्या श्लोकांतील "द्विजपति विसरेना सर्वथा स्वीय दीक्षा। कर पसरुन मागे वक्त्रलावण्य भीक्षा॥" ह्या चरणांत 'द्विजपति' व 'कर' हे शब्द श्लिष्ट आहेत. हा चरण वाचतांना, "ब्राह्मणाची नित्य दीक्षा। मागितली पाहिजे भिक्षा। ओम्‌भवति या पक्षा। रक्षिलें पाहिजे॥ (दा० द. १४, स. २.) ह्या प्रसिद्ध ओवीची आठवण होते. (३) सहाव्या सर्गांत रुक्मिणीच्या विवाहाकरितां आलेल्या अनेक पंथांच्या ब्राह्मणांत 'कित्येक तेथें अजपा जपेति' ॥ ४५ ॥ असा उल्लेख आहे. समर्थांनीं दासबोधांत (द. १७, स. ५) अजपानिरूपण केलें आहे. त्यास अनुसरून हा उल्लेख असावा असा भास होतो. वरील विवेचनावरून श्री. कानिटकरांनीं असें अनुमान काढलें आहे कीं, तुकाराम महाराजांच्या अभंगरचनेचा काळ व समर्थांच्या ब्रह्मारण्यवर्णनाचा काळ लक्षांत घेतां श. १५७०–१५७५ चे सुमारास सामराजानें 'रुक्मिणीहरण' रचिलें असा निष्कर्ष निघतो.

(८) या कालनिर्णयाच्या दृष्टीनें आणखी एक दोन साधनें विचारांत घेणें इष्ट आहे. विठ्ठल कळपूरकर यानें 'रासक्रीडा' नांवाचें काव्य श. १५३६ मध्यें लिहिलें. हें सर्व काव्य उपलब्ध नाहीं. तथापि त्यांतील आद्यंताचे कांहीं श्लोक कै. राजवाड्यांनीं 'सरस्वतीमंदिर' मासिकांत दिले आहेत. 'रुक्मिणी-हरणा'च्या पहिल्या सर्गांतील पहिल्या व तेहतिसाव्या श्लोकांत व 'रासक्रीडें'तील पुढील श्लोकांत विलक्षण साम्य दिसतें. हा श्लोक असा :—

गणपतिवरदानें स्फूर्ति अद्भूत आहे। मृदुपदरचनेचे श्लोक साहित्य पाहे॥
कुजन म्हणतिल वाचा काय भाषा मराठी। परि सुरस जनातें प्रीति
होईल मोठी॥ २२९॥

तसेंच,

जनक तूं जननी द्विरदानना। तुजविणें दुसऱ्यास भजेचिना॥
हरिकथा वदतां कवि विठ्ठला। करि कृपा शरणागतवत्सला॥ २॥

ह्या 'रासक्रीडे'च्या दुसऱ्या श्लोकांत व

'जनक हे जननी मजला नसे। यदुपती मज आस तुझी असे॥
'रु. ह.' स. ६–११३

या चरणद्वयांत साम्य दिसतें.

(९) जुन्नरचा रहिवासी ब्राह्मण लोलिंबराज यानें जगन्नाथपंडिताप्रमाणें रत्नकला नांवाच्या यवनीशीं लग्न केलें होतें. तिच्या अकालीं निधनानें त्यास उपरति होऊन तो महान् साधु झाला. त्यानें श. १५५६ मध्यें ' वैद्यजीवन ' नांवाचा ग्रंथ लिहिला. लोलिंबराजाच्या " लोलिंबराज व रत्नकलाचरित " या काव्यांतील भाषेची छाप ' रुक्मिणीहरणां ' त दृष्टीस पडते. उदाहरणार्थ,

१ अमृतमधुर ज्याचे श्लोक भूपाल नारी
पडत पडत कैसें कौतुकें कीर सारी ॥
हरि हृदयचि तो हा रूपविद्याविलासी
उठ सखि मजपासी आणि लोलीमकासी ॥ १ ॥
२ मजविण घडि कोठें जासि ना तूं रसाळे
न पुसत परलोका केंवि गेलीस बाळे ॥ २ ॥
३ चटपट सुटलीसे जीव कोठें न राहे
वदन धरुन हस्तीं एकली वाट पाहे ॥
करुनि सकल शोभा दर्पणीं रूप पाहे ।
पति अजुनि न ये कां हेंचि चिंतीत आहे ॥ ३ ॥

हे श्लोक व ' रु. ह. ' सर्ग ३ श्लोक १०८–११० यांतील भाषा सारखी वाटते. लोलिंबराज प्रसिद्ध होता. त्याचें काव्य सामराजानें पाहिलें असावें.

या सर्व विवेचनाचा निष्कर्ष श्री. कानिटकरांनीं असा काढला आहे : " एकनाथ, विठ्ठल कळपूरकर व लोलिंबराज यांचेनंतर सामराज झाला असावा; तुकाराम, समर्थ, वामनपंडित, नागेश, जयराम पिंड्ये व शिवभारतकार परमानंद यांचा सामराज समकालीन असावा; तसेंच वेणूबाई, बिडकर विठ्ठल, आनंदतनय हे सामराजानंतर झाले असावेत. "*

श्री कानिटकरांच्या वरील उल्लेखांचा विचार करण्यासारखा आहे यांत शंका नाहीं. तथापि फार्शी शब्दांच्या प्रमाणावर बांधलेलें अनुमान तितकें अचूक वाटत नाहीं. सामराजानें 'राजव्यवहारकोशां'तून आपले शब्द घेतले असें म्हणण्या-

* " रुक्मिणीहरण-निरीक्षण " –पृष्ठ १–१०

पेक्षां हा प्रतिभासंपन्न कवि या कोशापूर्वी ( श. १५९६–९८ ) झाला असला पाहिजे असा विचार करणें अधिक सयुक्तिक होईल. त्याप्रमाणेंच समर्थ-वाङ्मयांतील दर्शविलेलीं तीन साम्यें हीं तितकींशीं महत्त्वाचीं नाहींत. त्यांतील शेवटचीं दोन तर ओढूनताणून काढल्यासारखीं दिसतात. फळांचीं वर्णनेंही या प्रकारचींच. सामराजाच्या कालनिर्णयासंबंधीं प्रो. पंगूचें मत ग्राह्य वाटतें. "सामराज वामनाचा समकालीन असून त्यानें पंडितांची काव्यकृति पाहिली असावी. यास अनुसरून श्री. राजोपाध्ये यांनीं गीताचंद्रिकेवरून श. १६०५ हा जो त्याचा काल ठरविला आहे तोच ग्राह्य वाटतो. अर्थात् १६०५ शके, हा सामराजाच्या उतारवयाचा काल होय, हें लक्षांत घेतलें पाहिजे. तस्मात् श. १५५०–१६०० या काळांत सामराजानें आपलें ' रु. ह. ' रचलें असावें. " *

रुक्मिणीस्वयंवराच्या प्रसंगावर मराठी व महानुभावपंथीय कवींनीं तीस–बत्तीस काव्यें रचिलीं आहेत. हा कथाभाग श्रीमद्भागवताच्या दशम स्कंदाच्या ५२ व ५३ या अध्यायांत आला आहे. सामराजानें आपल्या काव्याला हे अध्याय आधार म्हणून घेतलेच आहेत, पण त्यांशिवाय भागवत स्कंद १०, अध्याय ४१ व ५०, तसेंच ' माघकाव्य ' सर्ग ३ व सर्ग १३, श्लो. ३१–४८, नैषधचरित्र सर्ग ४ व १५, रघुवंश सर्ग ७, श्लो. ५–१२ इत्यादि संस्कृत काव्यें व इतर सुभाषितें ह्यांचाहि उपयोग केला आहे. श्री. कानिटकरांनीं त्या त्या ग्रंथांतील उल्लेख दाखविले आहेत. ( वि. ज्ञा. वि. वर्ष ५९, अं. ३ ).

संस्कृत ग्रंथांप्रमाणें मराठींतील नाथांच्या ' रुक्मिणीस्वयंवरा 'चा अनुवादहि केलेला दृष्टीस पडतो. यासंबंधीं लिहितांना, श्री. कानिटकरांनीं 'सामराज जरी बऱ्याच उच्च दर्जाचा कवि आहे, तरी त्यानेंहि नाथांच्या साहित्याची चोरी केली आहे,' असे एक विधान केलें आहे. हें विधान त्यांनीं मुद्दाम जाणून केलें असेल असें त्यांच्या एकंदर लिखाणावरून व सामराजाविषयींच्या आदरावरून वाटत नाहीं. तथापि हल्लींच्या वाङ्मयवातावरणांत ' वाङ्मयचौर्य ' या शब्दाला फाजील महत्त्व आल्यामुळें त्याच्या उपयोगानें केव्हां केव्हां लेखकाविषयीं अवास्तव प्रतिकूल ग्रह उत्पन्न होण्याचा संभव असतो. सामराजाच्या अनुकरणाला 'चोरी' म्हणण्याचें कारण नाहीं. ग्रंथांचा उत्तम अभ्यास होऊन ते आवडते झाले म्हणजे त्यांच्या सतत वाचनानें

* प्रा. पंगु–" सामराज. " पृ. ५९

त्या त्या ग्रंथांची भाषा, त्यांतील कल्पना व शब्द आत्मसात् होऊन स्वाभाविकपणें केव्हां कळून, केव्हां न कळून, त्यांचा अनुवाद लेखकाच्या लिखाणांत होत असतो. त्यांत त्यांना मूळ थोर ग्रंथकारांचा उल्लेख न करून आपल्या स्वतंत्र प्रतिभेचा टेंभा मिरवायचा असतो असें नाहीं. सहज जातां जातां एक उदाहरण देतों. पंतांच्या श्लोक-केकावलीच्या पद्धतीचे, भाषेचें, कल्पनांचें कितीतरी आधुनिक कवींनीं पंतांचा किंवा त्यांच्या काव्याचा नामनिर्देश न करतां अनुकरण केलें आहे. तथापि या कवींवर वाङ्मयचौर्याचा आरोप करणें वाजवी होणार नाहीं, व तसा कोणीं केलेलाहि नाहीं. नसती योग्यता व महत्त्व मिळविण्याकरितां जेव्हां खरोखरीच एखाद्यानें वाङ्मयचौर्य केलें असेल, तेव्हां त्याला समाजापुढें अवश्य खेंचून आणावें. परंतु संवय किंवा धंदा म्हणून वेळीं अवेळीं ही कामगिरी अंगावर घेणें इष्ट नाहीं. सामराजानें आपलें सर्व ऋण एकदांच कबूल केलें आहे. तो म्हणतो,

जे बोलिली भागवतीं पुराणीं । **विस्तारिली जी पुरुषीं पुराणीं ।**

अशी भागवतांत सांगितलेली व पूर्वीच्या कवींनीं विस्तारानें लिहिलेली कथा मी रचतों. शिवाय नाथांचा 'रुक्मिणीस्वयंवर' हा ग्रंथ सर्वत्र पूज्य असून सर्वांच्या वाचनांत असल्यामुळें सामराजानें त्याचा केलेला अनुवाद सहज ध्यानांत येण्यासारखा होता. आणखी एक गोष्ट अशी कीं, सामराजाची दृष्टि लौकिक कीर्ती मिळविण्यापेक्षां ईश्वरभक्तीकडे अधिक होती. तो सर्ग १, श्लोक ३३, ३४ यांत आवर्जून म्हणतो,

असे मऱ्हाटी निजदेशभाषा । न येत उक्ती बहुशा विशेषा ॥
तथापि जे कीं निजभक्त तूझे । न पाहती हे गुणदोष माझे ॥ ३३ ॥
अगत्य नाहीं जनरंजनाचें । लागे तुझें ध्यान निरंजनाचें ॥
आराधनीं अन्य उपाय नाहीं । समर्पितों याच उपायनाही ॥ ३४ ॥

अशा प्रकारें मोठ्या लीनतेनें आपल्याकडे कमीपणा घेऊन भक्तिपूर्वक परमेश्वर-कथा गाणारा हा कवि वाङ्मयचौर्याच्या आधुनिक भानगडींत कशाला पडेल ?

सामराजाचें 'रुक्मिणीहरण' वाचीत असतां या काव्याचे एकदोन विशेष सहज लक्षांत येतात. या काव्यांतील बराचसा भाग संस्कृत काव्यांच्या धर्तीवर रचलेला असून त्यावरून संस्कृत काव्य व साहित्यशास्त्र यांच्याशीं कवीचा दृढ परिचय असला पाहिजे, हें स्पष्ट दिसून येतें. एकंदर काव्याची अंतर्बाह्य रचना, त्याची ठेवण, सर्गांचीं

नांवें व त्यांची मांडणी, निरनिराळ्या प्रसंगांचीं संस्कृत काव्यांतील त्या त्या प्रसंगाशीं मिळणारीं वर्णनें, उदाहरणार्थ, दुसऱ्या सर्गांतील आरंभींचें भीमक राजाचें वर्णन, त्याची प्रजापालन-तत्परता, त्यानंतर गरोदर राज्ञीचें वर्णन इ. पाहिलीं म्हणजे कवीचा ' रघुवंशा 'दि काव्यांशीं उत्तम परिचय दिसून येतो. इतकेंच नव्हे, तर रुक्मिणीच्या आईचें गर्भारपणांतील वर्णन करीत असतांना कालिदासाचें ' रघुवंशां 'तील तिसऱ्या सर्गांतील वर्णन कवीपुढें निःसंशय असलें पाहिजे. त्याचप्रमाणें तृतीय सर्गांतील रुक्मिणीचा भाऊ रुक्मि यानें केलेल्या कृष्णनिंदे-वरून ' कुमारसंभवां 'तील बटूच्या शिवनिंदेची आठवण होते. तसेंच पांचव्या सर्गांतील १०७ व त्यापुढील श्लोकांत आलेलें रुक्मिणीचें प्रत्यवयववर्णन पाहून ' कुमारसंभवां 'तील पार्वतीच्या वर्णनाचा भास होतो. अशीं आणखीहि उदाहरणें देतां येतील.

सामराजाचा संस्कृत ग्रंथांशीं असलेला परिचय दुसऱ्याहि एका गोष्टीमुळें व्यक्त होतो. या काव्यांत पुष्कळसे संस्कृत शब्द, संस्कृतप्रचुर दीर्घसमास व कित्येक ठिकाणीं वाक्यरचना दृष्टीस पडतात. तसेंच कवीनें योजिलेल्या उपमादृष्टांतादि अलंकारांतील कल्पना संस्कृत-काव्यांत नेहमीं आढळणाऱ्या आहेत. या काव्यांत आलेल्या अनेक अलंकारांवरून कवीचें साहित्यशास्त्रांतील प्राविण्य व्यक्त होतें.

अशा प्रकारें या काव्यांत जरी संस्कृताचें वर्चस्व सर्वत्र दिसत असलें, तरी त्यांत अशींहि कांहीं स्थळें आहेत कीं, त्या ठिकाणीं जुन्या शुद्ध मराठी वळणाच्या काव्याची आठवण होते. मातापितरांना न जुमानतां कृष्णद्वेषी रुक्मि आपल्या बहिणीच्या लग्नाची तयारी करीत असतां त्या वर्णनांत येणाऱ्या वस्त्रपात्र, दाग-दागिने, जडजवाहीर, लग्नसाहित्य इत्यादिकांच्या लांबलचक ठराविक पद्धतीच्या याद्या इतर मराठी काव्यांप्रमाणें येथेंहि पहावयास सांपडतात. या याद्या वाचूं लागलें म्हणजे संस्कृत काव्यवातावरण विसरून जाऊन आपण आनंदतनय, नागेश, विठ्ठल अशांच्यासारखें एखादें मराठी काव्य वाचीत आहों असा भास होतो. तसेंच पहिल्या सर्गांतील भवार्णव व त्याचें दुस्तरत्व याचें वर्णन, मराठी कवींच्या रिवाजाप्रमाणें काव्यग्रथनाचा उल्लेख, कवीचा परमेश्वरकथावर्णनाकडे ओढा, जुने प्राकृत शब्द तशींच जुनीं, अपरिचित अशीं शब्दांचीं रूपें, वृत्तानुरोधास्तव अक्षरांच्या ऱ्हस्व-दीर्घत्वाकडे कांहींसें दुर्लक्ष, व क्वचित् अशुद्ध शब्दरूपांची योजना वगैरे जुन्या मराठी काव्याचे बरेवाईट विशेष सामराजांत सर्वत्र आढळतात.

सामराजाच्या काव्यांतील मुख्य गुण प्रसाद. प्रस्तुत काव्याचें साधारणपणें कोणतेंही पान उघडून वाचलें असतां त्यांत हा गुण सहज दृष्टीस पडतो. जुन्या अपरिचित शब्दांनीं क्वचित् प्रसंगीं काव्य दुर्बोध झालें आहे; ऱ्हस्वदीर्घांच्या दुर्लक्षामुळें कांहीं श्लोक कर्णकटु होतात; वस्त्रपात्रादिकांच्या याद्या नीरस व कंटाळवाण्या वाटतात. पण अशा प्रकारचे साधारणपणें जुन्या मराठी काव्यांत सरसहा आढळणारे दोष या काव्यांत एकंदर काव्याच्या मानानें थोडे आहेत. या लांब लांब याद्या कंटाळवाण्या व नीरस असल्या तरी तत्कालीन सामाजिक आचारविचार समजण्यास त्यांचा चांगला उपयोग होतो. एकंदरीनें पाहतां प्रस्तुत काव्य वाचकांना प्रासादिक व सुरस वाटेल. प्रसादाला प्रतिभेची जोडही चांगली मिळाली आहे. पहिल्या सर्गांतील संसारसमुद्राचें उत्कृष्ट रूपक, दुसऱ्या सर्गांतील रुक्मिणीचा जन्म, तिची बाल्यावस्था व त्यानंतर तिसऱ्या सर्गांत वर्णिलेली तारुण्यदशेंतील श्रीकृष्णवियोगामुळें उत्पन्न झालेली विरहावस्था, चवथ्या सर्गातील सुदेव ब्राह्मण व त्याबरोबर पाठविलेली प्रणयपत्रिका, सुदेवाचें प्रवासवर्णन, त्याचा मनास उपदेश वगैरे प्रसंग कवीच्या प्रतिभेची व मनोरम वर्णनशैलीची साक्ष देतात. सामराजाच्या सृष्टिवर्णनांचा नमुना म्हणून पुढील श्लोक पाहण्यासारखे आहेत. त्यावरून त्याच्या अंगचे प्रसाद व माधुर्य हे गुण व्यक्त होतात.

## सायंकाळवर्णन

वदत वदत ऐसें सांज होण्यास आली,
दिनकरकरलक्ष्मी सर्व संक्षीण झाली।
मुखकमल तियेचें म्लान अत्यंत देखे,
म्हणवुनि कमलांचा बंधु बांधव्य राखे ॥ १ ॥

सहज दिनमणी हा अस्त होतांच, एकी
प्रियतमविरहानें क्रंदती चक्रवाकी।
विधिविहितनियोगें वारुणी आदरीली,
म्हणुनि चरम संध्या काय आरक्त झाली ॥ २ ॥

तदुपरि उगवे हा चंद्रमा पौर्णिमेचा
अनभिलषित अर्थी होय हा उत्तमेचा।

द्विजपति विसरेना सर्वथा स्वीय दीक्षा
कर पसरुनि मागे वक्त्रलावण्य भीक्षा ॥ ३ ॥
हिमकरकर जैसे कांतिपूर स्रवेनी
हळुच तसतसे ते चंद्रकांत द्रवेती ।
क्षुधिततर चकोरां पारणें थोर जालें.
मुकुलित कुमुदांला जन्मसाफल्य आलें ॥ ४ ॥
तुहिनकर नव्हे, हें बीज चितालतेचें;
विकसित अथवा हें पुष्प उद्वेगतेचें ।
अभिनव मदनाचें छत्र किंवा उभारें,
युवतिजन जयाच्या दर्शनें मात्र भारे ॥ ५ ॥
नभ धवलित केलें, विश्व आनंदवीलें,
परि विरहिजनाचें चित्त उन्मादवीलें ।
क्षणभरि मज बाई याकडे पाहवेना.
प्रलयदहनकल्प स्पर्श हा सोसवेना ॥ ६ ॥

( सर्ग ३ )

संध्याकाळ व चंद्रोदय यांचें हें वर्णन संस्कृत काव्यपद्धतीचें आहे. त्यांतील कल्पना संस्कृत काव्यांत नेहमीं आढळणाऱ्या आहेत. सामराजानेंही तेथूनच त्या घेतल्या असाव्यात. तथापि कवीनें त्या आत्मसात् केल्या आहेत. या वर्णनांत कवीची प्रासादिक वाणी व भाषाप्रभुत्व हीं चांगलीं व्यक्त होतात. अशाच तऱ्हेचें एक प्रातःकालवर्णन पुढें आलें आहे. मराठी काव्यांत सृष्टिवर्णन मुळींच नसतें असें वाटणाऱ्या मंडळींनीं हीं वर्णनें अवश्य वाचून पाहावींत. या ठिकाणीं एक गोष्ट कबूल केली पाहिजे कीं, इंग्रजी कवींप्रमाणें किंवा तदनुयायी आधुनिक मराठी कवींप्रमाणें स्वतंत्र काव्यविषय म्हणून जुन्या कवींनीं सृष्टि वर्णिली नाहीं, किंवा ती वर्णन करतांना उच्च कल्पनांच्या भराऱ्या मारलेल्या नाहींत त्याचें कारण त्यांची काव्यविषयक कल्पना व काव्यध्येय भिन्न प्रकारचीं होतीं. तथापि मुख्य काव्यविषयांत ओघानें जर सृष्टिवैभव गाण्याचे प्रसंग आले तर ते ते वायां जाऊं देत नाहींत. मुक्तेश्वरमोरोपंतादिकांच्या काव्यांत अशीं सुंदर वर्णनें दृष्टीस पडतात. कांहीं उत्तम नमुने हवे असल्यास मुक्तेश्वराच्या महाभारतांतील आदिपर्व, अध्याय २७ यांतील हिमालयवर्णन, अध्याय ३६ मधील रात्रीचें वर्णन, वगैरे पाहावींत.

स्थल, काल, प्रसंग इत्यादिकांचें यथायोग्य वर्णन करण्याची हातोटी सामराजास चांगली साधली आहे. नितक्याच मर्फाईनें तो मानवी स्वभावाचें चित्र काढतो. रुक्मिणीच्या आईला आपल्या लाडक्या लेकीच्या लग्नाविषयीं लागलेली काळजी, तिनें तेवढ्याकरितां निरनिराळ्या देवतांस केलेल्या प्रार्थना व नवस, मुलीच्या श्रीकृष्णाशीं होणाऱ्या विवाहामुळें झालेला आनंद, रुक्मिणी आतां दुसऱ्याची होऊन आपल्याला कायमची अंतरणार म्हणून तिच्या मातृहृदयाला होणारें वियोगजन्य दुःख, व शेवटीं देवीच्या देवालयाकडे जाण्याकरितां निघालेल्या रुक्मिणीला तिनें मातृप्रेमानें प्रेरित होऊन केलेला बिनमोल उपदेश वगैरे वाचतांना खऱ्या प्रेमळ मातेची मूर्ति डोळ्यांपुढें उभी राहते. त्याचप्रमाणें श्रीकृष्णाकडे रुक्मिणीची पत्रिका नेणारा सुदेव ब्राह्मण व त्याची ग्राष्ट पत्नी यांचीं स्वभावचित्रें सरस उतरलीं आहेत. एखाद्या प्रसंगाचें किंवा व्यक्तीचें वर्णन करतांना बारीकसारीक गोष्टी सुद्धां सामराजाच्या निरीक्षणांतून सुटत नाहींत हें पाहिलें म्हणजे त्याचा अनुभव, सूक्ष्म निरीक्षण व मानवी स्वभावाचें ज्ञान प्रत्यंतरास येतात. श्रीकृष्णाला देण्याकरितां सुदेवाजवळ लिखित प्रेमपत्रिका देऊन तोंडीं निरोप सांगतांना, श्रीकृष्ण ‘ कार्यांतरीं रक्त असेल जेव्हां, करूं नको गोष्टि मदीय तेव्हां ’; तर, ‘ त्याचे मनीं हा मज ठाव व्हावा, प्रसंग गेला बरवा पहावा ’, असें रुक्मिणी त्याला बजावून सांगते. सहाव्या सर्गांत विवाहाकरितां अनेक प्रांतांतून आलेल्या वऱ्हाडी मंडळींचीं विनोदी व मार्मिक वर्णनें आलीं आहेत. त्यांत निरनिराळ्या देशांतील रहिवाश्यांचें स्वभाववैचित्र्य, नैय्यायिक, वेदांती वगैरे मंडळींचा आप-आपल्या पंथाविषयींचा अभिमान व त्यांच्यांतील वादविवाद वगैरे वर्णनें विनोद-पूर्ण व मनोरंजक आहेत. सामराज मधून मधून विनोदाची झुळूक चांगली दाखवितो. विवाहसाहित्याचें तळण पडलें असतांना—

बसेत जेव्हां तळणें तळाया। तें अर्भकें धांवति आतळाया ॥
आकांत होती बहु लेकरांचे। वाजेत तेथें धक्के करांचे ॥

किंवा जेवणानंतर आंचवतांना हाताला माती लावणारा सुदेव ब्राह्मण जेव्हां,—

सुरभि सलिल देती कस्तुरी आंचवाया,
स्थविर तदपि लागे मृत्तिका चांचपाया ॥

किंवा,

शिवा युद्धासाठीं अतिशयित त्याची थरथरी।

असें कलहप्रिय नारदाचें वर्णन वाचतांना त्यांतील विनोदानें कोणास हसूं लोटणार नाहीं ? हा सर्व विनोद स्वभावजन्य व अबोंचक असून शुद्ध सात्त्विक वृत्तीनें केलेला आहे हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

प्रस्तुत काव्यांत अलंकारांची इतकी रेलचेल झाली आहे कीं, पुष्कळदां आपण एखादें संस्कृत काव्य वाचीत आहोंत असा भास होतो. संस्कृत काव्याचा सामराजावर किती परिणाम झाला होता हें मागें सांगितलेंच आहे. मोरोपंतांची ‘ केकावलि ’ व रघुनाथपंडितांचें ‘ नलदमयंती स्वयंवराख्यान ’ या प्रख्यात काव्यांत असाच अलंकारांचा भरणा आहे. रघुनाथपंडितांचें काव्य पुष्कळ अंशीं सामराजाच्या ‘ रुक्मिणीहरणा ’सारखें आहे. पण सामराजांत पंडितांपेक्षां प्रसाद अधिक असल्यामुळें रुक्मिणीहरणाची रचना अधिक स्वाभाविक व मनोहर वाटते. कृत्रिम रचनेमुळें दुसरें काव्य कांहींसें क्लिष्ट झालें आहे.

रुक्मिणीस्वयंवराच्या प्रसंगावर तीसबत्तीस कवींनीं ग्रंथरचना केली. त्यांत सामराजाच्या काव्याची पायरी फार वरची आहे. मूळ कथा जरी एकच असली, तरी तिला काव्याचा पेहेराव चढवितांना कवीनें आपलें कौशल्य खर्च केलें आहे. आधीं मूळ कथानक फार गोड व काव्यविषय होण्यास अत्यंत अनुकूल असून त्यांत शृंगारादि रस व स्वभाववैचित्र्य यांस पूर्ण अवसर आहे. शिवाय सामराजानें कांहीं प्रसंग अगदीं स्वतंत्रपणें स्वतःचे घातल्यामुळें या काव्याचें सौंदर्य दुणावलें आहे. रुक्मिणीचा विरहसंताप, सुदेवपत्नीचा जळफळाट, सुदेव द्वारकेस जात असतां त्यानें केलेला मनास उपदेश, रुक्मिणी सासरीं जातांना तिच्या आईची मनःस्थिति व तिनें लेकीला केलेला बहुमोल उपदेश इत्यादि भाग कवीचे स्वतःचे म्हणून दाखविण्यास हरकत नाहीं. उत्तम सुपीक जमीन पाहून एखाद्या कुशल मालाकाराने मोठ्या चतुराईने तिच्यावर सुंदर बगीचा उठवावा,त्याप्रमाणें काव्याला सर्वोतोपरी योग्य असा रुक्मिणीहरणाचा प्रसंग निवडून प्रतिभादि गुणांच्या जोरावर कवीनें हें उत्कृष्ट काव्य निर्माण केलें. त्यांतील वर्णनसौंदर्य मागें दाखविलेंच आहे. स्वभाववर्णनाची चतुराईही आपण पाहिली. कवीचें कल्पनास्वातंत्र्य व्यक्त करणारे बरेच प्रसंग प्रस्तुत काव्यांत आहेत; पण त्याची लांबलचक यादी न देतां त्यांतील विशेष बहारीचे प्रसंग आहेत, त्यांपैकीं थोड्यांचा येथें उल्लेख करतों.

पहिल्या सर्गांत कथेची प्रस्तावना करतांना कवीनें संसारार्णवाच्या दुस्तरत्वाचें वर्णन करतांना,—

आयु:पयाचा अति गोड प्याला। हळू हळू काळबिडाल प्याला।

ही सुंदर व नवी कल्पना आणली आहे. चवथ्या सर्गांत सुदेवनामा ब्राह्मण रुक्मिणीची प्रेमपत्रिका श्रीकृष्णास नेऊन देतो. हा सर्ग शाकुंतल नाटकाच्या चवथ्या अंकाप्रमाणें साग्र मनोहर झाला आहे. त्यांत लिखित पत्रिकेशिवाय रुक्मिणीनें कृष्णाला पाठविलेल्या तोंडी निरोपांत आपल्याला सत्वर घेऊन जाण्याविषयीं विनविलें आहे. हा सर्वच भाग मनोवेधक उतरला आहे. त्यांत कवीचें साहित्यनैपुण्य पूर्णपणें व्यक्त होतें, व वाचकाला कवीच्या "साहित्य-स्वारस्य समस्त वेंचे" (सर्ग १-४६) या वचनाची सार्थकता पटते. तसेंच रुक्मिणीच्या स्वभावचित्रांतील तिची कृष्णभेटीविषयीं मनाची आतुरता, लीनता, प्रेमळपणा, सारासारविचार, चातुर्य वगैरे गुणनिदर्शन पाहिलें म्हणजे कवीचें स्वभावनिदर्शनाचें कौशल्यही दृष्टीस पडतें. या तोंडी निरोपांत रुक्मिणी शेवटीं कृष्णाला विनवून सांगते,

तूं सोडवीं जीवविहंग माझा। होईल येणें पुरुषार्थ तूझा॥
त्वन्नामुक्ताफळमात्र चारा। तुझे पदीं केवळ यास थारा॥ १॥
जेसें तुला मी नवरी न माने,। करूं नको ज्येष्ठ कदापि मानें॥
मी धाकटी होइन धाकटीची। दासी करीं रे मज शेवटींची॥ २॥

व शेवटीं सुदेवासही अनुकूल काल पाहून कृष्णाला पत्रिका देण्याविषयीं सुचविते. इतक्यांत सुदेवाला निरोप देऊन मंचकावर पडली असतां तिचा किंचित् डोळा लागतो व स्वप्नांत तिला कृष्णभेट होते. ह्या प्रसंगींचें कवीनें चितारलेलें शब्दचित्र फार बहारीचें आहे. इकडे सुदेव द्वारकेचा मार्ग आक्रमण करीत असतांना यदुपति-भजनाची गोडी लागून तो पारमार्थिक विचारांत गुंग होतो. याप्रसंगीं त्यानें आपल्या मनाला केलेला उपदेश समर्थांच्या 'मनाच्या श्लोकां'ची आठवण करून देतो. अर्थात् कवींच्या स्वभावभिन्नतेमुळें या दोन 'मनाच्या श्लोकां'त सादृश्य कमी आहे. पांचव्या सर्गांत रुक्मिणीची प्रेमपत्रिका आपल्याला वाचावयास सांपडते. तिचा पहिला भाग श्रीमद्भागवतांतूनच घेतला आहे. हें भाषांतर सरस उतरलें आहे. या पत्रिकेंत रुकिमणीचें एकनिष्ठ प्रेम व परमभक्ति हीं निदर्शित केलीं आहेत.

सातव्या सर्गांत रुक्मिणी कुलरिवाजाप्रमाणें देवीच्या दर्शनाला जावयास

निघतांना तिची आई तिला पतिगृहीं कशी वागणूक असावी याविषयीं उपदेश करते. हा उपदेश इतका सरस व सुबोध आहे कीं तो प्रत्येक मुलीकडून पाठ करून घ्यावा. 'केरळकोकिळ' मासिकाचे संपादक कै. कृष्णाजी नारायण आठल्ये या कवींनीं 'सासरची पाठवणी' नांवाचें एक छोटेखानी सुंदर काव्य रचिलें होतें. त्यासारखीच पण त्यापेक्षां सर्वदृष्टींनीं सरस अशी ही सामराजाची 'पाठवणी' आहे.

'जाऊन तूं नांदसि सिंधुगर्भीं; मी येकली राहिन ये विदर्भीं;' 'पोटाशीची माय मी दूर जालें; लागे आतां नांदणें त्याजखालें;' अशा मातेच्या विव्हल अंतःकरणाच्या हांकेनें या 'पाठवणी'चा आरंभ होतो. या विस्तृत उपदेशांत कितीतरी बोधप्रद गोष्टी कळकळीनें सांगितल्या आहेत. 'घालाघाली घालती नित्य सासा; टाकूं बाई नेदिती हा उसासा' अशा सास्वांपासून गडीमाणसां-पर्यंत प्रत्येकाशीं कसें वागावें हें चांगलें दाखवलें आहे. 'सासू, दीर, जावा, नणंदा या सर्वांशी नीट वागून व पतीच्या अर्ध्या वचनांत राहून त्याचें मन हस्तगत करून घे,' असा उपदेशाला आरंभ करून क्रमाक्रमानें त्याचें स्वरूप अधिक उदात्त व उच्च दाखविलें आहे.

'त्वां आपुलीं आवरिजेत मूलें । जें नित्य होतीं कलहास मूळें ॥
टाकून बाई अभिमान द्यावा । संसार हा गोड करून घ्यावा ॥
मिळोन जातें मन दंपतीचें । तरीच घेती सुख संपतीचें ॥

वगैरे हितोपदेश कोणत्या प्रेमळ मातेला प्रथमच सासरीं जाण्यास निघालेल्या आपल्या कन्येस करावासा वाटणार नाहीं ? शिवाय हा उपदेश साधारणपणें सर्वत्र व सर्वदा लागू पडणारा आहे. रुक्मिणीची आई येवढाच ऐहिक हितसाधक उप-देश करून थांबत नाहीं. शेवटीं,

दुपारची सायी समज अवघी संपत्ति असे.
शहाणे हे कोणी धरितिच न यीचे भरंवसे ॥

असा पारमार्थिक उपदेश करण्यास ती विसरत नाहीं. याच्यापुढचे,

'अये, ये लक्ष्मीची तिळभरहि तृष्णा न धरिजे,
इच्या त्वां वेचें करुनच यिची वृद्धि करिजे ॥

हे उपदेशामृताचे बोल किती अमोल आहेत ! असा सुंदर सुबोध उपदेश करून शेवटीं रुक्मिणीची आई तिला सांगते,

'हा तूज शिक्षाविधि मात्र केला । सर्वांस बाई उपदेश झाला ॥
वर्तोत ऐशाच समस्त मूली । घरोघरीं मृण्मय जाण चूली ॥'

यापुढील रुक्मिणीचें भाषणही मजेदार आहे. ती आईला म्हणते,

जें जें मला तूं सिकवीस कांहीं । वर्तेन तैसी अनुमान नाहीं ॥
तूं सर्व, माते, समजेसि तत्त्वें । नसेत तूझीं वचनें कवित्वें ॥ १ ॥

माते चमत्कार अपूर्व पाहे । जगामधें वर्तत एक आहे ॥
मूर्धा पुढें काढुनि टेवियेला । तथापि नाहीं यश हें सुनेला ॥ २ ॥

सासू सुनेला सिकवीत आहे । वर्ते कशी आपण हें न पाहे ॥
कार्पण्य कारुण्यकटाक्षलेशीं । पांडित्य हें सर्व परोपदेशीं ॥ ३ ॥

'रुक्मिणीहरणां'तील बराचसा भाग संस्कृतप्रचुर व संस्कृत पद्धतीचा असला तरी त्यांतही 'पाठवणी,' 'सुदेवाच्या मनास उपदेश,' लग्नसाहित्याच्या याद्या, इत्यादि भाग शुद्ध मराठी स्वरूपाचे आहेत. या भागांवरून अभ्यासकांना तत्कालीन आचारविचारांची, राहटीची, शब्द, भाषासंप्रदाय वगैरेंची चांगली माहिती मिळण्यासारखी आहे. वस्त्रपात्र, जडजवाहीर, साहित्याचें इतर कार्य वगैरे वर्णन करतांना व इतरत्रही सामराज फार्शी शब्दांचा पुष्कळ उपयोग करतो. मधून मधून कानडी शब्दही आढळतात.

सामराजाच्या या काव्यांत गुणांप्रमाणें दोषही आहेत. त्यांचा उल्लेख पूर्वींच केला आहे. पण एक तर ते जुन्या काव्यांत सामान्यतः आढळणारे आहेत. शिवाय ते गुणांच्या मानानें इतके अल्प आहेत कीं, त्यांचा विचार करण्याचें कारण नाहीं. कवीच्या अंगीं कल्पनास्वातंत्र्य, पदलालित्य, प्रतिभा, सहृदयता, विनोद, बहुश्रुतपणा इत्यादि अनेक गुण वसत असल्याची हें काव्य साक्ष देतें; व त्यांवरून त्याची योग्यता व दर्जा अजमावितां येतील.

गो. वि. तुळपुळे

# अभ्यासाचीं साधनें


**वि. ल. भावे**—सामराजकृत ‘ रुक्मिणीहरण ’, प्रस्तावना ( महाराष्ट्र–कवि, इ. स. १९०५ )

**वि. ल. भावे**—‘ महाराष्ट्र–सारस्वत, ’ आ. ५ वी, इ. स. १९६३.

**प्र. धों. कानिटकर**—‘ रुक्मिणीहरण–निरीक्षण ’, आ. २ री, इ. स. १९५२

**द. सी. पंगु**—‘ सामराज ’, आ. २ री, इ. स. १९४१.

**गो. रा. राजोपाध्ये**—सामराजकृत ‘ मुद्गलाख्यान. ’

**वा. म. जोशी**—‘ विविधज्ञानविस्तार, ’ १९२७, जानेवारी व मार्च.

**द. सी. पंगु**—‘ रत्नाकर ’ १९२७ मार्च; विविधज्ञानविस्तार, ५९, ९.

**चिं. वि. जोशी**—वि. ज्ञा. वि., १९२७ फेब्रुवारी.

**दि. ना. पुरंदरे**—वि. ज्ञा. वि. १९२७, ऑगस्ट.

**प्र. धों. कानिटकर**—१ वि. ज्ञा. वि. ५९।७; ३.
२ भा. इ. सं. मं. त्रै. ९।१.
३ मुमुक्षु–वर्ष ८–सामराज कवीचा काल, लेखांक १, २, ३. शामगुसाई, शामभट आम्रोकर व सामराज,

**गो. रा. राजोपाध्ये**—मुमुक्षु–वर्ष ८, जून–डिसेंबर– ‘ सामराज कवी-विषयीं चर्चा ’–मुमुक्षु, वर्ष ९–६.

ग्रंथालय
क्रमांक ..... दि. .....


## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| प्रस्तावना ( द्वितीयावृत्तीची ) | ... | ३–५ |
| प्रस्तावना ( तृतीयावृत्तीची ) | ... | ६–७ |
| उपोद्घात | ... | १०–२६ |
| अभ्यासाचीं साधनें | ... | २७ |
| रुक्मिणीहरण काव्य | ... | १–१३३ |
| टीपा व स्पष्टीकरण | ... | १३५–१७२ |
| परिशिष्ट : १ : भावे-प्रत व हस्तलिखित प्रती | ... | १७३ |
| कठीण शब्दांचे अर्थ | ... | १७८–१८६ |

# रुक्मिणी हरण

अनु० २१३२१
क्रमांक १८३८
काव्य
१५५६८
मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. १५५६२

# सामराजकविविरचित

# रुक्मिणीहरण

## सर्ग पहिला.[1]

॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥

वंदीं, मना, पाय गजाननाचे, । जे सिंधु कल्पद्रुमकाननाचे ॥
जे वंदिल्या विघ्न पळोन जाती, । स्फुरेतही फार कवित्वजाती. ॥ १ ॥

जे घेय हातीं बरवी विपंची, । जीच्या गुणें होय विधि प्रपंची, ॥
जे राजहंसावरती विलासे, । तीचे पदीं मस्तक ठेविलासे. ॥ २ ॥

वात्सल्य मोटें तुजला विकासे, । जगद्‌गुरू, तूं मज लावि कासे, ॥
आणीक काहीं तुजला न मागें, । येईन आधार धरून मागें. ॥ ३ ॥

वाचेस जे वाट कदा न फूटे, । जेथे मनाची गति नित्य खुंटे, ॥
अद्वैत जा ( ज्या ) आड दडोनि राहे, । त्याची किल्ली तूज अधीन आहे. ॥ ४ ॥

जे नित्य मायापट आड लावी, । ते पूत्ति कैसी मज आडलावी ? ॥
भवार्णवीं पाय तुझे जपावे, । तरी ( च ) हें ज्ञानजलज पावे. ॥ ५ ॥

कामानळें जीव महा अहाळे. । याला परब्रह्म कसें न्याहाळे ? ॥
त्वन्मूर्ति चित्तांतुन हे गहाळे. । नसे मला वोळखि ये राहाळे. ॥ ६ ॥

हे बुद्धि माझी मजला चुकावी, । म्हणोन त्यां वाट तुझी चुकावी ॥
मदांध मी ये भरलों अव्हाटे. । तूं लावि आतां मज नीट वाटे. ॥ ७ ॥

---

१. हा सर्ग 'क' प्रतींत नसल्यानें येथें तो केवळ 'ख' प्रतीवरुन दिला आहे.

५.४ हा चरण भावे-प्रतींत 'तरीच हें ज्ञानसरोज पावे' असा छापला आहे-त्याला मुळांत आधार नाहीं.

तूं आंधळ्याची अससील काटी; । हें पांगुळें वागवितोसि पोटीं; ॥
तूं द्रौपदीचा अति साह्कारी; । असे तुझी दृष्टि परोपकारीं. ॥ ८ ॥

तां वाढवीला महिमा धुरूचा; । तां दीधला बाळकही गुरूचा; ॥
तां सोडवीलें व्यसनीं गजेंद्रा; । उपेक्षसीं तूं मज कां उपेंद्रा ? ॥ ९ ॥

माझा तुला काय विषाद आला ? । किंवा कृपासागर शुष्क जाला ? ॥
प्रसन्न नाहीं मन आजि तूझें ? । कीं आड आलें दुरदुष्ट माझें ? ॥ १० ॥

कीं लागली हे तुज योगनिद्रा ? । न पावसी कां करुणासमुद्रा ? ॥
करून दीनावरती कृपा हे । तूं आजि डोळे उघडून पाहें ॥ ११ ॥

तूं आपणा दीनदयाळु ऐसें । जनामधें या म्हणवीस कैसें ? ॥
मला प्रपंचांतुन शीघ्र काढीं, । कीं आपुलें बीरुद आजि सोडीं ॥ १२ ॥

असेत माझ्या अपराधकोटी, । तथापि मागें पसरून वोटी ॥
मत्सारिखीं हे कितियेक वेडीं । तूझे घरीं काय असेत थोडीं ? ॥ १३ ॥

अजामिळा पावन त्वांच केलें । पातित्य नाम स्मरतांच गेलें ॥
तां तारिला व्याध महाभिमानी । तां बैसवीली गणिका विमानीं ॥ १४ ॥

संहारिलें तां खरदूषणांला । तां दीधलें राज्य विभीषणाला ॥
तूं अर्जुनाचे तरि अश्व धूसी । तूं संकटीं पावसि तद्वधूसी ॥ १५ ॥

अनेक इत्यादिक उद्धरीसी । मदर्थ कां संशय हा धरीसी ? ॥
असेच जे जे तुज अंतरेती, । कोण्या उपायें जन ते तरेती ? ॥ १६ ॥

आयुःपयाचा अति गोड प्याला । हळूहळू काळबिडाळ प्याला ॥
त्वद्योग तो या समयांत नाहीं । चुके कसी हे यमयातना ही ? ॥ १७ ॥

शरीरसंरक्षणमात्र केलें । वेचून वायां वय सर्व गेलें ॥
आतां असे अंत समीप आला, ॥ म्हणोन तूझा अवलंब केला ॥ १८ ॥

तां घातलें ये मज मोहजाळीं ॥ कर्में मला बंधनरूप जालीं ॥
हा वासनाबंध कदा सुटेना ॥ जन्मावळीचें विरडें तुटेना ॥ १९ ॥

---

१२·३ मूळ हस्तलिखितांत 'कसै' असा हस्तदोषयुक्त पाठ आहे.

प्रपंच हा दुर्वह कोण वोढी ? । पदोपदीं यास पडेत वोढी ॥
जेथें निधीचा समुदाय आटे, । कल्पद्रुमाचे न पुरेत साटे ॥ २० ॥

स्वधर्म येथें न घडेच कांहीं । कधीं सुखाचा लवलेश नाहीं ॥
महर्घ येथें परमार्थ जाला । विवेक दारिद्र्यदशेस आला ॥ २१ ॥

माया मला लागट हे न सोडी । अहो दुराशा मन नित्य ओढी ॥
उभेच संकल्प विकल्प दोघे, । विरक्ति तेथें मज काय भोगे ? ॥ २२ ॥

तृष्णापिशाची बहु फार वाढे । त्रैलोक्यसंपत्ति धरून दाढे; ॥
क्षणेकही येथुन हे न फाके, । ब्रह्मांड जीच्या पदरांत झांके ॥ २३ ॥

या वासनेची सुजि वोसजेना. । पदानुसंधान तुझें सजेना. ॥
निवृत्ति कैसी मजला पचावी, । प्रपंच ईला जरि साप चावी ? ॥ २४ ॥

हा क्रोधचांडाळ सदा विटाळी, । संपर्क याचा जन कोण टाळी ? ॥
देहीं वसे वाधिणिसी अहंता, । असेस तूं येक इचा नियंता. ॥ २५ ॥

आधार तूं स्थावरजंगमाचा. । तूं भारही होसि भुजंगमाचा. ॥
अपार तूझा महिमा कळेना. । स्वरूप तूजें मज आकळेना. ॥ २६ ॥

असेत तूझीं चरितं विचित्रें । तसींच नामें सकळीं पवित्रें ॥
मदीय जिव्हेस अनेक कामें । कदापि ईला न वसे रिकामे. ॥ २७ ॥

परापवादें अथवा विटाळे । ईला कसें नाम तुझें उटाळे ? ॥
जे का(की)टली नित्य महानृतानें । ते क्षाळिजे कृष्णकथामृतानें. ॥ २८ ॥

समस्त शास्त्रांस पडेत मौन्यें. । शुकादिकांही विपरीत भानें. ॥
वेडावती वेद समस्त जेथें, । करूं तुझें वर्णन काय तेथें ? ॥ २९ ॥

तथापि बांधेन कथा विचित्रा, । पदोपदीं पावन जे पवित्रा. ॥
तूझे कृपेचा परि ईस पाया । पडे, तई हे न पवे अपाया. ॥ ३० ॥

जे बोलिली भागवतीं पुराणीं, । विस्तारिली जे पुरुषीं पुराणीं ॥
पवित्रकर्ती सकळा जगा या, । आधार ही थोर असे जगाया. ॥ ३१ ॥

२७·१ चरितं ( भावे-प्रत )

त्वद्वर्णनीं हे रसना कवीची । प्रवेशतां, येति विचेकवीची. ॥
मिळेत ही अर्थ बरे नवेची. । तो वंचलासे जन जो न वाची. ॥ ३२ ॥

असे मऱ्हाटी निजदेशभाषा, । न येत उक्ती बहुशा विशेषा, ॥
तथापि जे कीं निजभक्त तूझे । न पाहती ते गुणदोष माझे. ॥ ३३ ॥

अगत्य नाहीं जनरंजनाचें. । लागे तुझें ध्यान निरंजनाचें. ॥
आराधनीं अन्य उपाय नाहीं; । समर्पितों याच उपायनाहीं. ॥ ३४ ॥

करूं न जाणें बहुशा जपासी, । तथापि लागे मन तूजपासीं. ॥
नेणें च बालाबगलादिसेवा. । जाणें तुजे केवळ पाय, देवा. ॥ ३५ ॥

माझ्या मना, तूं असती वराडी; । कां भीमकीचा नव्हसी वऱ्हाडी ? ॥
हा स्नेह नाहीं वरपंगतीचा. । तूं लाभ घेयीं वरपंगतीचा. ॥ ३६ ॥

असे हरीही निजसोयरा, हो । याच्या पदाची तुज सोय राहो ॥
हें ब्रह्म नाना अवतार धारी । तथापि हा कृष्णच तूज तारी ॥ ३७ ॥

सत्संग आवश्यक अजि पाहे, । जो ईश्वरप्राप्तिस हेतु राहे, ॥
जो सज्जनाच्या निववी मनाला, । जो लाजवी, बावनचंदनाला ॥ ३८ ॥

राजा असे थोर परिक्षिती, हो । कीर्ती सुधांशूस परि क्षिती हो ॥
पुसे कथा तो मग हे शुकासी, । जीणें असे अत्यय पातकासी ॥ ३९ ॥

द्वैपायना, योगिवरा, द्विजेंद्रा, । पौराणिका सर्वकथासमुद्रा, ॥
ज्या सांगसी कृष्णकथा उदारा, । त्या नाशिती नित्य मनोविकारा ॥ ४० ॥

कथारसें या मन हें विटेना । श्रीकृष्णपायींहुनि, हो सुटेना ॥
कथा पुसे आणिकही नवीना । कां आपला संशय नाशवीना ? ॥ ४१ ॥

हे रुक्मिणी देववरें वरोरू । नेली कसी द्वारवतीस भीरू ? ॥
स्वयंवरीं कृष्ण कसा वरीते ? । केलें कसें साहस सावरी ते ? ॥ ४२ ॥

जिंकूनिया मागध, शाल्व राजे, । प्रताप ज्यांचा जगतींत गाजे, ॥
तेणें विवाहीं विधि राक्षसाचा । केला कसा सांग उदार साचा ॥ ४३ ॥

---

३६·२ मूळ हस्तलिखितांत ‘ स्नेन ’ असा चुकीचा पाठ आहे.

जाला असे जो उपजोन योगी; । क्षणेकही जन्मसुखा न भोगी, ॥
न आतळे जो द्विज अंशुकासी, । कृष्णीं महा भक्ति जया शुकासी ॥ ४४ ॥

कृष्णास तो वंदुनि विप्र भावें । प्रवर्त्तला तच्चरणप्रभावें ॥
तत्त्वार्थ सांगेच परिक्षितीसी । असे कथा हे तुज रक्षितीसी ॥ ४५ ॥

साहित्यसारस्य समस्त वेचे । शब्दोदधीचे निवडून वेंचे ॥
पवित्र हे कृष्णकथा रसाला, । जे नित्य आणी रस नीरसाला ॥ ४६ ॥

गंगाप्रवाहोपम बोध जेथें । न जाय हा काय अशेष तेथें ? ॥
करूनि चित्तें अति सावधानें । हे आयकावी हरिसन्निधानें ॥ ४७ ॥

जो हा महाविष्णु विराटरूपी, । चराचराची रचना निरूपी, ॥
तो गर्भ राहे मग देवईला । संरक्षिती येउन देव यीला ॥ ४८ ॥

सदा निराकार, निरीह भासे, । जें शुध्द चैतन्यपणें विकासे, ॥
निर्माण ज्यापासुन विश्व जालें, । तें देवकीचा उदरास आलें ॥ ४९ ॥

अव्यक्त जें व्यक्तदशेस आलें, । कारागृहीं तें अवतीर्ण जालें ॥
भासे अकस्मातच बाळसेंही । तत्काळ आलें मग बाळसेंही ॥ ५० ॥

हा बाळ सर्वांहुनि आगळा, हो. ॥ गळेत त्या आपण आगळा, हो ! ॥
तत्काळ जालीं उघडीं कवाडें. । तो पावला गोकुलही निवाडें. ॥ ५१ ॥

येऊन पाजी स्तन मावसी हे. । हा काय नेणे मग मावसी हे ? ॥
हा मोडिला बाळपणींच गाडा, । न भीतसे बाळक जो लिगाडा. ॥ ५२ ॥

करीं करी रत्नजडीत सिंपी, । ते माय आगोधर पाय शिंपी. ॥
घालून पायांवर दूध पाजी, । ब्रह्मादि विश्वेश्वर ज्यासि राजी. ॥ ५३ ॥

उत्पन्न ज्यापासुन भूतसृष्टी, । काडी तयाच्या बहु फार दृष्टी. ॥
जो पूतनास्तन्यविषास प्याला, । ते माय देते गरळा तयाला. । ५४.॥

करीजे विश्रांती श्वशुरसदनीं शेषशयनीं,
कदा योगींद्राचे क्षणभरि पडेनाच नयनीं; ।
पयःपानीं त्याचें मुखकमळ दुग्धें करिं भिजे.
सुखें ये मातेच्या करयुगुलतल्पावरि निजे. ॥ ५५ ॥

---

५५·१ करीजो विश्रांती...( भावे-प्रत ).

न जाणें प्राग्जन्मीं कवण तप मातेस घडलें ?
यदीय प्रारब्धें प्रगटच असें हें उघडलें. ।
जयाचे हे ब्रह्मादिक विबुध लागेत चरणीं,
तया बाळा घेते उचलुन कडे नंदग्रहिणी. ॥ ५६ ॥

अलिंदीं नंदाचे घनरुचिर चैतन्य मिरवे,
जयाच्या माथांचे नवकुरळ शोभेत बरवे. ।
निजछंदें रांगे, विमल तळहातद्वय मळे,
पदस्पर्शें ज्याच्या तरुयुगुल तत्काल उमळे. ॥ ५७ ॥

अनंत ब्रह्मांडें यदुदरदरीमाजि दडती,
जया चैतन्याचें स्तवन करितां वेद अडती, ।
जगत्कर्ता धाता सहज उपजे नाभिकमळीं,
विकासे त्याचा हा रुचिर रहिवास व्रजकुळीं. ॥ ५८ ॥

धरूनि हे अर्भकदेहलीला, । जे शोभवी प्रत्यह देहलीला, ॥
हे लोक ज्याच्या उदरांत माती । तें ब्रह्म टाकी वदनांत माती. ॥ ५९ ॥

जें आंगणीं येउनि नित्य खेळे, । मनोदयें जें चिखलांत लोळे, ॥
नंदालयीं बाळक घोंग त्याचें, । ब्रह्मादिकां दुर्लभ सोंग त्याचें. ॥ ६० ॥

घरामधें अर्भकरूप रांगे, । पदोपदीं जो नवनीत मागे, ॥
ज्याच्या पदीं होति पवित्र गोटे, । ज्याच्या भयें गोरस नित्य गोटे ॥ ६१ ॥

हा आंगणीं घे अगणीत धांवा, । तथापि याच्या न पुरेत हावा ॥
अग्रण्य भूमीरुह हा चडाया, । निष्णात गोपीगृह ऊघडाया ॥ ६२ ॥

जो गोंविला बाळक वासरांनीं, । करीतसे नित्य निवास रानीं, ॥
मुखांबुजीं मंजुळ वेणु वाहे, । गोपांगनाची हरि वाट पाहे ॥ ६३ ॥

वेणूस्वनें गोपसमूह मोहे । टाकून धेनू वृषभास दोहे ॥
त्या गोपिका होति समस्त मुग्धा, । प्रत्यक्ष ज्या कीं गुसळीत दुग्धा ॥ ६४ ॥

घरोघरीं चौर्य करी मुरारी । कुलांगनाच्या भुलवी कुमारी ॥
असे जरी आपण आलकाही । न देय येऊं पण आल कांहीं ॥ ६५ ॥

मिळोन तेथें मग गोपिकाही । वदेत येऊन विरुध कांहीं ॥
अम्ही तुसीं काय वदों, यशोदे ? । हा लाडका लेक घरीं असों दे ॥ ६६ ॥

कर्मं करी नित्य महा अचाटें । केलीं मुलें हीं अवघीं अचाटें ॥
दारापुढें खेळतसे लगोऱ्या । लेकी, सुनाही भुलवील गोऱ्या ॥ ६७ ॥

हा खेळ खेळे यमुनाकदंबीं । हा दृष्टि लावी ललनानितंबीं ॥
असेत बाला सकला निरीहा । तथापि वोढी उगली निरी हा ॥ ६८ ॥

पतिव्रता ज्या अति आगलाल्या, । निजव्रतापासुनि त्या गलाल्या ॥
चोटांलिलें गोकुल सर्व येणें । हें लोक बोलों न सकेत भेणें ॥ ६९ ॥

उन्मूललीं काय म्हणोन झाडें । हा नासला बाळ तुझाच लाडें ॥
कसें असें काय तऱ्हीं अरिष्टें ! । या गोकुळा आणिलही अरिष्टें ॥ ७० ॥

राम, कृष्ण, सखि, सोदर दोघे । वाढवीस सुत नित्य अमोघे ॥
त्यांत हा वडिल फार गुणाचा । धाकटा चपळ हा अगुणाचा ॥ ७१ ॥

सोंगड्यांस उठऊन पाहाटे । नंदसूत सकळांत राहाटे ॥
पाहतां हृदयतस्कर मोटा । नेतसे सकळ गोरसमोटा ॥ ७२ ॥

देवर्डे पद, उभारुनि बाहे, । गोधनें सकळ हे हरि बाहे ॥
उठोन त्याची जननी यशोदा । तत्काळ त्याच्या मग जाय शोधा ॥ ७३ ॥

देखोन ईला हरि वावहावा । धरी यशोदा मग पाव डावा ॥
बांधे तयाच्या उदरास दावें । सौभाग्य यीचें कवणें वदावें ॥ ७४ ॥

समर्थ मायार्गळ ऊखळाया, । तो गोंविला बाळक ऊखळा या. ॥
मातेस अन्याय समस्त मागें । त्या गोपिकांचे अपराध सांगे. ॥ ७५ ॥

सस्नेह माता मग त्यास सोडी; । तथापि तो नित्य करीच खोडी. ॥
अघासुरा मारुनिया, बकाला, । तसेंच वत्सासुरधेनुकाला, ॥ ७६ ॥

तृणापरी त्या तृणनामकाला, । भंजूनिया सौख्यसुकाळ केला. ॥
सर्व प्रकारें व्रज रक्षियेला. । प्रत्यक्ष हा पावक भक्षियेला ! ॥ ७७ ॥

---

६९.३ चौढाळिलें ( भावे-प्रत ). भावे यांनीं ही दुरुस्ती बहुधा अश्लीलता टाळण्यासाठीं केली असावी.

जो नांदवी उत्कट गोपवाडे, । गाती तयाचे बरवे पवाडे. ॥
पीतांबर, श्यामलरूपधारी, । सचेत्रवंशीकर जो मुरारी. ॥ ७८ ॥

कृत्यस्त पादांबुज, माळ कंठीं, । गोवृंद चारी यमुनोपकंठीं. ॥
माथां धरी रम्य मयूरबर्हें. । कर्में करी नित्य महा अनर्हें. ॥ ७९ ॥

वाहे सिदोरीस उदास अंसीं, । उत्पन्न त्याचें भय होय कंसीं. ॥
अक्रूर तेणें मग धाडियेला. । घेऊन दोघां मथुरेस गेला. ॥ ८० ॥

कंसांबरें लूटुन आणियेलीं. ॥ त्रिवक्र कुब्जा अति नीट केली. ॥
दारीं उभा उन्नत मत्त हस्ती । मारून, ते दंत धरीत हस्तीं. ॥ ८१ ॥

चाणूर हा, मुष्टिक दुष्ट जेटी । धाडीत मर्दून कृतांतभेटी. ॥
त्यानंतरें मातुळ देखियेला. । उडोन कंसावरि कृष्ण गेला. ॥ ८२ ॥

धरून केशीं, मग खालता हा । पाडून त्यासीं मग होय 'हा हा;' ॥
कारागृहें सर्वहि फोडवीलीं; । तें मायबापें मग सोडवीलीं. ॥ ८३ ॥

व्यापार हा कंसवधांत केला. । ते दारके श्रीहरि शीघ्र आला. ॥
अशी रिती हा हरि जन्मलासा । जाणोन इच्छी कमळा विलासा. ॥
ज्याकारणें होय जळांत मच्छी । ते मानवी देह कसा न इच्छी ? ॥ ८४ ॥

कथा हे कृष्णाची सकळजगदानंदजननी.
मनोभावें ईचें श्रवण करिजे नित्य सुजनीं.
प्रसंगें श्रोत्याचे सकलहि महादोष हरनी.
यदुत्तंसप्रेमें विषयरसगोडी विसरती. ॥ ८५ ॥

इति श्रीमद्भगवद्भक्तपदानुरक्तकविसामराजविरचिते रुक्मिणीहरणकाव्ये कृष्णजन्मो नाम प्रथमः सर्गः ॥ १ ॥

---

८४. हस्तलिखित प्रतींत (ख) 'जाणोन इच्छी कमळा विलासा' या चरणाच्या अन्तीं ८४ चा आंकडा असून यापुढील दोन चरण स्वतंत्रपणें लिहिले आहेत.

२९३ ९१
१०३६
आय
९१।५२

# सर्ग दुसरा

॥ श्रीमुद्गलाय नमः ॥

उत्पत्ति हे आयिक भीमकीची । श्रीकृष्णपादांबुजकामुकीची ॥
दौश्चित्य जीच्या श्रवणेंच मोडे, । लक्ष्मीपतीची घर थोर जोडे ॥ १ ॥

विदर्भदेशाधिप भीमनामा । राजा असे येक उदारधामा, ॥
जो धीर, गंभीर महाप्रतापी, । जो लोकपालांसहि नित्य दापी ॥ २ ॥

करीतसे पालन ये महीचें । नयेंच घे उत्तम हेम ईचें ॥
प्रजांपरी पालितसे प्रजांला, । नीजान्वयीं जो कुलदीप झाला ॥ ३ ॥

असे तयाची मग मुख्य जाया । त्याला असे तत्पर जे भजाया ॥
विनीत अत्यंत, महाकुलीना, । कसें पतीचें मन आकलीना ? ॥ ४ ॥

मूर्धन्य जे होय पतिव्रतांची, । जीला महा आवडि ही व्रतांची, ॥
तीच्या गुणांची बहु त्यास गोडी । तेही तयाचीं वचनें न मोडी ॥ ५ ॥

विभक्त त्यांचीं दिसतीं स्वरूपें, । असेंत चित्तें परि येकरूपें ॥
तीं होतिं येकेविण येक अंधें । चाले महाप्रेम ऋणानुबंधें ॥ ६ ॥

जे पाळिती नित्य अनेक इष्टें, । यथाविधीनें करिताति इष्टें, ॥
जे सर्व काळीं करवीत पूर्त्तें, । नसे तयांचें तप हें अपूर्त्तें ॥ ७ ॥

क्रमेंच त्याला सुत पांच जाले । कनिष्ठ हो च्यारि भले निघाले ॥
रुक्मी असे अग्रज दुष्टबुध्धी, । कदापि कांहीं न धरीच बुध्धी ॥ ८ ॥

घाली पिता नित्य तया पढाया । पदोपदीं लागतसे अडाया ॥
न जाय तो पुत्र कदापि साळे, । न आयके वाक्य, सदा पिसाळे ॥ ९ ॥

टाकून दे सुंदर गद्यपद्यें, । त्या यादवांचींच वदे अवद्यें ॥
म्हणे गुरू शिष्य नसे भलासा । याची तुम्ही सत्वर जीभ लासा ॥ १० ॥

---

१·१ उत्पत्तिहिं आइक भीमकीची । ( ख )

हळू हळू तो बहु होय मोटा । अला असे काय कलंक पोटा ? ॥
करी अवज्ञाच सदा पित्याची । न पालटे रीति कदापि त्याची ॥ ११ ॥

निघे जऱ्ही त्यास बहूत दाढी । तथापि ते बुधि न येच गाढी ॥
विवेक त्याचे हृदयीं बसेना, । अंधास आदर्श जसा दिसेना ॥ १२ ॥

पित्यास पोटांतुन दुःख वाटे । तथापि त्याचे न वजाय वाटे ॥
संबंध त्यासी बहुसा न पाडी । त्याच्या विचारांतुन चित्त काढी ॥ १३ ॥

चिंतावली माय तसीच त्याची । हा नायके बुध्दि तसीच तीची. ॥
पदोपदीं येउनि सीकवीला, । तथापि तेणें उर पीकवीला. ॥ १४ ॥

ते त्रासलीसे सुतसंततीला, । कदापि नाहींच उसंत तीला. ॥
अपुत्र संसार म्हणे असावा, । कुपुत्र पोटीं सहसा नसावा. ॥ १५ ॥

निजोदरीं जे नवमास वाहे, । ते माय त्याचें मुखही न पाहे ॥
कुळास जेणें अधमत्व येतें, । संतान ते शल्य कसें न हो तें ? ॥ १६ ॥

ते त्या दिसापासुन नित्य देवी । अनन्यभावें कमलेस सेवी. ॥
असे सुतेचीच तिला असोसी. । त्या आत्मजाचें अति दुःख सोसी. ॥ १७ ॥

न सेविती हे जरि लोकमाता, । कोठें इचा हा तरि शोक माता ? ॥
येके दिसीं फार विषण जाली, । प्रत्यक्ष तीसीच वदों निघाली. ॥ १८ ॥

“ महालक्ष्मी, माते, कमळनिलये, हांस मजला;
मला तूझा आतां सकलहि मुदा हा समजला. ।
स्वसा तूं धेनूची नियत असती सिंधुदुहिता.
वराकी जाणें मी, जननि, तुजला काय दुहिता ? ॥ १९ ॥

भवांभोधीमध्यें असलि जननिर्वाणलहरी.
परब्रह्माची, वो. नियत अससी तूं सहचरी. ।
महापापें, माते, न घडति मला काय अनयें ?
तुझीं आतां येथें प्रकट मजला होत अभयें. ॥ २० ॥

---

१६.२ ते माय त्यांची मुख हे न पाहे । (ख)

परब्रह्मछाये, कपटवनिते, होसि कमला.
प्रपंचामध्येंही जरि दिससि अकस्मिक नला, ।
करीतें विज्ञप्ती सभय तुज, वैकुंठवनिते,
कटाक्षप्रक्षेपें मज जिवविं, रत्नाकरसुते. ॥ २१ ॥

नसे हें निर्वाहें, जननि, मज सामर्थ्य भजनीं,
कृपाशीले हेला मणुन न करीं मद्विध जनीं. ।
जगन्माते, येथें बहुत असती बाल तुजला;
विचारें पाहातां तुजविण नसे माय मजला. ॥ २२ ॥

प्रसंगें हे जाली, जननि, मजला वोलखि तुझी.
मनोवाक्कायें मी नियत न करीं स्वामिनि दुजी. ।
तुझ्याही भक्ताला प्रतिपद पडे संकट जयीं,
जगन्माते, तूझा अविहित दिसे लौकिक तयीं ॥ २३ ॥

असो चिंता माझी, जननि, पुरती येथुनि तुला.
नसे माझा कैसा अझुणि पुरता भोग सरला ? ।
असारीं संसारीं बहुत भवदाधार धरिला.
कृपाभिक्षा घालीं पदर तुज म्यां हा पसरिला. " ॥ २४ ॥

अशी इची हे स्तुति आयकीली । प्रसन्न तेही मग तीस जाली ॥
स्वप्नीं तिला दर्शन दीधलें कीं । म्हणे, 'तुझी होइन मीच लेंकी' ॥ २५ ॥

त्यानंतरें जो तिस गर्भ राहे, । तें तेज ते शीतल कां न साहे ? ॥
क्लेशी करी तीस बहूत रुक्मी, । म्हणोन आली उदरास लक्ष्मी ॥ २६ ॥

तत्काल आली तिस गर्भछाया, । प्रवेशली येउनि आदिमाया ॥
आली तिच्या पांडुरता मुखाला, । ते काळिमाही कुचचूचुकांला ॥ २७ ॥

गजगति गमनीं ते पाउलें मंद टाकी,
प्रतिदिन उठतां हे हात भूमीस टेकी, ।
त्रिवळि मग तयेची स्पष्ट मोडोन गेली,
अनुदिन दिननिद्रा तीस येऊं निघाली. ॥ २८ ॥

जयिंहुन उदरीं हे गर्भ वाहों निघाली,
तयिंहुन कमळांची प्रीति उत्पन्न जाली।
यदुपतिभजनाचे डोहले तीस व्हावे,
प्रतिदिन मन तीचें द्वारकेमाजि धांवे ॥ २९ ॥

तो कांत आला सदनास तीच्या। पाहातसे हो वदना सतीच्या ॥
तें वक्त्र तेथें सुमुखी फिरावी। दोघांत लज्जा तिसरी सिरावी ॥ ३० ॥

तथापि तीची धरिली हनोटी,। तेही तयाचा मग हात लोटी ॥
प्राणेश आंगावरि हात टाकी,। ते आपुलें सर्व शरीर झांकी ॥ ३१ ॥

ते बोलतां त्याजसमक्ष कोडें,। वेणीस जीच्ये विलसेत गोंडे ॥
सलज्ज जों जों बहु होय नारी,। तों तों इच्या हेतुस हा विचारी ॥ ३२ ॥

उझून नीवीनिचयास देखे। तीचें समाधान बहूत राखे ॥
तेणें तिची आवडि हो पुसावी। क्षणेक तेणें मग ते रुसावी ॥ ३३ ॥

भूमंडलीं लभ्य तयास नाहीं। असे नसे वस्तु कदापि कांहीं. ॥
ते कां न पावे मग डोहळ्याला?। करी तिच्या वल्लभ सोहळ्यांला. ॥ ३४ ॥

धरीतसे थोर निधान पोटीं। म्हणोन तीची भरितात वोटी. ॥
औदुंबरी माळ गलां न घाली,। जें पुत्रजन्मास बहूत भ्याली. ॥ ३५ ॥

असेपरी हे नवमास गेले.। प्रसूतिचे सन्निध दीस आले. ॥
येके दिसीं मध्यम राति गेली,। कन्या तिला उत्तम येकि जाली. ॥ ३६ ॥

जे जन्मल्या माय कृतार्थ जाली,। ते स्वप्न देवी विसरोन गेली. ॥
अनिंद्य हें सर्व शरीर तीचें,। न आडले दूषण हें रतीचें. ॥ ३७ ॥

प्रवीण सर्वांहुन हा विधाता,। कदापि याच्या न कलेल धाता. ॥
सर्वोपमा मेलविजे अहो ते। तरीच हे सुंदर मूस वोते. ॥ ३८ ॥

चातुर्य वेंचे चतुराननाचें,। घडीत आलें तंव आननाचें. ॥
आकारलें रूप असेल जेव्हां,। तो भूलला काय नसेल तेव्हां? ॥ ३९ ॥

वृतांत बापें मग आयकीला। तेणें तिचा उत्सव थोर केला. ॥
द्वारप्रवेशीं बहु होय दाटी,। द्विजांस नाहीं परि आडकाठी. ॥ ४० ॥

येती विप्रां कांचनें युक्त गायी; । वादित्रांची होतसे थोर घाई. ॥
जे जे कोण्ही मागते लोक येती । त्यांच्या तेथें कामना पूर्ण होती. ॥ ४१ ॥

करी तिच्या उत्तम बारशाला. । दे रांतवर्ग्यांस अपार शाला. ॥
ठेऊनि हे रुक्मिणि नाम तीचें, । म्हणे, पहा बालक हें मतीचें. ॥ ४२ ॥

नियोजिलीसे तिस येक दायी, । जे भूपतीनें करिजे निधायी. ॥
तथापि ते वत्सळ राजपत्नी । तें वाढवी लेंकिं अनेक यत्नीं. ॥ ४३ ॥

तीणेंच ते प्रत्यह खेलवावी, । ते पालनां सुंदरि हालवावी, ॥
कडेसही घे बहु धाकटीला, । जे शोभवीते बहुधा कटीला. ॥ ४४ ॥

जे नित्य शोभे बहु लक्षणांनीं । ते वाढलीसे बहुल क्षणांनीं ॥
अज्ञा करी हे मग पट्टराणी । धात्री नृपासंन्निध तीस आणी. ॥ ४५ ॥

पित्यास जों जों बहु आवडावी, । तों तों तयासंन्निध हे भिडावी. ॥
त्याभोंवतीं येउन नित्य खेले, । त्याचेच मांडीवरि नित्य लोले. ॥ ४६ ॥

जे बोवडे बोळ तिला सुचावे, । तसेच त्याला बरवे रुचावे. ॥
जे क्लेश पुत्रें करिं फार पावे, । ईच्या गुणीं ते मग फार पावे. ॥ ४७ ॥

तें लाडकी होउन हो गुणांची । बहीण जाली परि दारुणाची ॥
वेधा जिचे दूषणमात्र खोडी, । ते कन्यका काय करील खोडी ? ॥ ४८ ॥

रुक्मी तिला बोल विरुद्ध बोले । बसेत तीच्या हृदयांत भाले ॥
तथापि ते राजसुता शहाणी । विरुद्ध वाचेस कदा न आणी ॥ ४९ ॥

मूहूर्त्त केलें तिस एकराला । घरोवरीं वाटिति शर्करांला ॥
केले अलंकार तिला नृपानें । तें लेववीलीं श्रवणांस पानें ॥ ५० ॥

नये शुकाची तुलनेस चोंची । ती नासिकाही मग माय टोंची ॥
आणीक कांहीं तरि मायना कीं । म्हणोन घाली नथ माय नाकीं ॥ ५१ ॥

---

४१·२ वाजंत्राची ( ख ).

४७·४ येथें 'फार पावे' याच्या ऐवजीं 'हारपावे' असा पाठ श्री. कानिटकर सुचवितात. तो स्वीकारल्यास विरोध स्पष्ट होतो.

तदुपरि नितले हे भीमकाची कुमारी
मदननृपति जाला यौवराज्याधिकारी ।
तदवविभग किंचिद्बाळभावास टाकी
सभय हृदयदेशा अंचलें नित्य झांकी ॥ ५२ ॥

क्रमेंच तीचीं उजलेच अंगें । हे पाजवीली छुरिका अनंगें ॥
हळू हळू यौवन हें झलंबे । ईला कसें शैशवही विसंबे ? ॥ ५३ ॥

मुखेंदु जों जों बरवा सजावा, । तों तों इचा माज उगा झिजावा ॥
ईच्या नितंबा गरिमा न यावा । तथापि यावा इस फार यावा ॥ ५४ ॥

लीलारसें हे सदनांत वागे । पाठी इचे हंससमूह लागे ॥
लाजेत ईचे कबरीस मोरें । येती मुखासन्मुख हें चकोरें ॥ ५५ ॥

अत्यंत त्यांची द्युति हे विकासे, । सुवर्णपूगीफलयुग्म भासे, ॥
उठेत वक्षोरुह हे उठाणें, । या शैशवाचें उठवीति ठाणें ॥ ५६ ॥

आली तिच्या ते जडता नितंबा । हांसे तिचें तें मुख चंद्रबिंबा ॥
शोभे तिचे पाठिस लांब वेणी । प्रतिक्षणीं फेरुनि लेय लेणीं ॥ ५७ ॥

होतांच हा निर्गम शैशवाचा । प्रवेशलासे गुण केशवाचा ॥
ब्रह्मादिकांला न कले तथा रे, । तें ब्रह्म ईच्या हृदयांत थारे ॥ ५८ ॥

सेवार्थ बंदीजन नित्य येती, । तींही प्रसंगें वर वर्णजेती ॥
ज्याचे गुणीं रुक्मिणि कान देते । शरीर त्याला तरि कां न देते ? ॥ ५९ ॥

तो द्वारकेचा वर नित्य गाजे । हे भीमकी ही नवरी अगा जे ॥
मनोज माध्यस्थ करूं निघाला । मनोविपर्यास तयांस जाला ॥ ६० ॥

परस्परांचे गुण दूत येती । परस्परें हे अनुरक्त होती. ॥
त्याच्या गुणें मन्मथ ईस बाधे । धनुष्य हें सज्ज तयास साधे. ॥ ६१ ॥
जें कृष्णरूपें अवतीर्ण जाले, । तें मन्मथें ब्रह्म शरव्य केलें. ॥
हे वेदना दुःसहसी कलावी । म्हणोन किंवा स्मर शीक लावी ? ॥ ६२ ॥

---

५३.१ येथें 'उजलेच' याऐवजीं 'उजळेत' असें अनेकवचनी क्रियापद श्री. कानिटकर सुचवितात.

जे आदिमाया प्रकृतिस्वभावें । स्मरे तिला ब्रह्म अनन्य भावें ॥
तेही तदाकार तशीच जाली । स्वदेहभावा विसरोन गेली. ॥ ६३ ॥

यदुपतिपदपद्मीं चित्त आसक्ति पावे;
अवसर मदनाला तोच अत्यंत फावे ।
अगणित मग त्याचे तीक्ष्ण नाराच येती,
कठिण हृदय तीचें नित्य भेदून जाती. ॥ ६४ ॥

परम विकल, येके आसनीं ते बसेना,
क्षणभरि जननीचे संनिधानीं असेना, ।
अनुदिन मन तीचें कोटि संकल्प वेंघे,
हरिविण विषयांचा स्वाद कांहींच नेघे. ॥ ६५ ॥

विमल कमल हातीं भीमकी घेत नाहीं,
प्रतिवचन सख्यांला हे नसे देत कांहीं. ।
हरियुत हरितेचा वायुही पार मानी,
हरिविण दुसरा हा नायके शब्द कानीं. ॥ ६६ ॥

अशन वसन तीला सर्वथा हें न माने,
हरिरहित सुखाचा हेतु आणीक नेणें. ।
निशिदिन तिस लागे ध्यान हें द्वारकेचें.
तदितर दुसरें तत्प्रापक द्वार कैंचें ? ॥ ६७ ॥

हरिचरणवियोगें रात्रि तीला न लोटे;
युगसम तिजला हे दीसही जाति मोटे ।
कृशतनु तनु जाली, भूक ताहान गेली,
निखिल निजजनाची हे असे सांडि केली. ॥ ६८ ॥

ते भीमकी हे मग घोण घाली । चिंतासमुद्रीं प्रविशों निघाली. ॥
आंगास तीच्या कडमोड आला, । मुखेंदुही हा उतरोन गेला. ॥ ६९ ॥

तत्काळ तन्मस्तक होय भारी । प्रवेशला येउन कैटभारी ॥
सखीजनां संनिध जे न बाहे, । निजे उसां घालुन वाम बाहे ॥ ७० ॥

विकासली पांडुरता कपोलीं, । गेला असे बोल बहूत खोलीं, ॥
जाली तिला चंदन, चंद्र, वाला, । घडी घडी विव्हल होय बाळा ॥ ७१ ॥

नकलत तुज किंवा भूक ताहान मोडे ?
अनियत तुज येती कां उगे आंगमोडे ? ।
निशिदिन कवणाचा हा निजध्यास लागे ?
अति कठिण अकाळीं योग अभ्यासला गे. ॥ ७९ ॥

अझुणवरि न लागे कां तुला हे पिपासा ?
न मनिसि भय कांहीं, कां (क) रीसी उपासा ? ।
झडकरि उठ आतां अल्पसें जेवि, मूली,
नियतच तुज आली हे असे अन्नभूली. ॥ ८० ॥

दिसति मज सख्याही सर्व तूझ्या लबाडा,
तुजच जवलि आतां होय याचा निवाडा. ।
अति परिचय यांसीं येक हा देखिला गे,
अभिनव कवणाची अन्यथा देखि लागे. ॥ ८१ ॥

मज तरि समजेना सर्वथा हे अवस्था.
न समजत करावी काय ईची व्यवस्था. ।
अनृत वदत नाहीं सर्वथा नावरेसी.
निशिदिन जगदंबा तूज राखो परेशी. ॥ ८२ ॥

प्रतिवचन न येतां होय हे घाबिरीसी
प्रकट म्हणत आहे गोष्टि नाहीं बरीसी. ।
प्रतिगृहिं नसती या काय लेंकी समा या,
बहुत सबळ माझी हे जळो व्यर्थ माया ! ॥ ८३ ॥

सकलहि कुळदेवी, येकदा ईस राखा,
प्रतिदिन इस दृष्टीं कांसवाचेच देखा. ।
नवस नवसिले हे व्यर्थ होऊं न द्यावे,
इस गुण दिधल्यानें सर्व संकल्प घ्यावे. ॥ ८४ ॥

---

८०·२ दोन्ही हस्तलिखित प्रतींत हस्तदोष आहे. ख प्रतींत काकपद घालून तो सुधारला आहे.

सरीसृपी होय सरी गळांची । जाली असे सेजहि यिंगलांची ॥
ते चालतां हे नुचलेत वाले । शरीर तीचें सुकुमारवालें ॥ ७२ ॥

हा पातकी मन्मथ थोर धन्वी, । हे राजकन्या सुकुमार तन्वी, ॥
कर्तव्य ईचें इस ऊमजेना । कदापि कोठें सुख ऊपजेना ॥ ७३ ॥

ते नित्य हातें मग दीस लोटी, । ते वागवी शोकसमुद्र पोटीं, ॥
शरीरसंताप नसे निवाला, । करीतसे नित्य अपन्हवाला ॥ ७४ ॥

चटपट बहु लागे होय संतप्त बाळा,
प्रतिदिन मदनाचा होतसे हा उबाळा ।
चतुर तिज समाना सर्व तीच्या वयस्या
असति, परि तयेच्या नेणती या रहस्या ॥ ७५ ॥

कुसुमशरशरानीं जर्जरीभूत जाली,
तदुपरि शरतल्पीं भीमकी हे निजेली ।
परि यिस भगवंतीं थोर निर्वाह आहे,
म्हणउनि कटिणाही वेदना सर्व साहे ॥ ७६ ॥

निरतिशय इची हे वेदना आयकीली,
त्वरित बहुत तेथें माय धांवोन आली ।
मग तिस पुसतां हा कंठ अत्यंत दाटे,
नयनयुगिं जलाचा पूरही थोर लोटे ॥ ७७ ॥

न पुसत मज तूं गे चित्रसालेस जासी,
अनियत अथवा ये गेहवापीस न्हासी, ]
सहज निजशरीं हे नित्य घालून नाडे,
प्रतिदिन फिरसी गे येकली कां अन्हाडे ॥ ७८ ॥

---

७२·४ क प्रतींत ' सकुमारवाले ' असा पाठ असून ख प्रतींत ' सखुमारवाले ' असा पाठ आहे. त्यावरून हें ' शरीर ' या नामाचें विशेषण दिसतें.

७५·२ चतुर तिज समाना ( ख प्रत ). क प्रतींत हस्तदोष आहे. ( ' चतुर तिज माना ' )

नकळत तुज किंवा भूक ताहान मोडे ?
अनियत तुज येती कां उगे आंगमोडे ? ।
निशिदिन कवणाचा हा निजध्यास लागे ?
अति कठिण अकाळीं योग अभ्यासला गे. ॥ ७९ ॥

अद्युणवरि न लागे कां तुला हे पिपासा ?
न मनिसि भय कांहीं, कां (क) रीसी उपासा ? ।
झडकरि उठ आतां अल्पसें जेवि, मूली,
नियतच तुज आली हे असे अन्नभूली. ॥ ८० ॥

दिसति मज सख्याही सर्व तूझ्या लबाडा,
तुजच जवळि आतां होय याचा निवाडा. ।
अति परिचय यांसीं येक हा देखिला गे,
अभिनव कवणाची अन्यथा देखि लागे. ॥ ८१ ॥

मज तरि समजेना सर्वथा हे अवस्था.
न समजत करावी काय ईची व्यवस्था. ।
अनृत वदत नाहीं सर्वथा नावरेसी.
निशिदिन जगदंबा तूज राखो परेशी. ॥ ८२ ॥

प्रतिवचन न येतां होय हे घाविरीसी
प्रकट म्हणत आहे गोष्टि नाहीं वरीसी. ।
प्रतिगृहिं नसती या काय लेंकी समा या,
बहुत सबळ माझी हे जळो व्यर्थ माया ! ॥ ८३ ॥

सकळहि कुळदेवी, येकदा ईस राखा,
प्रतिदिन इस दृष्टीं कांसवाचेच देखा. ।
नवस नवसिले हे व्यर्थ होऊं न द्यावे,
इस गुण दिधल्यानें सर्व संकल्प घ्यावे. ॥ ८४ ॥

---

८०·२ दोन्ही हस्तलिखित प्रतींत हस्तदोष आहे. ख प्रतींत काकपद घालून तो सुधारला आहे.

घडिघडि तिस दावी पोखल्या बायकांला,
विसरोन मदनाच्या जाति ज्या सायकांला. ।
अतिशयित असे जे राजपत्नी अभिज्ञा,
सकलहि अनभिज्ञांहून ते होय अज्ञा. ॥ ८५ ॥
सचकित म्हणताहे लागि कोठें पाहा गे;
झडकरि तुम्हि येथें वैद्य कोण्ही बहा, गे. ।
घडिघडि इजला हे झांपडीही पडावी,
म्हणउन मज वाटे भूतबाधा घडावी ॥ ८६ ॥
कितियक मग तेथें नैपुणें दाखवीती
अगणित तिज हातीं सांडणीं टाकवीती ।
कितियक इजसी या बोलती बोल नारी,
नकलत तुज जालें काय हें बोल नारी ! ॥ ८७ ॥
क्षणभरि मग तेथें पाड त्यांचा पडावा,
दिवस तरी तयांला येक हा सांपडावा ।
अनभिमत तयांचें वाक्य हें आयकेना
चतुरपण जयाचें ईपुढें हें विकेना ॥ ८८ ॥
तदुपरिहि पहाती वैद्य तीचीं निदानें.
तदुचित करवीती विज्ञ दैवज्ञ दानें ।
धरुन तिस ललाटीं मंत्रवादी विभूती
करित असति, जीच्या निर्विकल्पा विभूती ॥ ८९ ॥
तदपि न धरवे हा धीर यां पोखल्यांला
सहज न समजे हो हा इचा रोख त्यांला ।
अति विविध चरित्रें हांसिलासे मुरारी
अधिक मग तयेचें चित्तचैतन्य चोरी ॥ ९० ॥
अगणित मग बाळा दीर्घ निश्वास टाकी.
मुखकमळ तयेचें अंचलें माय झांकी ।
अनिश उभय पार्श्वी फीरतां हे न भागे;
क्षणभरि इजला हे झोंप तेही न लागे ॥ ९१ ॥

८९३९२
१०३८

११ २५



तदुपरि नृपपत्नी फार भेऊं निघाली,
सकरुण दुहितेला आपली आण घाली।
उठउन निजअंकीं बैसवी तीस माता
'अभिलषित तुझें तूं, भीमकी, बोल आतां ॥ ९२ ॥

तूं खेलतां राजस भागलीशी, । कीं दृष्टि लागे तुज चांगलीसी ?
संपर्ग जाला तुज सापिणीचा, । कीं लागला पालव पापिणीचा ? ॥ ९३ ॥

विकार भासे मज मन्मथाचा, । न सांपडे माग मनोरथाचा. ॥
पडे बहू विस्मृति हे तुला गे, । कोठें तुझा जाउन हेतु लागे ? ॥ ९४ ॥

नसे तुझें हें मन आजि ठाईं, । अशा प्रकारें पडशी अपायीं. ॥
होईल शोकें हृदय द्विधा, गे, । हांसेल या तूज भवद्विधा गे. ॥ ९५ ॥

न लेति जे लोचन अंजनाला, । तथापि हे निंदिति खंजनाला. ॥
दिसेत कर्णेजप जागराचे, । करू नको सोदर सागराचे. ॥ ९६ ॥

असीम लावण्य तुजे शरीरीं. । लाधेल हें कोण तऱ्ही शरीरी ! ॥
यदर्थ चित्तीं अति तापसी, गे, । न आडळे (तो) मज तापसी, गे. ॥ ९७ ॥

प्रवेशला कोण असे त्रिवेणी ? । प्रसन्न कोणास पिनाकपाणी ? ॥
त्वदर्थ कोणें पडणीं पडावें ? । हुताशनप्राशन वा घडावें ? ॥ ९८ ॥

आजन्म कोणें उदवास केला, । ज्याच्या असे काम फलास आला ॥
कीं खड्गधाराव्रत वीर सेवी । त्याचीच तूं होसिल मुख्य देवी, ॥ ९९ ॥

किंवा असाधारण हे तपस्या. । तूं अन्यथा होसिल काय वश्या ? ॥
असा महापूरुष कोण आहे । जो आजि तूझा अनुराग लाहे ? ॥ १०० ॥

तूं तो स्वभावें असती कुमारी, । हा कोपला दारुण शंबरारी. ॥
खचे तुझा उत्कट धैर्यसेतू. । तूं आपला हा मज सांग हेतू. ॥ १०१ ॥

शरीर तूझें मज पाहवे ना, । त्वद्वेदनाही मज साहवेना," ।
बोलोन ऐसें उगलीच राहे । तटस्थ तीचा मुखचंद्र पाहे ॥ १०२ ॥

---

९७·४ न आडळे तऱ्ही मज तापसी गे (ख प्रत : 'तऱ्ही' हा शब्द काकपद करून समासांत दिला आहे.);

९९·१ उपवास (भावे-प्रत)

यदुपतिविरहें जे शुष्क होऊनि गेली,
   अविदितहृदया जे मन्मथाधीन जाली ।
निरवधि जननीचा थोर संकोच जाला,
   प्रतिवचनप्रसंगीं प्राण कंठास आला. ॥ १०३ ॥

' तुज मज जननी हा सर्वथा भेद नाहीं.
   नव्हतिल तुज कैशा मद्गता वेदनाही ? ।
नियमितच असें मी श्वासनिश्वास तूझा,
   तुझविण दुसरा हा प्राण नाहींच माझा. ॥ १०४ ॥

परि, जननि, सुतेचा ल.भ हा होय ज्याला,
   नियत समजताहें थोर धिक्कार त्याला. ।
परम अधम हें स्त्रीजन्म वाईटवाणें,
   उपजत परचित्ताधीन तेनें रहाणें ॥ १०५ ॥

अनुपद तुझिया मी व्यर्थ पोटास आलें,
   परम अनुपयोगें भार भूमीस जालें ।
अगणित अपराधी मी तुझें लेंकरूं गे,
   अनुचित तुजसीं हे वंचना कां करूं गे ? ॥ १०६ ॥

प्रकट म्हणसि जो हा कोपला शंबरारी.
   अविदित तुज कैसा तात त्याचा मुरारी ? ' ।
वदत वदत ऐसें आडवी लाज आली.
   तदुपरि मग बाला खालती मान घाली ॥ १०७ ॥

अविदित दुहिताभिप्राय विज्ञात झाला.
   नरपति रमणीचा सर्व संदेह गेला ।
प्रमुदित मग माता कन्यकेला बुझावी,
   तदपि परम मुग्धा ईजला हे बुजावी ॥ १०८ ॥

तदुपरि जनयित्री फार उद्विग्न जाली;
   पतिसमिप मृगाक्षी तेच वेळेस आली ।
सविनय मग त्यासी हात जोडूनि बोले;
   अपरिमित जलाचे पूर नेत्रांस आले ॥ १०९ ॥

'उपवर मुलि जाली, बोलतां येत नाहीं.
वरविषयक चिंता हे नसे होत कांहीं।
यदुवर अवतारीं, पुत्र जो देवकीचा,
गुणनिधि, अवधारीं प्राण ये भीमकीचा॥ ११० ॥

पदयुगुळ हरीचें ईस आदान आहे.
तदितर वरवार्त्ता सर्वथा हे न साहे।
मणवुन, पृथिवींद्रा, गोष्टि हे आयकावी,
त्वरित मुलि उदारा केशवा आजि द्यावी' ॥ १११ ॥

वचन मग विदर्भाधीश बोलों निघाला,
'मजवरि अमृताचा लोट कोठूनि आला?।
अगणित परिपाका पुण्य संपूर्ण आलें,
अघटितघटनेनें दैव किंवा उदेलें?' ॥ ११२ ॥

तदुपरि मग दोघां हाच निर्वाह केला.
म्हणति हरिस देऊं आपुले कन्यकेला.।
नरपतिमुखिंची हे गोष्टि बाहेर आली,
हळुहळु तनयाच्या कर्णमूळास गेली. ॥ ११३ ॥

परम अधम रुक्मी जो महाशीघ्रकोपी.
प्रकट मणति याचे दोष हे कोण थोपी?।
बहुतच अविवेकी होय संक्षुब्ध तैसा,
हुतवहवदनीं हा तैलसंपातजैसा. ॥ ११४ ॥

उपजत खल जो कीं दुष्टबुध्धि स्वभावें,
अनिश यदुपतीसीं वर्त्ततो वैरभावें।
जनक मग विचाराकारणें त्यास बाहे.
अधम तंव तयातें पुत्र संक्रोध पाहे. ॥ ११५ ॥

तदुपरि हरिनिंदा जे मुखांतून आली,
स्तुतिपर परभागें ते महा पुष्ट जाली.।

अनृत वचन कांहीं वैखरी हे वदेना
सहज हरिचरित्रा दोष येऊंच देना. ॥ ११६ ॥

कथा हे कृष्णाची सकळ जगदानंदजननी.
मनोभावें ईचें श्रवण करिजे नित्य सुजनीं. ।
प्रसंगें श्रोत्यांचें सकलहि महादोष हरती,
यदुत्तंसप्रेमें विषयरसगोडी विसरती. ॥ ११७ ॥

इती श्रीमद्भगवद्भक्तपदानुरक्तकविसामराजविरचिते रुक्मिणीहरणकाव्ये रुक्मिणीजननोनाम द्वितीयः सर्गः ।

---

११६·३ मूळ हस्तलिखितांत 'वेदना' असा हस्तदोषयुक्त पाठ आहे.

# सर्ग तिसरा

## ॥ श्रीरुक्मिणीकांताय नमः ॥

रुक्मी म्हणे, ' हें तुज काय जालें ? । कुलास या दूषण थोर आलें ॥
विचार तूझा मज हा न माने, । किंवा इचें प्राक्तन कोण जाणें ॥ १ ॥

विवाहकार्यीं स्थिरता धरावी, । तां आपली तांतडि आंवरावी ॥
जें येकदां कृत्य घडोन येतें, । विचारल्यावीण करूं नये तें ॥ २ ॥

हिमालयें जो अविवेक केला, । तसाच त्याचा परिपाक जाला ॥
ये पार्वतीचे पडला कपाळीं । अद्यापि पाहे न चुके कपाली ॥ ३ ॥

त्याचेंच तां हें मत आदरीलें । कां आपलें पौरुष आवरीलें ॥
मला अभिप्राय कळों न देसीं । त्या यादवाचे गुण नित्य घेसीं ॥ ४ ॥

मुखांबुजीं संतत वेणु वाहे, । गोपांगनांचे अपशब्द साहे, ॥
धरी शिरीं केवळ मोरवीसें, । तें देवकीचें तरी पोर पीसें ॥ ५ ॥

जो हा गुणग्राहक रानटांचा, । शोभे सदा वेष बरा नटाचा, ॥
असे जया संगति गोवृषांची, । तो काय जाणे स्थिति मानुषाची ॥ ६ ॥

जेणें सखा मातुळ हा वधावा, । संबंध त्यासी तुजसी बधावा ॥
त्या मावसीच्या तरि घातक्याला । कन्या कसी देसिल पातक्याला ॥ ७ ॥

जो गोकुळीं गोवळ मातलाहे, । वक्षस्थळीं जो हरि लात लाहे, ॥
तो ईजला वल्लभ मी करीना । ज्याचा मला हा कलला करीना ॥ ८ ॥

असे तुझी मूलि महागुणाची, । पत्नी कसी होइल निर्गुणाची ? ॥
ज्याकारणें हे विलपे वराकी, । तो काय ईला समजे गुराखी ? ॥ ९ ॥

नृपा तुला उत्तम ध्हारि जाली । दैवें निघाली परि हेरि जाली ॥
जे भाळली केवळ गोवळाला, । कळंक लावी विमळा कुळाला ॥ १० ॥

जाणों नको यास मनुष्यदेही । असे सदाचा हरि हा विदेही ॥
निर्द्वंद्व, निःसंग, महा अकर्मी, । याची नसे दृष्टि मनुष्यधर्मी ॥ ११ ॥

लज्जा न पावे हरि अग्रजाची, । जो गोकुलग्राम समग्र जाची, ॥
जो नित्य वृंदावनभूविहारी, । जो गोपकन्यावसनापहारी ॥ १२ ॥

सबाह्य अभ्यंतर कृष्ण काळा, । कदापि नाहीं वचनास ताळा ॥
कदापि जो धर्म अधर्म नेणे, । हे ये कपाटच्चरवृत्ति जाणे ॥ १३ ॥

हा येक जाणे विधि वा हल्याचा । विचारतां केवल बाहल्याचा ॥
हा हुंबरी घालुन रे शाहाणा, । घेऊन काठी, चडवी वाहाणा. ॥ १४ ॥

न आडलें हे कुळगोत कांहीं, । विचारितां यास टिकाण नाहीं. ॥
देऊं नको मूलि, लहाचराया । जाणों नको गोष्टि अहाच राया. ॥ १५ ॥

ज्यांचा महा कुत्सित नांदणूका, । सुनांस नाहीं तरि कामणूका, ॥
ज्या भक्षिती केवल ताकघाटा, । विकावया गोरस नेति हाटा, ॥ १६ ॥

जो गोरसें गोवल नित्य गाणे, । तो काय या कामरसास जाणे ॥
मायावलें केवळ विश्व मोही, । जाला तुला वल्लभ आजि तोही. ॥ १७ ॥

भूतांस जे होउन भूत लागे, । तें हें महद्भूत जगांत जागे. ॥
जळीं स्थळीं व्यापक रूप ज्याचें । न मानिसी तूं भय आजि त्याचें ॥ १८ ॥

जाला असे जो उदकांत मासा, । तसाच हा कांसवही अमासा, ॥
त्यानंतरें सूकर घोररूपी, । नृसिंह्य तो त्याहुनही विरूपी. ॥ १९ ॥

तसाच हा वामन निर्विकारी । झाला बलीचे घरिंचा भिकारी. ॥
जो आपली भार्गव माय मारी, । तुम्हांस तो निर्दय काय तारी ? ॥ २० ॥

गमाविलें पौरुष रामरूपें । तें मर्कटें मेळविलीं अमूपें. ॥
राणामधें टाकुन जाय राणी, । असा नसे आणिक तो अडाणी. ॥ २१ ॥

हा आठवा चालक कृष्ण मोटा, । संबंध त्यासीं तुज आजि खोटा; ॥
यालागिं जे जे जन आठवीती, । ते सर्व संसारसुखा मुकेती. ॥ २२ ॥

उत्पन्न जो होय चहूं भुजाचा । विटंबिला अन्वय भूभुजाचा ॥
उरीं जयाचे मिरवे लहासें । या सोयर्यांचें करिसील हांसें ॥ २३ ॥

---

१५.३, ४ ‘देऊं नको मूलि, लहान राया । जाणो नको गोष्टि अहवराया ॥’ (भावे-प्रत)

पडे पहा हे अकुलीं कुलीना, । शची दिसे जीजपुढें मळीना. ॥
परी जयीं हे वरदा विपारा । जाळील हे कीर्त्ति समुद्रपारा. ॥ २४ ॥

हे गोष्टि माझी हृदयीं धरावी, । वार्त्ता हरीची सहसा त्यजावी. ॥
वसुंधरा उद्दस आजि जाली ? । पुंसृष्टि किंवा अवघी बुडाली ? ॥ २५ ॥

जो चैद्यदेशीं मदघोष आहे, । विख्यात ज्याचें कुळ, शीळ पाहे, ॥
आहेच पूर्वींहून सोयरा जो । संबंध त्यासीं तुजसीं विराजो. ॥ २६ ॥

कुमार त्याचा शिशुपाळ नामा । उत्कृष्ट सर्वांहुन, सार्वभौमा. ॥
उदार, गंभीर, महाभिमानी । या यादवाला तृणतुल्य मानी. ॥ २७ ॥

विचारिलीं राजकुळें अशेषें । हा श्लाघ्य संबंध दिसे विशेषें ॥
ये भीमकीनें तप काय केलें ? । दैवें इच्या हेंच घडोन आलें ' ॥ २८ ॥

अत्यंत हा आग्रह देखियेला । पुत्रास तो भीमक वश्य झाला! ॥
कर्त्तव्य दुष्टाप्रति काय चाले ? । नेत्रीं विषादें जळबिंदु आले ॥ २९ ॥

पाचारवी पुत्र समस्त जोशी । प्रत्युत्तराची न धरीच गोसी ॥
जसें तसें केवळ लग्न काढी । चैद्येश्वरा सत्वर मूळ धाडी ॥ ३० ॥

कोठ्या थट्या मुक्त समस्त केल्या । प्रमाणग्या आपण देववील्या ॥
सभोंवते भोंवति सर्व सेटे । राबेत तेथें कितियेक वेठे ॥ ३१ ॥

स्थळीं स्थळीं मंडप घालवीले । प्रसाद अत्युत्तम झाडवीले ।
सवारिल्या राजसभा प्रशस्ता । वारांगना आणविल्या समस्ता ॥ ३२ ॥

त्वरित मुळचिठ्या त्या सोयऱ्यांला लिहील्या,
रथ, तुरग, तुरंगी, पालख्या पाठवील्या ।
सहज रिपुपणें जो श्रीपतीचा विरोधी,
म्हणुन मग मार्ग द्वारकेचा निरोधी ॥ ३३ ॥

---

२६.१ 'दमघोष' असें पाहिजे. दोन्ही हस्तलिखित प्रतींत 'मदघोष' असा चुकीचा पाठ आहे.

३१.१ काठ्या (ख प्रत). ३२.२ प्रासाद (ख प्रत)

न पुसत जनकाला चालवी हातरोखे
तदुपरि सचिवांची बुध्दि सर्वत्र रोखे।
तटति सकळ कार्यें, हा पडे हे प्रवाहीं,
बहुतच मन घाली सोदरीचे विवाहीं ॥ ३४ ॥

द्विपवर अवलोकी आदरें आंदणाचे,
क्षितिधर अथवा जे भारती अंजनाचे।
निवडुन मग घोडे काढिले फार यानें,
जवन पवन जीहीं जिंकिलासे रयानें ॥ ३५ ॥

अति रुचिर रथांच्या आणवी संचयाला
हयनिवह नियोजी जे महासंच याला।
मणिखचित अपारा पालख्या, तख्तरावे
घडिघडि अवलोकी; हा भरे येच हांवे ॥ ३६ ॥

पटु पटह, पताका, आतपत्रें उदंडें,
शशिकरविशदें तें चामरें हेमदंडें, ।
कनकमय कमाना, त्या गदा दुर्निवारा,
सित शर तरवारा तीक्ष्णधारा अपारा. ॥ ३७ ॥

मग जडित कडीं तें, मुद्रिका, कर्णभूषा,
पदकयुत गलांच्या सांखळ्याही विशेषा, ।
कनकघटित माळा, हार मुक्ताफळांचे,
अति तरळ विलोकी थाट ते मेखळांचे. ॥ ३८ ॥

तदुपरि जरतारी मंदिलें उंच बोली,
पटुतर पटकेही जें अमोलीक मोलीं. ।
निवडुन डगल्यांला नीलखा वेतर्वाल्या.
तदुचित सुरवारा तत्क्षणीं सीववील्या ॥ ३९ ॥

---

३५.२ 'भारती' याऐवजीं 'भासती' असा पाठ श्री. कानिटकर सुचवितात. त्यानें अर्थ चांगला लागतो.

मखमल, सखलादा, सोपशाला अपारा,
मृदुतर थिरमे, त्या कोंचक्या कोरदारा, ।
अतळस कुतन्याहीं साहिव्या रंद बोली,
बहुत सखर सेले चांगले आठ गोली. ॥ ४० ॥

पाटाऊ म्यानवंद्या, तडप आणि धव्या, भेद खंत्रायितांचे,
लाखी, माची, दुरंगी, बहुत ढिग तसे ताफत्या वाफत्यांचे,
साड्याही नौपटीच्या, कतिपय लुगडीं, जें नवें पांजणीचीं.
पीतें, शोणें, बनोसें, भरजर अवघीं पातळें पैठणींचीं. ॥ ४१ ॥

मुक्ताशेखर, पोंहच्या, धुकधुक्या, हीरांगदें उज्वलें,
पाची, हीरक, पद्मराग, लसणे, गोमेद, मुक्ताफळें. ।
सत्कृष्णागरुनिर्मिता उदवत्या, काश्मीर कस्तूरिका,
चोवा, चंदन, मोगरेल अतर, श्रीखंडखंडे, बुका. ॥ ४२ ॥

हांडे, कुंभ, पल्या, परात, तवल्या, गुंडे, तपेलीं, घडे ।
गंगाळें, चरव्या अनेक, निवडी सोन्यारुप्याची जडें
तांबे, जांब, कुजे, प्रशस्त तिवया, ताटें नवीं तासकें,
वाट्या लाहानशा, तशा तबकड्या, केल्या महाशासकें ॥ ४३ ॥

चौक्या सुंदर, हेममंचक, तसे चौरंग, त्या न्याहल्या,
नीशारादि पलंगपोस, पडदे, गाद्या, उशा, पाहिल्या. ।
अस्तावे, समया, रुमाल, तबकें, प्याले, डबे, आरसे,
पंखे, मोरछलें कितेक निवडी तस्तें प्रशस्तें पुसे ॥ ४४ ॥

सर्जे, तोडर, पाखरा, सजहुमे, कंडे, पटे चांगले,
सील, टोप, अनेक हा निवडितां ते लोकही भागले ।
डेरे खांबजडीत उंच अवघे, भारी छमीने जरी,
बाडें सुंदर, खावगे, नवगज्या सिद्धाच होत्या घरीं ॥ ४५ ॥

तक्क्यांना मद गर्दपोश, सुजन्या, लोडे दुलीचे नवे,
सत्रंज्या अति विस्तृता, बचकन्या आलोकिले चांदवे ।
गंजीफा, सतरंज, चोपड नवे, ते नर्दही सांग जे,
खांशाच्या पिलसो नसोत म्हणती त्याला बहू रागिजे ॥ ४६ ॥

दासी, दास, सवत्स धेनु, महिषी, दासेरकें, वेसरें,
रेडे, बोकड, येडके, वृषदुमे, सौगंधिकें मांजरें, ।
चित्ते, बाज जुरे, विहंगम तुरे, जे हे ससाणे बरे,
लावे, तितिर, मोर, थोर बदकें, रावे महासाजिरे ।। ४७ ।।

येळा, कंकोळ, पूगीफल, खदिर, शशी, जायपत्री, लवंगा,
बादामें, आकरोटें, खिसमिस, उतत्या आणवील्या सवंगा ।
गोडंब्या, नारिकेलें, खजुर आणि रुईशर्करा, शुद्ध, चीनी,
जीरे, शुंठी, मरीचें, हळदि बहुतसी, हिंगही, दारचीनी ।। ४८ ।।

दाळिंबें, सोनकेळें, पपनस, अननसें, जांभळें, मातुलिंगें,
आंबे, लिंबें, (सुरंगें), तरबुज, पपये, अंजिरें हें कलिंगें,
शेपें, शीताफळेंही, खरबुज, खिरणी, सुंदरें तूत, बोरें,
सप्ताळें, ऊस पुंडे, कविठ, कमरखें, वाळकें सूक्ष्म थोरें ।। ४९ ।।

गोधूम, तांदुळ, तुरी, मुग, माष, शाळी,
तीळें, तुपें, गुळ, चणे, तिळ येति काळीं ।
पानें नवीं दळदरें रुचिरें विड्याचीं,
आसेति दिव्य कुसुमें बहु केवड्यांचीं ।। ५० ।।

सकळसंपति यद्यपि आयती, । तदपि होति समस्तहि आयती ।।
चहुंकडे फिरती परिचारिका । बहुत भीति तया अविचारिका ।। ५१ ।।

दळण, कंडन, पेषण, चाळणें, । वइंचणे, निसणें, अणि गाळणें, ।।
कणिक, शुद्ध पिठी, सपिठें रवा । म्हणति त्या गहुं आणिक बोलवा. ।। ५२ ।।

सहज सुंदर सूद कुटुंबिनी । हळुच त्या मग येति नितंबिनी. ।।
वळवटे वळिती जिव आटिती । बहुत पातळ पापड लाटिती. ।। ५३ ।।

विविध त्या मग घालिति लोणचीं, । तिरकुटें नसती अति वाणिचीं. ।।
सहज लग्न निघे बहु तांतडी । म्हणुन होय पुढें अति तांतडी. ।। ५४ ।।

---

४९–२. दोन्ही हस्तलिखित प्रतींत नसलेला कंसांतील 'सुरंगें' हा शब्द भावे प्रतीनें या चरणाच्या मात्रापूर्तीसाठी घातलेला दिसतो.

अपरिमित वडे हे वाळती सोहळ्याचे. ।
   दिवस जवळि आले बोलती कोहळ्याचे. ।
दृढतर तिळवे हे, गोड अत्यंत लाडू,
   प्रिय परम जसे हो सोयर्‍यां माजि साडू. ॥ ५५ ॥

निवडुन शिशुपाळा कारणें हा मुकासे.
   अगणित भरती हे नित्य, जेथें नकासे. ।
तदुपरि वरपक्षी लेहवी लोक खांसे,
   घडि घडि जनकाच्या जो विचारास हांसे, ॥ ५६ ॥

अविनय तनयाचा देखिला स्पष्ट भारी.
   नरपतिरमणी ते खोंचलीसे जिव्हारीं. ।
मुखकमल तयेचें स्वच्छ विच्छाय जालें.
   तदुपरि अविलंबें आंग मोडोन आलें. ॥ ५७ ॥

न कळत हृदयेशा स्वीय गेहासि गेली,
   निजकनकपलंगीं भामिनी ते निजेली. ।
वचन परिजनांसी चंद्रवक्त्रा वदेना.
   तनयकृत विचारा व्यक्त होऊंच देना. ॥ ५८ ॥

नरपतिदुहितेला माय येतां दिसेना,
   तदुपरि मग तीचें चित्त कोठें बसेना. ।
घडि घडि निजगेहा आंतबाहेर येते,
   अनिमिष जननीची वाट बाळा पाहाते. ॥ ५९ ॥

त्वरित बहुत घाई होतसे आपतीची.
   क्षणहि मन न घाली सर्वथा माय तीची. ।
तदपि परिजनांला हेतु याचा पुसेना,
   सुलज बहुगुणांची मायसीं जे रुसेना ॥ ६० ॥

कुचकुच सखियांची अन्यथा देखियेली;
   मग परम शाहाणी तत्त्व जाणोन गेली ।

---

६०.२ क्षणहि मन मघाली सर्वया माय तीची ( ख प्रत )

नरपतितनयेचा सर्व उत्साह आटे;
प्रळयजळधि किंवा लोटला तीस वाटे ॥ ६१ ॥

स्थगित मग मृगाक्षी ते घडी येक राहे,
अति चकित दाहाही शून्य दिग्भाग पाहे ।
विसर तिस पडे हा कांहिही आठवेना
हृदयकमलकोशीं दुःख हें सांटवेना ॥ ६२ ॥

अनभिमत विचारें तें तिचें चेत लासे,
विरहदहन आंगी मागुतीं चेतलासे ।
अपरिमित तियेला येति तेणें उमासे
घडिक म्हणति जाऊं प्राणही हे अमासे ॥ ६३ ॥

क्षितिपतितनया जे मन्मथाधीन जाली,
बहुत सबळ तेव्हां मूर्छना तीस आली ।
परम विकळ बाळा नावरी जे शरीरा,
धरणिवरि पडे निश्चेतना ते अधीरा ॥ ६४ ॥

तदुपरि सखिया त्या सर्व धावोनि येती,
नवकिसलयतल्पीं तीजला नीजवीती ।
घडि घडि करिते हे भीमकी घालफेडी,
अगणित ऋण किंवा मन्मथाचेंच फेडी ॥ ६५ ॥

अनुपद तिस कोण्ही वीजणें जाणवीती.
कितियक मग तेथें चंदनें आणवीती ।
कितियक नलिनीचीं तें दलें कोमलेंसीं
धरिति हृदयदेशीं संगतें शैवलेंसीं ॥ ६६ ॥

तिजजवळि सख्यांचा बैसला थोर पाळा.
कितियक रचिती त्या दिव्य कर्पूर माळा ।
कितियक मणिबंधीं बांधती त्या मृणाळें.
म्हणतिच 'शिशुपाळा, हो तुझें तोंड काळें.' ॥ ६७ ॥

परम विकळ तन्वी, हालवील्या न हाले.
   सशपथ सखियांनीं बोलवील्या न बोले. ।
सहज यदुपतीचें नाम जे घेत आहे,
   उघडुन मग डोले तीकडे मात्र पाहे. ॥ ६८ ॥

मुखरणि सखियांची सर्व संमर्द वारी.
   बहुत जवळि केली भूपतीची कुमारी. ।
हळुहळु मग काढी श्रीपतीचीच वार्त्ता,
   न वदत तिजसी हे बोलती तीस धूर्त्ता. ॥ ६९ ॥

यदुपतिपदवार्त्ता तन्मुखांतून येतां,
   लगबग बहु जाली मूर्च्छेलागिं जातां, ।
सकरुण सखयेसी भीमकी वाक्य बोलें
   सहज मृदु, जयाशीं काय पीयूप तोले ? ॥ ७० ॥

कळत कळत होसी आजि कां तूं अजाणा ?
   अझुणवरि कसी या नेणसी पंचबाणा ? ।
अति कठिण, सये, हें चाप याचें जळेना !
   त्वरित बहुत याची कां चिता पाजळेना ! ॥ ७१ ॥

व्यजनपवनयोगें होतसे हा उबारा;
   अनिश तपति किंवा सूर्य येकत्र बारा. ।
खुपति मज शरीरीं सर्व तल्पप्रसूनें.
   निपटच, सखि ये येसां केली प्रसूनें ॥ ७२ ॥

किति दिस करपत्रीं आपला जीव घालूं ?
   निशिदिन मदनाला कोठपर्यंत डालूं ?
हळहळ बहु जाली होय संसार वारा.
   मजवरि फिरली हे दैवदुर्वारधारा. ॥ ७३ ॥

---

७२.४ ‘ निपटच, सखि, डोळेझांक केली प्रसूनें ’ ( भावे–प्रत ). या पाठाला मूळ हस्तलिखितांत आधार नाहीं. अर्थात् मुळांतील पाठहि सदोषच आहे.

रतिपति मज पाठीं कां, सये, लागला, गे, ?
यदुकुलतिळकाचा हा कसा लाग लागे ? ।
दिवस कठिण कंठीं मी पराधीन बाळा.
मुररिपुकरुणेचा नाडले हा जिव्हाळा ॥ ७४ ॥

जिव बहु उबगे हा, गोष्टि कांहीं रुचेना,
निजहित मज आतां सर्वथा हें सुचेना ।
घडिघडि बहु, बाई, वोढती सर्व सांवा.
यदुपति मज भेटे कैं जिवाचा विसांवा ? ॥ ७५ ॥

अघटित घटना हे मांडिली या विधेनें.
कठिण हृदय केलें कां कृपेच्या निधीनें ? ।
झडकरि जरि माझा येकदां जीव जाता,
निजकुळपुरुषार्थी बंधु निश्चिंत होता ॥ ७६ ॥

कनक रजत वेचे नित्य खंडीच खंडी,
परि मन जननीचें पातकी हा विखंडी ।
न पुसत परभारीं चालवी राजकार्यें,
नरपतिपरिपाटी टाकिली या अनार्यें ॥ ७७ ॥

परम अधम रुक्मी हा महा तोंडखोडी,
नियतच वडिलांच्या जो विचारास मोडी ।
विकत कठि जयानें घेतली आजि मोलें,
अनुदिन बहु लागे बाप याच्याच बोलें ॥ ७८ ॥

श्रुतिनिवह जयाला बोलती ' नेति नेती, '
निजहृदयनिकेतीं नित्य योगींद्र नेती, ।
निशिदिन शितिकंठा हा जयाचाच धंदा,
घडिघडि बहु त्याची हे घरीं होय निंदा ॥ ७९ ॥

निजहित समजेना, लिप्त हा होय दोषें.
तरुन कितिक गेले पातकी नामघोषें ।
निजपदभजकांची हेळना होय जेथें,
त्वरित बहुत धावे द्वारकानाथ तेथें ॥ ८० ॥

सकरुण भगवंता, जाशि तूं आ( ज ) कोठें ?
तुजविण पडलें हें जाण संकष्ट मोटें ।
मजच वर न माने लग्न वायां बधावें,
झडकरि बहु माझ्या धांवण्या आजि धांवें. ॥ ८१ ॥

विविधविषयतृष्णादुर्निवारप्रवाहीं
पडति जन, तयांला नाठवे आजि कांहीं. ।
निजगुणसमुदायें यांस बोढून काढीं,
झडकरि अथवा ये नामनौकेस धाडीं. ॥ ८२ ॥

सहज घडोन आलें ये विदेशीं राहाणें. ।
तुजविण उगवी हे कोण माझीं राहाणें ? ।
त्वरित बहुत आतां येकदां भेटि द्यावी,
उचलुनि अथवा हे आपुली दासि न्यावी. ॥ ८३ ।

स्मरण तुज, मुकुंदा, कां नव्हे आजि माझें ?
तुजविण मज माझा देह हा होय वोझें. ।
झडकरि अथवा हा नेसि ना जीव देवा ।
रवितनयलुलायारूढ देखेन केव्हां ? ॥ ८४ ॥

कृपादृष्टीं पाहें, मज कवण आहे यदुपती ?
मला या दुष्टाचीं तिकट वचनें नित्य खुपती. ।
सुखें या प्राणेसीं नियतच पडो आजि विघडो,
भवंनिंदालेशश्रवण परि हें येक न घडो. ॥ ८५ ॥

महादैत्यश्रेणी अनुदिन असंख्यात वधिशी,
प्रसंगीं ये कैसें अतिशयित ताटस्थ धरिसी ? ।
जया सिंहा मत्तद्विरदकरटास्फोटन घडे,
तयाला जंबूकापसददमनीं संकट पडे ! ॥ ८६ ॥

गजेंद्रासाठीं तूं जडकरि कसी टाकिसि उडी ?
परामर्शी येशी द्रुपदतनयेच्या घडिघडी. ।

ध्रुवप्रल्हादादि प्रियतम महा होति तुजला;
तयांपेक्षां कैसें निपट धरिसी दूर मजला ? ॥ ८७ ॥

अनेकां जन्माचा परिचय जयासीं बहु असे,
तया तूझें, कृष्णा, कठिण मन सर्वांहुन दिसे. ।
जगज्जीवा, किंवा दुरितचय माझा बहुतसा
अकारुण्यें तूझ्या परिणत असा होय सहसा ॥ ८८ ॥

सुराराध्या देवी मजवरि उदासीन सकला
कस्या जाली ? मी तों निपटच पडें आजि विकला ।
सहाकारी माझा यदुपति पहा आजिच अडे.
कसा येकायेकीं मजवरि महापर्वत पडे ! ॥ ८९ ॥

अवो बाळे, वाळे जडित तुज वाहेन बरवे.
तिहीं लोकीं तूझें अतिशयित सामर्थ्य मिरवे ।
मला तूं ये वेळे त्वरित जरि पावेसि जननी,
मनोभावें तूझें अनिश यश गाईन वदनीं ॥ ९० ॥

यथाकाळीं, काळी, करिन भवदाराधन बरें.
महाकल्पांतींही उपकृति तुझे हे न विसरें ।
महेशे, कृष्णाचें त्वरित बहु आकर्षण करीं;
करीं, माते, आतां झडकरि मला येथुनि धरीं ॥ ९१ ॥

अनाथांचें नाथे, सुमुखि, विमुखी होसि मजसीं.
अवस्था माझी हे समजसि, वदों काय तुजसीं ? ।
प्रपंचीं ये होता बहुत मज तूजा भरवसा.
जगन्माते, कैसी न पवसिच अद्यापि नवसा ? ॥ ९२ ॥

मला, माते, तूझा कवण महदन्याय घडला ?
तुला जेणें माझा विसर, गिरिजे, आजि पडला ।
करावा वंधूचा त्वरित वदनस्तंभ बगले
तुझें कांहीं केल्या, जननि, मन आद्यापि नुगले ॥ ९३ ॥

क्षडे बंधुश्रेणी, सकळ सचिवां मोहन पडे,
धुडावे दुर्वृत्त, प्रबळ शिशुपाळा ज्वर जडे।
प्रभावें हें तूझ्या, जननि, जरि आद्यापिहि घडे,
महाविद्ये, वंद्ये, तरिच घडलें कार्य विघडे. ॥ ९४ ॥

वसति करिसि, माते, नित्य मातंकवाटीं;
परि भजक तुझा हा मत्त मातंक वाटी।
अमृतमय कृपेची दृष्टि हे पावलीसे
तइहुनि सुरवाडें सिद्धि फांफावलीसे. ॥ ९५ ॥

त्वरित तूं त्वरिते, जरि पावसी, । तरिच दैवतसी मज भावसी. ॥
विनवितें तुळजापुरवासिनी, । अभयदायिनि, शंभुसुवासिनी. ॥ ९६ ॥

वचन आइक, कर्णपिशाचके, । अतिनिगूढपराशयसूचिके. ॥
तुजच सांप्रत हें यक मागणें । मदभिलाष हरीप्रति सांगणें ॥ ९७ ॥

फिरसि लोक तिन्ही वरयक्षिणी, । परम सावध हो हरिरक्षिणि. ॥
झडपिसी दमघोषसुता जयीं । पुरति सर्व मनोरथ हे तयीं. ॥ ९८ ॥

वदत वदत ऐसे सांज होयास आली,
दिनकरकरलक्ष्मी सर्व संक्षीण झाली.।
मुखकमल तयेचें म्लान अत्यंत देखे,
म्हणउन कमळांचा बंधु बांधव्य राखे. ॥ ९९ ॥

सहज दिनमणीचा अस्त होतांच, एकी
प्रियतमाविरहानें क्रंदती चक्रवाकी.।
विधिविहितनियोगें वारुणी आदरीली,
म्हणुन चरम संध्या काय आरक्त जाली? ॥ १०० ॥

तदुपरि उगवे हा चंद्रमा पूर्णिमेचा.
अनभिनषित अर्थी होय ये उत्तमेचा;।
द्विजपति विसरेना सर्वथा स्वीय दीक्षा,
कर पसरुन मागें वक्त्रलावण्यभिक्षा, ॥ १०१ ॥

हिमकरकर जैसे कांतिपूर स्त्रवेती,
हळुच तसतसे ते चंद्रकांत द्रवेती. ।
क्षुधिततर चकोरां पारणें थोर जालें,
मुकुलित कुमुदाला जन्मसाफल्य आलें. ॥ १०२ ॥

विलसित अवघें हें भीमकीला न सोसे.
अविरत मग टाकी निःसहांगी उसासे. ।
क्षणभरि सखियेचा हात घेऊन हातीं
ससलिल बहु केलीं बोलतां नेत्रपातीं. ॥ १०३ ॥

अमृतमय शरीरी बोलती लोक सारे,
तदपि, कुमुदबंधू, वर्त्तसी तूं कसा, रे ?।
सहज विमळ तूं तों बाळ रत्नाकराचें
असोन, धरिसि कैसें नाम दोषाकराचें ? ॥ १०४ ॥

असेस चंद्रा गुरुदारगामी । प्राणास जालेंच उदार, गा, मी ॥
या पातकें होउन राजयक्ष्मी । गमाविली तां द्विजराजलक्ष्मी ॥ १०५ ॥

जिवलग सखिये, तूं होसि सर्वां अपेक्षा
तदपि करिसि कैसी आजि माझी उपेक्षा ? ।
कळत कळत तां ही हातिंचें सोडिजेतें,
नियतच तरि काळें या मला वोढिजेतें ॥ १०६ ॥

तुहिनकर नव्हे, हें बीज चिंतालतेचें,
विकसित अथवा हें पुष्प उद्वेगतेचें ।
अभिनव मदनाचें छत्र किंवा उभारें,
युवतिजन जयाच्या दर्शनेंमात्र भारे ॥ १०७ ॥

नभ धवलित केलें, विश्व आनंदवीलें,
परि विरहिजनाचें चित्त उन्मादवीलें ।
क्षणभरि मज बाई याकडे पाहवेना,
प्रळयदहनकल्प स्पर्श हा साहवेना ॥ १०८ ॥

मज निज नलगे, हे वैरिणी सेज जाली,
तगमग सुटलीसे, राति मध्यास आली।
क्षणभरि सपनींही कृष्ण दृष्टीं पडेना,
नयनसलिलयोगें चित्रिंचा सांपडेना ॥ १०९ ॥

अवसर समजेना, सारिका फार बोले,
शुकवचनविलासें चित्त अत्यंत सोले।
अझुणिहि न वजे हा चंद्र अस्ताचलासी,
यदुपतिविरहाची बैसवीली कळासी ॥ ११० ॥

चंद्र सोदर सये गरलाचा, । भाव काज समजे दुरळाचा ? ॥
ये शशांक मदनास सहाया, । मी अशक्य परि यास सहाया ॥ १११ ॥

दुःख दारुण सये विषयाचें । नित्य नूतन चढे विष याचें. ॥
लग्न निश्चित असे परवाचें, । मी कसी परि अतःपर वाचें ? ॥ ११२ ॥

बंधु देयिन म्हणे शिशुपाळा, । कां कृपा तुज नयेच कृपाळा ? ॥
दीनवत्स(ल), दयानिधि, ऐसीं । विरुदें हरि गवांविसी कैसीं ? ॥ ११३ ॥

सांवळ्या, सगुण, नंदकुमारा । राजसा, त्वरित ये सकुमारा. ॥
मन्मथें झडपिलें मन माझें, । झाडणी करिल पाउल तूझें. ॥ ११४ ॥

जन्म घोसिं हरि यादववंशीं, । देवही उतरती निजअंशीं. ॥
अंगनेस मज येक वरावें, । हें जगांत बहु नांव करावें. ॥ ११५ ॥

पाव तूं त्वरित, नंदकिशोरा, । राधिकावदनचंद्रचकोरा. ॥
रातलें मन तुझें पदपद्मीं, । नित्य वीट उपजे निजसद्मीं. ॥ ११६ ॥

नंदगोपतनया, अनया रे, । या कसा विसरसी विनया, रे ? ॥
व्यापिलें मज, मनोहरवेषा, । देवकीसुकृतसारविशेषा. ॥ ११७ ॥

---

११३. दोन्ही हस्तलिखित प्रतींत 'दीनवत्स दयानिधि ऐसीं' असाच पाठ आहे. 'ल' हस्तदोषामुळे गळला आहे.

११५-३ वरील पाठ 'ख' प्रतींत आहे. 'क' प्रतींत तो दुरुस्त करून घेतला आहे.

अंतरीं सुख तुझें बहु दाटे, । हें वृथा सकळ वैभव वाटे. ॥
एक वेळ मज सन्मुख यावें, । श्रीहरी, चरणदर्शन द्यावें. ॥ ११८ ॥

गोपिकांसि, हरि, दर्शन देसी, । भावपूर्वक अपूर्व वदेसी. ॥
घाणती घुरट ज्या कुलटा, रे, । पंथ हा, हरि, तुझा उलटा, रे ॥ ११९ ॥

द्वारकानगरनीरजनेत्रा, । काय होति मजहून पवित्रा ? ॥
सुंदरा तन्हि, हरी, अथवा, रे । हा विवेक अवघाच निवारे. ॥ १२० ॥

श्यामसुंदर सखा वनमाळी । आणि सत्वर, सये गुणशाळी. ॥
चालितां सकळ विश्वविसावा । आठवे पुरुष पंचविसावा. ॥ १२१ ॥

होय जें प्रकट गोवळवंशीं, । वाजवी मदनमोहन वंशी, ॥
वागवी निज सिदोरिस अंसीं, । ब्रह्म तें, सखि, सनातन गंसीं. ॥ १२२ ॥

नीलनीरजदलद्युति भासे, । देवढें चरण नित्य उभासे. ॥
आणि त्यास, सखि, लागन पायां, । जाय हें वय अमोलिक वांया ॥ १२३ ॥

हा मनोगज अनावर मातें, । नावरे मज, चराचरमाते, ॥
सिंहवाहिनि, शिवे, जगदंबे, । रक्षिं तूं प्रणतभक्तकदंबे. ॥ १२४ ॥

हे राति आली अति अंधकारी, । तूं रक्षिं येथें मज, अंधकारीं. ॥
वृषध्वजा, विश्वपते, पुरारे, । केला नसे मन्मथ तां पुरा, रे." ॥ १२५ ॥

वाक्यें यिच्या दुःखित फार जाली । सखी तिसीं स्पष्ठ वदों निघाली ॥
करद्वयें ते उठवी तयेला, । जीणें असे उत्कट शोक केला ॥ १२६ ॥

"मी काय नेणं, सखि, मन्मथातें ? । आयीकतां या श्रमसी कथांतें ॥
हे वेदना काय तुलाच व्हावी ? । लोकत्रया मन्मथ आगि लावी ॥ १२७ ॥

पतिव्रता गौतमधर्मपत्नी । ते वंचवीली परम प्रयत्नीं; ॥
ज्याच्या प्रसादें द्विजराज रोगी, । ज्याच्या भयें होय कुमार जोगी ॥ १२८ ॥

हें घेतलेंसे व्रत सौनिकाचें । नसे जयाला भय लौकिकाचें ॥
जो वायकांचा अति घात केला । त्याचा तसा प्रत्यय यास आला ॥ १२९ ॥

---

१२३-२. मूळ 'लागोन' याचें 'लागन' असें केलें आहे.

निदान तूं जे सकळा सुखाची । ते वल्लरी होसि महाविखाची ॥
असी निरुद्योग कसी बसेसी ? । पडेसि यत्नेविण तूं भसेंसी ॥ १२० ॥

लज्जा तुझी हे परती सरेना । पंचेषु तो हा तुज वीसरेना ॥
डसे तुला कृष्ण भुजंग, बाई । उपाय येथें करिजेल कायी ॥ १२१ ॥

क्षणेकसाता तकवा धरावा । स्वपत्रिकालेख तया करावा ॥
मदीय शिक्षापन तूज तैसें । नटापुढें नर्त्तन होय जैसें " ॥ १२२ ॥

हें आयके वचन कुंडिननाथपुत्री.
ते काय होय विदुषी मग दीर्घसूत्री ? ।
जे आणवी त्वरित रत्नजडीत दौती,
ते लेखणी, रुचिर कागद घेय हातीं ॥ १२३ ॥

बाळा भीमकसार्वभौमदुहिता, जे गांजिली सोदरें,
पूर्वीपूर्वक पत्रलेखरचना केली तिणें आदरें ?
स्वीयोदंतनिवेदनोक्तिपटनीं अत्यंत अध्यापिली,
श्रीकृष्णानयनार्थ हे निजसखी किंवा असे योजिली ॥ १२४ ॥

कथा हे कृष्णाची सकळ जगदानंदजननी
मनोभावें ईचें श्रवण करिजे नित्य सुजनीं ।
प्रसंगें श्रोत्याचे सकळहि महादोष हरती;
यदुत्तंसप्रेमें विषयरस ( गोडी ) विसरती ॥ १२५ ॥

॥ इति श्रीमद्भगवद्भक्तपदानुरक्तकविसामराजविरचिते रुक्मिणीहरण-
काव्ये पत्रिकालेखो नाम तृतीयः सर्गः ॥

# सर्ग चवथा

॥ श्रीगोकुलवासिने नमः ॥

ते भीमकी सर्व उपाय जाणे; । वैदग्ध्य तीचें तिस येक बाणे; ॥
सुदेव नामा द्विज सोमयाजी । स्वकीय दौत्यार्थ मनांत योजी. ॥ १ ॥
जो वेदवेदांगतदर्थवेत्ता, । लक्षांमधें जो द्विज येक वक्ता, ॥
कथा, पुराणें, इतिहास जाणे, । तो काय हे लौकिकरीति नेणं ? ॥ २ ॥
अत्यंत आराधक केशवाचा, । नामें करी नित्य पवित्र वाचा ॥
बोलोन जो गोड बहुत आहे, । असत्य ज्याला सपनीं न साहे; ॥ ३ ॥
तो आणवीला अतिगुप्त वाटे, । तथापिही साध्वस ईस वाटे. ॥
हळू हळू तीजसमीप आला, । तेणें नमस्कार तयास केला. ॥ ४ ॥
बसावया आसन देववीलें, । सखीकरें अर्चन त्यास केलें, ॥
मंत्राक्षता हा द्विज तीस देतां । म्हणे, "वर स्वेछित पाव आतां." ॥ ५ ॥
अशांत आली तिजला त्रपा हे । सखीकडे किंचितमात्र पाहे. ॥
ते भाव तीचा समजोन गेली. । त्यासीं सखी वाक्य वदों निघाली. ॥ ६ ॥

"विषयविषधरीं हे डंखिली आजि भारी.
कवण पुरुष येथें निश्चयें यास भारी ? ।
झडकरि बहु आणी गारुडी द्वारकेचा,
त्वरित मग राखें प्राण ये दारिकेचा." ॥ ७ ॥

मुद्रामुद्रित पत्रिका करुन ते विप्रापुढें ठेविली.
तेणें ते उचलून भीमकसुता सव्यें असे घेतली. ।
येकाकी अवघी तजून सुकृती जो द्वारिके चालिला,
जेणें श्रीपतिपादपंक(ज)युगीं आत्मा असे वाहिला. ॥ ८ ॥

---

७.४ हा चरण 'क' प्रतींत मागाहून घातला आहे. 'ख' प्रतींत मात्र तो मूळचाच आहे.

८.३ दोन्ही हस्तलिखित प्रतींत 'तनून' असा अपपाठ आहे. भावे–प्रतीने तो 'त्यजून' असा दुरुस्त केला आहे.

ते बोलवीत कितियेक तयास आली;
तेथेंच ते सहचरी मग राहियेली. ।
बाला विषण्ण तितक्यांतच फार भागे,
कृष्णास ते हळुच तोंडनिरोप सांगे. ॥ ९ ॥

" सर्वोत्तमा, उत्तम पाय तूझे । देखोन हे नेत्र निवोत माझे. ॥
पाहें तुझी वाट, अनाथनाथा. । सनाथ कैं हा परि होय माथा ? ॥ १० ॥

न सांपडे रूपठसा असा हा । केले जन्ही तां अवतार दाहा ॥
ते कोण तूला नवरी वरीना । मनामध्यें पाय तुझे धरीना ? ॥ ११ ॥

महाभुजा, राजकुळावतंसा, । मनोरमा, मानसराजहंसा, ॥
चातुर्य तूझें कवणांत आहे ? । या क्षीरनीरा निवडून पाहें ॥ १२ ॥

सर्वत्र उच्चावच भेद आहे । बरें विचारून मनांत पाहें ॥
दिसेत हें पांडुर तक्रदुग्धें । जाणोन घ्यावीं परि हें विदग्धें ॥ १३ ॥

मी तों नसें, रे, तुज पारखीसी । पदोपदीं कां मज पारखीसी ? ॥
मी जाणतें केवळ जो हरीसा । तो आजि होसी म(ज) जोहरीसा ॥ १४ ॥

माझा जळो हा जिव वीसराळू ! । तूं तों जगन्नाथ महाकृपाळू ॥
वाटे तुझें चित्त सहस्र ठायीं । हा चालला प्राण तुझेच पायीं ॥ १५ ॥

तूझी कृपा पातळ फार जाली । तेणें दशा हे मज आजि आली ॥
गळेत नेत्रांतुन वारिधारा । तूं पाव शोकार्णवकर्णधारा ॥ १६ ॥

स्थळांतरीं देइल तात जेव्हां, । हा प्राण मी ठेविन काय तेव्हां ? ॥
घडो न माझी तुज आजि हिंसा । या सोदराचा जिव होय हिंसा ॥ १७ ॥

तथापि मी हे विनती करीतें । तजूं नये ये निज किंकरीतें ॥
जायील हा केवळ जीव माझा । जगामधें लौकिक होय तूझा ॥ १८ ॥

मी काय नेणें तुज मानसींही ? । नसे तुझा हा अभिमान लिंहीं ॥
हा देह माझा, हरि, भागलाहे । गोमायु कैसा हरिभाग लाहे ॥ १९ ॥

प्रसन्न, देवा, मुखचंद्र तूझा । ध्यातो सदा चित्तचकोर माझा ।
मी चातकी, तूं घननीळ, कृष्णा, । तथापि पाहें नवजाय तृष्णा ॥ २० ॥

तूझे पदीं नित्य अनंग नाचे । तूं भूलवीसी जन अंगनांचे ॥
त्या गोपिकाही असती सदेवा । तूं पावसी ज्या असतींस, देवा ॥ २१ ॥

मी नंदिनी राजस भीमकाची । होयीन दासी घरिंची फुकाची ॥
पावेन तूझ्या चरणारविंदा । प्रसाद ऐसा करिजे मुकुंदा ॥ २२ ॥

हा जीव माझा तुजला न लाहे । करीन याची तरि आजि लाहे ॥
कामानळीं आहुति इंद्रियांची । देयीन हें निश्चित जाण यांची ॥ २३ ॥

तूं आजि माझी करिसी उपेक्षा । मी जीवनाची न धरीं अपेक्षा ॥
जसा तसा केवळ काळ कंठीं । प्रस्थान मत्प्राण करीत कंठीं ॥ २४ ॥

असे नसे ग्रंथिस पुण्य कांहीं, । जेणें तुझें मी पदयुग्म पाहीं. ॥
आतां कृपा केवळ तां करावी, । स्वकीय दासी स्वकरीं धरावी. ॥ २५ ॥

फासां पडे केवळ मी कुरंगी, । ये पंजरीं, रे, अडके विहंगी, ॥
पंकीं पडे दुर्बळ गाय जैसी, । पदोपदीं व्याकुळ होय तैसी. ॥ २६ ॥

तूं सोडवीं जीवविहंग माझा, । होईल येणें पुरुषार्थ तूझा. ॥
त्वन्नाममुक्ताफळमात्र चारा, । तुझ्ये पदीं केवळ यास थारा. ॥ २७ ॥

जैसे तुला मी नवरी न मानें, । करूं नको ज्येष्ठ कदापि मानें. ॥
मी धाकटी होइन धाकटीची । दासी करीं, रे, मज सेवटींची ॥ २८ ॥

करीन हे केवळ पादसेवा; । घरामध्यें हा न करीन हेवा; ॥
सेवीन पदोदक नित्य तूझें । टाकीन देवा अभिमान वोझे. ॥ २९ ॥

लावीन तूझा पदरेणु भाळीं; । उछिष्ठ सेवीन यथोक्त काळीं; ॥
त्वत्पादनिर्माल्य धरीन माथां; । गायीन देवा, भवदीय गाथा. ॥ ३० ॥

---

२०–३ येथें क प्रतींत ‘ मी चाकी तूं घननीळ कृष्णा ’ असा हस्तदोषयुक्त पाठ आहे.

२१–२ येथें ‘ तूं भूलवीशीं मन अंगनांचें ’ असा पाठ श्री. कानिटकर सुचवितात.

२३–१ क प्रतींत मूळ पाठ ‘ साहे ’ असा असून त्याची दुरुस्ती समासांत ‘ लाहे ’ अशी केली आहे. ख प्रतींत ‘ साहे ’ हाच पाठ ठेवला आहे.

२९–४ भावे प्रतींत ‘ अभिमानवोझें ’ याप्रमाणें पाठ शुद्ध करून घेतला आहे.

मार्गीं तुझ्ये लोचनयुग्म लागे । त्वच्चिंतनीं मानस नित्य भागे ॥
जाली असे हे वचनीय सीमा; । तूं सर्व जाणेसि, गुणाभिरामा. ॥ ३१ ॥
माझे मनीं जाण विकल्प नाहीं, । करूं नको आणिक कल्पनाही, ॥
धरूं नये संशय यावयाचा, । पुढें नये, रे, रस या वयाचा ॥ ३२ ॥
अनर्कसंपर्क कदापि, पाहें, । शुचिव्रता हे नळिनी न साहे; ॥
वसेत नाना विपिनांत वल्ली, । अनादरीना सहकार मल्ली ' ॥ ३३ ॥
हा प्राणनाथास निरोप सांगें. । विप्रा, तुला आणिक येक मागें. ॥
हे गोष्टी कोण्हास कळों न द्यावी, । गुरूपदेशाहुन गूढ घ्यावी. ॥ ३४ ॥
ग्यां वांचणें हें त्वदधीन जालें, । हाता तुझ्या हें यश थोर आलें. ॥
धर्मांमधें उत्कट धर्म, पाहे, । परोपकारासम कोण आहे ? ॥ ३५ ॥
द्विजा नको फार विलंब लाऊं, । कदापि तूं रिक्त नकोच येऊं. ॥
जाणेस तूं तेथिल सर्व दीक्षा, । करून बोलें समयप्रतीक्षा. ॥ ३६ ॥
जो द्वारकेची करि पातशाही । वरील तो काय जशातशाही ? ॥
त्याचे मनीं हा मज ठाव व्हावा, । प्रसंग ऐसा बरवा पाहावा. ॥ ३७ ॥
कार्यांतरासक्त असेल जेव्हां । करूं नको गोष्टी मदीय तेव्हां. ॥
होईल आकस्मिक हे अवज्ञा, । उपाय खुंटे अवघाच विज्ञा. ॥ ३८ ॥
मार्गीं चुकावून समस्त मेटें, । तूं द्वारकापत्तन पाव नेटें ॥
ज्याचे पदीं हा दृढ भाव माझा, । तो सर्व निर्वाह करील तूझा ॥ ३९ ॥
अपार संसारसमुद्र पाहीं । तरावया यास उपाय नाहीं ॥
तें द्वारकेचें घननीळ तारूं । येऊन येथें, मज शीघ्र तारू ॥ ४० ॥

माझा असे परम दारुण ज्येष्ठ बंधू ;
चैद्येश्वरा अभिलषी अविवेकसिंधू ।
धाकेंत हे नव, पुरातन कारभारी;
यांचे मतीस बहु होय विकार भारी ॥ ४१ ॥
तूं मायबाप कुळगोत समस्त माझें;
मी धाकटें निपट बाळक आजि तूझें ।
तूं येकदा परमजीवन दान देयी.
तो देवकीतनय घेउन शीघ्र येयी. " ॥ ४२ ॥

नरेंद्रदुहिता असें हळुहळू जऱ्ही बोलते,
  प्रभातसमयप्रभा तदपि दुष्ट डोकाविते ।
चरित्र समजोन हें स्तिमित राहिली भीमकी
  द्विजास म्हणते " द्विजा, परम शीघ्र तूं जाय, " कीं ॥ ४३ ॥

विहंगमकुळें महाविटपिकोटरीं बाहती.
  सुशीतळ हळूहळू सुरभि वातही वाहती ।
विदर्भभवनीं उठे विविधवाद्यसंघोष तो,
  अनेकनुतिपाठकस्तुतिभरेंच जो पोषतो ॥ ४४ ॥

कलकलिति कपोती, पूर्व दिग्भाग हांसे;
  हळुहळु मग तेणें चंद्र निःश्रीक भासे ।
तसिच उडुगणाला तूटि येऊं निघाली;
  तदुपरि तनुता हे दीपशोभेस आली ॥ ४५ ॥

गलबल बहु जाली दासिकांची पाहाटे,
  म्हणउन परते हे मायचा धाक वाटे ।
सकळ निजसख्याही लागती जों उठाया,
  झडकरि तंव आली भीमकी पूर्वठाया ॥ ४६ ॥

चिरतर व्यवसायें भागली फार बाळा.
  क्षणभरि तिस लागे जागृतीमाजि डोळा. ।
तदुपरि गरुडीं हे कृष्ण आरूढ देखे,
  यदुतिलक जिचे हा गुंतला पूर्व भाके. ॥ ४७ ॥

अति रुचिर विकासे कांस पीतांबराची,
  प्रकट परम जाली मूर्ति त्या श्रीधराची. ।
निरुपम उमटे हे कुंडलांची झळाळी,
  मणिमयमुकुटाची दीप्ति फांके निराळीं. ॥ ४८ ॥

---

४८–३ दोन्ही हस्तलिखित प्रतींत हस्तदोषयुक्त पाठ आहेत (' निरुपगे उमटे '–क; ' निरुपम गेउटे '–ख.)

अभिनव वनमाला कंठदेशीं विलासे, ।
मुखकमळ इचें जो देखतां देव हांसे. ।
यदुपति अवतारी, जो गदाचक्रधारी,
झडकरि इजसाटीं धाविलासे मुरारी. ॥ ४९ ॥

हळुच जंव पलंगीं कृष्ण येऊन बैसे,
मुकुळित तंव होती हे इचे नेत्र तैसे. ।
क्षणभरि निजअंकीं भीमकी बैसवीली,
मुखकमळिं तयेच्या स्वीय तांबूळ घाली. ॥ ५० ॥

तदुपरि रव बाळा आयके सारिकेचा,
यदुपति मग तेणें हारपे द्वारकेचा. ।
खडबडुन उटे ते भीमकी निस्तुरीसी;
मुखकमळसुगंधें लाजवी कस्तुरीसी. ॥ ५१ ॥

तदुपरि निजशय्या चांचपों जों निघाली,
हरिचरणवियोगें घाबिरी फार जाली. ।
उठउन सखियांतें दीप लाऊन पाहे,
न लगत निधि हातीं, ते यथावस्छ राहे. ॥ ५२ ॥

पक्षद्वारें विप्र बाहेर आला, । क्षेमाशंसी त्याजला काक गेला; ॥
जैसा देखे पूर्णकुंभद्वयाला । तैसा त्याला पूर्ण आनंद जाला. ॥ ५३ ॥

सवत्स त्या सन्मुख गाय आली; । सुवासिनीची मग भेट जाली; ॥
देखोन साळंकृत कन्यकेला, । मुहूर्त्त तेणें अति धन्य केला. ॥ ५४ ॥

अनुपद मग तेथें पातऴी होमवेळा,
म्हणउन मग तेणें घाबिरा विप्र जाला ।
अविदित निजगेहा ये महातांतडीनें.
विधि विहित तयाचा होय येके घडीनें ॥ ५५ ॥

उदयगिरिशिरीं हें भानुबिंब प्रकाशे,
रजनिजनित जेणें कोकशोकाग्नि नासे ।
मुकुळित कमळांचा भार उल्लास पावे.
मधुकरपटलीला बंधनिर्मुक्ति फावे ॥ ५६ ॥

भृंगसमूह

द्विज सविनय वंदी सूर्यनारायणाला;
क्षणभरि मग ठेवी वेदपारायणाला ।
वचन गृहपतीसीं व्यक्त बोले तपस्वी,
" मज गुरुतर कार्यीं तां करावें यशस्वी ॥ ५७ ॥

सकळहि निजपोष्यें रक्षिं तूं आश्रयाशा;
तुजविण मज नाहीं आणखी आश्रयाशा ।
सदय उभयकाळीं हव्य घे नित्य होमीं.
यदुतिलक पाहाया चाल्लिलोंसें, अहो, मी. " ॥ ५८ ॥

प्रयासविधि आदरें त्वरित फार केला असे.
निदेश नृपनंदिनीविहित मानसीं हा वसे ।
कमंडलु करीं धरी, स्मरणमालिका आदरी,
घरींहुन निघे महामुदित होय जो अंतरीं ॥ ५९ ॥

अतिसभय उलंघी हा पुरद्वार जेव्हां,
घरिंहुन सुटलोंसें वाटलें त्यास तेव्हां ।
यदुपतिपुरमार्गा रोधिती राजसेना,
तदपि हरिकृपेनें यास कोण्ही पुसेना ॥ ६० ॥

तदुपरि मग त्याची अंगना होय जागी,
" त्वरित उठ " म्हणे हे कन्यकेला वजागी ।
घडिघडि वदलें जे वल्लभासी चिरीटी,
म्हणउन बहुधा ये होय ऐसी करंटी ॥ ६१ ॥

न पुसत गृहिणीला द्वारके विप्र गेला,
म्हणउन इजला हा थोर संताप आला ।
त्वरित बहुत गेली लांसि धांवोन तेथें,
नगरपतितनया हे बैसली श्रांत जेथें. ॥ ६२ ॥

---

५९-१ भावे प्रतींत 'प्रवासविधि' हाच पाठ आहे.

बहुत मुखबळें हे फार बोलों निघाली, ।
   तदपि नृपसुतेनें आदरें बैसवीली. ।
हळुच तिस खुणेनें हे निवारीत आहे,
   तदपि परम आज्ञा बोलतां ते न राहे. ॥ ६३ ॥
"अलगट बहु होसी, ढाल हें काय केलें ?
   लटिकपण कसें या सोदरा आणियेलें ? ।
न पुसत पति माझा धाडिला हा विदेशा,
   झडकरि तुझिया या आगि लागो निदेशा ! ॥ ६४ ॥
घडिघडि अशनाला मागती जें अपत्यें,
   उगिच मज दिल्हीं हें व्यर्थ कां गार्हपत्यें.
हळुहळु सरती या सर्वही दर्भमुष्टी;
   घृतविरहित, बाई, चालती काय इष्टी ? ॥ ६५ ॥
निपट अपुरती हे बुद्धि या वल्लभाची, ।
   उगिच विजवटी हे आणिली कालि भाची. ।
क्षणभरि मज दृष्टि नावडे ज्येष्ठ धाडी,
   अझुणिवरि इला हा सासुऱ्याही न धाडी ॥ ६६ ॥
सकळहि करिजेते जीव देऊनि वाणी,
   परि विखळ मिळाली सून मोटी निवाणी. ।
तिजहुन नवश्यांची नाति झाली तिवाटी,
   अनिश सहचरींशीं खेळतां धान्य वाटी. ॥ ६७ ॥
अवगुण नणदेच्या चोरट्या पोरट्यांचे ।
   घडिघडि किति सोसूं सांग या कारट्यांचें ? ।
मज तरि सपनींही हा दिसेना अघेला,
   अझुणि तन्हि न लागे आगि यांच्ये क्षुधेला. ॥ ६८ ॥
अति मधुर न साहे कोरका कोरण्याला;
   अझुणिवरि समस्तें नित्य धाकों कण्यांला. ।
रुचिर बहुत लागे भास्करी नाचण्याची,
   जिजवरि मज भाजी आवडेना चण्याची ॥ ६९ ॥

हळुहळु जरिह सासू होय अत्यंत वृद्धा,
तदपि बहु भुकेनें होतसे नित्य क्रुद्धा ।
निरुपम घरिंचा हा जाच कोणास सांगों !
घडिघडि उसणें मी धान्य कोणास मागों ? ॥ ७० ॥

परम विरस वाक्यें बोलतें जों असाळी,
तंव नरपतिपत्नी येतसे तेच काळीं ।
लगबग उठतां हे राजकन्येस जाली,
परि वहु अविदग्धा बोलतां ते न भ्याली ॥ ७१ ॥

हळुच तिस म्हणे हे, "गागसी कां, गवारे ?
गृहविषयक चिंता सर्व येथून वारे ।
जडित वळय तीणें हातिंचें काढियेलें,
द्विजपतिगृहिणीला गुप्तसें अर्पियेलें ॥ ७२ ॥

रुचिरतर तयेच्या वस्तु येतांच हातां,
हळुच 'पति नये कां' ते म्हणे व्यक्त आतां ।
परम परिजनाची दाटि होऊं निघाली,
म्हणुन निजगृहातें ते चुकावून गेली ॥ ७३ ॥

निशि दिवस जयानें सेविजे कृष्णवर्मा,
द्विजतिलक न लागे तो कसा कृष्णवर्त्मा,
अपरिमित पवाडे देवकीनंदनाचे,
विविध, रुचिर गातां थोर आनंद; नाचे ॥ ७४ ॥

अनिश यदुपतीचा हा महाछंद लागे,
म्हणउनि अतिपंथा चालतां तो न भागे ।
अति कठिण अव्हाटा चोखटा होति वाटा,
हरिगुणकथनाचा फूटला ज्यास फांटा ॥ ७५ ॥

सहज कठिण आहे काळ जो हा उन्हाळा,
प्रकट परम तेथें होय मध्यान्ह वेळा ।

तदपि हरिकृपेची सावली यास आली,
सहज निजसुखाची थोर विश्रांति जाली. ॥ ७६ ।

त्रिविध मग तयाला पाठिंचे येति वारे,
त्रिविधहि परि जींहीं क्रूर संताप वारे. ।
अगणित सुकृतांचे सांटवी नित्य सांटे,
अति तिखट तया कां मोडती द्वंद्व वाटे? ॥ ७७ ॥

द्विजवर निजमार्गीं नित्य येकांत सेवी,
सहज हरिकृपेच्ये जो सिदोरीस जेवी. ।
यदुपतिभजनाची लागली थोर गोडी.
हळुहळु विपयांची वासना यास सोडी. ॥ ७८ ॥

तदुपरि उपदेशी आपल्या या मनाला,
क्षणभरि परि नेदी ठाव जें कामनांला; ।
सदनजनितचिंता सर्वदा जें न साहे,
यदुकुळमणि जेथें नित्य येऊनि राहे. ॥ ७९ ॥

परम निलज चित्ता कां पडे हे कुटुंबीं,
तुजवरि विपयांची हे पडे नित्य झोंबी. ।
यदुपति तुजला हा जा घरांतून काढी,
सदयहृदय तो हा हातिचें काय सोडी? ॥ ८० ॥

लगबग करिसी हे, व्यर्थ हांवे भरेसी;
क्षणभरि परि माझें तूं मला नावरेसी, ।
लुडबुड करिसी तूं जीपुढें, ते पुसेना,
तदपि तुज विषादावेश कांहीं असेना. ॥ ८१ ॥

पुसत पुसत आली या शरीरा जरा हे,
परि हरिभजनाची वासना वांज राहे. ।
विषयबिडिशलोभें गुंतसी मोहजाळीं;
कवण विषय आतां सोडवी अंतकाळीं? ॥ ८२ ॥

चळनवळन राहे, बोल भार्या न साहे,
जवळि कधिं न बाहे, नित्य सक्रोध पाहे; ।

अझुणि तन्हि, मना, तां सांडि येत्री करावी;
झडकरि उगली हे शांतिकांता वरावी ॥ ८३ ॥

अनुभविसि शरीरीं यातना या उदंडा
तदपि अझुणि तूझा होत नाहीं उगंडा।
घडिघडि युवतीच्या गुंतसी स्नेहपाशीं;
विषयविरति नाहीं सर्वथा तूजपासीं ॥ ८४ ॥

निशिदिन परनिंदास्वाद घेतां न राहे,
क्षणभरि हरिनामस्पर्श जीला न साहे।
अतिमधुर रसें हे सर्वदा तृप्त केली,
तदपि मज रसज्ञा काय उत्तीर्ण जाली ? ॥ ८५ ॥

अनिश परकलत्रालोकनाभ्यास ज्याला,
हरिचरणदिदृक्षा काय हे होय त्याला ?।
म्हणुन घडिघडी हें लोचनें आंवरावीं,
हरिचरणचरित्रें अंतरें हीं स्मरावीं ॥ ८६ ॥

क्षण परिचय झाल्या जन्मजन्मीं सुटेना,
परम विषम काळीं सोयरा जो विटेना।
निधि निरवधि पुण्यें लाधसी जो फुकाचा,
विसरसि परि कैसा कंद तो चित्सुखाचा ? ॥ ८७ ॥

अनिश विधिनिषेधीं काळ वेंचोनि गेला;
क्षणभरि हरि नाहीं ध्यानयोगास आला।
गृहसुतधनदारा राहाती सर्व येथें.
हरिविण तुज, मूढा, सोडवी कोण तेथें ? ॥ ८८ ॥

मजलि जवळि आली, हें अहंभाव वोझें
झडकरि तजिं आतां; कोण अज्ञान तूझें !।
हळुहळु अवघा हा सोडिं संसारधंदा,
क्षणभरि अवकाशें चिंतिं आनंदकंदा ॥ ८९ ॥

अझुणि तुज मना हें काय कर्त्तव्य आहे ?
हरिचरणसरोजीं लीन होऊनि राहें।

९५५६२

स्मरण करिं हरीचें, व्यर्थ आयुष्य वेंचे,
मरण जवळि आलें; काळ कोणासि भेचे ? ॥ ९० ॥
दृढतर भगवंतीं पूर्ण सद्भाव ज्याचा,
सहज मग तुटे हा वासनाबंध त्याचा. ।
करुन विषयसेवा वासना वा मुराली;
त्रिभुवनपति त्याला दूर नाहीं मुरारी; ॥ ९१ ॥
हरिपदिंहुनि कैंही चित्त ज्याचें निघेना,
क्षणभरि विषयांचा वास नांवास घेना, ।
गुणगणन हरीचें नित्य जेणें जपावें,
भवसलिलनिधीचा पार तो येक पावे. ॥ ९२ ॥
अगणित फिरसी तूं, पामरा, हीन योनी.
अपर गति दिसेना, तूज जन्मा नयोनी. ।
निजगुरुचरणाब्जीं सर्वदा चित्त देयी,
हरिभजककुळीं हें जन्म मागोन घेयी. ॥ ९३ ॥
परति धरुनि आतां लाज तूं चित्स्वरूपीं,
न कळत पडसी ये व्यर्थ मोहांधकूपीं. ।
कळस जरि तुझे ये कल्पनेचा ढळावा
तरित गुरुकृपेचा सोहळा आडळावा. ॥ ९४ ॥
तजुन विषयधंदा सद्गुरूच्या नियोगें.
सगुणभजनमार्गीं लाग सत्संगयोगें, ।
जंव जंव तुजमध्यें चित्स्वरूप प्रकाशे.
तंव तंव अवघें हें गाढ मोहांध नासे. ॥ ९५ ॥
विषयविषयमार्गीं चालतां क्लेश होती;
पदर धरुनि वोढी हे जगन्मुक्तिदूती.
हरिचरणसरोजीं क्षेत्रसंन्यास घ्यावा, शरीराचा त्याग
तरिच मग न व्हावी हे पराव्रृत्ति जीवा. ॥ ९६ ॥
निरुपम ममतेची लागली दाट झाडी,
त्वरित बहुल आतां पाय येथून काढीं. ।

यदुपतिपदवी हे येकल्या तों न चाले;
सहजच तुज साही आडवे शत्रु आले ॥ ९७ ॥

अजुणि तरिहि विवेकें तूं विचारूनि पाहीं.
गुरुविण तुजला हा सर्वथा मार्ग नाहीं. ।
सहज तुज यशोदापुत्र हा सांपडावा,
कवण अपरजन्मीं योग ऐसा घडावा ? ॥ ९८ ॥

क्षणभरि परि याचे पाय आतां न सोडीं,
त्वरित गुरुपणाची लाविं यासींच गोडी ।
बहुतच तुज जें कीं वाटती, रे, अशक्यें,
सहज समजसी तें तत्वमस्यादिवाक्यें ॥ ९९ ॥

गोकुळीं प्रकटली द्युति सांवळी,
गोधनें द्रुमतळीं सहसा वळी ।
जे सनातन जगलयसावली,
तत्पदीं हृदयवृत्ति विसांवली ॥ १०० ॥

द्वारकापतिपदांबुजमार्गीं
लागलें मन, विटें अपवर्गीं ।
वासुदेव मज कौस्तुभधारी
आठवे नळिननाभ मुरारी ॥ १०१ ॥

जो श्रुतींसहि अयोनिज वाचे
तो सदैव तुज यो निजवाचे ।
देवढें चरणपद्म जयाचें
जाण धाम विषयोर्मिजयाचें ॥ १०२ ॥

जो परात्पर अगोचर वेदां,
नातुडेच हरि जो मतभेदां, ॥

---

९९.४ दोन्ही हस्तलिखित प्रतींत ‘ समजसी ’ असा हस्तदोषयुक्त पाठ आहे.

१०२.३ श्री. कानिटकर यांनीं सुचविल्याप्रमाणें दोन्ही हस्तलिखित प्रतींत ‘ देवढें ’ हा शब्द आहे.

८१३२१ १८३६ ९५१५८ ५३

गोपवेष मुरलीधर ध्यावा,
तोच तां सुखिं अहर्निश गावा ॥ १०३ ॥

जो नसोनहि असे परि साचा,
जाण जो परिसही परिसाचा, ।
नाकनायक जया कर जोडी,
मानसा, करि तयाचिच जोडी. ॥ १०४ ॥

कृष्णमूर्ति हृदयीं जडलीसे, । तत्पदा दृढ मीठि पडलीसे, ॥
विश्व हें सकळ तन्मय जालें, । द्वैतभान अवघेंच उडालें. ॥ १०५ ॥

माय, बाप, कुळगोत, विसांवा, । सोयरा सजण हाच असावा. ॥
अंतरंग तुज याहुन नाहीं, । हें मना हित विचारुन पाहीं. ॥ १०६ ॥

कृष्ण, केशव, जनार्दन नामें । घेत जाय करितां निज कामें. ॥
वासुदेव, घननीळ फुकाचा । सांपडे, निधि अनादिसुखाचा. ॥ १०७ ॥

हा भवाब्धि मजला न उलंघे, । धुंडिता विषय मानस लंघे. ॥
सांवळा, सगुण, जो अवतारी, । कर्णधार उतरील उतारीं ॥ १०८ ॥

सोयरीं सकळ, सोदर, मित्रें, । व्यर्थ जाण अनुकूळ कळत्रें; ॥
चित्त हें न लगतां भगवंतीं । सोडवी कवण येउन अंतीं ? ॥ १०९ ॥

ज्ञानराज मजला गुरु भेटे, । शोकसागर समग्रहि आटे. ॥
नित्य वोहट पडे ममतेला । ठाव होय चढता समतेला. ॥ ११० ॥

हा भरें मज भवज्वर आला, । ज्ञानराज मज वैद्य मिळाला. ॥
मी उदास विषयांवरि जालों, । सद्गुरू, शरण तूजच आलों. ॥ १११ ॥

व्यापिलें मज मनोभवरोगें, । जाचलों विषयसंचययोगें. ॥
पादुकाभजनभेषज द्यावें; । सद्गुरू, यश अमोलिक घ्यावें. ॥ ११२ ॥

ओघ येति तुझिया स्तवनाचे, । भारती बहुत यास्तव नाचे ॥
वेग जाय मुरडोन मनाचा, । नित्य उत्सव तुझ्या नमनाचा ॥ ११३ ॥

मातलों धनमदें, जगदीशा, । नाठवेशि मज, गोपतिवेशा. ॥
वेदवेद्यचरिता, भगवंता । येय मी शरण तूज, अनंता. ॥ ११४ ॥

पुत्रमित्रपशुबांधवमोहें । नित्य संसृतिसुखांतच पोहें. ॥
नाठवे चरणपंकज तूझें, । सोडवी कवण बंधन माझें ? ॥ ११५ ॥
झोंबलाच मदनानळ आहे । रक्षिता कवण आणिक आहे ? ॥
मत्सरें हुरपळे मन माझें, । यास जीवन पदोदक तूझें. ॥ ११६ ॥
मोहमैंद भुरळें मज घाली, । वृत्ति हे तुज पराङ्मुख जाली. ॥
घातला दृढ गुणत्रयफांसा, । लाविसी हरि किती मज झांसा. ॥ ११७ ॥
कृष्णजी, परमदीनदयाळा, । पावना, पतितपावनशीळा, ॥
सोयऱ्या, सुसखया, रणसोडी । येक वेळ मज येथुनि सोडीं ॥ ११८ ॥
आयके द्विज अजामिळ नांवें । ज्याजला पतितराज म्हणावें, ॥
उद्धरे निधि अनाचरणाचा । हा प्रताप तुझिया चरणाचा ॥ ११९ ॥
रूप हें सहज सुंदर तूझें । नोळखे हृदय पामर माझें ।
हें निरर्थक भरे बहु हांवें । या अनित्य विषयांवरि धावे ॥ १२० ॥
कोटि जन्म जपतां तुजला, रे । लाधसी अवचिता मजला रे ॥
सांपडेस निज संचितठेवा । कोण यावरि विसंबेल देवा ? ॥ १२१ ॥
निद्रितास मज जागृत केलें । हातिंचें सकल संचित नेलें ॥
तोडिलें सकल बंधन, बापा । कोण हे हरि तुझी अनुकंपा ॥ १२२ ॥
खेळ हा सकळ मोडुन नेला । थोर तां मज अनुग्रह केला ॥
दावणीहुनि सुटे पशु जैसा, । होय मी सहज मुक्तच तैसा ॥ १२३ ॥
नित्य संसृतिभवें सुखदुःखें । देखिलीं विविधरूप अनेकें ॥
सोडवीं त्वरित, यादवराजा । गुंतसी कवणिया निजकाजा ? ॥ १२४ ॥
तूजवीण मन पांगुळ जालें । आंधळेपण मतीसहि आलें ॥
ऊचलून कडिये मज घेयी । कृष्णरूपजननी स्तन देयी ॥ १२५ ॥
तूं असोनि जननी कनवाळू । मी तुझें परमबाळ भुकाळू ॥
काय होय अति वोरस तूझा । प्राण जाय तुजवांचुन माझा ॥ १२६ ॥
मी विषण्ण विलपें परदेशीं । तूं कसें मज अनुत्तर देशी ? ॥
वत्सळे तजुन बाळक तान्हा । काय हा पळविसी निजपान्हा ? ॥ १२७ ॥

---

१२१.४ विसंबल ( क प्रत ).

बाळकें रुसतसे जननीशीं । काय माय रुसते परि त्यासीं ? ॥
वासुरा तजुन गाय खडाणी । काय जाय पशुजाति अडाणी ? ॥ १२८ ॥
श्वापदांत भयभीत बराकी । काय हे हरिणि पाडस टाकी ? ॥
चारया जरि विहंगिणि जाते । ते फिरोन पिलियांप्रति येते ॥ १२९ ॥
कोरडें मुख पडे बहु माझें । न द्रवे अजुणि मानस तूझें ॥
म्यां किती तन्हि हरी विलपावें ? । कोण काळ तन्हि तान्हि लपावें ॥ १३० ॥
कंठ हा गहिंवरें बहु दाटे । लाविं सत्वर मला निज वाटे ॥
पंथ हा ज्जन्हि तुझा उमगावा । पाश हा तरिच रे, उगवावा ॥ १३१ ॥
हा हरिस्तव पढे जन जो कीं, । तो कृतार्थ म्हणवी नरलोकीं. ॥
प्रेमपात्र हरिचें बहु व्हावा; । संसृतिश्रम तयास न व्हावा. ॥ १३२ ॥

बहुविध महायासें ऐसें मनाप्रति बोलतां,
स्मरणहि शरीराचें ज्याला नसे पण चालतां; ।
तदपि करुणासिंधू पंथा स्वकीय न टाकवी,
जळनिधिमहासीमेमध्यें हळू हळु पाववी. ॥ १३३ ॥
नयनकमळें विप्राचीं ते क्षणेंचि त्यहाळिती
कळस कनकप्रासादांचे जडीत झळाळिती. ।
तदुपरी पाहा आलीं नामें तदीय मुखांबुजा.
जय जय कृपासिंधो, बंधो मदीय अधोक्षजा. ॥ १३४ ॥
यदुपतिपुरी विप्रातें ते दिसों जंव लागली,
प्रणति भगवद्भक्तें तेव्हां असे मग घातली. ।
सजळ नयनें जालीं, प्रेमें गळा बहु दाटला,
अतिशयित हा रोमांचाचा समूहहि थाटला. ॥ १३५ ॥
कथा हे कृष्णाची सकळजगदानंदजननी,
मनोभावें ईचें श्रवण करिजे नित्य सुजनीं. ।
प्रसंगें श्रोत्यांचे सकळहि महादोष हरती;
यदूत्तंसप्रेमें विषयरसगोडी विसरती. ॥ १३६ ॥

इति श्रीमद्भगवद्भक्तपदानुरक्तकविसामराजविरचिते रुक्मिणीहरणकाव्ये द्वारकादर्शनो नाम चतुर्थः सर्गः ।

# सर्ग पांचवा

॥ श्रीरमाकांताय नमः ॥ ॥ श्रीमुद्गलो जयति ॥

महापुण्यें राहे जळधिजठरीं हेमनगरी,
धरी जे सद्भावें त्रिभुवननिधानास उदरीं; ।
तिच्या द्वारा आला द्विजवर महासंभ्रमभरें,
कपाटें रत्नांचीं विलसति जयेलागिं रुचिरें. ॥ १ ॥

फेरा जिला द्वादश योजनाचा, । आधार जे केवळ सज्जनाचा, ॥
प्राकार जे सात धरीत आहे, । क्षणेक हा तीजकडेच पाहे ॥ २ ॥

जे देखिली केवळ कांचनाची, । कृतार्थता होय विलोचनाची, ॥
प्रवेशही ते नगरींत केला । जन्मांतरीय श्रम सर्व गेला ॥ ३ ॥

असेत या सप्त पुऱ्या समाना । उत्कृष्ट सर्वांहुनि ईस माना ॥
प्रत्यक्ष जेथें भगवंत नांदे, । सौभाग्य हें याहुनि काय लाधे ? ॥ ४ ॥

वाहे जिचा उत्कट धाक लंका, । धरीत आहे अलका कलंका, ॥
जे लाजवीते अमरावतीला, । हा आदरी यादवराव तीला ॥ ५ ॥

जेथें निधीच्या करिजेत पोती, । कल्पद्रुमाची तरि होय खोती, ॥
घरोघरीं पाळिति कामधेनू, । संपत्ति हे याहुनि काय वानूं ? ॥ ६ ॥

लोटांगणीं येति महासमृद्धी, । लोळेति दारीं अणिमादि सिद्धी, ॥
पावोनि अत्युत्कट संपदा या । चुकेतना जे निजसंप्रदाया ॥ ७ ॥

विदोविदीं लोटति तें प्रवाळें । खेळेत मुक्तागण विप्रवाळें ॥
जेथें नसे आदर माणिकांचा. । विचार कैचा परि आणिकांचा ? ॥ ८ ॥

पाहोन नानाविध आपणांतें । कृतार्थ मानी द्विज आपणातें ॥
चहूंकडे केवळ जातरूपें । कदापि दृष्टीं न पडेच रूपें ॥ ९ ॥

---

१·२ दोन्ही हस्तलिखितांत 'त्रिभुवननिधातास' असा अशुद्ध पाठ आहे.

संपन्न चिंतामणिसंदुकांनीं । बसेत सौदागर ते दुकानीं ॥
अधिष्ठिती तत्सुदती सज्यांला, । अनेक मुक्ताफळचोस ज्यांला ॥ १० ॥

वाजेत हे ताळ मृदंग वीणा, । नाचेत त्या नृत्यकलाप्रवीणा ॥
सबाळ कृष्णांघ्रिसरोरुहार्चा । करीत तच्चित्रचरित्रचर्चा ॥ ११ ॥

वाटाविदीं नामभरें अटाळ्या, । पौरांगना वाजविताति टाळ्या ॥
घरोघरीं उत्सव केशवाचा । गोविंद, दामोदर, हेच वाचा ॥ १२ ॥

संमर्द जेथें भगवत्कथांचे, । जे हे समुत्पादक सत्पथांचे ॥
उठेत नाना ध्वनि आरत्याचे । कळेत ना पार अपार त्यांचे ॥ १३ ॥

संवाद होती शुकसारिकांचे । अखंड वैदांतिक कारिकांचे ॥
टेऊनियां मस्तक योषिदंकीं कपोत हुंकार करी विटंकीं ॥ १४ ॥

द्विज नगर पहातां श्रांत होऊन गेला;
चुकत चुकत दैवें राजचौकांत आला. ।
सभय यदुपतीच्या पावला द्वारपाळी,
हरिजवळि जयाला नेयिजे द्वारपाळीं. ॥ १५ ॥

निरुपम तंव देखे बाग, पीयूषवापी; ।
हरिगुण पिक गातां, नाचती ते कलापी; ।
सहजच ऋतु साही होती येकत्र गोळा,
कधिंहि न समजे हा पावसाळा उन्हाळा. ॥ १६ ॥

तसी असे अंगणभू नृपाची, । बसेत जेथें अति सज्ज पाची. ॥
उठेत जेथें जलयंत्रधारा, । देवांगना नाचति निर्विकारा. ॥ १७ ॥

गंधर्व जेथें करिताति गानें, । स्वर्लोकवासी धरिती विमानें ॥
मेळा मिळे उत्कट किन्नरांचा, । करी महा आदर तो नरांचा. ॥ १८ ॥

झुलेत ऐरावतकोटि जेथें, । उच्चैःश्रवे काय नसेत तेथें ? ॥
स्थळीं स्थळीं युद्ध करीत जेठी, । नरेंद्रही घेउनि येति भेटी. ॥ १९ ॥

चहूंकडे रत्नजडीत जोतीं; । गोपानसीला अगणीत मोतीं. ॥
असी असे राजसभा विशाळा; । चंद्रासही स्पर्शति चंद्रशाळा. ॥ २० ॥

वातायनें शोभति इंद्रनीळीं, । दिगंतरें भासति सर्व नीळीं. ॥
तशा हिऱ्यांच्या घडितां चिऱ्यांच्या । परंपरा शोभति पायऱ्यांच्या. ॥ २१ ॥

तदुपरि जंव वेंघे विप्र सोपानपंक्ती,
झडकरि तंव चारी आडव्या येति मुक्ती; ।
ढकलुन परत्या त्या, तो पुढें चालिलासे.
हरिचरणसरोजीं जीव हा ठेविलासे. ॥ २२ ॥

जय, विजय उभे हे त्या सभाद्वारदेशीं;
म्हणति, 'कवण येतो हा विचारा विदेशी.' ।
क्षणभरि परि कांहीं त्यांकडेही न पाहे;
मुनिजनहृदयाचें लक्षण लक्षीत आहे. ॥ २३ ॥

सिंहासनीं श्यामळ तेज भासे । देखोन जें यास निगूढ हांसे. ॥
द्विजागमाचा हरि हेतु जाणे । अक्रूरहस्तावरि हस्त हाणे. ॥ २४ ॥

सुरासुरांची मग दाटि देखे, । पदप्रणामीं बहु होति वाखे, ॥
घेती किरीटांवरि वेत्रयष्टी, । तथापि शौरी न पडेच दृष्टीं ॥ २५ ॥

स्वर्लोकलोकाधिप वज्रपाणी । राहे उभा घेउन तत्कृपाणी ॥
तसाच तेथें यम दंडधारी । यथोचितस्थाननिदेशकारी ॥ २६ ॥

आणीतसे तो मग पाशपाणी । कृष्णास गंडूषविधीस पाणी ॥
उपायनें घेय मनुष्यधर्मा । कदा चुकेनाच मनुष्यधर्मा ॥ २७ ॥

कृशानु तांबूलकरंक वाहे । पतद्गृही नैर्ऋत घेत आहे ॥
हा वायु जेथें व्यजनास वारी । ईशान हा राजसभाधिकारी ॥ २८ ॥

सहस्रपत्र स्फुट होय जैसें, । कलाधर छत्र धरीच तैसें ॥
जे सात्यकी उद्धव भक्त भारी, । ते चामरें वारिति निर्विकारी ॥ २९ ॥

हरीत ज्या इंद्रकिरीटशोभा । त्या पादुकांचा गरुडास डांभा ॥
गणेश घे रत्नजडीत आसा । उमा असे टाकित जो उसासा ॥ ३० ॥

अमात्यचूडामणि हे हरीचे, । जे येक रत्नाकर चातुरीचे, ॥
चहूंकडे सर्व उभे रहाती, । तटस्थ गोविंदपदें पहाती ॥ ३१ ॥

विलक्षणा तेथिल राजरीती, । देवांसही मानव नाढ़रीती ॥
हा विप्र येणें अति भीति वाहे, । मधें मधें श्रोकत येत आहे ॥ ३२ ॥

कृष्णास दृग्गोचर विप्र जाला । तत्काळ खालें उतरोन आला ॥
सस्नेह वत्साप्रति गाय धांवे, । तसाच भक्तांप्रति देव पावे ॥ ३३ ॥

पीतांबराचा बहु घोळ लोळे, । आकर्णपर्यंत विशाळ डोळे, ॥
आपाद कंठीं वनमाळ घाली, । ते सांवळी सन्मुख मूर्ति आली ॥ ३४ ॥

द्विजास तेव्हां न सुचेच कांहीं । पडे महानंदरसप्रवाहीं ॥
स्तवी चतुर्वक्त्र जयास बंदी, । तो कृष्ण त्याचे मग पाय वंदी ॥ ३५ ॥

अर्धासनीं आणुन बैसवीला । यथाविधीनें मधुपर्क केला ॥
ब्रह्मादिकां जो हरि वोचकेना, । तो आजि याच्या उचिता चुकेना ॥ ३६ ॥

अपूर्व वाटे सनकादिकांला, । तसें वसिष्ठादिक वैदिकांला ॥
एतत्कृपागर्व महा वहाती । परस्परें ते वदनें पहाती ॥ ३७ ॥

सुदेव नामा द्विज माज सोडी, । तं भीमकीचें मग पत्र काढी. ॥
म्हणे तया श्रीहरि, 'राहवावें; । क्षणांतरीं हें मज दाखवावें.' ॥ ३८ ॥

द्विज परम शाहाणा हा महा बोलकाही,
परि निपट निघेना त्या पुढें बोल कांहीं. ।
घडि घडि जिभ जेथें चावळे वाक्पतीची,
रदबदल न चाले सर्वथा दिक्पतींची. ॥ ३९ ॥

तदुपरि मग सायंकाळिंचा तास वाजे,
त्रिविध रुचिर वाद्यध्वान गंभीर गाजे. ।
अगणित मग येती दीपधारी, हिलाली,
यदुपतिनमनीं हे पंक्ति ज्यांची कलाली. ॥ ४० ॥

बहुत जवळि आली हे समुत्थानवेळा
म्हणउन विनहे हा षण्मुखें अर्ज केला. ।
यदुपति उठतां हे वारि होऊं निघाली,
तदपि कितियकांची दाटि अत्यंत जाली. ॥ ४१ ॥

---

४१·२ विनयें ( भावे प्रत )

कषति परम जेथें अंगदें अंगदांसीं,
अपरिमित तसी हे आयुधें आयुधांसी. ।
विलुठति पदपीठीं देव कोटीरकोटी,
अहमहसिकतेनें धांवती वीर कोटी. ॥ ४२ ॥

क्षणभरि तंव तेथें विप्र साशंक पाहे,
झडकरि कर त्याचा सात्यकी घेत आहे. ।
तदुपरि अवरोधद्वार किंचिद्विलंबे,
यदुपति मग पावे पार्थहस्तावलंबें. ॥ ४३ ॥

दाशार्ह हे अनुसरेत तया नृपातें; । संभाविलें मग यथोचित दृष्टिपातें. ॥
अंतःपुर प्रविशतां मधुकैटभारी, । सर्वांसही अति निषेधिति वेत्रधारी ॥ ४४ ॥

संध्यामंटपमार्ग दावित असे मुख्य प्रतीहारिका.
'यावें, श्रीहरि ! कृष्ण ! यादवपते !' हें बोलती सारिका. ।
संध्यावंदन आदरें करुनि जों गेला असे भोजना,
विप्राची तंव नारदें हळुच ते केली असें सूचना ॥ ४५ ॥

झडकरि जगदीशें विप्र तो आणवीला,
अतिसुरभि फुलेलें आदरें न्हाणवीला ।
तडप रुचिर लाखी उंच हा नेसवीला;
सविनय मग पंक्ती आपले बैसवीला ॥ ४६ ॥

तदुपरि मग पंक्ती बैसती यादवांच्या,
द्विज परिणत जेथें बोलती वेदवाचा ।
फिरति बहुत तेथें देवदासीसहस्रें,
सहजच निजतेजें वारिती जे तमिस्रें ॥ ४७ ॥

कितिक मग वसाया देति या हेमपीठें.
कितियक मग तेथें मांडिती रत्नताटें ।

४२.४ 'अहमहमिकतेनें' असें पाहिजे. दोन्ही हस्तलिखित प्रतींत हस्तदोष आहे.

४५.३ क प्रतींत 'आदरें' हा शब्द गळाला आहे.

कितियक तरळा या लाविती दीपमाळा.
कितियक मग तेथें वाढिती त्या सुशीळा ॥ ४८ ॥

हळधर हरि दोघे बैसती येक ताटीं.
त्वरित बहुत आली माय हे त्याजसाठीं।
सकळयुवतिमान्या देवकी देवमाता,
पुनरपि निजहस्तें वाढिते जे अनंता ॥ ४९ ॥

क्षणभरि मग दारा येति त्या राजदारा,
अति रुचिर पदार्था वाढिती ज्या उदारा।
हळुहळु सकळांचीं भोजनं सांग होती,
कनकघटित तस्तें दासिका आणवीती ॥ ५० ॥

सुरभिसलिल देती कस्तुरी अंचवाया,
स्थविर तदपि लागे मृत्तिका चांचपाया।
अभिनव नवलें या हांसती देवदासी;
हळुच मग दटावी ते दरोगीण त्यांसी ॥ ५१ ॥

अति रुचिर विड्यांची प्राप्ति सर्वांस जाली.
द्विजपतिस अनुज्ञा उद्धवें देववीली।
यदुपतिजनकाची जे असे होमशाळा,
क्षणभरि मग तेथें स्वाप जाऊन केला ॥ ५२ ॥

निजेल्याही रामायण अण महाभारत पढे,
मधेंमधें नामस्मरणमहिमा त्यावरि चढे.।
महाध्यानाभ्यासीं स्थगित मग राहे क्षणभरी,
मनामध्यें येती हरिपदसुखांभोधिलहरी. ॥ ५३ ॥

भरें हा निद्रेच्या द्विजपति निजेला जंव असे,
त्यव्हां, हा येऊन प्रभुवर तया संनिध बसे.।
मनस्वी, विश्वात्मा, भुवनपति, विश्वंभर, हरी,
विसांवा भक्तांचा द्विजचरणसंवाहन करी ! ॥ ५४ ॥

करस्पर्शें त्याच्या द्विजतिलक तत्काळ उठिला,
म्हणे "हा श्रीकृष्णा परम मज अन्याय घडला!"।
पदीं माथा ठेवी; झडकरि करें तत्कर धरी,
"प्रकार स्वामी हा सकळ परलोकास अधरी. ॥ ५५ ॥

घडे हें प्रत्यक्ष प्रकटच तुझें दर्शन मला,
नसे कांहीं माझा तदपि असदुद्योग शमला; ।
रहातां ही पाहें सुरपतितरूच्या तळवटीं,
जसा भिक्षेसाटीं निशिदिस करंटा कटकटी ! ॥ ५६ ॥

प्रयासें संसारीं निजविषयगुंते उगविती,
गुणीं तूझ्या ते तों सहजच सुखें गुंतति यती. ।
अहंबुद्धिस्पर्शें प्रकटच जया वाळित पडे,
तयां तत्पंक्तीचें अढळ बसणें कोठुन घडे ? ॥ ५७ ॥

निजानंदें जें कीं स्थळ परमहंसा विचरणें,
कदा जेथें नाहीं नियत निजकर्में निचरणें. ।
तया ठायां जाया हृदय बहुधा तांतडि करी,
जगंनाथा, आतां क्षणभरि पहा धीर न धरीं. ॥ ५८ ॥

वृथा मायाजाळीं पडोन मन हें धांवति करी,
दुराशेनें गुंते अझुणि विषयीं वीट न धरी. ।
विवेकाच्या मूळें निजनिलयकारागृह सुटे,
ठसा वैराग्याचा तरिच हृदयामाजि उमटे. ॥ ५९ ॥

मनामध्यें माझ्या विषयविषवृक्ष प्रकटला,
फलाशेनें जीवाभिधविहग जेथें लिगटला, ।
निराशेनें जेथें शुक, सनक झंपावति सदा,
यदुत्तंसा, आतां झडकरि तया दाखवि पदा ॥ ६० ॥

पदस्पर्शें तूझ्या दुरितचयपाथोनिधि जळे,
क्षणार्धें श्रीकृष्णा, सुकृतमय कल्पद्रुम फळे ।

भवद्बोधाचा हा अनुभव महा होय मजला.
  अहो, मूढत्वानें अझुणि पुसणें काय तुजला ? ॥ ६१ ॥

अहो, या लोहाचा जिनस परिसेसीं जरि मिळे,
  तयाच्या संसर्गें अखिळ मग लोहत्व उधळे ।
अकस्मात, स्वामी, सकळहि अहंकार निरसे,
  पदस्पर्शें तूझ्या सहज मजला मीपण नसे ” ॥ ६२ ॥

सदा सद्भावाचा अतिशयित भोक्ता हरि असे,
  मनामध्यें ज्याच्या स्वपरजनवैषम्य न वसे ।
महा प्रेमें त्यासीं तदुपरि जगन्नायक वदे,
  जयाचे भक्तीला मन यदुपतीचें बहु बधें ॥ ६३ ॥

“ चहूंमध्यें मुख्य प्रगटच गृहस्थाश्रम असे.
  असें विश्रांतीचें निलय दुसरें आणिख नसे ।
प्रसंगें हे तेथें अतिथिपरिचर्या जरि घडे,
  समारंभें अंतीं सुरपतिपुरद्वार उघडे ॥ ६४ ॥

महादोषी मूढप्रवरवर विप्रध्रुव असे,
  जया दुष्टा माझी निपट कयिंही चाडच नसे ।
तयाही विप्राचा अनुचित असत्कार करणें,
  जयाच्या संक्षोभें निजपतन कैसें न घडणें ? ॥ ६५ ॥

द्विजद्रोहाग्नीचा कण जरि पडे किंचित मनीं,
  तयाच्या संसर्गें उठति भडके वंशविपिनीं ।
महांधाच्ये दृष्टीं प्रकटहि महा दोष न दिसे.
  पाहातां तो याचें फळ तुरुत हातावरि असे ॥ ६६ ॥

यदृच्छालाभें जे द्विज मुदित युष्मद्विध सदा,
  तयाच्या पायांचा परिचय सुटेना मज कदा. ।
भृगूची हे लत्ता विमल हृदयीं नित्य मिरवीं,
  यिच्या लाभें लक्ष्मीप्रणयरस जीवा विसरवीं. ॥ ६७ ॥

प्रसादें ज्यांच्या मी यदुपति जगन्नायक असें,
 असे हे निर्वाहें अझुणि समजेना जग कसें ?
मदीया भक्तांचा अपसद तिरस्कार करिती,
 अहो, ते दुष्टात्मे नियत मजसीं वैर धरिती. ॥ ६८ ॥

भल्याच्या संतोषें निरतिशय माझें मन निवे,
 तयांच्या या दुःखें नियत बहुधा जीव दुखवे. ।
तयां भक्तांसाटीं विविध अवतारांस धरणें,
 तदुद्देशें ऐसा विरस मज संसार करणें. ॥ ६९ ॥

पहा माझ्ये नाभीकमळिहुनि वेधें उपजती,
 अनंतब्रह्मांडें उदरकुहरीं हे कुहिजती; ।
द्विजाची मर्यादा तदपि अवहेळूंच न शके,
 अहो, तेथें इंद्रप्रभृति विबुधें कोण मशकें ? ॥ ७० ॥

अहो, जेथें माझें स्तवन करितां वेद अडती,
 शिरोभागा माझे अपरमित संदेह पडती. ।
गुणोत्कर्षें माझ्या निपटच धरी शेष लघिमा,
 तया जाला पाहें अविषय मला भक्तमहिमा. ॥ ७१ ॥

अहो, मद्भक्तांचा परम मज दुष्काळ पडला,
 अशामध्यें तूझा अवचट मला लाभ घडला ! ।
द्विजा तूझें आहे अनिश अनुसंधान मजसीं,
 घडे कैसा तेथें क्षणभरि तरी भेद तुजसीं ? ॥ ७२ ॥

सदा सद्वांछेचें हृदयविवरीं बीज उगवे,
 अहो, मद्भक्तीचा तरिच बरवा कोंब उघवे. ।
विवेकाचे पाले सहज फुटती कोमल नवे,
 मनाचे वृत्तीला अभिनव कसा उत्सव नव्हे ? ॥ ७३ ॥

क्रमप्राप्तीनें हे तदुपरि फुले शांतिलतिका.
 असें हें विश्रांतिस्छळ परम जें जीवपथिकां ।

---

७२·२ तुझ्या (क).

निजानंदामोदें सकळ सुखदुःखादि विसरे.
पाहातां अद्वैतामृतफळरसोद्रेक पसरे ॥ ७४ ॥

प्रपंचीं हें माझें भजन जरि कांहीं घडे,
महादोषी तोही निपट अढवाटेस न पडे ।
प्रतिज्ञा माझी हे नियत समजावी बुध जनीं.
धरावा निर्वाहें अनवरत विश्वास भजनीं ॥ ७५ ॥

अहो, जों जों जीवा सगुण भजनाचें पुट चढे,
अनेका जन्मांचा तंव तंव मनाचा मळ झडे ।
स्वभावें सत्वाच्ये तदुपरि कसोटीस उतरे.
क्रमप्राप्तीनें हें मनपण मनाचें मग तुरे ॥ ७६ ॥

भवांभोधीमध्यें विषयमय आनाय पसरे.
तयाच्या संसर्गें निजहित मनोमीन विसरे ।
पाहातां या दोघां मणु जिवशिवां भेद नसतां,
स्वबुद्धीनें कल्पी हतमति दुजा भाव नसता ! ॥ ७७ ॥

मनें वेदांताच्या समज निजसंसार लटका.
करी कोणाची हे कवण लटकी आजि सुटका ? ।
पाहातां बंधाचें सहज समजे मूळच नसे.
मुमुक्षा तेथें हें गगनकुसुमाकार विलसें ॥ ७८ ॥

समस्तां शास्त्राचें मथित कथितों सार तुजला.
नको टाकूं आतां क्षणभरि मनांतून मजला ।
कराया हे सेवा समुचित तुझा सिद्धच असें.
अभिज्ञा, विप्रेंद्रा, प्रकृत तुजला यावरि पुरें ॥ ७९ ।

समुद्रामध्यें हें स्थळ तरि महा दुर्गम असे.
तुम्हां लोकांचा तो अझुणिवरि संचारच नसे ।
किमर्थ, स्वामी, हा श्रमित बहु आत्मा श्रमविला ?
कळों द्यावें याचें झडकरि तुम्हीं कारण मला.” ॥ ८० ॥

---

७५.१ प्रपंचीं हें माझें भजन जरि कांहीं (क्षण) घडे । (भावे-प्रत).

घनश्यामाचीं हें सरस वचनें विप्र परिसे,
महा आनंदाचे हुरुप उठती ज्यांजसरिसे. ।
तुरीयावस्थेचे अनुभवरसीं यद्यपि वसे,
तऱ्ही श्रीकृष्णाला प्रतिवचन हें देतच असे ॥ ८१ ॥

" विदर्भीं हे आहे प्रथित बहुधा कुंडिनपुरी,
तयेच्या राज्याची चतुर विलसे आजि कुमरी. ।
मनोभावें कृष्णा, नियतच जिणें तूज वरिलें,
तुझे पायीं निष्ठा धरुनि तुजला पत्र लिहिलें. " ॥ ८२ ॥

द्विजें श्रीकृष्णाच्ये तदुपरि करीं पत्र दिधलें,
तयानें लाखाटा उखळुनि असे जें उकलिलें. ।
तयाला वैदर्भी स्वलिखितमिषें भेटत असे.
जयेच्या प्रेमाचा अतिशय असाधारण दिसे. ॥ ८३ ॥

जेथें वटे रुचिर कुंकमबिंदु शोभा,
लाजे जिला कनककेतकगर्भगाभा; ।
आली असे प्रकृत जे प्रतिमा प्रियेची,
ते पत्रिका हळुच यादवराव वाची. ॥ ८४ ।

जैसी असे विमल वोवणि मोतियांची,
तैसी वसे सहज ठेवणि अक्षरांची; ।
ओजःप्रसादमधुरादिक संपदांची,
शोभा धरून विलसे रचना पदांची. ॥ ८५ ।

" तीर्थस्वरूपचरणा, करुणानिधाना,
प्रौढप्रतापमिहिरा, प्रथिताभिमाना, ।
सौजन्यसिंधुसदना, मदनाभिरामा,
सर्वोपकारनिरता, समवाप्तकामा, ॥ ८६ ।

राजाधिराज, यदुवंशशिरोवतंसा,
कंसांतका, सुररिपो, कमळानिवासा, ।

८३-२ लखोटा (ख).

राजश्रियासज विराजित राजमान्या,
वंदी तुझे चरण भीमकराजकन्या. ॥ ८७ ॥

येथील हें कुशळ जाणोन लेखकाला,
आज्ञापिजे निजमहोत्सवलेखनाला।
हें लीहिलें प्रकृत केवळ संप्रदायें;
मानूं नये परि यथार्थच देवरायें ॥ ८८ ॥

विज्ञापना परिस यादववंशवीरा,
योगींद्रहृत्कमळपंजरगर्भकीरा।
हातास ये त्वरित आजि उडोन माझ्या.
वार्त्ता मला श्रवणगोचर होति तूझ्या ॥ ८९ ॥

माझा मनोमधुप लुब्ध बहूत जाला.
तूझ्ये पदांबुजयुगीं रहिवास केला।
काकूलती बहुत याजनिमित्त येतें,
कृष्णा, तुझे चरणपल्लव हे धरीतें ॥ ९० ॥

जे आयकेत भवदीय गुणौघ कानीं,
त्यांचे निवेति उगलें मग ताप तीन्ही।
जे पाहती अति मनोहर रूप देवा,
त्यां डोळसां अखिळ लाभ अपूर्व व्हावा ॥ ९१ ॥

जन्मास या तुजनिमित्तच जाण आलें.
आईकतां गुण तुझे, सजणा, न धालें।
हे अच्युता, मन मना नकळेंच तूझें,
तूझे पदीं परि अपत्रप चित्त माझें ॥ ९२ ॥

सर्वां गुणीं तुजसमान, महा वदान्या,
ते कोण तूज नवरी न वरील धन्या ?।
विद्यावयद्रविणरूपगुणौघधामा,
कृष्णा, नृसिंह, नरलोकमनोभिरामा ॥ ९३ ॥

---

८७·३ राजश्रियासह (भावे–प्रत)

या कारणें नियत त्यां वरिलास भावें.
येऊनियां त्वरित तां मज आजि न्यावें।
हा लागला जिव असे तुजवीण जाया.
तूं आपली मज हरी करि आजि जाया ॥ ९४ ॥

हा वीरभाग शिशुपाळ जयीं विटाळी,
वीरामधें तुरुत होइल येकि टाळी.।
लज्जा तजून धिट आणिक येक बोलें,
सिंहामिषा हरुनि नेइल आजि कोल्हें ! ॥ ९५ ॥

यागादिदाननियमव्रतदेवपूजा,
केली असे, तरिच होइल लाभ तूझा.।
येऊनियां त्वरित फार गदाग्रजानें
पाणिग्रहास करिजेच चतुर्भुजानें. ॥ ९६ ॥

पर्वा असे लगिन निश्चित जाण भावें,
सेनेसमेत अति गुप्त बहूत यावें.।
मंथून चैद्यमगधेशबळासि धीरा,
रक्षोविवाह विधिनें मज नेयिं, वीरा. ॥ ९७ ॥

अंतःपुरांतुन वधू न वधून बंधू.
नेऊं कसी म्हणसि तूं पुरुषार्थसिंधू ?।
यांच्ये कुळी नववधूस असे विचित्रा
लग्नास पूर्व दिवसीं कुलदेवियात्रा. ॥ ९८ ॥

ग्रामास सन्निध निकेतन अंबिकेचें,
जें हें असे निजमनोरथदायिकेचें;।
तेथें बसोन घटिकाद्वय वाट पाहें,
मी ही नये तरि तुझी मज आण आहें. ॥ ९९ ॥

---

९५·२ दोन्ही हस्तलिखितांत प्रथम ' धरामधें ' असें लिहून नंतर ' ध ' च्या ' जागीं वी ' असें लिहिलें आहे.

तूझ्या पदांबुजरजःस्नपनें शिवाला
अज्ञाननाशनमहोत्सव थोर जाला. ।
एतन्निमित्त सनकादिक लुब्ध होती,
तूझा पदांबुजरजःकण इच्छितातीं. ॥ १०० ॥

जें हा तुझा चरणलाभ मला न व्हावा.
म्यां निश्चयें तरि हरी मग जीव द्यावा. ।
घेईन मी तुज निमित्त सहस्र जन्में,
त्वत्प्रापकें करिन नित्य अनेक कर्में. ॥ १०१ ॥

विज्ञापना शपथपूर्वक तूज केली.
येथील तों सकळरीति कळोनि गेली ।
आणीक काय निपुणाप्रति म्यां त्यहावें.
तां येक वेळ सगुणा इकडे पहावें ॥ १०२ ॥

नारायणा, निखिळवृष्णिपते, मुकुंदा,
टाकून दे मजनिमित्त समस्त धंदा ।
दासी तुझी परम लालस वाट पाहे.
तूझे त्वरेस बहु यावरि मोल आहे ॥ १०३ ॥

हेजीब हे जीभचि जाण माझी.
येथें नसो किमपि विप्रतिपत्ति तूझी।
पत्रांत लेख्य अवशिष्ट असेल कांहीं,
याच्या मुखें विदित होइल तूज तेंही. " ॥ १०४ ॥

हें भीमकीपत्र समाप्त जालें । कृष्णास कांहीं यक हास्य आलें ॥
जाणोनि हा आदर माधवाचा, । वदे प्रसंगोचित विप्र वाचा ॥ १०५ ॥

" चतुर्भुजा, नीरदनीळवर्णा, । परावरा, वीरकुळावतीर्णा, ॥
विशेष हा आइक, शेषशाई, । करीस लोकत्रयपातशाही ॥ १०६ ॥

ते भीमकी पंकजपत्रनेत्रा, । कृशोदरी, पूर्णसुधांशुवक्त्रा, ॥
उत्फुल्ल आरक्त सरोरुहांतें, । जे लाजवीते करभोरु हातें ॥ १०७ ॥

---

१०२.३ म्या (ख)

या कारणें नियत त्यां वरिलास भावें.
  येऊनियां त्वरित तां मज आजि न्यावें।
हा लागला जिव असे तुजवीण जाया.
  तूं आपली मज हरी करि आजि जाया ॥ ९४ ॥

हा वीरभाग शिशुपाळ जयीं विटाळी,
  वीरामधें तुरुत होइल येकि टाळी.।
लज्जा तजून धिट आणिक येक बोलें,
  सिंहामिषा हरुनि नेइल आजि कोल्हें ! ॥ ९५ ॥

यागादिदाननियमव्रतदेवपूजा,
  केली असे, तरिच होइल लाभ तूझा.।
येऊनियां त्वरित फार गदाग्रजानें
  पाणिग्रहास करिजेच चतुर्भुजानें. ॥ ९६ ॥

पर्वा असे लगिन निश्चित जाण भावें,
  सेनेसमेत अति गुप्त बहूत यावें.।
मंथून चैद्यमगधेशबळासि धीरा,
  रक्षोविवाह विधिनें मज नेयिं, वीरा. ॥ ९७ ॥

अंतःपुरांतुन वधू न वधून बंधू.
  नेऊं कसी म्हणसि तूं पुरुषार्थसिंधू ?।
यांच्ये कुळी नववधूस असे विचित्रा
  लग्नास पूर्व दिवसीं कुळदेवियात्रा. ॥ ९८ ॥

ग्रामास सन्निध निकेतन अंबिकेचें,
  जें हें असे निजमनोरथदायिकेचें;।
तेथें बसोन घटिकाद्वय वाट पाहें,
  मी ही नये तरि तुझी मज आण आहे. ॥ ९९ ॥

---

९५·२ दोन्ही हस्तलिखितांत प्रथम ‘धरामधें’ असें लिहून नंतर ‘ध’च्या ‘जागीं वी’ असें लिहिलें आहे.

तूझ्या पदांबुजरजःस्नपनें शिवाला
अज्ञाननाशनमहोत्सव थोर जाला. ।
एतन्निमित्त सनकादिक लुब्ध होती,
तूझा पदांबुजरजःकण इच्छिताती. ॥ १०० ॥

जें हा तुझा चरणलाभ मला न व्हावा.
म्यां निश्चयें तरि हरी मग जीव द्यावा. ।
घेईन मी तुज निमित्त सहस्र जन्में,
त्वत्प्रापकें करिन नित्य अनेक कर्में. ॥ १०१ ॥

विज्ञापना शपथपूर्वक तूज केली.
येथील तों सकळरीति कळोनि गेली ।
आणीक काय निपुणाप्रति म्यां ल्यहावें.
तां येक वेळ सगुणा इकडे पहावें ॥ १०२ ॥

नारायणा, निखिळवृष्णिपते, मुकुंदा,
टाकून दे मजनिमित्त समस्त धंदा ।
दासी तुझी परम लालस वाट पाहे.
तूझे त्वरेस बहु यावरि मोल आहे ॥ १०३ ॥

हेजीव हे जीभचि जाण माझी.
येथें नसो किमपि विप्रतिपत्ति तूझी।
पत्रांत लेख्य अवशिष्ट असेल कांहीं,
याच्या मुखें विदित होइल तूज तेंही. " ॥ १०४ ॥

हें भीमकीपत्र समाप्त जालें । कृष्णास कांहीं यक हास्य आलें ॥
जाणोनि हा आदर माधवाचा, । वदे प्रसंगोचित विप्र वाचा ॥ १०५ ॥

" चतुर्भुजा, नीरदनीळवर्णा, । परावरा, वीरकुळावतीर्णा, ॥
विशेष हा आइक, शेषशाई, । करीस लोकत्रयपातशाही ॥ १०६ ॥

ते भीमकी पंकजपत्रनेत्रा, । कृशोदरी, पूर्णसुधांशुवक्त्रा, ॥
उत्फुल्ल आरक्त सरोरुहांतें, । जे लाजवीते करभोरु हातें ॥ १०७ ॥

---

१०२·३ म्या (ख)

जो हा न पावे समता नखाची, । तो काय पावे उपमा मुखाची ? ॥
नखप्रभेनें विधु हा उटावा, । तरीच हो निर्मळ ऊमटावा ॥ १०८ ॥

असेत हे सुंदर केश काळे, । विशाळ तीचे विलसेत डोळे, ॥
जयांपुढें खंजन खंज जाले, । प्रत्यक्ष हे मीन जळीं लपाले ॥ १०९ ॥

तीची असे सज्ज कपाळपाटी । सौभाग्यरेखा उमटे ललाटीं ॥
ज्या भ्रूलता श्यामळ शोभमाना, । त्या कामकोदंडसमान माना ॥ ११० ॥

अत्यंत हे स्वछ कपोल दोन्ही । सुवर्णशुक्तिभ्रम होय कानीं ॥
नासा तिची हे उपमा न साहे, । तिळप्रसूनाहुन नीट आहे ॥ १११ ॥

आली तसी त्या अधरास लाली, । लज्जा प्रवाळांस विशेष जाली ॥
त्या पक्क हो दाडिमबीजराजी । दंतावळी दाश्यविधीस राजी ॥ ११२ ॥

असे गळा मंजुळ हा निसर्गें, । तथापि तीचीं वचनें महर्घें. ॥
तीच्या स्मिताचें जंव तेज फाके । तेणेंहि त्याचें मग ओज झांके. ॥ ११३ ॥

न ये मृणाळां मृदुता भुजांची, । कंन्या महासुंदर भूभुजाची. ॥
अत्यंत शोभा कुचकुड्मलाची । विळासभू त्वन्नयनोत्पलांची. ॥ ११४ ॥

नाभीन्ह्दीं या मदनास थारा. । रोमावली तत्तरवारधारा. ॥
तीच्या नितंबास गुरुत्व साजे; । माजे जिच्या सिंहसमाज लाजे. ॥ ११५ ॥

दृष्टांत तीच्या जघनास नाहीं. । तथापि भासे मज येक कांहीं. ॥
साम्राज्य जेव्हां मदनास आलें, । सुवर्णसिंहासन सिद्ध केलें. ॥ ११६ ॥

असेत त्या मांसळ फार ऊरू; । जानुद्वयें सुंदर फार भीरू. ॥
त्या पोटऱ्यांची रुचिर प्रभा ते । कीं मन्मथाचे विलसेत भाते. ॥ ११७ ॥

ते पाय तीचे नवपल्लवांनीं । समानसे, मानव कोण वानी ? ॥
औदार्य जें नित्य धरीत मोटें । कल्पद्रुमांचें यश होय खोटें. ॥ ११८ ॥

नसे बहू पातळ आणि मोटी; । देवांगनाच्या नुपमेति कोटी. ॥
नसे बहू उंच तरीच खूजी; । प्रत्यक्ष लक्ष्मीप्रतिमाच दूजी. ॥ ११९ ॥

नसे मनांतून कदापि कोटी; । खोटया करी तप्त सुवर्णखोटी. ।।
गंगाप्रवाहोपम शीळ जीचें; । पवित्रतावर्णन काय तीचें ? ।। १२० ।।

पादादिमूर्द्धांत सुलक्षणांनीं । संपन्न सामुद्रिक लक्षणांनीं. ।।
लक्ष्मीच किंवा अवतीर्ण जाली । या भीमकाच्या उदरास आली. ।। १२१ ।।

माळा स्मराची विलसे जपाची । कीं वोतली मूस तुझ्या तपाची, ।।
लोकत्रयीं मोहनमूळविद्या; । साहित्यसंगीतकळानिषद्या. ।। १२२ ।।

नसे तुझ्या तों गणना गुणाची । तेही असे मूर्ति महागुणांची. ।।
ते तूजला हात बहूत जोडी, । केली तिणें आजि तुझीच जोडी. ।। १२३ ।।

असे स्वभावें बहुफार गोरी । घरांमध्यें कामविकार चोरी. ।।
जीला फुलांची जड होय जाळी । मुक्ताफळांची जिस माळ जाळी. ।। १२४ ।।

तथापि बाहेर उभी न ठाके, । अंतर्गृहांतून कदा न फांके. ।।
ध्याते तुझ्या ते पदनीरजातें; । अखंड नेत्रांतुन नीर जातें. ।। १२५ ।।

तीचा सदा गद्गद कंठ दाटे, । नेत्रांबुजीं सागरपूर लोटे, ।।
तुझ्ये कृपेचा असतां जिव्हाळा, । वांचेल कैसी सुकुमार बाळा ? ।। १२६ ।।

अत्यंत दैनंदिन दैन्य जोडी, । लावण्यलक्ष्मी परि हे न सोडी ।।
समीप आली दशमी अवस्था । करूं नये या वरि तां अनास्था ।। १२७ ।।

तूझ्या गुणांची जपमाळ केली । ते वीसरे भोजनही भुकेली ।।
कृष्णा, तुझीं जें असती चरित्रें, । चित्रीं पाहा ते लिहिते विचित्रें ।। १२८ ।।
दैवें पुरोडाश पवित्र जाला । सिवेल आकस्मिक काय याला ? ।।
म्यां काय देवा तुजशीं वदावें ? । थोड्यांत जाणोन बहूत घ्यावें ।। १२९ ।।

हें सर्व आहे नटनाट्य तूझें । चातुर्य हें व्यर्थ समस्त माझें ।।
तूझ्या प्रकाशें जग हें प्रकाशे । तां नाशिल्या हें जग सर्व नाशे ।। १३० ।।

---

१२०·१ खोटी ( भावे–प्रत )-

१२९·२ या चरणांत ‘ काय ’ याऐवजी ‘ काग ’ ( = कावळा ) असा पाठ श्री. कानिटकर सुचवितात.

तां हालवील्याविण हें न हाले, । त्वदीय सत्तेविण हें न चाले, ॥
असेच निश्चेतन चित्र जैसें, । हें सर्व आहे तुजवीण तैसें ॥ १३१ ॥

पाहे तुझी वाट नरेंद्रपुत्री । दिसेस तूं तो मज दीर्घसूत्री ॥
केली तिची येउन हे अनुज्ञा । आतां असे यावरि काय आज्ञा ? ॥ १३२ ॥

निजेल्या पर्यंकीं किमपि न लगे नीज नयनीं.
वियोगें उद्विग्ना उठत असते भूमिशयनीं ।
स्मराचे जे सोसी तिखट शर राजन्यतनुजा,
चकोराक्षी लक्षी त्वरित मुखचंद्रोदय तुझा." ॥ १३३ ॥

वाक्यें असीं हें जंव आयकीलीं, । श्रोत्रें हरीचीं अति तृप्त जालीं ॥
धरून हातें मग हात त्याचा । वदे तयासीं स्मितपूर्व वाचा ॥ १३४ ॥

"जाली असे हेच मला अवस्था । दिसेत तद्युक्त दिशा समस्ता ॥
प्रतिक्षणीं व्याकुळ चित्त होतें । विदर्भदेशाप्रति धांव घेतें ॥ १३५ ॥

रुक्मीच तो मद्विषयीं निषेधी, । कळोन गेलें तुजहून आधीं ॥
आतां रणीं सर्व वधून वैरी, । हरीन ते कांचनगर्भ गौरी ॥ १३६ ॥

चंद्रानना, खंजनमंजुळाक्षी, । शातोदरी मार्ग मदीय लक्षी ॥
जाली असे मत्पर पेशलांगी । तीचें असें शासन कोण लंघी ?" ॥ १३७ ॥

बोलोन ऐसें पणपूर्व शौरी । प्रच्छाननक्षत्र त्यव्हा विचारी ॥
तों दैवयोगें गुरुपुष्य साधे । मुहूर्त अत्युत्तम कृष्ण लाधे ॥ १३८ ॥

उत्साह तेणें द्विगुणीत जाला । तत्काळ तेव्हां रथ आणवीला ॥
आनंदला नंदन देवकीचा । तेथेंच केला विधि देवकीचा ॥ १३९ ॥

प्रस्थानकाळीं बहु गौरवीलें, । समस्त ते यादव राहवीले. ॥
करी उपस्थान महारथाचें, । जो येक वाहे भय मन्मथाचें. ॥ १४० ॥

धरुन हातें द्विज वेंघवीला. । विशेष हा आदर दाखवीला. ॥
त्यानंतरें आपण पाव टाकी. । तत्काळ तो दारुक अश्व हाकी. ॥ १४१ ॥

---

१३३·२ दोन्ही हस्तलिखित प्रतींत 'भूनिशयनी' असा हस्तदोषयुक्त पाठ आहे.

धांवेत ते तेथुन फार घोडे, । वाटेत हें ज्यांस दिगंत थोडें. ॥
तों कावळेही उजवे उडावे. । महाहठी तासहि जाति डावे. ॥ १४२ ॥

उल्लंघिली ग्राम, पुरें, सहारें, । प्राणप्रियाचारुकथाविहारें. ॥
अनर्तदेशींहुन येक रात्रें, । तें पाविजे कुंडिन पद्मनेत्रें. ॥ १४३ ॥

कथा हे कृष्णाची सकळजगदानंदजननी,
मनोभावें ईचें श्रवण करिजे नित्य सुजनीं; ।
प्रसंगें श्रोत्याचें सकळहि महादोष हरती,
यदूत्तंसप्रेमें विषयरसगोडी विसरती. ॥ १४४ ॥

इति श्रीमद्भगवद्भक्तपदानुरक्तकविसामराजविरचिते रुक्मिणीहरणकाव्ये
कुंडिनागमनो नाम पंचमः सर्गः ॥ ५ ॥

# सर्ग सहावा

## श्रीपुरुषोत्तमाय नमः ॥ श्रीमन्महामुद्गलो जयति ॥

याहून पूर्वीं शिशुपाळ आला, । जेणें विवाहोचित वेष केला. ॥
चाले जयाची चतुरंग सेना, । रजोविशेषें रवि हा दिसेना. ॥ १ ॥

रुक्मी पुराबाहेर त्यास आला, । करून पूजा मिरवीत नेला. ॥
वाजेत भेरी, बरवे नगारे, । ते भीमकाची नगरी सवारे. ॥ २ ॥

शोभे महा कुंडिन राजधानी । संपन्न नानाविध संविधानीं. ॥
शृंगारिल्या उत्कट राजवीथी. । समस्त शृंगाटक वोप देती. ॥ ३ ॥

प्रासाद अत्युच्च असे असावे, । सहाश्व जेथें बहु घे विसावे. ॥
जेथें उभारेति महा पताका, । विचित्रवर्णा दिसती अनेका. ॥ ४ ॥

काश्मीररसंसेचित अंगणांनीं, । प्रवाळमुक्तामय तोरणांनीं, ॥
द्वारप्रदेशा बहु येति शोभा, । पण्यांगना नाचति त्या सदंभा. ॥ ५ ॥

चैद्येंद्र हा जानवशास आला । नृपें पुरस्कार बहूत केला ॥
चहूंकडे या प्रसरेत वार्ता । आरंभलें मूळ महा अनर्था ॥ ६ ॥

स्त्रीरत्न हें कृष्ण हरील जेव्हां, । स्वकीय नाशे पुरुषार्थ तेव्हां ॥
म्हणोनि हा मागध सिद्ध जाला । सहाय या चैद्यनृपास आला ॥ ७ ॥

हा दंतवक्त्रादिक पौंड्रकांनीं । आईकिजे सर्व उदंत कानीं ॥
द्वेषी हरीचे हृदयीं जळाले । मदें जरासंधमता मिळाले ॥ ८ ॥

या वेगळे आणिख येति राजे, । बळिष्ठ ज्यांचा दळभार साजे ॥
कित्तेक हे चैद्यनृपा सहाया । कित्तेक हे कौतुकही पाहाया ॥ ९ ॥

---

३.४ येथें भावे-प्रतींत 'नोप' असें होतें. हस्तलिखित प्रतींत 'वोप' असा पाठ असून तोच बरोबर आहे. श्री. कानिटकर 'नोक' असा पाठ सुचवून त्याचा अर्थ नोकझोक असा करतात.

तैलंग, कर्नाटक, पांड्य राजे। त्या द्राविडांचा समुदाय गाजे ॥
येती माहाराष्ट्र माहाभिमानी। कित्तेक ते केवळ मद्यपानी ॥ १० ॥
काश्मीर, पांचाळक, गौड येती। आवंत्य, बाल्हीक, अनेक जाती ॥
कैकेय, गांधार, अनेक आले,। सत्कार त्यांचे बहु फार केले ॥ ११ ॥

झडकरि गणकांला भीमकें आणवीलें.
कनकमय विटाचें बोहलें घालवीलें।
इतर बसवीले अर्गज्याचेच लेवे.
वरिवरि करिजेती कस्तुरीचे गिलावे ॥ १२ ॥

तदुपरि सकळेंही मंदिरें धूपवीलीं.
परम रुचिर चित्रें कारुकीं काढियेलीं।
अति मृदुतरवाला ज्या महा उंच खाशा,
अति चतुर फरासीं आंथरील्या तिवाशा ॥ १३ ॥

विविध मृदुर वाद्यें, चौघडे वाजताती.
अगणित दरबारीं भाट हे गाजताती।
तदुपरि मग ल्याल्या नेसल्या बायकांचे
अगणित गण येती, सोयऱ्याधायऱ्याचे ॥ १४ ॥

आता, माम्या, मावस्या, सर्व आल्या.
धाड्या, भाच्या, आणिल्या सर्व साल्या।
सासा, जावा, माय, आज्या, बहीणी,
आल्या मानें त्या नणंदा, विहीणी ॥ १५ ॥

सकळहि मग तेथें राजपत्न्या मिळाल्या,
धरुनि मुलिस हातीं स्नानशाळेस आल्या.।
दुचित मन तयेचें होय, कांहीं न चाले,
यदुतिलकविलंबें घाबिरे प्राण जाले. ॥ १६ ॥

ते मांडिली रत्नजडीत चौकी,। मुक्ताफळांचे बसलीत चौकीं. ॥
लागे तिला जे समई हरिद्रा,। शची दिसे जीजपुढें दरिद्रा ! ॥ १७ ॥

सख्या तिच्या काढुन सर्व लेणीं, । हळूच तीची उकलीत वेणी. ॥
जेथें असे रत्नजडीत न्हाणी, । तेथें तिला नेउनि माय न्हाणी. ॥ १८ ॥

जों जों पडे ईवरि उष्ण पाणी, । तों तों स्मराची झळके कृपाणी. ॥
हें मंगळस्नान तयेस जालें, । शरीर संप्रोछन सज्ज केलें. ॥ १९ ॥

अत्यंत थोर गजरें अति शीघ्र आली,
राका शशांकवदना सदनांत आली. ।
बाळातपीं कुटिल कुंतळ वाळवीले,
आळीजनें अतिसुगंधहि धूपवीले. ॥ २० ॥

असें असे सर्व शरीर गोरें, । जयापुढें कांचन होय भोरें. ॥
प्रत्यक्ष हे दोष दिसोनि याचे, । तथापि लेते नग सोनियांचे. ॥ २१ ॥

भरजर अवघी हे नेसली उंच साडी,
पदर मग तयेचा सुंदरी लांब काढी. ।
पदकमळ जयेचें वंदिजे लोकपाळीं,
सिसफुल धरि माथां, भांगटीळा कपाळीं. ॥ २२ ॥

कांचोळी मोतियांची तटतटित बसे वक्षदेशीं जयेच्या.
पेटयांचें येकदाणे, तदुपरि दुलडी कंठदेशीं तयेच्या. ।
रत्नाची रुंद कांची अतिरुचिर जिच्या मध्यभागीं विलासे,
जालीसे क्षीण मध्यें म्हणउनि मदनें वंध किंवा दिल्हासे ! ॥२३॥

कोथिंबिरी, टोपण, घोंसबाळया, । शोभेत कानीं जडिता निराळ्या. ॥
मुक्तामयें तानवडें, विचित्रें । ल्याली असे, जे वदनांत पत्रें. ॥ २४ ॥

दंडीं धरी रत्नजडीत वांकी, । ल्याली असे, वेसर दिव्य नाकीं, ॥
गोंडाळ ईचे बहु हात गोरे, । बसेत जेथें अति सब्ज दोरे. ॥ २५ ॥

त्या बांगड्या उत्तम सोनियांच्या । मधें मधें शोभति माणिकांच्या ॥
हे पाटल्या, हातसरांस ल्याली । अत्यंत किर्मीरित कांति झाली ॥ २६ ॥

त्या आरशा घालुनि आंगठ्याला । ल्याली असे सुंदर आंगठ्यांला, ॥
साध्या विलोरी, नकसी, जडीता, । दशावतारांकित मूर्त्तिमंता ॥ २७ ॥

तीच्ये सरीचे न बसेत फांसे, । म्हणोन कांहींयक माय हांसे ॥
चितांक चिंताकुळ लेत नाहीं, । तद्वाक्य चित्तांत न घेय कांहीं ॥ २८ ॥

घाली गळां रत्नजडीत पेटी, । लावण्यसिंधूंत निघे अपेटी ॥
चापेकळयाच्या मिरवेत माळा, । मुक्ताफळांच्या दिसती अमाळा ॥ २९ ॥

ते जोड पायीं सज सांखळयांचे, । शोभेत दोन्ही सर पोवळयाचे ॥
वाळा कडीं पैजण जाण त्याली, । त्या खालते घुंगुर सज्ज घाली ॥ ३० ॥

अनवट, निट त्याली, जोड त्या जोडव्यांचा,
अनुपम उमटे हा शब्द पोल्हारियांचा ।
रुचिरतर विरोद्या शोभनी अंगुळीला.
कितियक नग लेतां भार जाला मुलीला ॥ ३१ ॥

क्षणभरि परि तीचें चित्त हें स्वस्थ, नाहीं,
म्हणउनि नग तेव्हां लेतसे स्वल्प पाहीं ।
अविरळ मग वाळा मोकळे केश बांधे.
वदन विधुभयानें ध्वांत हें कावरोधे ? ॥ ३२ ॥

सुस्नात देवी मग ते सुशीला । प्रवेशली येउनि यज्ञशाळां ॥
जे पीत खंबाइत उंच नेसे, । ते हेमपीठावरि सज्ज बैसे ॥ ३३ ॥

जे येकलें मंगळ मंगळाचें, । तें येकदाणें मिरवे गळांचें ॥
बाळ्या धरी रत्नजडीत कानीं, । नासेस मोतीं विलसे सुपानी ॥ ३४ ॥

जीच्या स्वरें लाजतसे विपंची, । माजीं जिच्या रत्नजडीत कांची, ॥
त्याली असे जे मुद राखडीला, । जाली असे तांतडि तांखडीला ॥ ३५ ॥

पुण्याहवाचन करून बसेत दोघें;
आहेर घेत असती द्विजमंत्रयोगें ।
बैसे पुढें अति सुलक्षण ते कुमारी.
नीराजनें करिति तीस अनेक नारी ॥ ३६ ॥

पद्मापदोपासक, अग्निहोत्री, । पुरोहित, श्रोत्रिय वत्सगोत्री, ॥
पुढें निघे उत्तम संप्रदायी, । ज्याभोंवते भोंवति वाजपेयी. ॥ ३७ ॥

अथर्ववेदें गृहयज्ञ केला. । ते भीमकीला अभिषेक जाला. ॥
हिरण्यगोभूतिळवस्त्रदानें । ईच्छा करं देवविलीं नृपानें. ॥ ३८ ॥

मिळति सकळ तेथें ऋग्यजुःसामवेदी,
शतपुरुष जयांची हे अविच्छिन्न वेदी. ।
त्वरित बहुत केली मंडपादि प्रतिष्ठा,
धरणिपतिस देवीं ब्राह्मणीं थोर निष्ठा. ॥ ३९ ॥

देशोदेशींहून ते विप्र येती, । कीर्ती याचा नित्य जे आयकेती. ॥
देती गांवीं टाकुनीयां कुटुंबें, । लागे मागें अर्भकांचेंच लोंबें. ॥ ४० ॥

वऱ्हाडी, कऱ्हाडी, बहू खानदेशी, । वऱ्हाडास येती कनोजे विदेशी, ॥
तसे कानडे, कोंकणे, बागलाणे, । महा मस्करे माथुरे, जे शाहाणे. ॥४१॥

कित्तेक हे येति दशावधानी, । जे कुंडलें हालविताति कानीं. ॥
पदोपदीं देति महापरीक्षा, । जाली असे सौमिक ज्यांस दीक्षा. ॥ ४२ ॥

भजेत कोण्ही जन माधवाला, । आराधिती एक उमाधवाला, ॥
सेवीत कोण्ही द्विज अंबिकेला, । नसेच हा वस्तुविवेक केला. ॥ ४३ ॥

अपार ते दीक्षितभार येती । समागमें जे पशु वागवीती. ॥
प्रत्यक्ष दंभप्रतिमाच जे कीं । आस्था नसे हे सदसद्विवेकीं ! ॥ ४४ ॥

कित्तेक तेथें अजपा जपेती, । अव्यग्र जे·उग्र तपा तपेती. ॥
समाधिसेजे द्विज जे निजेले, । पडेति ते कोठुन कर्मजेलें ? ॥ ४५ ॥

पढेत अध्याय सदा क्रमाचे, । बोलेत जे बोल पराक्रमाचे. ॥
कित्तेक तेथें पढताति पांच्या, । कित्तेक माळा धरिती जपांच्या, ॥ ४६ ॥

कृष्णातीरींहून ते माध्व आले, । ज्यांच्या मागें शिष्यसंभार चाले. ॥
आंगोआंगीं लाविती श्रीशमुद्रा, । ग्रंथोग्रंथीं निंदिती नित्य निद्रा. ॥ ४७ ॥

हातीं घेती तीर्थगंड्या, गवाळीं, । चंबू, चंच्या, आसनांचीं चवाळीं, ॥
माथां ज्यांच्या शोभती उंच टोप्या, । विद्या गर्वें वाटती सर्व सोप्या. ॥४८॥

स्वधर्मे गोदेच्या उभयपुलिनीं वास करिती,
सदा श्रीकृष्णाच्या चरणयुगुळीं जे विचरती, ॥

सदाचारी वेदाध्ययनरत वेदांत पढती,
तयांचे हे तेथें अतिशयित सन्मान घडती ॥ ४९ ॥

द्विज परम शाहाणे हे महाराष्ट्र येती,
तदुपरि मग तैशी गोडखे, गुर्जराती ।
मिळोनि सकल तेथं मंडपामाजि आले.
सविनय अवघे हे भीमकें पूजियेले ॥ ५० ॥

हातीं जयाच्या झळकेत झाऱ्या, । त्या धोतरांच्या विलसेत धाऱ्या ॥
काशीनिवाशी कितियेक आले । सत्कार त्यांचे बहु फार केले ॥ ५१ ॥

गणेश, जे शांभव, सौर आले । येकांत ते येक मिळोन गेले ॥
जे पूजिती शाक्त विविक्त यंत्रें, । घेती बिऱ्हाडें बरवीं स्वतंत्रें ॥ ५२ ॥

येती पुढें जे जन हे वऱ्हाडे । मिळेत त्यांला बरवीं बिराडें ॥
राहेत देऊन कितेक भाडें । धरूनि कित्तेक अपूर्व झाडें ॥ ५३ ॥

कित्तेक ते देत असेत बाडें । फिरेति कित्तेक उगीं लबाडें ॥
आटोपिले मंडप यायजूकीं । आक्रांदती अंध, अनाथ, मूकीं ॥ ५४ ॥

शोभेति वोटे बरवे विटांचे, । समूह जेथें बसती विटांचे ॥
साध्वी महा सुंदर लोकदारा । ज्याच्या भयें येत नसेत दारा ॥ ५५ ॥

बाजार जारीं बहु वेष्टियेले । बाहेर सच्छ्रोत्रिय काढियेले ॥
आलोकिती नित्य परांगनांतें, । लावीत त्यांसीं अनुकूळ नातें ॥ ५६ ॥

येती महादोंदिल मोटपोटे । भारीपणं हे कितियेक लोटे ॥
धरून बैसेत वृथा प्रतिष्ठा । द्रव्यार्जनीं मुख्य धरीत निष्ठा ॥ ५७ ॥

शिष्यांस जे केवळ राबवीती, । जे स्नानसंध्या बहु लांबवीती, ॥
उगाच ज्यांचा पसरे पसारा, । भुलोन गेला मग लोक सारा ॥ ५८ ॥

जेव्हां येती भार नैय्यायिकांचे, । गोळा होती प्राण मीमांसकाचे, ॥
हातीं पायीं फूटती ज्यांस जीभा, । जेव्हां तेव्हां बोलतां वाद ऊभा ॥ ५९ ॥

परस्परें शिष्य करीत पृच्छा । म्हणेत, ' तूं बोलसिं काय, तुच्छा ॥
बोलों नको तूं, क्षण येक राहे । माझा उपन्यास समग्र पाहें ॥ ६० ॥

बोलेन आतां अनुमान खंडी । तुम्हामधें हें मत कोण खंडी ? ॥
तर्कांत युक्ती चढती उदंडा । घेऊं नका व्यर्थ उगा वितंडा ॥ ६१ ॥

काढूं नका ये समयीं कपाळे. । याच्या विचारें उठती कपाळें. ॥
हें निग्रहस्थान तुम्हांस आलें; । नय्यायकांचें यश थोर जालें." ॥ ६२ ॥

वदेत मीमांसक योग्यताभरें, । "वेमातुरी व्यर्थच चक्र चीवरें. ॥
असेत हें केवळ बुद्धिरोधनें; । नसेत कांहीं परलोकसाधनें. " ॥ ६३ ॥

वेदांती म्हणतात्ति, "शास्त्र बरवें आमूळ आलोडिलें,
त्याचा हा परिपाक आजि दिसतां या पंडितां मोडिलें. ।
कैंचे न्याय ? किमर्थ याग करणें ? संसार हा पारखा.
मिथ्याभूत समस्त जाणोन तुम्हीं अद्वैत हें बोळखा." ॥ ६४ ॥

प्रतिष्ठेनें येती कितिक कवि राजेंद्रसदना,
जयाच्या पद्यांच्या अनवरत चालेत रचना. ।
तयांच्ये दाटीनें अपरिमित दाटेत सदनें,
कुरंगाक्षींचीं जे अति चतुर पाहेत वदनें. ॥ ६५ ॥

त्यानंतरें अति अलंकृत राजदासी
वाद्यस्वनें निघति बाहेरि संपदांसीं. ।
हत्तीवरून चिकसे अणि मोगरेलें
वांटीत जाति नगरांत; अपूर्व जालें. ॥ ६६ ॥

आज्ञा नृपें स्ववनितेस हळूच केली.
ते सुंदरी त्वरित पाकघरांत आली. ।
रांधून घेत तंव त्या मग रांधणारी,
ज्या धूतलेंच बहु धूतिल हो धुणारी. ॥ ६७ ॥

बसेत जेव्हां तळनें तळाया, । तं अर्भकें धांवति आतळाया. ॥
आक्रांत होती बहु लेकराचे । वाजेत तेथें धबके कराचे. ॥ ६८ ॥

टेऊनि शाका वर त्या शिजाया । कढींत घालीत वडे भिजाया. ॥
खोवोन आधीं पदरास पोटीं । नितंबिनी उत्तम दाळि वाटी. ॥ ६९ ॥

सुदेवपत्नी अति मंद आली, । भाग्योदयें जे सुकुमार जाली. ॥
असे शाहाणी उसळून सोले, । जीच्या करें सूरण फार सोले. ॥ ७० ॥

अत्यंत आणी चवि कारल्याला, । उपाय जाणेच विकारल्याला. ॥
करीतसे जे गुण पापडीला, । तथापि जाला श्रम वापडीला. ॥ ७१ ॥

तळनथळन केलें, कोरकें सिद्ध जालें.
त्वरित परम तेथें भात हे वेळियेले ।
रुचिर वहु शाका फोडण्या देयिजेती.
तदुपरि मग तेव्हां आंधुली सांगिजेती ॥ ७२ ॥

स्नानें करून मग विप्र समस्त आले;
सत्कारपूर्वक यथोचित बैसवीले ।
पात्रें सुवर्णरुचिरें मग मांडवीलीं.
गंधाक्षतें कितियकीं मग चालवीलीं ॥ ७३ ॥

कोशिंबिरी विविध, मीठ, मिरें, मुळेही
तेथील हे त्वरित वाढिति तें मुलेंही ।
अत्यंत जें रुचिर रोचकतेस आलें,
तें वाढिजे कितियकीं अति शीघ्र आलें ॥ ७४ ॥

वाढावया निघति सुंदर त्या सुशीळा,
वीजेहुनी चपळ ज्या चमकेति बाळा ।
ज्या लोणचीं रुचिर, पापड, पत्रशाका
वाढीत जात असतां भुलवीत लोकां ॥ ७५ ॥

त्यानंतरें विविध ओदन वाढिजेती.
अत्यंत जे निबति ते मग काढिजेती ।
शोभेति ते सघृतशर्कर पायसान्नें.
अत्यंत फार पिवळीं बरवीं वरान्नें ॥ ७६ ॥

---

७१.३ 'गुण पापडीला' हे शब्द निरर्थक वाटल्यानें श्री. कानिटकर त्याऐवजीं 'गुळपापडीला' असा पाठ सुचवितात.

अत्यंत वर्तुळ वडे अरवार भारी
वाढीति त्या गजगती सखवार नारी ।
ते बोटवे, सरवळे आणि मालत्यांला
वाढीत जाति बहु बारिक सेवयांला ॥ ७७ ॥

त्या पोळियांच्या चळथा रचाया । परस्परें वाहति वायका या ॥
घाऱ्या, पुऱ्या, तेलवऱ्या विदग्धा । वाढीत दुग्धें कितियेक मुग्धा ॥ ७८ ॥

वाढीत तेथें बरव्या करंज्या, । ज्या सुंदरी रांधविती विरिंज्या ॥
कोण्ही घड्या घालुन मांडयांच्या, । नेती पराता मग सांडयांच्या ॥ ७९ ॥

मुखेंदु हे निंदति आरश्याला, । त्या काय नेणेत अनारश्याला ? ॥
नितंबपर्यंत पडेत वेण्या । त्या सुंदरी वाढितसेत फेण्या. ॥ ८० ॥

जेव्हां घृतांत परिवेपण सर्व जालें,
आपोशनादि मग कृत्य समग्र केलें. ।
पंक्ती अनेक वसती विविधप्रकारा
बाळा तथापि करिती बहु येरझारा. ॥ ८१ ॥

जेथें नद्या लोटति या घृतांच्या
दह्यांदुधांच्या, मधुरा मधाच्या; ।
पडेत हे पर्वत शर्करांचे,
लोपोन गेले रव कर्करांचे. ॥ ८२ ॥

मागेत कोण्ही द्विज ते फराळा. । आरंभिती पाक किती निराळा. ॥
भक्षीत कोण्ही मग ते हविष्यें; । तसींच त्यांचीं असती भविष्यें. ॥ ८३ ॥

कितीयक सुख तेथें स्वीय जिव्हेस देती.
अनियत हरिनामें भक्त कित्तेक घेती. ।
विविध परम होतो नामसंघोष जेथें;
घडिघडि बहु देते भीमकी कान तेथें. ॥ ८४ ॥

सहज निजजिवाचा जीव जो अंतरींचा,
निसिदिवस लागे वेध त्या श्रीहरीचा. ।

अनिश हृदय तीचें तत्स्वरूपाभिलाषी;
मुखकमळ तयेचें तद्गुणौघाभिभाषी. ॥ ८५ ॥

करजळ पुतळ्यांतें नित्य चोरून पाहे;
परि निजजननीचा अंतरीं धाक वाहे. ।
घडिघडि करिते जे प्रश्न विप्रश्निकांला.
हळुच मग निवारी बंधुसंबंधिकाला. ॥ ८६ ॥

क्षितिवरि परदेसीं नित्य निद्रा करीते.
व्रत नियमतपश्या अंतरीं आदरी ते. ।
स्वन जंव अजिरीं हे आयके वायसाचा,
उठोन कवळ त्यातें घालवी पायसाचा. ॥ ८७ ॥

न वदति सखियाही सर्वथा तत्प्रसंगीं.
श्रमित बहुत जाली आंग टाकी पलंगीं ।
परम विकळ बाळा फार चिंता करी ते,
अनिश यदुपतीचे पाय जे आठवीते ॥ ८८ ॥

महा विश्वासाचें निलय बहु आनंदलतिका,
द्वितीया हे तैसी अतिचतुर शृंगारकळिका ।
सख्या दोहीं भागीं वसति सरसा सावधपणें,
कनिष्ठेच्या वक्त्राभिमुख करिजेतें मुख यिणें ॥ ८९ ॥

अद्यापि वैकुंठनिवास येना । तेथून त्याचें मन हे निघेना ॥
लग्नास तों रातिच आड आहे । करीच ना ईश्वर कां कृपा हे ? ॥ ९० ॥

जाली असे हे प्रतिकूळ गौरी । म्हणोन हा काय न येच शौरी ? ॥
अत्यंत दैवेंकरि हीन जालें । म्हणोन ये दीन दशेस आलें ॥ ९१ ॥

हरून माझ्या जिवसावजाला । तो आजि कैसा हरि साव जाला ? ॥
आतां कशाची मज जीवनाशा ? । जाल्यें असें सन्मुख जीवनाशा ॥ ९२ ॥

जो द्वारके ब्राह्मण पाठवीला, । अद्यापि नाहीं परतोन आला ॥
ते भक्त कृष्णाप्रति पावताती, । फिरोन ते काय घरा न येती ? ॥ ९३ ॥

वाटेस आद्यापि असे निजेला ? । किंवा घरींहून नसेच गेला ? ॥
कीं द्वारकेची पदवी न चाले ? । कीं कृष्ण जातांच विरुद्ध बोले ? ॥ ९४ ॥

प्रत्युत्तरें हें न सुचेत याला ? । किंवा सभाक्षोभ तयास जाला ? ॥
किंवा निषेधी वसुदेव देवा ? । सक्रोध संकर्षण हा वदे वा ? ॥ ९५ ॥

कीं लागला वैदिक तो गुणाया ? । कीं लुब्ध जाला भगवद्‌गुणां या ? ॥
त्या संपदा देखोन थोरथोरा । कीं गुंतला ब्राह्मण पाहुणोरा ? ॥ ९६ ॥

किंवा बसे नित्य करीत इष्टी ? । कीं चालतां श्रोत्रिय होय कष्टी ? ॥
स्वभाविक छांदस वृत्ति ज्याची, । पहातसें व्यर्थच वाट त्याची ॥ ९७ ॥

जेथें नसे आदर नारदाचा । कदापि या योगविशारदाचा, ॥
अद्यापि जेथें शुक बैसला, गे । हा विप्र कोणे लगडेस लागे ? ॥ ९८ ॥

तथापि तो बंधु अकिंचनाचा । प्रसिद्ध हे शास्त्रपुराणवाचा ॥
हा येक विश्वास असे मला, गे । परंतु मार्गीं हरि हा न लागे ॥ ९९ ॥

त्या देवकी आदिकरून राण्या । निषेधिती काय महा शाहाण्या ? ॥
कृष्णार्थ कृष्णास पडेत गुंते ? । कीं योगियांच्या हृदयांत गुंते ? ॥ १०० ॥

कीं पूर आला बहु आपगेला ? । कीं आडवा येउनि साप गेला ? ॥
किंवा रथाचें युग भग्न जालें ? । कीं पांखिरूं आजि उडोन गेलें ॥ १०१ ॥

किंवा निजे शेषविशेषतल्पीं । कोणें तयानें उठिजेल कल्पीं ? ॥
किती तऱ्ही येथुन वाट पाहों ? । आकल्पपर्यंत आसीच राहों ? ॥ १०२ ॥

येकीकडे लौकिक सर्व ठेऊं । निर्लज्ज लोकांत म्हणोन घेऊं ? ॥
कीं द्वारके धाडुन जीव देऊं ? । कीं पक्ष लाऊन उडोन जाऊं ? ॥ १०३ ॥

नृपतिकुळकळंका म्यां तुझें काय केलें ?
यथवरि शिशुपाळा का वृथा आणियेलें ? ।
तुजजवळि पडे हे चालि नीचा जनांची.
निपटच हळवा रे वृत्ति तूझ्या मनाची. ॥ १०४ ॥

---

९४·१ अद्यापि (क); ९६·४ पाहुणेरा. १०२·२ तयातें

१०४·३ 'क' प्रतींत प्रथम 'चालु' असें लिहून नंतर नंतर त्याचें 'चालि' करण्याचा प्रयत्न केला आहे. 'ख' प्रतींत 'तुजजवळि पडे हें चालूनी चांजनाची' असा पाठ आहे.

कळत कळत घेसी जीव या मानवांचे.
तुजजवळि भल्यांचा काय सन्मान वांचे ? ।
अति विमळ कुळीं ये भूत निर्माण होसी.
शिव, शिव ! भगवंता जाब हा काय देसी ? ॥ १०५ ॥

पदीं श्रीकृष्णाचे अविरत मनोवृत्ति विवरे.
वियोगें त्याच्या हा क्षणभरि मला धीर न धरे ।
रहावी हे माझीं यथुनि अवघीं हीं व्यवसितें.
कितेकां या देवां विविध नवसांतें नवसितें. ॥ १०६ ॥

गणाधीशा जे जे स्मरनि तुज संकष्टसमयीं,
पहा, ते ते होती मनुजजन आजन्म विजयी. ।
कुमारा गौरीच्या, म्हणुन विनवीतें तुज बरें.
चतुर्थी तूझ्या मी करिन अवघ्या थोर गजरें. ॥ १०७ ॥

असो हें काठिण्य क्षितिधरकुळोत्तंसकुळजे
वदों वारंवार प्रकट तुजसीं काय तुळजे ? ।
न सोसे कांहींही शिवसुरतरुप्रेमलतिके,
तुला तों नाहीं हा अनुभव, शरीरार्धपतिके. ॥ १०८ ॥

उदारा मल्लारी, अति विषमचिंतानल हरीं.
कृपापारावारा, प्रकट करिं कारुण्यलहरी ।
सहस्रा खंडीचा तुजवरिच भंडार उधळीं.
करावें तां ऐसें झडकरिं पडे यादवकुळीं ॥ १०९ ॥

हनूमंता, विश्वप्रथितचरिता, अंजनिसुता,
महावीरा, धीरा, कपिकुळवरा, वायुकुमरा, ।
कृपावंता, आतां वडवडित पावेसि मजला,
वड्यांची हे माळा रुचिरतर वाहेन तुजला ॥ ११० ॥

स्वकीय स्वामीसीं अतिनिकटता केवळ तुझी.
नियोज्या रामाच्या, मज न मानि सीतेहुनि दुजी ।
अयोध्येचा राजा, विभु अवतरे यादवकुळीं.
तयाच्ये हें गुंते हृदय सगुणा अंघ्रिकमळीं ॥ १११ ॥

महाभाग्यें रामासदृश तुजला स्वामि गवसे.
तयालाही ऐसा तुजसम दुजा सेवक नसे।
अनुज्ञेनें त्याच्ये झडकरि महासिंधु तरसी.
कसा लंकेमध्यें त्वरित मजसाठीं उतरसी ? ॥ ११२ ॥

अशोकाच्ये मूळीं पतिचरणचिंताकुळ असें।
कपट्यें येथें तूं वचन वदसी येउनि वरें।
' अभिज्ञे ? रामाचा नियत समजें दूत मजला.
तयाची हे मुद्रा अभिनव अभिज्ञात तुजला. ॥ ११३ ॥

अरे, जे जे काळीं परम मजला संकट पडे,
तुझी ते ते वेळे नियतच उडी येउन पडे।
अनेकां दुःखांचा त्वरित बहु निस्तार करिसी.
कसा ये संकष्टीं बहुतच मला तूं विसरसी ? ॥ ११४ ॥

महा विश्वासाच्ये अतिचतुर शृंगारकळिके,
सुमध्ये, मध्यस्थे, कुसुमशरनालीकनळिके !।
प्रसंगीं ये येथें सकळ तुमचा भाव कळला.
दुराचारी रुक्मा निपट, सखिये, हा विचळला ॥ ११५ ॥

सये हा पुष्पेषु प्रकट निज कोदंड चढवी.
धनुर्विद्या यातें कवण, सखिये वीर पढवी ?।
जया या मूढातें निपटच पहा माय न कळे,
शहाणे, हा कैसा अझुणि तुज संबंध नुकले ? ॥ ११६ ॥

पहातां हा माझा सजच हृदयीं प्रत्यय न ये.
वदों कोणापाशीं सहज सपत्नींचें सुख सये ?।
धरी बाहे, बाहे यदुपति; अये, जे अवसरीं,
पहा तेव्हां दुःखक्षितिधर पडे सर्व विसरीं. ' ॥ ११७ ॥

यिच्या या बोलांनीं मग सहचरी हे दचकली.
म्हणे, " कांहीं, बाई, तिळभरि नसे चूकि पडली.।
अनंगक्षोभें या सहज पडसी थोर व्यसनीं.
वदों, पाहें, कांहीं धरिसि जरि विश्वास वचनीं. ॥ ११८ ॥

दुराशेच्या, आई, निरुपम खळाळीं मन पडे.
 वितर्कावर्तीं या उमज तुजला कोठुन घडे ? ।
अविश्रांते, आतां उठोन, सखिये, बैस सरसी.
 अकस्मात स्वीयप्रकृति अवघी हे विसरसी. ॥ ११९ ॥

अये, पाहें आहे उपजत मला संगति तुझी.
 नसे कांहीं आल्यें अपरिचित बाहेरुन दुजी. ।
कसा जाला आहे, सखि उभयतः पाश मजला.
 फुकाचें हें होतें विधुर वदतां काय तुजला ? ॥ १२० ॥

परद्वारी पूर्वीपसुनच महा चाळक असे;
 जयाच्ये ये छाये जवळुनि सती वागत नसे. ।
अवो, तूं कोणाच्ये उपजसि, सये, आजि उदरीं.
 कसा हा बांधेसी प्रकट खदिरांगार पदरीं ? ॥ १२१ ॥

गुणज्ञे, रंभोरु, प्रकृतिकमनीये, गुणवती,
 तुझ्या या बंधूच्या सकळ तुज हांसेत युवती. ।
पवाडे कृष्णाचे भुवनतळविख्यात असती.
 हठें, बाई, कैसी धरुनि बससी गोष्टि नसती ॥ १२२ ॥

अनात्मज्ञे, आतांपसुनच तुला वेड पतिचें.
 महासोसाची, गे, गुरुभय न मानीस रतिचें ।
नरेंद्राच्ये कन्ये, कवण सिकवी बुद्धि तुजला ?
 सुखें आतां रागेजसिल तरि रागेज मजला ॥ १२३ ॥

विचारें या व्हावा निखिळ निज राज्यांत वळसा.
 चढे, बाळे कैसी असरळ तुझी बुद्धि कळसा ? ।
कदाचित् हे वार्त्ता, कमळमुखि, कोठूनहि फुटे,
 घरामध्यें तेव्हां अभिनव अनर्थांकुर उठे ॥ १२४ ॥

---

१२४·२ क प्रतीत ‘ कळसा ’ ह्या–शब्दांतील ‘ सा ’ हें अक्षर लिहिण्याचें राहून गेलें आहे. ख प्रतींतही तें काकपदानें घातलें आहे.

मिळाले हे पृथ्वीवरिल, सखि, राजन्य अवघे.
कसे वेडे, मूके, बधिर आणि विद्रूप अनघे ।
कशाला हा आम्हा अतिशय ? सये, आवडि बरी.
बरें जालें हें ही अति चतुर सज्ञान नवरी ॥ १२५ ॥

अवश्यंभावी हें सहज जरि होणारच असे,
अयत्नेंही तूझ्या करकिसलयीं येउन बसे ।
महा धीराची तूं निपट तकवा सोडिसि कसा ?
उतावेळी होसी म्हणउनि तुटे हा भरंवसा. " ॥ १२६ ॥

सखीच्या वक्त्रें हा गरळमय पर्जन्य पडला.
अहो किंवा उल्काशतपतनसंस्कार घडला ।
जऱ्ही हे कांहींही विधुर न वदे वारिजमुखी,
महाप्रस्तावीं ते तदपि पडलीसे बहु सखी ॥ १२७ ॥

दगदली वदतां बहु भीमकी । न समजे कुसुमायुध पातकी ॥
उपचडे सुटती तिजला बहू । शयनिंचीं सुमनें खुपती मऊ ॥ १२८ ॥

निपट हा तकवा हिजला नसे । उठोन ते शयनावरती बसे, ॥
बहुत जे बरळे विविधापरी, । सुख नसे सहसा जिस अंतरीं ॥ १२९ ॥

" भुवननायक, कंजविलोचना, । गरुडवाहन, शोकविमोचना ॥
रुससि कां मुरलीधर, माधवा, । मदनमोहन, गोकुळबांधवा ॥ १३० ॥

व्रजपती, जपती तुज गोपिका । अझुणि तेथुन, नंदकिशोरका, ॥
नरहरी, शरणागतवत्सळा, । परतसी अथवा निज गोकुळा ॥ १३१ ॥

अझुणि गुंतसि गोधनदोहना ? । परम व्याकुळ मी, मनमोहना ॥
मुरलिवादनिं तादृश हे सवे; । परि तुझें वय हें तयिंचें नव्हे, ॥ १३२ ॥

उबगती सखिया निजजीविता; । न पवती कुळिंच्या कुळदेवता; ॥
जनक हे जननी मजला नसे; । यदुपती मज आस तुझी असे. ॥ १३३ ॥

अवस, रे, बहु होय मला तुझी. । परिणिसी नवरी अथवा दुजी, ॥
जऱ्हि असें नृपनायककन्यका । तऱ्हि तुझी हरि होइन दासिका. ॥ १३४ ॥

जरि तुवां मन येथुन काढिजे । यमपुरा तरि आजिच धाडिजे. ||
गति नसे तुजवांचुन अन्यथा; | निरसता करिसी नसती वृथा. ” || १३५ ||

घडिघडी बरळे असि भीमकी, । चतुर जे सकळा गुणिं नेटकी. ||
यदुपुरीपथ साशय जे पुसे, । न कथतां सखियांवरती रुसे. || १३६ ||

सहचरीवचनें सलती जिला, । कवण भाविक हे शिकवी तिला ? ||
घरिंहुनी क्षण येक न हालली | तदपि ते मग बाहेर चालली. || १३७ ||

अति चतुर वयस्या आडवी तीस आली.
धरुन हळुच हातीं भीमकी चालवीली. ।
तदुपरि पथ दावी माधवीमंडपाचा.
हरिविण बहु वारा होय ईच्या जिवाचा. || १३८ ||

प्रमदविपिनगर्भी वेदिका कांचनाची,
तिजवरि बसवीली कन्यका भीमकाची. ।
निजकरकमळीं जे वक्त्रचंद्रास टेवी;
व्रत नवजळदाचें लोचनद्वंद्व सेवी. || १३९ ||

मुररिपु, अवतारी, जो महा मूढ तारी,
हरहृदयविहारी, केशव क्लेशहारी, ।
सकळजनविसांवा द्वारकाधीश आहे.
पुनरपि मग त्यासी वक्र बोलोन पाहे || १४० ||

“ सकरुण विलपें मी, माधवा केधवाची,
तजुन सकळ आशा आपल्या बांधवांची. ।
यदुपति अडल्यांचा सारथी तूंच होसी;
क्षणभरि परि येथें, श्रीहरी, कां न येसी ? || १४१ ||

न समजसि गजेंद्रें कार्य हें काय केलें ?
अढळपद ध्रुवातें काय जाणोन दिल्हें ? ।
दशविध हरि जन्में अंबरीषार्थ घेसी.
झडकरी गणिकेला स्वीय सायुज्य देशी || १४२ ||

सकळ नृप पाहातां पार्थसारथ्य केलें.
यदुपति तुज तेथें काय हातास आलें ? ।
क्षणभरि मजसाठीं येथपर्यंत येतां
अभिनव पडलें, रे, थोर कोडें, अनंता ॥ १४३ ॥

यदुपति तुजसाठीं मीच मासीण जालें.
अकथित कमठीच्या मीच पोटास आलें ।
अति विकट वराहा मीच जालें वराही.
तदुपरि नरसिंहा होय मी नारसिंही ॥ १४४ ॥

अभिनव तुज रामा मीच रामावतारीं.
प्रकृतहि तुजसाठीं भीमकाची कुमारी ।
क्षणभरि मज, कृष्णा, आठव्या, नाठवीसी.
व्रजयुवतिसहस्रें अंतरीं सांटवीसी ॥ १४५ ॥

स्वकीयां भक्तांचें निरुपम महा वेड तुजला
असे, हें श्रीकृष्णा, अविदित असे काय मजला ? ।
मदीय प्रारब्धें स्मरणहि फुकाचें तुज नव्हे.
कृपाळा, हे लागे अभिनव तुला कोठुन सवे ॥ १४६

निजध्यासें तूझ्या न समजति संसाररचना,
सदा वेडे होती, अनुसरति तूझ्याच वचना ।
तुला गाती, ध्याती, अनिश भजती, भाविकपणें,
तयाचें तूं कृष्णा, क्षणभरि पडों नेदिस उणें ॥ १४७ ॥

महाबाहो कृष्णा, परमपुरुषार्थैकनिलया,
तुझ्या नामें जाती सकळहि महा दोष विलया ।
रथांच्या कोटींनीं विविध विरुदें जात नसती,
घनःश्यामा, तेही प्रकृत मज निःसार दिसती ॥ १४८

पिता, माता, भ्राता सखिनिवह वंचून, तुजला,
मुखें या विप्राच्या यथिल अवघा भेद दिधला; ।
असी मी हे तूझी परम अपराधीणच असें.
न योजे हें, कृष्णा, अझुणि तुज पत्रोत्तर कसें ? ॥ १४९ ॥

अति श्रेहाळें हे जनकजननी राहाति उगीं.
  भयें या बंधूच्या फिरति सुहृदें आजि अवघीं. ।
वृथा या एकांतीं सकळ सखिया गांजिति मला.
  अवस्था माझी हे यथिल समजे कोठुन तुला ? ॥ १५० ॥

सदा वेदाभ्यासी द्विजपति तुझा मार्ग चुकला ?
  तुला एतां मार्गीं गरुड अथवा काय थकला ? ।
निषेधी हा किंवा हळधर तुझा सोदर तुला ?
  कृपापारावारा, परम पडलें संकट मला. ॥ १५१ ॥

पृथेच्या पुत्रांचा असशिल हरी केवळ ऋणी.
  तयांची हे बाजू तिळभरि पडों नेदिस उणी. ।
अरे धर्माचेथें असशि बहु निष्कारण वृथा.
  सदा उच्छिष्टांच्या उचलिसि असंख्यात चळथा. ॥ १५२ ॥

प्रतिष्ठा वैकुंठीं निरतिशय तैसी मिरविसी;
  रथाचे पार्थाच्या अनवरत घोडे फिरविसी. ।
मुरारे पार्थाचें असशि बहु सारथ्य करितां,
  न वाटे हे लज्जा कराकिसलयीं दोर धरितां, ॥ १५३ ॥

विचारें, श्रीकृष्णा, दिससि मज तूं थोर निकसी,
  जनामध्यें येणें करुनि निजधर्मास मुकसी. ।
रुजुत्वाची कैसी निपटच, हरी, वाट चुकसी.
  अरे, कोठें हें तूं परमशठपांडित्य सिकसी ? ॥ १५४ ॥

हरे कृष्णा, नारायण, नरहरे, आदिपुरुषा,
  तुझ्या तों पायांसीं वचन न वदे पापिणि मृषा ।
प्रतापी हे राजे मिळति अवघे कुंडिनपुरीं;
  नृपव्याघ्रा, कां रे बससि उगला जाउनि घरीं ? ॥ १५५ ॥

अवज्ञेनें बोलें कितियक हिणाहून वचनें.
  अशा या बोलाचा अनुचित मनीं राग धरणें ।

व्रजस्वामी, आम्ही कपट न पढों राजदुहिता.
विलंबें या तूझ्या बहुत पडला जीव दुचिता ॥ १५६ ॥

तुझ्या या पायांसीं प्रथम सलगीनें वदतसें.
मनामध्यें तूझ्या व्रजयुवतिदाठीतहि धसें ।
मसीं आतां, कृष्णा, तिलभरि दुजाभाव न धरीं.
समीक्षाभिक्षेनें प्रणतजनसंभावन करीं ॥ १५७ ॥

फुकाचे दासीतें अनुचित उदासीन धरणें.
समर्थें रंकासीं असदृश असा रोप करणें ।
अकस्मात स्वामी मन विषयगर्वांतुन उठें.
तुझ्ये भेटीसाटीं निशिदिवस माझा जिव फुटे ॥ १५८ ॥

जिवें भावें कृष्णा, शरण तुज आलें यदुपती.
न व्हावें हें हांसे म्हणुनि करितें तूज विनती. ।
तुझ्या वेडा लागें सहज निजकर्त्तव्य विसरें.
अकर्तव्याची हे प्रकृत पदवी ही अनुसरें ॥ १५९ ॥

नये कोण्हा हातीं, यदुपति, समाचारहि तुझा
असे जाला माझा म्हणुन मजला जीव अवझा ।
महाप्रस्थानाचे अनुभवुन संक्लेश पुरते
तुझ्ये भेटीसाटीं पुनरपि हरि प्राण परते ॥ १६० ॥

अरे तूझें नामस्मरण करितें अंतसमयीं.
सुखें राहें, कृष्णा, यथुन पुरता होय विजयी ।
वियोगें या तूझ्या नियत जरि लोकांतर मला.
अरे याची पृछा सहजच पडे केवळ तुला ॥ १६१ ॥

परित्याग स्त्रीचा कवण पुरुषार्थी नर करी ?
असें हें, श्रीकृष्णा, अपयश शिरीं वीर न धरी ।
उसासा हे टाकी, सुकृतरससारांश विघडे.
अनेका हिंसाची सहज मुरकुंडी वरिपडे ॥ १६२ ॥

अरण्यीं श्रीरामें अवगणुन सीतेस तजिलें,
जगामध्यें कोणें समुचित असें त्यास म्हटलें ?।
पदीं श्रीरामाच्या दृढतर महादोष विलगे;
कसा या दोषाचा दशरथकुलीं डाग न लगे ? ॥ १६३ ॥

पहातां त्वन्मार्ग, त्रिभुवनपती, नेत्र सिणती.
कृपासिंधु, स्वामी, कवण तुजला लोक म्हणती ?।
तुझें हें पाषाणें हृदय बहुधा आजि घडिलें.
कठोरत्वें किंवा अति कठिण आमूळ मढिलें. ॥ १६४ ॥

सये, माझ्या दुःखें उपवन लता या दुखवती.
पहा, हे पक्षी हा वदनगत चारा विसरती.।
विलापें या माझ्या द्रवति बहु पाषाण, सखिये.
शठाचा, हा वाई, मुकुटमणि अद्यापिहि न ये." ॥ १६५ ॥

इच्या वक्त्रांभोजापसुन सज वाग्बाण सुटती,
मनीं श्रीकृष्णाचे अति तिखट जाऊन बसती.।
असे जाला तेणें क्षणभरि अति व्याकुल हरी.
प्रियेच्या आक्रंदें किमपि न सुचे ते अवसरीं. ॥ १६६ ॥

कथा हे कृष्णाची सकळजगदानंदजननी,
मनोभावें ईचें श्रवण करिजे नित्य सुमनीं;।
प्रसंगें श्रोत्यांचे सकळहि महादोष हरती,
यदुत्तंसप्रेमें विषयरसगोडी विसरती. ॥ १६७ ॥

इति श्रीमद्भगवद्भक्तपदानुरक्तकविसामराजविरचिते रुक्मिणीहरणकाव्ये
रुक्मिणीविलापो नाम षष्ठः सर्गः ॥ ६ ॥

---

१६३·२ क प्रतींत 'गजामध्ये' असा हस्तदोषयुक्त पाठ आहे. ख प्रतींतहि तसाच आहे; पण तो मागाहून दुरुस्त केला आहे.

१६४·३ दोन्ही हस्तलिखित प्रतींत 'पाबाणे' असा अशुद्ध पाठ आहे.

# सर्ग सातवा

**श्रीलक्ष्मीकांताय नमः ॥ श्रीमुद्गलो जयति ॥**

विचारें विप्राच्या हृदयगत, चोरून मजसी
रथें येक्या गेला; निपट न दिसे बुद्धि सजसी. ।
विदर्भी वीरांचें घनतर महामंडळ मिळे;
तयांसी युद्धाचा समय पडल्या कृष्ण न ढळे. ॥ १ ॥

मनीं हे आशंका धरुन मुसळी तेथुन निघे.
सवें ते सेनेचे निवह सज घेऊन अवघे ।
जसा येतां देखे अतिनिकट काळांतक हळी,
तयाच्या आतंकें द्विजतिलक तेथें चळवळी. ॥ २ ॥

द्विजाचा कृष्णाला हृदयगत भावार्थ समजे;
म्हणे, " आतां, स्वामी, त्वरित घरिंचा मार्ग धरिजे. " ।
अनुज्ञेनें त्याचे द्विजतिलक तेथून उठला;
भयें श्रीरामाच्या त्वरिततर तैसा निसटला ॥ ३ ॥

कृतांताचे दाढेपसुन जंव दैवें द्विज सुटे,
पुरामध्यें कृष्णागमनभव कोलाहळ उठे ।
तस्यामध्यें गेला नृपतितनयेच्या उपवना.
न्यहाळीतां तीतें क्षणभरि पडे संशय मना ॥ ४ ॥

सुवर्णाचे वेदीवरि कनळवल्ली उगवली.
कसी येकायेकीं कवण चतुरेनें सुकविली ? ।
सरोव्याजें द्वंद्वींहुन सतत मुक्तागण गळे;
यथाकाळीं किंवा यदुतिलकपुण्यद्रुम फळे ॥ ५ ॥

---

४·२ दोन्ही हस्तलिखित प्रतींत ' कृष्णानमनभव ' असा अशुद्ध पाठ आहे.
५·३ दोन्ही हस्तलिखित प्रतींत ' सरोजाव्यें द्वंद्वीहुन ' असा पाठ आहे.

विदर्भाची कन्या, अति चतुर, लावण्यपुतली
वियोगें कृष्णाच्या निशिदिवस जे हे तळमळी, ।
तयेची हे डावी अतिमृदुल बाहे फुरफुरी.
शुभाशंसी तैसी तदुपरि लवे नेत्रशफरी ॥ ६ ॥

तों तीस नेत्रातिथि विप्र जाला । किंवा तिचा प्राण फिरोन आला ॥
भावार्थ हा केवळ भीमकीचा । आकर्षिला नंदन देवकीचा ॥ ७ ॥

प्रसन्न त्याचा मुखचंद्र देखे । तत्काळ चिंतातम दूर फांके ॥
कदापि हा हर्ष न माय पोटीं । विराजतें किंचित हास्य वोठीं ॥ ८ ॥

तत्काळ तन्वी अति पुष्ट जाली । चोळी तयेची उतटोन गेली ॥
संतप्त अत्यंत निवेति गात्रें । जालीं तयेचीं अनिमेष नेत्रें ॥ ९ ॥

तान्हेजल्यासन्मुख तोय आलें । बुभुक्षिता भोजन हें मिळालें ॥
अंधास आकस्मिक दृष्टि आली । मृतास संजीवनसिद्धि जाली ॥ १० ॥

कीं होय चंद्रोदय हा चकोरा, । प्रसन्न वर्षागम येय मोरा, ॥
कीं वोळगे मेघ निदाघकाळीं, । मानी असें भीमकराजबाळी. ॥ ११ ॥

तत्काळ कृष्णार्पण देह केला. । तीचा अहंभाव गळोन गेला. ॥
अत्यंत निर्वासन चित्त जालें. । जेथील तेथें मन हें मुरालें ॥ १२ ॥

निमग्न आनंदरसांत जाली. । सत्कार त्याचा विसरोन गेली. ॥
हे वेष्टिलीसे नृपकन्यकांनी, । लागे तिचे विप्र म्हणोनि कानीं. ॥ १३ ॥

आला सखा सन्निध उद्धवाचा, । बोलों न जाणेच विरुद्ध वाचा. ॥
जाला असे हा दिस सोनियाचा, । वृत्तांत आयीक बसोनि याचा. ॥ १४ ॥

"जो आजि आहे पति दारकेचा, । यासारिखा आजि उदार कैंचा ? ॥
हा वासवाचा हरि आजि भाऊ, । तूंही शचीची तरि होय जाऊ. ॥ १५ ॥

अखंड आखंडळ ज्यास दापे, । कृतांत देखोन जयास कांपे, ॥
अढे जया शेष सहस्रजिव्हा, । तेथें वदों मी द्विज काय यज्वा ! ॥ १६ ॥

---

८·२ दोन्ही प्रतींत 'कर्ष' असा अशुद्ध पाठ आहे.

११·२ वोळवे ( ख ).

धरून मौनव्रत वेद चाऱ्ही । फिरेति शास्त्रांसमवेत दारीं; ॥
गाती पवाडे अठरा पुराणें; । घेती यती ज्याजनिमित्त राणें. ॥ १७ ॥

हें सांख्य पातंजळ पाहियेलें; । समग्र वेदांत विचारियेले; ॥
आलोडिलीं वेदशिरोरहस्यें; । तत्प्राप्ति हे केवळ सामरस्यें. ॥ १८ ॥

जें हें महादैवत दैवतांचें, । असे तसें जीवित जीवितांचें; ॥
तें दैवयोगें तुज सांपडावें; । निधान तूझें पदरीं पडावें. ॥ १९ ॥

ते द्वारकेचे बहुलोक भोळे, । ज्यांच्या घरांतील अपूर्व सोळे, ॥
वागेति ज्यांच्या अति संचरूना, । घडे तियां कोठुन पंचसूना ॥ २० ॥

अपूर्व तो संगम गोमतीचा, । जेथें न राहे मळ गोमतीचा. ॥
जाऊन तेथें सज नित्य न्हाती, । हीरांकुरांच्या उजळीत वाती. ॥ २१ ॥

करीत सेवा तुळसीवनाच्या; । नसेत बाळा अळसी मनाच्या; ॥
करून संसारिक सर्व कामें । पढेत गोविंदसहस्रनामें. ॥ २२ ॥

त्या यादवांचेथिल बायका या । वसेत तूझे गुण आयकाया. ॥
तूं आजि सर्वांहुन धन्य, बाळे, । सनातन ब्रह्म मनांत खेळे. ॥ २३ ॥

सांगों नये कां तुजला भले गे ? । छत्तीसही हे गुण लाभले गे. ॥
अपूर्व हे गोत्र घटीत आहे. । बोलों नये हें; उगलीच राहें. ॥ २४ ॥

ढकल करुन कैसें धाडिलें द्वारकेसी ?
नरहरिसहवासें मुंकलों या जिवासीं ।
जपतपयजनें जें स्नानसंध्यादि कर्मे,
जळुन सकळ गेलीं या तुझ्या दौत्यधर्में ॥ २५ ॥

---

२०·३ 'वागेति ज्यांच्या अति संच सूना' असा मूळ पाठ असावा. हस्तलिखितांतहि दोष दिसतो.

२२·२ दोन्ही हस्तलिखित प्रतींत 'तसेत बाळा अळसी मनाच्या' असा निरर्थक पाठ आहे.

२५·२ मूकलो (ख).

तां भीमकी मज अनुग्रह थोर केला;
श्रीकृष्णदर्शनमहोत्सव दावियेला ।
येथून हे सकळ निस्पृहवृत्ति जाली.
बेडी प्रपंचमय सर्व तुटोन गेली ॥ २६ ॥

श्रीरंग जो गरुडवाहन शेषशायी,
ब्रह्मादिकां अभयदानवरप्रदायी, ।
म्यां तों तदर्थ कधि यत्न नसेच केला;
तूझ्या परंतु सुकृतें भगवंत आला ॥ २७ ॥

वृत्तांत हा सकळ तूज निवेदिलाहे.
माझें प्रयोजन अतःपर काय आहे ? ।
आज्ञा मला त्वरित दे स्वगृहास जाया."
हें बोलतां वदतसे मग आदिमाया ॥ २८ ॥

" अत्यंत बापा श्रमलास भारी । स्वकीय हे वांचविली कुमारी ॥
जामात हा श्रीपति आणियेला । मदर्थ तां उत्कट यत्न केला ॥ २९ ॥

न वर्णवे हा उपकार तूझा । तूं तत्त्वदर्शी गुरुराज माझा ॥
हे सार्थक क्लेश समस्त जाले । मनोरथा अंकुर आजि आले ॥ ३० ॥

उत्तीर्ण आतां तुज काय होऊं ? । प्राणेशदात्या तुज काय देऊं ? " ॥
बोलोन हे अंजळि जोडियेला. । प्रणाममात्रें द्विज बोलवीला ॥ ३१ ॥

जो दैवयोगें कृतकृत्य जाला, । तो हा गृहासन्निध विप्र आला ॥
विचित्र गेहस्थिति देखियेली । गजांतलक्ष्मी सदनास आली ॥ ३२ ॥

कोणीकडे वाट चुकोन आलों ? । स्वकीय वीथी विसरोन गेलों ? ॥
किंवा असें जागृत कीं निजेलों ? । उगाच कामीं वचकों निघालों ? ॥ ३३ ॥

करून हे तर्क तटस्थ राहे । चहूंकडे संशयरूप पाहे ॥
तों ते गृहस्वामिनि देखियेली, । जे हे गृहाबाहेर शीघ्र आली ॥ ३४ ॥

---

३१·४ बोळवीला ( भावे – प्रत )

विनीत अत्यंत, महा सुशीळा, । प्रणाम येऊन पतीस केला. ॥
धरून हातीं सदनांत नेला, । सुवर्णपीठावरि बैसवीला. ॥ ३५ ॥

पदांबुजें क्षाळुन आदरानें । पुशीतसे जे वसनांचळानें. ॥
आचांत जो हा विमळा जळानें । संतोषवीला व्यजनानिळानें ॥ ३६ ॥

लेंकी सुना येउन भेटताती; । ते दासदासीजन दाटताती; ॥
स्त्रीपुत्रमित्रादि कुटुंब पाहे । तों सर्वही हें अनुकूळ आहे. ॥ ३७ ॥

मनामध्यें विस्मय थोर जाला. । उठोन जों होमगृहांत गेला, ॥
तों सर्व तेथें विपरीत देखे; । जेथील तेथें उगलाच थोके. ॥ ३८ ॥

सुवर्णाची वेदी, जडित अरणीयुग्म विलसे;
सुवर्णाचीं पात्रें दृषदुपल सौवर्णच दिसे. ।
सुवर्णाच्या जाल्या सकळहि पहा दर्भसमिधा.
म्हणे हे कृष्णाची सकळ करणी होय बहुधा. ॥ ३९ ॥

तदुपरि नृहरीचा शंख गंभीर वाजे.
गजबजिति वऱ्हाडी सर्व धाकेति राजे. ।
पडति बहुत तेव्हां रुक्मियाचे धसासे;
अगणित शिशुपाळें टाकिजेती उसासे. ॥ ४० ॥

'त्रिभुवनपति दोघे रामकृष्णाख्य आले,'
नृपतिजवळि ऐसें दूत सांगों निघाले. ।
अभिनव हृदयीं हा थोर आनंद जाला.
अभिमुख मग त्याला सैन्य घेऊन गेला. ॥ ४१ ॥

तदुपरि हरिसेनेमाजि सेना मिळाली.
म्हणउन मग तेव्हां दाटि होऊं निघाली. ।
कितियक मग तेथें भेटती येकमेकां;
बसति कितियकांला वेत्रयष्टी अनेकां. ॥ ४२ ॥

---

३६·३. दोन्ही हस्तलिखित प्रतींत 'आचांत' असा अपपाठ आहे. भावे प्रतीनें तो 'आश्रांत' याप्रमाणें दुरुस्त केला आहे.

" तदुपरि हरिपूजा हे यथायुक्त जाली.
प्रणति मग तयातें भूप साष्टांग घाली. ।
विनययुत उभा तो हात जोडून राहे.
विनउन नृहरीनें तो पुरामाजि बाहे. ॥ ४३ ॥

कळत कळत त्यां तों थोर अन्याय केला,
तदपि परम माझा हेतु तां पूरवीला ।
सहज मज अनाथा नाथ तूं आजि होसी.
निजपदभजकांचा नित्य कैवार घेसी ॥ ४४ ॥

अलभ्य तूझा मज लाभ जाला । पवित्र हा देश समस्त केला ॥
यानंतरें या नगरांत यावें । कृतार्थ कृष्णा, मज तां करावें " ॥ ४५ ॥

त्यानंतरें सस्मित कृष्ण बोले, । " मागील ही लोक समस्त आले ॥
पुरांत संमर्द बहूत जाला । होयील कोठें अवकाश याला ? ॥ ४६ ॥

याकारणं निश्चय हा करावा, । अंबालयासन्निध ठाव द्यावा ॥
आणीकही हा यक हेतु आहे, । पुरामधें तो शिशुपाळ राहे ॥ ४७ ॥

हे आमचे यादव तुंद मोटे । ते चैद्य पूर्वींहुन लौंद खोटे ॥
वाढेल बोलें करि बोल जेव्हां, । लग्नापुढें येयिल विघ्न तेव्हां. " ॥ ४८ ॥

भावार्थ याचा समजोन गेला । राजा विदर्भेंद्र वदों निघाला ॥
" अवश्य अंबालय आदरावें, । परंतु मार्गें तरि याच जावें. ॥ ४९ ॥

स्थळीं स्थळीं सर्व उभ्या राहाती । पौरांगना वाट तुझी पहाती ॥
या कुंडिनाची रचना प्रसंगें । आलोकिजे किंचित दृक्तरंगें " ॥ ५० ॥

विज्ञप्ति भूपें अनुरूप केली । घडोन चित्तांतिल गोष्टि आली ॥
रामाकडे कृष्ण तथापि पाहे । तोही तया सम्मत देत आहे ॥ ५१ ॥

विज्ञापिलासे अति गोड बोलीं । आरूढ जाला हरि चौरडोली ॥
अक्रूर सानंद रुमाल वारी । सभोंवतें चालति वीर भारी ॥ ५२ ॥

---

४९·४ दोन्ही प्रतींत ' परंतु मार्गें करि त्याच जावें ' असा अर्थहीन पाठ आहे.

तें आतपत्रादिक राजचिन्हें । शोभेति, तैसीं तगटीं निशानें ॥
वाजेति हत्तीवर ते दमामे, । ज्याच्या स्वनें हा शिशुपाळ वामे ॥ ५३ ॥

पुढें पुढें तो गजभार चाले । त्याहून मागें रहवाळ आले ॥
सर्वांस अग्रेसर भूप जाला । हा द्वारकाधीश पुरांत नेला ॥ ५४ ॥

पहावया नागरलोक आले । आलोकनें नेत्र कृतार्थ जाले ॥
कित्तेक तेथें सतखे करीती । होती नमस्कार अनेक रीतीं ॥ ५५ ॥

सुवर्णपुष्पें उडवीत कोण्ही । जोडीत निःकिंचन हात दोन्ही ॥
दाटेत नानाविध राजवीथी । आरार्तिकें घेउन भक्त येती ॥ ५६ ॥

क्षणेकसा कृष्ण तटस्थ राहे, । त्या कुंडिनाच्ये रचनेस पाहे; ॥
कटाक्ष विक्षेप करी हरी तो, । पौरांगनांचीं हृदयें हरी तो. ॥ ५७ ॥

पुरांत जेव्हां यदुनाथ आला, । आनंद सर्वां वनितांस जाला. ॥
पहावया येति कितेक दारा, । घरामधें हा न निघेच थारा. ॥ ५८ ॥

लागेत जातां बहु दारवेंडं, । परस्परें लोटिति बाहुदंडें; ॥
धरून सर्वत्र महाउपेक्षा । करीत कृष्णागमनप्रतीक्षा. ॥ ५९ ॥

येकीपुढें धांवुनि येकि जाती, । येकीस येकी धरिताति हातीं; ॥
येकीस येकी ढकलून देती, । येताति येकीवरि येकि दांतीं. ॥ ६० ॥

धांवोन येती कितियेक न्हातां । बाळांस कोण्ही स्तनपान देतां; ॥
उगाळितां चंदन येति कोण्ही, । अर्धीच कोण्ही ढकलून वेणी. ॥ ६१ ॥

वाढावया ओदन नेतनेतां, । धांवेति कोण्ही जळ देतदेतां. ॥
उठेति कोण्ही उटि घेतिघेतां । नेत्रांबुजीं अंजन लेतलेतां. ॥ ६२ ॥

संभ्रांत अत्यंत कितेक जाल्या, । भूषाविपर्यास करून आल्या; ॥
घालून पायीं करकंकणांला, । पादांगदीं शोभविती करांला. ॥ ६३ ॥

---

५९·१ हस्तलिखित प्रतींत ‘दारवेंडं’ हा पाठ अर्थहीन आहे. त्याऐवजीं श्री. कानिटकर यांनीं सुचविलेला ‘दारवंडे’ (=उंबरठे) हा पाठ ग्राह्य वाटतो.

९५५६२

नाकीं वाळया, राखड्या कर्णदेशीं, । ताटंकातें गोंविती केशपाशीं, ॥
दंडीं कंठे, बाजुबंदास कंठीं । लेती, माजीं हार, ताईत, पे[illegible] ॥

मुखकमळ उटूनि कुंकुमानें, । नयनयुगें भरिजेति चंदनानें, ॥
अधर सजविताति अंजनानें, । कृतविपरीतदशा निरंजनानें. ॥ ६५ ॥

पहावया कौतुक सर्व आल्या, । श्रीकृष्णरूपास भुलोन गेल्या; ॥
आंदोलती मन्मथसिंधुकूलें, । उगीच होती श्लथ हे दुकूलें. ॥ ६६ ॥

घालून पायीं मणिनूपुरांला । चढेति बाळा निज गोपुरांला; ॥
मुखांबुजीं रोधिति ज्या झरोखे, । कटाक्षपाशीं हरि आजि रोखे. ॥ ६७ ॥

मांड्या, अटाळ्या अणि उंच भिंती, । व्यापून कित्तेक उभ्या रहाती; ॥
प्रासाद नारीमय सर्व जाले, । अनेक संदेह पडों निघाले. ॥ ६८ ॥

देवांगना या उतरोन आल्या, । विद्युल्लता कीं झळकों निघाल्या; ॥
भासेत किंवा स्मरवैजयंती, । प्रतिक्षणीं चंचळरूप होती. ॥ ६९ ॥

चालेत हे छप्पन कोटि खासे, । तयांमधें श्रीहरि मुख्य भासे. ॥
या तारकांला अति दिव्य आभा । तथापि, चंद्रास विशेष शोभा. ॥ ७० ॥

न्यहाळिती कृष्णमुखारविंदा । म्हणेति आलास बरा मुकुंदा ॥
कित्तेक घेती वनिता बलाया । लागेति कोण्हीं वचनें वदाया ॥ ७१ ॥

“ हा देखिला यादवराय जीणें, । जालें तिचें सार्थक आजि जीणें ॥
नीराजिजे मन्मथकोटि जेथें, । सौंदर्यता वर्णन काय तेथें ॥ ७२ ॥

करून बाई उघडीं कवाडें, । हा पाहिजे कृष्ण बरा निवाडें ॥
हा पाहिलाही पुरता पहावा । न पाहतां हा अनुताप व्हावा ॥ ७३ ॥

पुढें तुम्ही व्हा, अति डोळसा गे । मागें फिरा जा, अति साळसा गे ॥
जाला महा सौख्य सुकाळसा गे । उभा न राहेच अमाळसा गे. ” ॥ ७४ ॥

---

७३·४ ‘ हावा ’ याऐवजीं ‘ व्हावा ’ असें पाहिजे. मुळांत हस्तदोष आहे.
७४·२, ३ हे दोन चरण क प्रतींत लिहिण्याचें राहून गेलें होतें. ते तेथें मागाहून घातले आहेत.

म्हणेन " हा या समयास आला । पूजाप्रसंगें मधुपर्क जाला ॥
होणार हें काय असे कळेना । दुर्बुद्धि रुक्मी सहसा वळेना ॥ ७५ ॥

दैवें मिळे हा यिज योग्य जोडा, । परंतु आहे अवकाश थोडा ॥
हें आमचें पुण्य उभें रहावें । दोघांजणां सत्वर ऐक्य व्हावें ॥ ७६ ॥

हा कृष्ण काळा, अति गौर बाळा । संयोग शोभेल अपूर्व यांला ॥
रत्ना सुवर्णा जरि भेटि होते, । परस्परें कांति विशेष येते. " ॥ ७७ ॥

इत्यादि संवाद करीत नारी । तटस्थ पाहेत पाहा कुमारी ॥
पुढें पुढें श्रीहरि चालियेला । प्रासाद वैदर्भिक देखियेला ॥ ७८ ॥

चढेत कोण्ही, उतरेत कोण्ही । पडेत वाटेस गळोन लेणीं ॥
सिंजारवें व्याकुळ सौध जालें । निर्जीवही जीवदशेस आले ॥ ७९ ॥

असूर्यंपश्या ही त्वरित बहु धांवेति अबळा;
अनभ्यासें मार्गीं स्खलन अति पावेति विकळा ।
बसे त्यांची तेथें अविरत मनोवृत्ति अवघी,
जयांच्या दासांचें अनिश करिती दास्य चवघी ॥ ८० ॥

स्वरूपें कृष्णाच्या अविरत जिचें मानस रुधें,
तये वैदर्भीसीं मग सहचरी येउनि वदे ।
" महा रथ्यामार्गें अभिनव युवा जात असतां,
निजप्रासादाग्रीं चढति सकळा राजवनिता ॥ ८१ ॥

कटाक्षाची छाया घनतर, सये, ज्यास पडली,
विधात्यानें ऐसी अभिनव असे मूर्ति घडिली ।
असे हा कोणाचा कवण मजला तत्त्व न कळे,
अये, ये भूलोकीं कवण तरुणीचें तप फळे. " ॥ ८२ ॥

न बोले कांहींही मुकुळितमुखी, कुंदरदना,
चमत्कारें बाळा झडकरि उठे मंदगमना; ।
निवारी सर्वांतें करकिसलयें वारिजमुखी,
तयेची हे हांसे पदर वदनीं लाउन सखी ॥ ८३ ॥

पहाया वैदर्भी मग उपरमाडीवरि चढे,
अनायासें प्रत्युद्गमनविधि किंवा तिस घडे. ।
करछत्रछाया करुन वदनीं चंद्रवदना
न्यहाळी कृष्णाचें मुखकमल सारंगनयना ॥ ८४ ॥
जिवाचा सांगाती निजनगररथ्या प्रविशला,
तिला वाटे चिंतामणिच निधि किंवा गवसला. ।
बळात्कारें बाला करुन परती ऱ्ही सहचरी,
कटाक्षप्रक्षेपें यदुपतिस नीराजन करी. ॥ ८५ ॥

मनामध्यें जीच्या प्रणयरस हेलावत असे,
मुखें बाला कांहीं प्रकट परि हे बोलत नसे; ।
अलभ्याच्या लाभें परम हरिखे, नीरजमुखी,
भयें या बंधूच्या हृदय परि यींचें धुकधुकी. ॥ ८ ॥
समारंभें गेला मिरवत पुराबाहिर हरी,
न राहे पाहातां तदपि नृपमूर्धन्यकुमरी; ।
स्वरूपीं हा साक्षादनुभव महा होय जिजला,
अहो आला गेला म्हणुन म्हणनें काय तिजला ! ॥ ८७ ॥

अहो खासा राहे यदुतिलक अंबापरिसरीं,
अनुज्ञेनें सेनापति उतरती स्वस्वशिबिरीं. ।
विदर्भें सर्वांचें अतिशयित आतिथ्य करिजे,
पदीं श्रीकृष्णाच्ये दृढ परम हा भाव धरिजे. ॥   ॥

घालून सव्यें मग अंबिकेला, । राजा विदर्भेंद्र घरास आला; ॥
सक्रोध रुक्मी तंव फार जाला, । द्विजांमधें वाक्य वदों निघाला. ॥ ८९ ॥

"पुरोहित छांदस फार भोळे । उगेच हातीं मिरवी कचोळें ॥
प्रसंग यांला सहसा कळेना । सांगितलें यांस कदा फळेना ॥ ९० ॥

पाचारिल्यावांचुन मूढ आले । हे गोवळी तों विचळोन गेले ॥
आतां तुम्ही तांतडि हे करावी । कन्या नृपाची उजवून घ्यावी ॥ ९१ ॥

---

८७.४ दोन्ही हस्तलिखित प्रतींत 'ह्मणुह्मणनें' असा हस्तदोषयुक्त पाठ आहे.

कृष्णाकडे झोंबति मायबापें, । म्हणोन जालीं मज शल्यरूपें ॥
दावा मसीं उत्कट साधियेला । भुजंग हा केवळ आणियेला. " ॥ ९२ ॥

जे जे पदार्थ उपयुक्त विवाहकर्मीं,
ते आणवी त्वरित राजकुमार रुक्मी ।
जों ज्योतिपी त्वरित लग्नघडीस घाली,
तों सन्मुख प्रलयसूचक सींक जाली ॥ ९३ ॥

येती मेळे वैदिकांपंडितांचे । होती तेथें वाद त्या तांत्रिकांचे ॥
येतां जातां मंडपीं दाटि केली, । होती ज्यांच्या या वृथा घालमेली ॥ ९४ ॥

म्हणेत कोण्ही मधुपर्क आणा । म्हणेत कोण्ही नवरीस न्हाणा ॥
म्हणेत कोण्ही वर सिद्ध जाला । मागेत कोण्ही चवकास सेला ॥ ९५ ॥

म्हणेत कोण्ही शुभ लग्न पाहा । म्हणेत कोण्ही उगलेच राहा ॥
म्हणेत कोण्ही नवरी दिसेना । कोण्हास कोण्ही मग हो पुसेना ॥ ९६ ॥

आयीकतां व्याकुळ फार जाली, । उठोन माडीवरि माय गेली ॥
म्हणे तिला "चाल; विलंब जाला । आली असे संनिध लग्नवेळा. " ॥ ९७ ॥

प्रसुवचनविलासें होतसे त्रास तैसा,
अभिनव करिणीला अंकुशाघात जैसा ।
तदुपरि जननीच्या ते गळां हात घाली,
अभिमत जनयित्री वाक्य बोलों निवाली ॥ ९८ ॥

" उगी राहें आतां बहुत वदतां ओष्ठ सुकले.
नको बोलों कांहीं, अकथित मला ग्रंथ उकले ।
अवो, तूं दैवाची ! प्रिय परम अर्द्धांग हरिचें.
तुझ्या हातां आलें सहज निजसाम्राज्य घरिंचें ॥ ९९ ॥

बाळे, तुवां साहस थोर केलें । हें द्वारकादैवत आणियेलें ॥
वैकुंठिंचा नायक जो मुरारी, । तो आठवा हा अवतारधारी ॥ १०० ॥

तुम्हांस दोघां सरपाड आहे, । पूर्वींच हे गोष्टि कळोन राहे; ॥
येथें जयीं हा चुकता विधाता, । येती तयाच्या अपकीर्ति हातां. ॥ १ ॥

सुदेव तां चोरुन पाठवीला, । मनोरथा घेउनि शीघ्र आला; ॥
धाईक हे अंघ्रिळ दक्प्रसंगें, । निधान लाधे तुज दैवयोगें. ॥ २ ॥

माझ्या मनायोग्य घडोन आलें, । परंतु दुःखास्पद येक जालें; ॥
जाऊन तूं नादसि सिंधुगर्भी । मी येकळी राहिन ये विदर्भीं ! ॥ ३ ॥

मागेल आतां मज कोण जेऊं ? । कोणास मी उत्तर आजि देऊं ? ॥
वाटेस माझी करिसील खंती, । तूं लागसी आजिपसून तंती. ॥ ४ ॥

कठीण आहे स्थिति सासुऱ्याची, । पडे मला गोष्टि तुझ्या जिवाची ॥
तूझे गुणीं न्यून कदापि नाहीं, । तथापि पाहें सिकऊंच कांहीं. ॥ ५ ॥

घालाघाली घालिती नित्य सासा, । टाकूं बायी नेदिती हा उसासा; ॥
पोटागीची माय मी दूर जाल्यें । लागे आतां नादणें त्याजखालें. ॥ ६ ॥

प्राणेश्वराच्या अति मान्य माता । आलीकडे त्याहुन जाण आतां. ॥
तो सासरा साधु बहूत आहे, । आज्ञेत त्याच्ये उगलीच राहें. ॥ ७ ॥

असे तुझा दारुण जेष्ठ भावा । तूं काय त्याच्या करिसी स्वभावा ? ॥
राहों नको त्याजपुढें उभी गे, । तूं सर्वदा तद्वचनास भी गे ॥ ८ ॥

करीत जा आदर त्या दिरांचे, । असोत जे माणुसही तिरांचे; ॥
तेथें असे गे तुज कोण साहे ? । तूं बोल त्यांचे उगलेच साहें. ॥ ९ ॥

अखंड गोपीजनवल्लभाचे । ते आदरीजेत समग्र भाचे. ॥
ज्या लाडक्या लांब महाजिभांच्या । तस्याच त्या मानित जाय भाच्या ॥ ११० ॥

असेत तूझ्या नणंदा अहेवा, । उगाच तूझा करितील हेवा; ॥
लागेत जेव्हां तुजसी रुसाया । तूं देत जा पाटपिढें बसाया. ॥ ११ ॥

असेत जे तूज बहूत जावा, । विरोध त्यांसी न करीत जावा; ॥
तां आपलीं आवरिजेत मूलें, । जे नित्य होती कळहास मूळें. ॥ १२ ॥

---

१०२·३ अंघ्रिळ ( भावे-प्रत ). याऐवजीं 'अघ्रिय ' ( पंगु ) व ' कंघ्रिळ ' ( कानिटकर ) असे पाठ सुचविण्यांत आले. परंतु दोन्ही हस्तलिखित प्रतींत ' अंघ्रिळ ' असें स्पष्ट आहे.

तूं सर्व शृंगार करून रातीं, । आधीं पतीचें मन घेय हातीं ! ॥
त्याच्या बऱ्यानें अवघीं बरीं हे, । त्या वेगळीं शत्रु तुझीं खरीं हे ॥ १३ ॥

ते स्वामिसेवा तुजला वडावी, । त्याची तुला आवडि आवडावी; ॥
त्याच्या मनासी मन मेळवावें, । तां नित्य त्याच्ये मिळनीं मिळावें. ॥ १४ ॥

असे जऱ्ही तो प्रतिकूल तूसी, । तथापि राहें अनुकूल त्यासीं ॥
असेल गे पूर्विल पुण्यठेवा, । तरीच हा वल्लभ वश्य व्हावा ॥ १५ ॥

घरामधें होतिल सुष्टदुष्टें, । तथापि तूला अवधीं वरिष्टें ॥
उगेच त्यांचे गुण नित्य घ्यावे । ते बोलतां जाव कदा न द्यावे ॥ १६ ॥

टाकून बाई अभिमान द्यावा । संसार हा गोड करून घ्यावा ॥
मुखास येती जरि शब्द मोटे, । तूझ्या गुणांचें तरि मूळ तूटें ॥ १७ ॥

बोलोन जासी जरि वांकडेंसें, । पडेल तूझें तुज सांकडेंसें ॥
येका तुझ्या या तरि गोड बोलें । तें वश्य होती अवधींच कोलें ॥ १८ ॥

तूं हा अहंभाव अशेष सांडीं । पदोपदीं तां धरिजेत सांडी ॥
वाढेल वाधंग उगाच जेव्हां, । पुसेल तेथें तुज कोण तेव्हां ? ॥ १९ ॥

तां आपला चालवितां घरोबा, । धरूं नये किंचित मात्र लोभा ॥
तसें अनासक्तपणें असावें, । जळीं जसें पद्मदळें वसावें ॥ १२० ॥

साक्षात सापत्न न दाखवावें । प्राणेश्वराचें मन वोळखावें ॥
माझें तुझें हें म्हणसील जेव्हां, । परस्परें तूटि पडेल तेव्हां ॥ २१ ॥

हा सोयरा केवळ पांडवांचा, । जो दाहकर्त्ता हरि खांडवाचा ॥
कृष्णा सुभद्रेहुन आवडावी । मैत्री तिसी हे तुजसीं वडावी ॥ २२ ॥

संसार हा बुद्बुदरूप आहे । तो स्वामि तूं ईश्वररूप पाहें ॥
संसारकृत्यीं तुजला नवोढे । त्या वल्लभावांचुन कोण वोढे ? ॥ २३ ॥

संसार हा यद्यपि सज्ज आहे, । तथापि सांगें गुज येक पाहें ॥
मिळोन जातें मन दंपतींचें, । तरीच घेती सुख संपतींचें ॥ २४ ॥

८१३७७ १८३८ १०७

आहेसि तूं तों अतिसाहसी गे । त्याचें कसें कैतव साहसी, गे ? ॥
करी हरी आदर गौळणींचा । कश्याम तां त्या म्हणिजेति नीचा ? ॥ २५ ॥

प्रगल्भता येथुन आदरावी । हे लोकलज्जा हृदयीं धरावी ॥
लोकापवादास बहूत भ्यावें । टाकून चित्तांतुन पाप द्यावें ॥ २६ ॥

असेस तूं सुंदर, फार गोरी, । पापास राहें परि पाठमोरी ॥
स्वशील संरक्षिसि नित्य बाळे, । तरीच तूझा पति तूज भाळे ॥ २७ ॥

ज्या सासुरां वर्त्तति गे उधंटा, । जनांत त्यांचा बहु होय तंटा ॥
नादेति ज्या गे सुलजा, विनीता, । सर्वांमुखीं त्या अति कीर्तिमंता ॥ २८ ॥

सर्वांपुढें सत्वर तां उठावें, । ते नीजल्या नंतर तां निजावें; ॥
आदासपर्यंतहि अन्न द्यावें, । त्यानंतरें भोजन तां करावें. ॥ २९ ॥

त्याच्या घरांतील समस्त राण्या, । रांधून वाढून महा शाहाण्या; ॥
पट्टांगना राजशिरोमणीची, । होयी वरी अग्रणि सुग्रणींची. ॥ १२० ॥

तां वागतां पल्लव नीट घ्यावा, । पाचारिल्या मंजुळ जाब द्यावा. ॥
तूं खालती पाहोनि नित्य चाले । तूं बोलवील्याविण गे, न बोले. ॥ २१ ॥

नेसे बरें उत्तम वस्त्र तैसें, । माने पतीच्या हृदयास जैसें. ॥
माने तया भूषण तेंच ल्यावें, । सेवेसि त्याचे परि चित्त द्यावें. ॥ २२ ॥

लावीत जा कुंकुम नित्य भाळीं, । सौभाग्यसंसूचक सर्वकाळीं; ॥
घालीत जा कज्जळ नित्य डोळां, । सिके वरा तेथिल सर्व मोळा. ॥ २३ ॥

सदा शुचिष्मंत तुवां असावें, । सदा सतीसन्निध, गे बसावें. ॥
जे उंबऱ्याबाहिर पाय टाकी । ते आपला लौकिक काय झांकी ? ॥ २४ ॥

धम्मिल्ल अंधतमरूप भासे, । विक्त्रेंदु नक्तंदिव हा प्रकाशे; ॥
म्हणोन तूझीं स्तनचक्रवाकें । कूर्पासका आड दडोन धाकें. ॥ २५ ॥

घालीं गळां रत्नजडीत गांठी, । देऊं नको भ्रूयुगुळास गांठी. ॥
प्रसंनता हे वदनीं असावी, । तरीच लक्ष्मी सदनीं वसावी. ॥ २६ ॥

---

१२५·३ क प्रतींत येथें ‘ करी हरी आदर गौळनिळा ’ असा अपपाठ आहे.

सन्मान सर्वां वडिलांस द्यावा, । कुलीन हा शब्द म्हणोन घ्यावा; ॥
न घेसि पैशून्य कदापि कानीं, । तरीच तूझें यश लोक वानी. ॥ ३७ ॥

तूं संकटीं हा निजधर्म राखे, । कदापि संसारसुखें न माखे; ॥
तत्काळ घाली अतिथीस भिक्षा, । पतिव्रतांची तरि हेच दीक्षा. ॥ ३८ ॥

कवींवधीं तूं मज आठवीं, गे, । त्यासारिखे आत्मज आठवीं गे. ॥
उत्कृष्ट येकीहुन येकयेकी । तथापि तूं वीसिल लेकलेकी. ॥ ३९ ॥

तां सासुरां उत्तम नादिजे ते, । पतिव्रतासाधन साधिजे तें; ॥
असी तुझी येयिल कीर्त्ति जेव्हां, । मला महाभूषण होय तेव्हां. ॥ १४० ॥

दुपाराची सायी समज अवघी संपति असे,
शहाणे हे कोण्ही न धरितिच यीचे भरंवसे. ।
अवो, जों जों ज्यावें तंवरि करिजे हात वरता
पहा हा विश्वात्मा तरिच पुरवी देव पुरता. ॥ ४१ ॥

अये, ये लक्ष्मीची तिळभरिहि तृष्णा न धरिजे
यिच्या तां या वेचेंकरुनच यिची वृद्धि करिजे ।
सुते, जों जों हातें करुन विहिरा हा उपसिजे,
पहा तों तों तेणें पुनरपि यथापूर्ण भरिजे ॥ ४२ ॥

समस्तां भूतीं तां निरुपम दया नित्य धरिजे
भुकेले, तान्हेले, शशिमुखि, विशेषें समजिजे ।
विलासें लक्ष्मीच्या स्वसुहृद्वर्गा न विसरिजें.
अनाथा दीनाचा निशिदिन परामर्ष करिजे ॥ ४३ ॥

प्रपंचीं ये देवद्विजचरणनिष्ठा तुज असो.
असत्याचा, बायी, तिळभरि घरीं संग्रह नसो ।
असत्यें हें पाहें अखिळहि महापातक जडें.
जगामध्यें तैसा सहज निजविश्वासहि उडे ॥ ४४ ॥

---

१४४·४ दोन्ही हस्तलिखित प्रतींत ‘जळामध्यें’ असा अपपाठ आहे.

उपेक्षाबुद्धीनें विचर, चतुरे, संसृतिसुखीं.
नको लागों देऊं किमपि, विमळे, पातक नखीं ।
नको राहों देऊं परुपवचनोच्चारण मुखीं.
अये, या दुर्वादेंकरुन तुटती सर्वहि सखी ॥ ४५ ।

तुला ये स्वप्नींही क्षणभरि असत्संगति नको
सदा या सत्संगें करुनच अहोरात्र उरको ।
अवो, ये संसारींहुन हळुहळू चित्त विरमे.
रमेच्या भर्त्तारीं तरिच उगलें जाउन रमें. ॥ ४६ ॥

स्वभावें ही वायी परसदनवार्त्ता करुं नये.
मनोवाचाकायें परपुरुषइच्छा धरुं नये ।
पतीच्ये ये पाईं दृढतर धरीं भक्ति बरवी.
पतिप्रेमाची हे प्रकटच गुढी उंच उभवी ॥ ४७ ॥

अवो, या चौघांच्या सज अनुमतें चालसि जयीं,
प्रपंचामध्यें या किमपि न पडें अंतर तयीं ।
शहाणी तूं पोटांतुन सिकवणें काय तुजला.
असें तां वर्त्तावें निपट न लगे बोल मजला ॥ ४८ ॥

अवो येतां जातां, उठत बसतां, कार्य करितां,
सदा देतां घेतां, वचन वदतां, ग्रास गिळितां, ।
घरीं दारीं, शय्येवरि रतिसुखाच्ये अवसरीं,
समस्तांची लज्जा तजुन भगवच्चिंतन करीं. ॥ ४९ ॥

निसर्गें स्वर्गंगा पदकमळ सौरभ्य धरिते,
जिवें भावें ज्याचें जळधितनया दास्य करिते; ।
असाही हा लोकत्रयपति तुझा इछित असे,
मला तों ये लोकीं तुजहुन सुते धन्य न दिसे. ॥ १५० ॥

पवित्राही रामायणमय महाभारतकथा
निजस्वामीच्या या स्वजनभजनावांचुन वृथा; ।
गुणोत्कर्षें जीचा प्रियतम असे वश्य जिजला
उषःकाळीं तीचें पदयुग दिसो नित्य तुजला. ॥ ५१ ॥

मदें तारुण्याच्या कुळवति अहंकार न करीं,
विनीतें वैदर्भी पतिवचन हातावरि धरीं; ।
पतीची हे सेवा निरुपम महा साधन तुझें,
कुळस्त्रीला बाई पतिविण नसे दैवत दुजें. ॥ ५२ ॥

पतीच्ये ये पायीं व्रत नियम दानें विलसती,
सदा जेथें गंगादिक सकळ तीर्थें निवसती; ।
धरावी ते माथां पतिचरणसंक्षाळणजळें,
जयाच्या संस्पर्शें तरति सकळें बांधवकुळें. ॥ ५३ ॥

तुझ्या या स्वामीचें चरित वदतां वेद शिणती,
कदा 'नेणों नेणों' शुक सनक योगींद्र म्हणती; ।
सहस्त्रां तोंडाचा फणिपति धरी शेष लघिमा,
अचिंत्य श्रीकृष्ण प्रणयिनि तदुच्छिष्ट महिमा. ॥ ५४ ॥

प्रसंगें हे बाई सहज पतिनिंदा जरि घडे,
गळत्कुष्टें जिव्हा नियत शतधा होउन झडे. ।
विहारीं आहारीं निज पतिस्र वंचीत असती,
वटाग्रीं तत्कर्में प्रतिफळित सर्वांस दिसती. ॥ ५५ ॥

विषादें स्वामीच्या घडि घडि उगें तोंड मुरडी,
अशो ते तों पत्नी नियत अथवा होय सरडी ।
उगी वारंवार, क्षितिपतिसुते, जे पुटपुटी,
अपंकीं ते भेकी अयुत शतजन्में चटपटी ॥ ५६ ॥

न वर्त्तसी हा विधि बोलिला गे, । त्या सासुऱ्यांचा तरि बोल लागे ॥
देऊन मातेवरि त्या शिव्यांला । म्हणेत हो यीस कश्यास व्याला ? ॥ ५७ ॥

तूं आजि रोडेजुन हाड होसीं । चिंतातपें फार सुकोन जासी ॥
अक्रोश अत्यंत करूं नये गे । प्रणाम अंबेस करून ये, गे." ॥ ५८ ॥

असें जिला तें सिकवून माता । म्हणे, " वह्नी, सत्वर चाल आतां ॥
आरोपिलें बीज फळास आलें । सहाय तूझें तुज पुण्य जालें ॥ ५९ ॥

हा तूज शिक्षाविधि मात्र केला । सर्वांस बाई उपदेश जाला ॥
वर्त्तोत ऐशाच समस्त मूली । घरोघरीं मृन्मय जाण चूली. " ॥ १६० ॥

बोले तिची ते तिजसी कुमारी, । " मोठ्या बळें येय पहा मुरारी ॥
हा सर्व कारुण्यकटाक्ष तूझा । येथे नसे किंचित यत्न माझा ॥ ६१ ॥

जें जें मला तूं सिकवीस कांहीं, । वर्त्तेन तैसी अनुमान नाहीं ॥
तूं सर्व, माते, समजेसि तत्त्वें । नसेत तूझीं वचनें कवित्वें ॥ ६२ ॥

माते, चमत्कार अपूर्व पाहें । जगामधें वर्तत एक आहे ॥
मूर्खा पुढें काढुनि टेविद्देला । तथापि नाहीं यश ये सुनेला ॥ ६३ ॥

सासू सुनेला सिकवीत आहे । वर्त्ते कसी आपण हें न पाहे ॥
कार्पण्य कारुण्यकटाक्षलेशीं । पांडित्य हें सर्व परोपदेशीं ॥ ६४ ॥

हे तों नसे गे मज आजि चिंता । माझी असे लाज तया अनंता ॥
माया महानाटकसूत्रधारी । तो आजि आहे मज अंगिकारी ॥ ६५ ॥

कल्पद्रु हा कल्पित मात्र देतो । चिंतामणी चिंतित पूरवीतो ॥
अकल्पितां चिंतितअर्थदाई । समर्थ लक्ष्मीपति शेषशायी ॥ ६६ ॥

निर्वाहकर्त्ता भगवंत आहे, । घालूनि जो यावरि भार राहे ॥
संपन्न जो कीं सकळां पदार्थीं, । तो काय घाडील तया अनर्थीं ॥ ६७ ॥

यदुपतिपदपद्मीं माय माहेर माझें.
मजनिमित न व्हावें चित्त हें व्यग्र तूझें ।
सहजच बळरामासारिखा पाठिराखा
म्हणउनि कवणाचा हा असे आजि लेखा ? ॥ ६८ ॥

---

१५९.२ भावे–प्रतींत ' मुली ' असा पाठ आहे.

१६२.२ येथें ' अनुमान ' च्या जागीं श्री. कानिटकर ' अनमान ' सुचवितात.

१६६.१ दोन्ही हस्तलिखित प्रतींत ' कल्पद्रु हा कल्पित मात्र ते तो ' असा अपपाठ आहे.

करूं नको खेद कदापि माझा, । खेदें तुझ्या होइल खिन्न राजा. ॥
घडे परामर्श कसा क्षितीचा । तूझा विधेयी सुत ये रितीचा ? ॥ ६९ ॥

असे प्रजापालन धर्म मोटा, । तुम्हांस तो याहुन अन्य खोटा; ॥
घडे प्रजापालन नित्य जेथें । हें ऐहिकामुष्मिक सर्व तेथें. ॥ १७० ॥

दयानिधि श्रीहरि शीघ्र आला, । म्हणोन माझा वरि बोल जाला. ॥
होणार तो होउन अर्थ जातो, । मागें पुढें हा उपहास होतो ॥ ७१ ॥

हे सर्व बाहेरिल सिद्धि जाली, । घरामधें यावरि गोष्टि आली. ॥
म्यां, काय, मातें उगऊन द्यावें ? । कळेल ते यावरि तां करावें." ॥ ७२ ॥

त्यव्हां ते मातेनें सकरुणकरें कारि धरिली,
तयेचे ते मांडीवरुन मग खालें उतरिली; ।
भुजिष्येच्या वक्त्रेंकरुन विनवी प्राणपतिला,
करावें देवीचें झडकरि तुम्हीं दर्शन यिला. ॥ ७३ ॥

सभेमध्यें राजा प्रगट मग हें बोलत असे,
" यिला तेथें नेणें परम मज आवश्यक दिसें. ।
न केल्या हें ऐसें नियतच कुळस्वामिनि खिजे,
अहो जाल्या आतां तुरुत नव तें विश्व उपजे. " ॥ ७४ ॥

पित्याचें हें जालें वचन गरळप्राय तनया,
हरिद्रोहें मोटा उपजत पढे नित्य अनया; ।
हरिद्वेषें ज्याला जनकजननीद्रोहच घडे,
तयासाटीं कैसें विविध निरयद्वार नुघडे ? ॥ ७५ ॥

कथा हे कृष्णाची सकळजगदानंदजननी,
मनोभावें ईचें श्रवण करिजे नित्य सुजनीं. ।
प्रसंगें श्रोत्यांचे सकळहि महा दोष हरती;
यदूत्तंसप्रेमें विषयरसगोडी विसरती ॥ १७६ ॥

॥ इति श्रीमद्भगवद्भक्तपदानुरक्तकविसामराजविरचिते रुक्मिणीहरणकाव्ये रुक्मिण्यूपदेशो नाम सप्तमः सर्गः ॥ ७ ॥

---

१७१.२ 'म्हणोन माझ्यावरि बोल जाला' ( ख )

# सर्ग आठवा

## श्रीमुद्गलो जयति

रुक्मी पित्यासन्मुख नीट बैसे. । निघेत वक्त्रांतुन शब्द तैसे, ॥
स्फुलिंग जे केवळ पावकाचे, । उठेति किंवा गण सायकांचे ॥ १ ॥

" लग्नप्रसंगीं, जगदेकपाळा, । हें वोडवे काय यिच्या कपाळा ! ॥
देवी स्वदेशांतुन आजि जाते ? । किंवा पुढें दर्शनही न देते ? ॥ २ ॥

या ब्राह्मणां आणिक काय धंदा ? । म्हणेत हो या दगडीस वंदा ॥
वाढे तपश्या बहु फार यांची, । हातांकडे केवळ दृष्टि ज्यांची ॥ ३ ॥

हे आमचे वेद समस्त वेडे, । पदोपदीं लाविति कर्मवेडे ॥
हें धर्मशास्त्रें अवघींच बाटें । परस्परें घेति महा हिलाटें ॥ ४ ॥

देवी कशाची ? कुळधर्म कैंचा ? । विचार आधीं पडला जिवाचा ॥
येकीकडे वृद्ध उभा रहाशी । माझ्या जिवाचा बळि आजि देशी ॥ ५ ॥

हा कृष्ण काळा अतिकूड मंत्री । आसक्त जाली नरवीरपुत्री ॥
बोलाफुला गांटि पडेल जेव्हां, । तूं काय तेथें करिसील तेव्हां ? ॥ ६ ॥

जळामधें लोटुनि कां न द्यावी ? । हुताशनीं आहुति वा करावी ॥
परंतु बाहेर न पाठवावी । हे गोष्टि माझी यक आयकावी ॥ ७ ॥

बोलाविल्यावांचुन येय पाहें । कसा बकध्यान धरून राहे ॥
कदापि याचें मत हें कळेना । अंबालयापासुन हा ढळेना ॥ ८ ॥

व्याघ्रापुढें आपण गाय जाते, । ते मागुती काय फिरोन येते ? ॥
जे सांपडे व्याधकरीं कुरंगी, । मिळे कसी ते निजयूथसंगीं ? ॥ ९ ॥

---

४.२ क प्रतींत ' कर्मवेडे ' असाच पाठ आहे. परंतु त्यांतील ' व ' हा ' च ' सारखा दिसत असल्यानें ख प्रतींत ' कर्मचेडे ' असें लिहिलें असून तोच पाठ भावे–प्रतींत स्वीकारला आहे.

कदापि हे होरडि हो न घ्यावी ? । मागें पुढें दृष्टि बहूत द्यावी ॥
तूं नेदिसी जीव मला फुकाचा । कळेल आतां परिपाक याचा ॥ १० ॥

पूर्वीं मसीं बोलुन काय जासी ? । कृष्णाकडे सांप्रत डोल देसी ॥
निर्वाह तूझ्या वचनास नाहीं । या स्त्रीजिता नित्य विटाळ पाहीं ॥ ११ ॥

स्त्रीबुद्धियोगें मजसीं पडेना । आरंभिलें कार्य सिरां चढेना ॥
स्त्रीबुद्धि हे नित्य अनर्थकारी । गमाविसी कां उगलीच कारी ? ॥ १२ ॥

हा आजि तूझ्ये नगरीं न राहो, । आला असे केवळ तूज राहो. ॥
कशास हा दाड तुम्हांस व्हावा ? । संमार्जनीचा गुण हा पहावा. ॥ १३ ॥

खिरीमधें हा नसता सराटा, । हा पांडवाचे घरिंचा खराटा. ॥
संपत्ति हे झाडुन सर्व नेली, । त्या पांडवाला भिक लावियेली. " ॥ १४ ॥

वाचाट हा चाट वदोन राहे; । औधत्य राजा सहसा न साहे. ॥
सानंद निंदा करिजे पित्याची, । होईल नेणों गति काय त्याची ? ॥ १५ ॥

राजा म्हणे " निंदिसि आदिदेवा । जळो तुझी पातकरूप जिव्हा, ॥
उगाच तूं जासिल नित्य गर्वें, । कर्में तुझीं हे विपरीत सर्वें. ॥ १६ ॥

तूं काढिसी या नसत्या कुसृष्टी, । हा कोण पाहेहि सवक्र दृष्टीं ? ॥
घालीन पृथ्वीतळ पालथें मी । जाणेस कैसें मज आजि, रुक्मी ? ॥ १७ ॥

विकत्थना कां करिसील गेहीं ? । न आडले हा पुरुषार्थ देहीं. ॥
तूं व्यर्थ माझ्या उदरास येसी, । वीरामधें क्लीब म्हणोन घेसी ! ॥ १८ ॥

असेस तूं तो पितृमातृहंता, । अद्यापि तूझी न जळे अहंता. ॥
दाऊं नको तोंड कदापि आतां, । लज्जा न वाटे मज जाब देतां ? ॥ १९ ॥

तूं देवतादर्शनविघ्नकारी । होसी कसा पैत्र्यपदाधिकारी ? ॥
ये पुत्रहत्येस कदा न भीतों, । राज्ञीकडे केवळ, रे, पहातों. " ॥ २० ॥

वैदर्भ निर्भर्त्सुन बोलियेला, । तों अंतरीं पुत्र जळोनि गेला; ॥
निघे मुखाबाहेर काय वाणी, । जो विंधिला केवळ शब्दबाणीं ? ॥ २१ ॥

उठोन तो जाय, पडे विचारीं, । पाचारिले स्वीय मतानुसारी. ॥
मुख्यप्रधानाप्रति काय बोले । " हे आमही लोक अनाम्र जाले. ॥ २२ ॥

बलिष्ठ हे प्राक्तनकर्मरेख'; । आरंभिलें हें विपरीत देखा. ॥
गोवळी कोठुन आजि आले ? । येकायकीं चक्र फिरोन गेलें ! ॥ २३ ॥

.थें हा गृहभेद जाला, । प्रयत्न हा वाहत सर्व गेला. ॥
.थें घरांतूनच आगि लागे । कोणापसीं जाउन कोण सांगे ? ॥ २४ ॥

दावा मसीं साधिति मायबापें, । कृष्णाकडे वोढति पापरूपें. ॥
हा पोटिंचा पुत्रहि दूर जाला । असा पहा हा कलिधर्म आला ! ॥ २५ ॥

कृशोदरी, सुंदर, सोदरी ते । जे सांवळा गोवळ आदरीते, ॥
लोचना कांचनवेदिमध्या । नव्हेल कैसी मज आजि वध्या ? ॥ २६ ॥

यापिही येक उपाय आहे । मलाच जो हा समजोन राहे ॥
सोडून हें कार्य कदा न दीजे । प्रयत्न हा आमरणांत कीजे ॥ २७ ॥

दैवें पुराबाहेर गोप राहे । पुरामधें हा शिशुपाळ आहे ॥
आतां कपाटें अवघींच देऊं । बळें तिला आणुन लग्न लाऊं ॥ २८ ॥

हे गोष्टि चित्तावरिती धरावी । परस्परें फूटि पडों न द्यावी ॥
हा आडवा येइल कोण पाहों । युद्धासही नीट उभेच राहों ॥ २९ ॥

सहाय हा मागध आजि आहे । आम्हाकडे यावरि कोण पाहे ? ॥
जो नित्य खासा तरवार मारी, । तयापुढें काय टिके मुरारी ? ॥ ३० ॥

विचार एवंविध काढियेला । सर्वांसही सम्मत तोच जाला ॥
करून तेव्हां घरिंच्या अरासी, । ते मूळ जाती अवघे वरासी ॥ ३१ ॥

विचार हा सांगति चार तेथें, । राजा वसे राजसभेस जेथें ॥
विषाद निःसीम नृपास आला । सेनापतीसी मग बोलियेला ॥ ३२ ॥

" सेना सर्व हे अवघीच घ्याची । अंबालया रुक्मिणि शीघ्र न्यावी ॥
सेनेमधें सावधरूप राहें । ईला घरांतीलच शत्रु आहे " ॥ ३३ ॥

आज्ञा तयानें बहु वंदियेली । समग्र सेना मग सिद्ध केली ॥
चहूंकडे दुंदुभिघोष गाजे । सेनासमूहें दरबार साजे ॥ ३४ ॥

स्वधर्म भूमीपति हा न सोडी । तो आपली हेकरि हो न मोडी ॥
दोघांमधें ताळ पडोन गेले, । ये भीमकींचें परि कार्य जालें ॥ ३५ ॥

राजांगना वाट पहात होती, । फिरोन आली तंव तेच दूती ॥
वृत्तांत जो तेथिल देखियेला, । तो यीजपासींच निवेदियेला ॥ ३६ ॥

न माय हर्षे, मग माय कोठें । तीच्या सख्याचें उठऊन जोठें ॥
येऊन तीच्या श्रवणास लागे । हळूच बीजाक्षर मंत्र सांगे ॥ ३७ ॥

निजानंदें बाळा थबथवित निःसीम निथळे
असे जाला तो तों अनुभव तिचा तीसच कळे ।
त्रपेनें मातेसी प्रतिवचन किंचिन्न वदली
स्ववस्त्रप्रांतीं हे त्वरित शकुनग्रंथि दिधली ॥ ३८ ॥

तत्काळ ते राजस सिद्ध जाली । सुवर्ण वृंदावन सव्य घाली ॥
सुदेव पत्नीयुत पूजियेला । प्रणाम मातापितरांस केला ॥ ३९ ॥

दूर्वामयी मंगलपुष्पमाळा, । जे आणवी संवरणार्थ बाळा; ॥
करांबुजीं ते अतिगुप्त घेते, । आगुल्फ माता तिस बुंथि देते. ॥ ४० ॥

स्मरोन विघ्नेश्वरमूर्ति तेथें, । सवत्स गोदान करून हातें, ॥
पायींच विश्वेश्वरि चालियेली, । दौवारिकीं दाटणि वारियेली. ॥ ४१ ॥

जांबूनदछत्र शिरीं विराजे, । मुक्ताफळस्तोम जयास साजे. ॥
दोहींकडे चामरधारिणीचा । संचार मध्यें गजगामिनीचा. ॥ ४२ ॥

सभोंवतीं वत्सळ माय भोंवे । सर्वे सख्यांचा परिवार धांवे. ॥
चालेति दासीगण हे दुरस्ता, । होती पुढें वेत्रधरा समस्ता. ॥ ४३ ॥

करें सखीचा कर घेय कारी, । समागमें सात सहस्र नारी. ॥
डाव्रीत डाव्रेस महाहत्यारें, । करीत सर्वांहुन युद्ध न्यारें. ॥ ४४ ॥

अंतःपुराबाहेर शीघ्र आली । स्रिवेत जीच्या वरहंस चाली. ॥
तथापि हे चंचळ दृष्टि पाहे, । अत्यंत दोलाचलवृत्ति आहे. ॥ ४५ ॥

तों हा गृहासन्निध चैद्य आला, । होणार आहे मधुपर्क ज्याला, ॥
मळार्थ जसी ये मग आयकीली, । तत्काळ वाळा उतरोन गेली. ॥ ४६ ॥

ेरा राजकुमार जाला, । कपाटबंधा विसरोन गेला· ॥
ं भगवंत आहे, । तेथें कदा विघ्न शिरों न लाहे. ॥ ४७ ॥

हस्तीं हरि रक्षिता हा, । तयेकडे कोण अवेक्षिता हा ? ॥
नाका चुना लाउन जात आहे, । ज्याचें कुडें त्याजपुढेंच राहे. ॥ ४८ ॥

त्या पाटिसी चालति राजदारा, । कदापि ज्यांला न लगेच वारा. ॥
अधिष्ठिती सुंदरि पालख्यांला, । न देति वागों जन पारख्यांला. ॥ ४९ ॥

मधें मधें चालति वारमुख्या, । सुवासिनी धांवति लक्षसंख्या. ॥
वाजेत नानाविध सर्व वाद्यें, । पढेत वंदी स्तुतिरूप पद्यें. ॥ ५० ॥

जे लोक खासे जवळील भारी, । आरूढ तेज्यांवरि शस्त्रधारी. ॥
सभोंवते चालति ते सिपायी, । हे चाललीसे सुकुमार पायीं. ॥ ५१ ॥

त्याभोंवता सज्ज पदातिफेरा । त्या भोंवता स्वारसमूहघेरा. ॥
त्याभोंवते हे रथ थाट चाले, । त्याभोंवते मत्त गजेंद्र काळे. ॥ ५२ ॥

त्याभोंवतीं केवळ वन्हियंत्रें, । चालेत ज्यांचीं शकटें स्वतंत्रें. ॥
बसेत साहा कट दाट, पाहीं, । पिपीलिकेला परि मार्ग नाहीं. ॥ ५३ ॥

अपार सेनार्णव चालिलासे । सेनाभरें शेषहि हालिलासे ॥
महापुरद्वारहि टाकियेलें । तत्काळ अंबालय पावियेलें ॥ ५४ ॥

मुकुंदपादांबुजध्यानशीला । राहे उभी बाहेर गूढलीला ॥
जे पाणिपादांबुजयुग्म धूते, । गंगोदकें आचमनार्थ घेते ॥ ५५ ॥

देवालयीं दाटणि देखियेली, । ते वारिजे सत्वर सौविदल्ली ॥
प्रवेशली त्यावरि राजपुत्री । प्रफुल्लपंकेरुहपत्रनेत्री ॥ ५६ ॥

टेवी तयेचे चरणाब्ज माथां, । आधार जे केवळ या अनाथां ॥
अपारसंपद्रचना विधात्री । कटाक्षमात्रें करि मोक्षदात्री ॥ ५७ ॥

माता तिच्या तीजसमीप आल्या । प्रणाम देवीस करूं निघाल्या ॥
सुवासिनी दाटति त्या अपारा । करीत दासी बहु वेरझारा ॥ ५८ ॥

अगस्तिपत्नी अणि अत्रिपत्नी, । पतिव्रता मुद्गलधर्मपत्नी, ॥
अरुंधती स्त्रीजनवृंदवृद्धा, । पतिव्रतांमाजि अतिप्रबुद्धा, ॥ ५९ ॥

पतिव्रतामंडन गौतमाची । जाया अहिल्या मुनिसत्तमाची, ॥
मिळोन इत्यादिक सर्व आल्या । यथोचित स्वागत बैसवील्या ॥ ६० ॥

गंधर्वविद्याधरवायकांचे । येती थवे गुह्यकगायकांचे ॥
वाजेत ते ताळ, मृदुंग, भेरी । देवीपुढें नाचति वारनारी ॥ ६१ ॥

शुभासनीं रुक्मिणि बैसलीसे, । जे पीतपीतांबर नेसलीसे ॥
सख्या उभ्या राहाति पृष्ठभागीं, । कुरंगनेत्रा, कुशला, कृशांगी ॥ ६२ ॥

संभार देवीपदपूजनाचे । आणीत अध्यक्ष वधूजनाचे ॥
आरंभिजे अर्चन अंबिकेचें । सौभाग्य मोटें नृपकन्यकेचें ॥ ६३ ॥

सुदेवपत्नी मग बाहवीली । सर्वांपुढें आणुन बैसवीली ॥
साडी जरी हे परिधान केली । सुवर्ण जे हें मण येक त्याली ॥ ६४ ॥

करीत सत्कार समस्त नारी । सस्मेर, सापत्रप होय कारी ॥
जाली जिच्या राजगृहीं प्रतिष्ठा, । न होय अन्यत्र कसी वरिष्ठा ? ॥ ६५ ॥

देवालय स्त्रीमय सर्व जालें । स्त्रीराज्य एकत्रच वा मिळालें ॥
पुन्नाम कोठें श्रवणीं पडेना । कोण्हीकडे मानस वावडेना ॥ ६६ ॥

द्विजांगना पूजन तीस सांगे । तें अर्चनीं श्रीप्रतिमा न मागे ॥
जें जें तिणें आपण मागिजेती, । तें तें सख्याही उपचार देती ॥ ६७ ॥

---

६७·२ येथें 'भावे' प्रतींत "ते अर्चनी श्रीपति मान भागे" असा पाठ आहे. परंतु 'मागे' हाच पाठ अर्थदृष्ट्या योग्य वाटतो.

पद्मांबुजध्यान मनांत केलें. । सुवर्णसिंहासन अर्पियेलें. ॥
सुगंधि पायावरि पाद्य घाली, । अनर्घ्य अर्घ्योदकसिद्धि जाली. ॥ ६८ ॥

समर्पिलीं आचमनीय तोयें, । संपादिलीं जे गुरुसंप्रदायें. ॥
मळापकर्षस्नपनीय वारी । निवेदिते त्यावरि राजकारी. ॥ ६९ ॥

पंचामृतस्नानविधान जालें, । पृथक् पृथक् पूजन त्यास केलें. ॥
विशेष संक्षाळन होय जेव्हां, । परस्परें बिंबुन जाति तेव्हां. ॥ ७० ॥

प्रवाळपीठावरि बैसवीली, । सुगंध तेलें मग माखियेली, ॥
काश्मीरकस्तूरि समान भागें, । उद्वर्त्तिजे तत्तनु भक्तियोगें. ॥ ७१ ॥

सुवर्णगंगालय आणवीलें, । सुगंधि उष्णोदक सारियेलें. ॥
करांगुलीच्या अवकाशमार्गें, । त्या तोयधारा पडती निसर्गें. ॥ ७२ ॥

अपार येती घट कांचनाचे । जे शुद्ध शीतोदक सेचनाचे. ॥
विध्युक्त तेणें अभिषेक केला. । तत्प्रोछनीं हा उपयुक्त सेला. ॥ ७३ ॥

तदुपरि तिस अर्पी पीत चंडातकातें,
परम रुचिविशेषें लाजवी हाटकातें. ।
भरजर अवघी हे शाठिका नेसवीली,
धरुन करसरोजीं आसनीं बैसवीली. ॥ ७४ ॥

झळकति सज जेथें गोठ हे सोनियांचे,
विलसति जवदाणे हे तसे मोतियाचे; ।
हरित तिस असी हे कंचुकी लेववीली,
मणिखचित नगांची पेटिका आणवीली. ॥ ७५ ॥

उघडुन मग काढी जे अळंकार यत्नें,
बसति बहुत जेथें हे अमोलीक रत्नें. ।
तदुपरि तिस अर्पी ते यथास्थानदेशीं
पद्युग जननीचें आदरीजे जिवेंसी. ॥ ७६ ॥

सौभाग्यसंसूचक रूपमुद्रा । अर्पीतसे कुंकुम हे हरिद्रा ॥
घेऊनियां रुक्ममयी शलाका, । नेत्रांबुजीं अंजन ले शलेखा. ॥ ७७ ॥

कस्तूरिका, चंदनसार, चोवा, । काश्मीर, कर्पूर, बुका वहावा. ॥
सुगंधि नानाविध पुष्पजाती । त्यानंतरं तीस समर्पिजेती. ॥ ७८ ॥

तत्काळ काळागरुधूप दावी । प्रसन्न एकार्त्तिक दीप लावी ॥
नैवेद्य विस्तारुन रत्नताटीं । निवेदिला उत्तम तीजसाठीं ॥ ७९ ॥

फळार्पणानंतर अर्पणीयें । समर्पिलीं शीत, सुगंधि तोयें ॥
कर्पूरकंकोळलवंगयेळा-। संमिश्र तांवूल निवेदियेला ॥ ८० ॥

आदर्श हा रत्नजडीत दावी । पतद्ग्रही तीजसमीप ठेवी ॥
क्षणेक संवीजन ताळवृंतें । तत्पादसंवाहन होय हातें ॥ ८१ ॥

सुवर्णकोटिद्वय दक्षिणा हे । वाहोन, मागें परतोन पाहे ॥
सख्या तिच्या सर्वहि इंगितज्ञा । संकेतमात्रें करिताति आज्ञा ॥ ८२ ॥

आंदोलिका उत्तम वाहियेली, । मुक्ताफळीं केवळ गुंफियेली ॥
सुवर्णपर्याणित अश्व चारी, । समर्पिजेती गजराज भारी ॥ ८३ ॥

सचामरछत्र, सुवर्णपादुका । सुवर्णपर्यंक, सुवर्णदीपिका, ॥
मृदूपधानान्वित हंसतूळिका, । समर्पिल्या ज्या उपयुक्त दासिका ॥ ८४ ॥

कर्पूर, नीराजन होय जेव्हां, । सहस्रघंटाध्वनि होति तेव्हां ॥
सुवर्णपुष्पांजळि वाहियेला । प्रणाम साष्टांग तयेस केला ॥ ८५ ॥

प्रदक्षिणा तीस करून आली । पुढें उभी सन्मुख राहियेली ॥
पुनः प्रणामांजळि जोडियेला । संपूर्ण पूजाविधि अर्पियेला ॥ ८६ ॥

अहो, लोपामुद्राप्रभृति अनसूयावधि सती
जयेच्या लक्षांशेंकरुन तुळने येत नसती, ।
असी हे जा बाळा मुनिवरमहामुद्गलवधू,
वदे ते अंबेसी घवघावित जीचा मुखविधू ॥ ८७ ॥

" अपर्णे, शर्वाणि, त्रिनयनगृहस्वामिनि, उमे,
कृपापांगें तूझ्या प्रणतजनचिंतानळ शमे ।
मृदुस्वांते, शांते, जननि, जगदंबे, भगवती,
करावें तां ऐसें शुभ अशुभ कर्में जुगवती. " ॥ ८८ ॥

नृपाची हे कन्या पदयुग नमस्कारित असे.
मनीं हा आनर्ताधिप हरि इच्ये येउनि वसे।
भवानी, हा अस्मद्द्विधहृदयसंदेह नुरवीं.
जगन्माते आतां झडकरिं इचा हेतु पुरवीं." ॥ ८९ ॥

विनंतीनें जाली किमपि जगदंबा स्मितमुखी,
स्मितज्योत्स्नाजाळें निजनिळय जीचें लखलखी.।
रुषीच्ये पत्नीला नियत तदभिप्राय कळला.
म्हणे, "बाळे, तूझा सकळ मनिंचा हेतु फळला." ॥ ९० ॥

भवानीच्ये कंठींहुन वकुळमाळा उचलिली.
यिचे कंठीं घाली अतिमृदुल जे हे मिरवली.।
वहाती तन्माता त्वरित जंव घेऊन अभिधा,
अनुज्ञा अंबेची झडकरि निघे घेउनि तदा. ॥ ९१ ॥

पुरोभागीं जो हा अतितत सभामंडप असे,
अहो, बाळा तेथें हळुच मग हे येउनि बसे.।
चिरंटीचा नानाविध निवह तेथें घनवटे;
कुमारींचा कोलाहळ बहळ तैसा मग उठे. ॥ ९२ ॥

सुवासिनी संनिध आणवील्या; । पदांबुजें क्षाळुन बैसवील्या. ॥
वेण्या तयांच्या सज घालवील्या; । साड्या सकूर्पासक अर्पियेल्या. ॥ ९३ ॥

स्वयेंच ते देत असे हरिद्रा. । उद्वर्तिती त्या निज वक्त्रचंद्रा. ॥
तें कुंकुमें उत्तम लाववीलीं. । हें पाउलें सुंदर रावविलीं. ॥ ९४ ॥

त्या कंठसूत्रांत अनेक भूषा । समर्पिते ते स्पृहणीयवेषा. ॥
फळेक्षुतांबूलसुवर्णपूर्णे । शूर्पें करी सिद्ध सुवर्णवर्णें. ॥ ९५ ॥

समर्पिते जे मग लक्ष वाणें. । करीत नारी तिस अक्षवाणें. ॥
असीच तेही तिहिं पूजियेली. । वोढी तिची हे परिपूर्ण केली. ॥ ९६ ॥

---

९६·४ वोठी (ख).

माता समस्ता मग पूजियेल्या, । माथा पदीं ठेउनि वंदियेल्या. ॥
त्या तीस आशीर्वचनास देती. । म्हणेति, "तूं होसिल पुत्रवंती." ॥ ९७ ॥

जाली पुढें सोदरमुख्यजाया । ईच्या मनांतील विषाद जाया. ॥
भाळीं तिचे कुंकुमबिंदु लावी. । म्हणे तिला, "तूं असती दुलावी." ॥ ९८ ॥

त्या देवकन्या अण राजकन्या । पहावया कौतुक येति धन्या. ॥
त्या मेनकाआदिकरून मुख्या । करीत सेवा सुरवारमुख्या. ॥ ९९ ॥

घालून मल्लीकुसुमें स्वकेशीं । तत्केशसंस्कार करी सुकेशी. ॥
धरून मौनव्रत मंजुघोषा । ते लेववीते तिजला विभूषा. ॥ १०० ॥

तिलोत्तमा उत्तम पाय ऊटी । अधोमुखी तीस न देय ऊठी ॥
रंभा स्वदंभास घसून लाहे । आदर्श घेऊन उभीच राहे ॥ १ ॥

उपासना संनिध उर्वशीला । असे जिला वासव हा वसीला ॥
वरिष्ठ सर्वांहुन हे घृताची । ते वाट पाहे वचनामृताची ॥ २ ॥

होऊन हा संभ्रम जाय तेव्हां, । बाहेर कोलाहल होय तेव्हां ॥
तेणें तिचें व्याकुळ चित्त जालें । संदेहसोपान चढों निघालें ॥ ३ ॥

उटे त्यव्हां तेथुन ते शाहाणी, । सिकेत जीच्या हरिणी पाहाणी ॥
पुसोन सर्वांस असे निघाली । देवालयावाहेरि चालियेली ॥ ४ ॥

तो घाबिरा होय भरोन धापें, । महाभयें ब्राह्मण फार कांपे ॥
तो तांतडी धांवत वृद्ध आला । म्हणे, "मुली, काय विलंब केला ? ॥ ५ ॥

प्रसंग जाणोन न वर्त्तसी, गे । असार कर्मींच प्रवर्त्तसी, गे ॥
टाकून गोविंदपदारविंदा । आरंभिला हा नसताच धंदा ॥ ६ ॥

अद्यापि चित्तावरि गोष्टि घ्यावी । माया तुवां सोडुनि सर्व द्यावी ॥
हे लाविल्यानें लिगटोन येते । हे सोडिल्या दूर सुटोन जाते ॥ ७ ॥

जें असवगें म्हणसील माझीं, । तें सर्वथाही नव्हतील तूझीं ॥
अलीकडे हा जन सर्व राहे । आत्मीय तो याहुनि भिन्न आहे ॥ ८ ॥

---

१०१·३ रंभा स्वदभांस धरूं न लाहे । ( भावे-प्रत ).

तूं गुंतसी, गोंविसी कां निसांसी ? । या अंतरंगा विसरोन जासी ॥
हे कोण आहे भवदीय दीक्षा ? । करी परब्रह्म तुझी प्रतीक्षा ॥ ९ ॥

स्वभाव तूझा बहु फार भोळा । बाळे, विवेकांजन घालिं डोळां ॥
येथें उदासीनपणें राहातां । चढेल अद्वैत निशान हातां ॥ ११० ॥

पडेल पायांवरि दृष्टि जेव्हां, । कृतार्थ तूं होसिल जाण तेव्हां. ॥
भाग्यास तूझ्या तरि पार नाहीं । फिटेल हे लोचनपारणाही ॥ ११ ॥

हे क्रोध, लोभ, मद, मत्सर बोळवावे । वाचेंकरून भगवद्गुण बोलवावे ॥
आशादिकां सहचरींस तजून, बाई । तूं येकली त्वरित जाउनि लाग पाईं ॥ १२ ॥

आणीकही परम विस्मय थोर जाला । तो क्षत्रियाधम नरेंद्रगृहास आला ॥
रुक्मी तयास मधुपर्क करीत आहे । चाटीत तो दधि हताश तसाच राहे ॥ १३ ॥

पूर्वेकडील आण दक्षिण पश्चिमेचे । राजे कितेक अति उद्धत उत्तरेचे ॥
सन्नद्धशस्त्रबळवाहनयुक्त होती । अंबालयाप्रति मिळोन समस्त येती ॥ १४ ॥

ते आपले विविधभार रचीत राजे, । जे, भीमकी, तुज निमित्त पडेत लाजे; ॥
अल्याहित प्रकट उत्कट मांडियेले; । हें अंबिकानिलय येउनि वेढियेलें. ॥ १५ ॥

हा द्वारकारमण, कृष्ण सहाय जेथें, । कोणापसून उपजे भय तूज तेथें ? ॥
बाहेर तूं त्वरित येथुन जाय, बाई. । हे त्यापुढें नृपति केवळ जाण गाई. ॥ १६ ॥

नरपतिसमुदायीं नेणसी श्रीपतीला.
त्वरित करुन जासी आपले व्युत्पतीला. ।
सहज नृपसमाजामाजि जो देखणा, गे;
तदपि तुज तयाच्या सांगतों या खुणा, गे. ॥ १७ ॥

अभिनव वनमाळा शोभते नित्य कंठीं,
अविरळ कुरळांची मस्तकीं वीरगुंठी, ।
वदननिहित वंशीं, देवळें ठाण ज्याचें,
दृढतर तुज लागो सर्वदा ध्यान त्याचें. ॥ १८ ॥

मुररिपु वळखें जो कंद नीळ्या नभाचा,
उदय हृदयदेशीं होय तो कौस्तुभाचा, ।
परम विमळ जेथें वैजयंती विराजे,
त्वरित वरिं तयातें, सर्व टाकूनि राजे. ॥ १९ ॥

ध्वजस्तंभीं ज्याच्ये खगपति सदा राहत असे,
भुजद्वंद्वीं तैसें अविरत गदा, चक्र विलसे, ।
शिरीं पिंछें वाहे, कटितटिस पीतांबर धरी,
असा हा लक्षावा यदुपति, जगन्नायक हरी. ॥ १२० ॥

न लक्षे योग्यांला अति तरळ ते लक्षिन कसें ?
करावेना वारी क्षणभरि मनीं चिंतन असें. ।
तयाची तूं सत्ता; तुजविण तया स्पंदन नसे;
तथापि प्रारब्धें सहज तुज हें ब्रह्म गंवसे. " ॥ २१ ॥

बोलोन हें वचन विप्र सुदेवनामा
" स्वस्त्यस्तु ते " म्हणोन जात असे स्वधामा. ।
तेथेंच राहति उभ्या नरनाथनारी
रक्षीत जाति तिजला बहु वेत्रधारी. ॥ २२ ॥

माता म्हणे, " नृपसुते, परतोन पाहें.
लोकांत हा विधि पुरातन उक्त आहे ।
धाडीन मी मुळ दिवाळिस तूज बाई.
हा प्राण होय मजला तुजवीण कायी ? ॥ २३ ॥

तो तों करील तुजला तळहातछाया.
माझी कसी मज सुटे परि आजि माया ? ।
वृत्तांत दूरिल कसा मजला कळे, गे ?
याकारणें परम हा जिव जाकळे, गे ॥ २४ ॥

तूं आत्मजे, मज मनांतुन मोकलीसी.
जाऊं कसी स्वसदना परि येकलीसी ? ।
ये कातरींत जिव आजि पडोन राहे.
' माते ' म्हणोन तुजवांचुन कोण बाहे ? " ॥ २५ ।

हें आयकोन पृथिवीपुरुहूतपुत्री
कोमेजली विकचपद्मपलाशनेत्री ।
बाहेर ये तदपि धीर धरून बाळा.
टाकी पदें हळुच कोमल चारुशीला ॥ २६ ॥

दोहीं करीं सहचरीस धरून चाले.
चालेत वीर अतिदूर धरून भाले ।
दाटेत त्या निजसमीप अनेक दासी,
ज्या सर्वदा वसति केवळ तीजपासीं ॥ २७ ॥

आज्ञापिती कितियकां परिचारिकांला,
आध्यापिती चतुर ज्या शुकसारिकांला ।
वाटेस वांटिति विडे, सगळ्या सुपाऱ्या,
रंभादिका दिसति ज्यांजपुढें विपाऱ्या ॥ २८ ॥

नाचेत त्या तिजपुढें बहु वारनारी.
दूती फिरेति कितियेक निवारणारी ।
वंशावळी पढत भाट अनेकजाती.
वाजेति त्या विविध सुंदर वाद्यजाती ॥ २९ ॥

ते भीमकी सकललोकमनोभिरामा,
वैकुंठनाथपदपंकजबद्धकामा, ।
सौंदर्यसाररसनिर्मित मूर्ति जीची,
उत्कृष्टता परम याहुन काय तीची ? ॥ १३० ॥

वक्त्रेंदु हा सहज सिंधु सुधारसाचा.
याचा धरी नियत इंदु उधार साचा ।
आहे असाच बहुधा अपवाद लोकीं.
हा अन्यथा हरिणलांछन कां कळंकी ? ॥ ३१ ॥

---

१२६·४ दोन्ही हस्तलिखित प्रतींत 'टाकी णदे हळुच कोमळ चारुशीळा' असा हस्तदोष आहे.

अत्यंत निर्मळ, अमोलिक, ज्या अभुक्ता;
सीमंतसीमपदवीस बसेत मुक्ता, ।
साजे बरा विजवरा तिजला ललाटीं.
येकावळीयुत मनोहर हार कंठीं. ॥ ३२ ॥

शोभे तिचें मृदु भुजद्वय बाजुबंदीं.
तें नीळ तेज झळकें हृदयारविंदीं. ।
हातीं तिच्ये सहजरत्नजडीत चूडा.
त्या मुद्रिका सकळ अंगुळिकाधिरूढा. ॥ ३३

आकर्ण विस्तृत तिच्या विलसेत दृष्टी;
तन्मध्य हा सहज सुंदर माय मुष्टी ।
तीचा महा रुचिर नाभि गभीर शोभे.
वक्त्रांबुजीं परम षट्पदवृंद लोभे. ॥ ३४ ॥
ते भीमकीस सिसफूल शिरीं विराजे.
नाकीं तिच्ये अति मनोहर मोर साजे. ।
पायीं तिच्ये जडित नूपुरयुग्म वाजे.
तीच्ये गतीस गगनीं गजराज लाजे. ॥ ३५ ॥

जे देवमाया, वरवीरमोहिनी,
व्यंजत्स्तनी, जे कळहंसगामिनी, ।
श्यामा, नितंबार्पितरत्नमेखळा,
पायीं जिच्ये शोभति हेमशृंखळा. ॥ ३६ ॥

कृशोदरी, कुंडलमंडितेक्षणा,
शुचिस्मिता, जे सुंदरी सुलक्षणा, ।
जे पक्वबिंबीफळसोदराधरा,
ते होय वीरां मग दृष्टिगोचरा ॥ ३७ ॥

व्रीडावलोकनविमिश्र तदीय हासा
देखोन, ते पडति वीर मनोजफांसां ।
उत्साह जे बहुत थोर धरून आले,
राजन्य ते परम मूर्छित सर्व जाले ॥ ३८ ॥

हस्तांबुजींहुन गळोन पडेत शस्त्रें.
   चित्रांपरी धरिति भूषण आणि वस्त्रें ।
यानांवरून कितियेक पडेत खालें.
   येकाग्रकीं नृपतिमंडळ मुग्ध जालें ॥ ३९ ॥

जों पावलें सकळ राजक हे अवस्था,
   तों चालिली सहज तेथुन पद्महस्ता ।
कृष्णार्पण प्रकट देह करूनि राहे,
   ते भीमकी भगवदाप्तिस इछिताहे ॥ १४० ॥

वारून वामकर जी अळकांस वाळा,
   तैसें अपांगविशिखीं अपरां नृपाळां, ।
आलोकिते सभय सादर अच्युतातें
   सव्रीड साचिवदना, पुरुषोत्तमातें ॥ ४१ ॥

तें सांवळें, सगुण ब्रह्म, कृपाकटाक्षीं
   सस्मेर तन्मुखसरोरुह हें अवेक्षी ।
दृष्टीस दृष्टि जंव नीट मिळोन गेली,
   ते भीमकी हळुच त्याजसमीप आली ॥ ४२ ॥

कीं चक्रवाकरमणीच वियुक्त जाली
   ते चक्रवाक उमगीतच काय आली ? ।
कीं मानसा तजुन मानसराजहंसी
   आसक्त हे परमहंसकुळावतंसीं ? ॥ ४३ ॥

कल्पद्रुमाजवळि जंगम कल्पवल्ली ।
   कीं येय हे हळुच चालत पायचाली. ।
कीं चातकप्रणयिनीच निदाघतप्ता
   धांवोन ये नवघनाभिमुख तृषार्ता ! ॥ ४४ ॥

किंवा तजून विषयांकुरमात्रचारा
   मेध्या मृगी अनुसरे निज कृष्णसारा; ।
किंवा महोदधि गवेषित येय गंगा;
   कीं भेटली रतिच येउनि या अनंगा. ॥ ४५ ॥

हे भीमकी सहचरीसहित त्रिवेणी;
प्रत्यक्ष हा वटमयीरुह चक्रपाणी. ।
जेणें सुटे सहज हा भवबंध, राया;
तो तीर्थराज प्रकटे जग उद्धराया. ॥ ४६ ॥

तत्काळ इंद्रियपराङ्मुख वृत्ति जाली.
श्रीकृष्णमूर्ति हृदयीं विवरों निघाली. ।
हारोन जाय मकरध्वज कोटिशोभा.
पाहे न्यहाळुन तया मग पद्मनाभा. ॥ ४७ ॥

चतुर्भुज श्यामळरूपधारी,
जो शंखचक्राब्जगदा उभारी, ।
उभा असे जो रणभूमिभागीं,
घेऊनियां चंदनऊटि आंगीं. ॥ ४८ ॥

कंठस्थळीं कौस्तुभ दिव्य भासे
मुखेंदु सानुग्रह मंद हांसे ।
उत्फुल्लकंजोपमनेत्र दोन्ही
ते कुंडलें हो झळकेति कानीं. ॥ ४९ ॥

ते साजिरी उन्नत नीट नासा,
शोभा महा भ्रूलतिकाविलासा. ।
टिळा ललाटीं निट केशराचा,
तो बिंदु शोभे वरि कस्तुरीचा. ॥ १५० ॥

धम्मिल्ल शोभे मृदु कुंडलांचा.
संवेष्टिला हार असे फुलांचा ।
किरीट माथां जडित प्रकासे.
रत्नावतंसद्युति हे विकासे ॥ ५१ ॥

---

१५१·१ येथें ‘ कुंडलांचा ’ याऐवजीं ‘ कुंतलांचा ’ असा पाठ श्री. कानिटकर सुचवितात. त्यानें अर्थ चांगला लागतो.

हीरांगदें शोभति बाहुदंडीं.
रत्नीं कडीं हें खचितें उदंडीं।
उद्योत तो उत्कट ऊर्मिकांचा,
प्रकाश जेथें पडला नखांचा ॥ ५२ ॥

श्रीवत्सलक्ष्मी सविशेष शोभा। वसे विश्री नाभिसरोजगाभा ॥
वक्षस्थळीं उज्वळ वैजयंती। पदाब्ज सेवी त्रिदिवस्रवंती ॥ ५३ ॥

पीतांबराचें परिधान साजें। कटिप्रदेशीं रशना विराजे ॥
त्या किंकिणींचा समुदाय वाजे। वाकी पदीं तोंडरयुग्म गाजे ॥ ५४ ॥

आविर्भवे केवळ शंबरारी। शृंगार किंवा अवतारधारी ॥
जें जें, अहो, रुक्मिणि अंग पाहे। तेथेंच ते दृष्टि जडोन राहे ॥ ५५ ॥

तथापि ते सस्मितवक्त्रचंद्रा। अमुद्रलावण्यसमुद्रमुद्रा ॥
त्या मेचका सेचन काय पायीं। सदृष्टि लेवी विविधा उपायीं ॥ ५६ ॥

पहातसे विश्वमनोभिरामा। कदा न पावेच विराम रामा ॥
जो हारि हा दुर्लभ योगियांला,। प्रत्यक्ष तो दर्शनलाभ जाला ॥ ५७ ॥

मिळे शशांकास अहो विशाखा;। किंवा अशोका सहकारशाखा; ॥
हे साधकासन्निध सिद्धि आली;। किंवा विरक्तान्वित शांति जाली ॥ ५८ ॥

जाला इला चरणदर्शनलाभ जेव्हां,
प्रेमार्द्रलोचन यदूद्वह होय तेव्हां।
तिर्यङ्मुखी सभय लाज्जित फार जाली.
कृष्णास ते नमनपूर्वक माळ घाली ॥ ५९ ॥

सख्या दोघी तीच्या सहज मग मागें परतती.
निजा सौजन्याचा निरवधिक निर्वाह करिती।
अहो, जन्मा आल्या उचित बहुधा हेंच इतुकें,
करावें हें तेणें नियत उरकें ज्यास जितुकें ॥ १६० ॥

न देखे वैदर्भी जवळि सखियांतें सुनयना;
नवोढत्वें लाजे, किमपि परते हंसगमना;।

जयाचें हें यीणें सहज फिरतां चित्त हरिलें,
तया या श्रीरंगें त्वरित पदरीं तीस धरिलें. ॥ ६१ ॥

पृथुश्रोणिश्रांता, उदितमदना, स्विन्नवदना,
महाभाग्यें जाली सफळनयना, कुंदरदना; ।
सुशीळा, तन्वंगी पदरिं धरितां जे दचकली
कृपाळें गोपाळें त्वरित चहुं हातीं उचलिली. ॥ ६२ ॥

रथीं वाहे, बाहे धरुन, जगदाधार जिजला
तयेची ही लज्जा तदपि न विसंबेच तिजला. ।
रथारूढें कृष्णें शिथिळ भुजबंधें कवळिली
कृशांगी सत्कारें करुन निजअंकीं बसाविली. ॥ ६३ ॥

पतिप्रेमाचें ये हृदयकमळीं थोर भरतें;
तयाचें हें देहीं प्रकट उमटें चिन्ह वरतें. ।
प्रकर्षें हर्षाच्या कृशतनु अकस्मातच फुगे,
त्यव्हां त्या सत्वाचे अनुभव कसे राहति उगे ? ॥ ६४ ॥

कपोळीं बाळेच्या अपरिचित रोमांच उठती,
तयेच्ये चोळीच्ये सकळ जवदाणे उतटती. ।
गळा दाटे भारी, सहज सलिलें नेत्र भरले,
महर्षाचें घर्मोदकण मुखचंद्रीं उमटले. ॥ ६५ ॥

वियोगें कृष्णाच्या अनवरत तापत्रय धरी
हृदीं आनंदाच्ये अतिशयित ते मज्जन करी. ।
निवाडें स्वामीच्या चरणनळिनातें अनुसरे. ।
तयेच्या क्लेशांचा पृथुतर कसा भार नुतरे ? ॥ ६६ ॥

जनाच्या सौभाग्यें प्रकृतिपुरुषां योग घडला,
अनेकां वीरांचा प्रबळतम उन्माद झडला. ।
समस्तां भक्तांचा नयनगत हा पांङ फिटला.
प्रपंचाविष्टाचा सहज हृदयग्रंथि सुटला. ॥ ६७ ॥

---

६७.३ फांङ ( ख ).

दमाम्याची घाई तदुपरि उठे हे चहुंकडे.
प्रसादें वाजेत त्रिदशनगरीचे चवघडे।
विमोक्ता बंधाचा यदुपति इणें कृष्ण वरिला.
फुलाचा हा माथा सुरतरुफुलांनींच भरला ॥ ६८ ॥

प्रतापें श्रीकृष्णें वरित हरिली प्राणदयिता,
मिळाल्या तेथेंही सकल सुरदिक्पालवनिता।
तयां त्या दोघांतें विविध कुरवंडीस करिती,
प्रणामांतीं ज्याला घडति निज नीराजन रिती ॥ ६९ ॥

विनीतत्वें ब्रह्मादिक सकळ बद्धांजळि उभे.
प्रभावें गर्जंते प्रमुदित महा यादव शुभे।
पहाया हे येती अगणित वशिष्टादिक मुनी,
जयाची हे जाली अतिशयित दाटी प्रणमनीं ॥ १७० ॥

अहो, हाहाहूहूप्रभृति बहु विद्याधरकुलें
प्रमोदें कृष्णाचीं विविध चरितें गाति विपुलें।
महोत्साहें येथें यदुपतिकथा भक्त करिती,
जयेच्या सारस्यें अमृतलहरींतें अधरिती ॥ ७१ ॥

तयां सर्वांमध्यें प्रिय परम हा नारद असे,
करीं ज्याच्ये वीणा, अनियत मुखीं नाम निवसें।
निजप्रेमें नाचे, हरिचरण लाभे तंववरी,
शिखा युद्धासाटीं अतिशयित त्याची थरथरी ॥ ७२ ॥

त्यव्हां त्या श्रीकृष्णें स्वपुरगमनोद्योग धरिजे.
पुढें ते सेनेला प्रबळ बळरामास करिजे।
प्रयाणप्रारंभीं उठति करनालध्वनि महा.
निनादें भेरींच्या दुमदुमित दिग्भागहि दाहा ॥ ७३ ॥

---

१६९·२ दोन्ही हस्तलिखित प्रतींत 'मिळाया तेथंही—' असा पाठ आहे.
१७२·३ हस्तलिखित प्रतींत 'तरवरी' असा पाठ आहे.

न पाहे वैदर्भी फिरुन अति वित्फुल्लवदना
 निघाली देवाची नृपकुमरि, लावण्यसदना ।
मुखश्रीनें जीच्ये सकलहि दिशा या उजलती,
 धरित्रीचे राजे निखिळ हृदयामाजि जलती ॥ ७४ ॥

भुकेला भक्तीचा हरुन तिजला होय विजयी.
 धरावी हे याची त्वरित वरवी मूर्ति हृदयीं. ।
निजाभक्तांसाटीं यदुपति कसा धांवत असे
 त्रिलोकी-मध्यें ये सदय दुसरा याहुन नसे. ॥ ७५ ॥

जगामध्यें जेणें अनवरत याचें म्हणविलें,
 निजप्राप्तीसाटीं अतिविनय याला विनविलें; ।
मनीं, ध्यानीं, स्वप्नीं, निशिदिवस जेणें निरखिला
 तयाचा हा शौरी नियतच अहो होय विकिला. ॥ ७६ ॥

सखा हा दीनाचा, पतितनिवहोद्धारक महा;
 अनाथाचा नाथ, प्रणतजनबंधूत्तम पहा; ।
विसांवा श्रांताचा, जनकजननी हाच भजका;
 करीना हे कैसी यदुतिलक संसारसुटका ? ॥ ७७ ॥

कथा हे कृष्णाची सकळजगदानंदजननी
 मनोभावें यीचें श्रवण करिजे नित्य सुजनीं. ।
प्रसंगें श्रोत्याचे सकळहि महादोष हरती;
 यदूत्तंसप्रेमें विषयरसगोडी विसरती. ॥ ७८ ॥

वृथा संकल्पाचे अनियत कडे वृत्ति न चढे.
 पाहातां तों येथें प्रकट सदसद्वस्तु निवडे. ।
चुके यातायातश्रम सकळ; सत्संगति घडे;
 अनायासें जेणें सहजसुखसंदूक उघडे. ॥ ७९ ॥

॥ इति श्रीमद्भगवद्भक्तपदानुरक्तकविसामराजविरचिते रुक्मिणीहरणकाव्ये रुक्मिणीहरणोनाम अष्टमः सर्गः

स्वस्यंदनीं वाहोन राजकन्या,
तो वाजवी श्रीपति पांचजन्या. ।
त्या वीरवृंदातुन जाय तैसा,
शृघालसंघातुन सिंह जैसा. ॥ ८० ॥

---

१८०. हा अखेरचा श्लोक दोन्ही हस्तलिखित प्रतींत सर्गसमाप्तीच्या मजकुरानंतर लिहिलेला आढळतो.

# टीपा व स्पष्टीकरण

## सर्ग पहिला

**श्लोक १.** ' उपजाति.' कल्पद्रुमकाननांचे सिंधु; कल्पवृक्षांचीं असंख्य अरण्यें. ' सिंधु ' शब्द केवळ बाहुल्य दाखवितो. विघ्न; विघ्नें. प्रस्तुत काव्यांत वृत्तसुखास्तव ऱ्हस्व, दीर्घ, मात्रा वगैरेंची पुष्कळ ओढाताण केलेली दृष्टीस पडते. **कवित्व-जाती;** काव्य-प्रकार. **श्लोक २.** ' इंद्रवज्रा.' चरण २–ब्रह्मदेवानें आपली कन्या सरस्वती इच्यापासूनच हें अखिल जग निर्माण केल्यामुळें तिच्या योगानेंच तो प्रपंची, संसारी झाला असा भाव. मस्तक; संस्कृत भाषेंत हा शब्द पुल्लिंगी व नपुंसकलिंगी आहे. येथें पुल्लिंगी योजला आहे. **श्लोक ३.** विकासें; शोभतें. **लाविं कांसे;** कांसेला लाव; ज्ञानरूपी दुग्धाचें प्राशन करीव. **चरण ४**–तुझा आधार घेऊन तुझ्या मागोमाग येऊन ज्ञान साध्य करून घेईन. **श्लोक ४.** अर्थ :–ज्या आतमज्ञानाचा मार्ग वाचेला सांगवत नाहीं, ज्याचा विचार करतांना मनाची गति खुंटते, जें ज्ञान झाल्याशिवाय द्वैतभाव नाहींसा होत नाहीं, अशा ज्ञानाची किल्ली तुमच्याजवळ आहे. **श्लोक ५. मायापट;** परमेश्वराच्या मायेचा पडदा. **पूत्ति**–१. ( सं. पूर्ति–पूत्ति ) पूर्णता ( प्रो. वा. म. जोशी यांचा पाठ ); २ ' वृत्ति ' ( प्रो. चिं. वि. जोशी यांनीं सुचविलेला पाठ ), ३ ' मूर्ति ' ( प्रो. पंगु, रा. कानिटकर व मीं सुचविलेला पाठ). मुळांतील 'पूत्ति' हाच पाठ घेऊन 'पूर्णता' असा चांगला अर्थ लागतो, म्हणून भिन्न पाठ घेण्याचें कारण नाहीं. **आडलावी;** आढ-ळावी. **श्लोक ६. चरण ४**–' ये राहाळें ' म्हणजे या कामानळाच्या सतत क्रमानें मला तुझी ओळख होत नाहीं. **श्लोक ७.** हे बुद्धि; विषयांकडे धाव घेणारी माझी बुद्धि; देहबुद्धि. **चुकावी;** ( चरण १ )–प्रयोजकभेद. माझ्याकडून चूक करविते; माझें मन विषयांकडे लावून मला आडमार्गाला लावते. **चुकावी;** ( चरण २ )–मूलभेद. चुकतों. **भरलों अव्हाटे;** आडमार्गाला लागलों. **श्लोक ८.** **असतील;**

आहेस. भविष्यकाळाचा वर्तमानकाळी उपयोग. **हें पांगुळें**; हा दीनदुबळा. नपुंसकलिंगी रूप दुर्बलता दाखवून मनांत दया उत्पन्न करितें. **पोटीं वागविणें**; एखाद्याला सतत आपल्याबरोबर वागवून त्याची काळजी वाहणें. **द्रौपदीचा साहकारी**; वस्त्रहरणादि प्रसंगीं श्रीकृष्णांनीं द्रौपदीची लाज राखल्याचा उल्लेख.

**श्लोक ९.** तां; त्वां, तूं. 'तां' हें द्वितीय पुरुषी सर्वनामाचें जुनें रूप सामराजानें अनेकदां वापरलें आहे. **धुरूचा**; ध्रुवाचा. ध्रुव हा उत्तानपाद राजाचा मुलगा. हा एकदां बालवयांत प्रेमानें आपल्या वडिलांच्या मांडीवर बसला असतां त्याची सावत्र आई सुरुचि त्याला लत्ताप्रहार करून व राजापासून दूर करून दुरुत्तरें बोलली. यामुळें फार वाईट वाटून तो अरण्यांत परमेश्वरास भेटण्यास गेला. श्रीविष्णूंनीं त्याला त्याची अढळ भक्ति पाहून दर्शन दिलें व आकाशांत अढळपद दिलें. हाच आपल्याला दिसणारा ध्रुवाचा तारा होय. **चरण २–गुरूचा**; सांदीपनीचा. सांदीपनी हा कृष्ण व बलराम यांचा गुरु. याच्या मुलाला पंचजन नांवाच्या राक्षसानें समुद्रांत कोंडून ठेविलें होतें. तो आपल्याला परत मिळवून द्यावा ही गुरुदक्षिणा सांदीपनीनें कृष्णाजवळ मागितल्यावरून कृष्णानें त्या राक्षसाचा वध करून गुरुपुत्राची मुक्तता केली, अशी विष्णुपुराणांत कथा आहे. **चरण ३–गजेंद्र**; हाहा आणि हूहू हे दोन गंधर्व देवल ऋषीच्या शापामुळें अनुक्रमें एक त्रिकूट पर्वतावर गज व दुसरा सरोवरांत नक्र असे जन्मास आले. एकदां गजेंद्र तृषार्त होऊन सरोवरावर पाणी पिण्याकरितां गेला असतां त्याला नक्रानें पाण्यांत ओढलें. त्या वेळीं गजेंद्राच्या धाव्यानें प्रसन्न होऊन श्रीकृष्णानें त्याची सुटका केली, अशी कथा आहे. **उपेंद्र**; विष्णु; इंद्राचा धाकटा भाऊ. **श्लोक १०. दुरदृष्ट**; अदृष्ट, दैव. **श्लोक ११. योगनिद्रा**; विश्वप्रलयानंतरची परमेश्वराची निद्रावस्था (सहजस्वरूपस्थिति.). **श्लोक १२ चरण ३**–किंवा दीनांचें रक्षण करण्याची प्रतिज्ञा तरी सोडून दे. **श्लोक १३. असेत**; असती, आहेत. 'स्फुरेत' 'करेत' वगैरे तृतीय पुरुषीं वर्तमानकाळाचीं अनेकवचनीं रूपें या काव्यांत अनेकदां आलेलीं आहेत. **वोटी पसरणें**; पदर पसरून याचना करणें. **मागें**; या क्रियापदाचें कर्म अध्याहृत घ्यावें. 'क्षमा मागें.' **वेडीं**; 'पांगुळें.' (श्लोक ८ वरील टीप पहा.) **तूझें**; तुझें. 'तु' ऱ्हस्व असूनही चाललें असतें. इंद्रवज्राच्या ऐवजीं उपेंद्रवज्रा चरण झाला असता एवढेंच. पण तेवढ्यानें हा ऱ्हस्वदीर्घाचा दोष टळला असता. अशा प्रकारचे ऱ्हस्वदीर्घाचे दोष या काव्यांत अनेक आहेत. या श्लोकाच्या शेवटच्या

दोन चरणांत ' प्रश्नालंकार ' आहे. बोलणारा जेव्हां अशा रीतीनें प्रश्न करितो कीं त्याचें उत्तर काय येणार हें उघड ढाऊक असतें किंवा तेंच उत्तर दिल्याशिवाय गत्यंतर नसतें, तेव्हां त्या ठिकाणीं ' प्रश्नालंकार ' होतो. **श्लोक १४.** अजामिळ; हा कनोज, प्राचीन ' कान्यकुब्ज, ' देशांतील एक विद्वान् अग्निहोत्री ब्राह्मण. एका शूद्र स्त्रीवर प्रेम बसून तिच्यापासून याला दहा मुलें झालीं. शेवटचा मुलगा 'नारायण.' त्यानें अंतकालसमयीं पुत्रस्नेहानें 'नारायण' 'नारायण' असा जप करीत प्राण सोडला.पुत्राच्या निमित्तानें का होईना, अंतकालीं त्याच्या मुखांतून परमेश्वराचें नांव आलें म्हणून विष्णुदूत त्यास वैकुंठास नेण्यास आले. इकडे हा महापातकी म्हणून यमदूत त्याला अगोदरच घेऊन चालले होते; पण विष्णुदूतांनीं त्याला सोडविलें. यानंतर अजामिळाला पश्चात्ताप होऊन, त्यानें आपलें अवशिष्ट आयुष्य गंगातीरीं भगवच्चिंतनांत घालविलें, व शेवटीं उत्तम लोकाची प्राप्ति करून घेतली. व्याध; ही कथा ' शिवलीलामृतांत ' आहे. एक गरीब व्याध रानांत वेलाच्या झाडावर सावजाची पाळत राखण्याकरितां बसला असतां त्या झाडाचीं पानें त्याच्या दृष्टीआड येऊं लागलीं. त्यानें तीं तोडून खालीं टाकलीं व त्या वृक्षाखालींच शिवलिंग असल्यामुळें त्यावर तीं पडलीं. तेवढ्यानें भोळ्या सांबानें प्रसन्न होऊन व्याधाचा उद्धार केला. गणिका; पिंगला. ही मिथिला नगरींत राहणारी एक वेश्या होती. हिला कांहीं कारणानें एके दिवशीं विरक्ति उत्पन्न झाली, व तेव्हांपासून ती परमात्मा परमेश्वरच आपला पति असें समजून राहिली. याप्रमाणें आपला निंद्य व्यवहार सोडून देऊन ती आत्मरूपीं रममाण झाली. **श्लोक १५.** खरदूषण; खर हा रावणाचा सावत्र भाऊ व दूषण हा रावणाचा सेनापति. या दोन्ही दैत्यांना रामानें ठार मारिलें. बिभीषण; रावणाचा भाऊ. चरण ३, ४—यांतील दोन्ही कथा महाभारतांतील आहेत. १ अर्जुनाचें सारथ्य करीत असतां श्रीकृष्णाला आपल्या भक्ताचे घोडे धुवावे लागत. २ श्रीकृष्ण द्रौपदीच्या धांव्याला धांवल्याचीं अनेक उदाहरणें आहेत. **श्लोक १६.** अंतरेति; अंतरतात, तुझ्या चरणकमलांस मुकतात. **श्लोक १७.** आयुःपयाचा; आयुष्यरूपी दुधाचा. कालबिडाल; काळरूपी बिडाल म्हणजे मांजर. चरण १ व २ यांमध्यें 'रूपकालंकार' फार सुंदर साधला आहे.उपमेय व उपमान यांच्यामध्यें अभेद आहे असें मानून वर्णन केलेलें असतें तेव्हां 'रूपक' होतें. त्वद्योग; तुझी भेट; तुझ्या भेटीचा योग. **श्लोक १९.** ये मोहजाळीं; ह्या मायेच्या योगानें संसारांत उत्पन्न होणाऱ्या मोहाच्या जाळ्यांत. चरण २—सकाम

कर्मे हातून घडत असल्यामुळें मला तीं जन्ममरणापासून मुक्त होऊं देत नाहींत. वासनाबंध; वासनेचा बंध. निष्काम कर्म घडत नाहीं हा अभिप्राय. जन्मावळी; ( जन्म + आवळी. सं. आवली = पंक्ती. ) नानाप्रकारच्या जन्मांचा फेरा. **श्लोक २०.** वोढी; ( चरण १ ); ( सं. ऊढ ) ओढणें, पार पाडणें. वोढी (चरण २); ओढ. समुद्राप्रमाणें संसाराला ओढ असते; त्यांत वारंवार संकटें उत्पन्न होतात, व तो तरून जाण्यास कठीण पडतें. निधींचा समुदाय; कुवेराच्या नवनिधींचा समुदाय. कुवेराचीही संपत्ति पुरी पडणार नाहीं. 'नवनिधी'-महापद्म; पद्म; शंख; मकर; कच्छप; मुकुंद; कुंद; नील; खर्व. सांटे; सांठे. **श्लोक २१.** येथें; या संसारांत. महार्घ; महाग, दुष्प्राप्य. परमार्थ; ब्रह्मज्ञान, आत्मज्ञान. चरण ३ व ४–संसारांत विषयसुखांत मन गुंतून गेल्यामुळें आत्मज्ञान पारखें होतें व विचार नाहींसा होतो. चरण ४ मध्यें 'पर्यायोक्त' अलंकार आहे. उजू व सरळ वर्णन न करितां तीच गोष्ट पर्यायानें सांगतात, तेथें 'पर्यायोक्त' अलंकार होतो. **श्लोक २२.** चरण ४-( १ ) 'भोगे' या शब्दांत 'गे' वर अनुस्वार असता तर 'भोग भोगीत असतां किंवा विषयोपभोगांनीं माझ्या ठिकाणीं वैराग्य कसें उत्पन्न होणार ?' असा अर्थ होईल. हा अर्थ चांगला आहे. 'भोगं' हाच पाठ घ्यावा. ( २ ) भोगे; भोगी. वैराग्य मला कसें भोगील; म्ह. माझ्यामध्यें वैराग्य कसें उत्पन्न होईल ?

**श्लोक २३.** या श्लोकांत 'तृष्णा' किंवा 'वासना' यावर पिशाचीचा आरोप करून सुंदर रूपक साधलें आहे. तृष्णापिशाची; वासनारूपी डाकिनी. वाढे; प्रबल होते. चरण –वासनाडाकिनीनें सर्व विश्व व्यापून टाकिलें आहे. **श्लोक २४.** पदानुसंधान; तुझ्या पदकमलावरचें लक्ष. सजेना; ( सं. सज्ज ) जमेना. चरण ३ व ४–प्रपंचरूपी सर्प निवृत्तीला दंश करीत असतां ती मला कशी पचणार ? प्रपंचांत माझें मन सतत गुंतून राहिल्यामुळें त्या ठिकाणीं वैराग्याचें वीं रुजत नाहीं हा भाव. 'रूपक' अलंकार. **श्लोक २५.** क्रोधचांडाळ; क्रोध हा कोणी चांडाळ. चरण १ व २–रूपकालंकार. **श्लोक २६.** स्थावरजंगमाचा; चराचर जगताचा, भुजंगमाचा; ( १ ) महासर्प जो शेष त्याचा. याच्यावर श्रीविष्णु शयन करितात. ( २ ) कालियामर्दनाच्या कथेचाही उल्लेख असेल. **श्लोक २७.** चरितें विचित्रें; जुन्या मराठींत नामाच्या वचनाप्रमाणें विशेषणाचें रूप बदलतें; हल्लींच्या मराठींत बदलत नाहीं. हल्लीं आपण "विचित्र चरितें" असेंच म्हणूं. ईला न वसे रिकामे; इला ( जिभेला ) स्वस्थ बसवत नाहीं. 'वसे' हें रूप

मूलरूपभेदी असतांना त्याचा शक्यभेदासारखा उपयोग केला आहे. वसे; वसवतें. **श्लोक २८.** **परापवादें;** दुसऱ्याच्या निंदेनें. **श्लोक २९.** **चरण १**–तुझ्य स्वरूपाचें यथार्थ आकलन न झाल्यामुळें सर्व शास्त्रें मौन धारण करतात. **शुक;** भगवान् व्यासांना घृताची अप्सरेपासून झालेला मुलगा. हा मुलगा उपजत ज्ञानी असून महानिग्रही व योगी होता. **चरण २**–शुकादिकांसारख्या महाज्ञान्यांना सुद्धां तुझ्या स्वरूपाचें यथार्थ ज्ञान होत नाहीं. **विपरीत भान;** मिथ्या ज्ञान. **श्लोक ३०.** **कथा बांधणें;** पद्यमय रचनेंत चरित्र किंवा कथा लिहिणें. **ईस;** या कथेच्या रचनेला. **श्लोक ३१.** जे; जी रुक्मिणीस्वयंवराची कथा. **विस्तारिली;** विस्तार करून लिहिली. **पुरुषीं पुराणीं;** प्राचीन कवींनीं. **श्लोक ३२.** **विवेकवीचि;** विचारतरंग. **वंचलासे;** वंचिला जातो, फसतो. **श्लोक ३४.** **निरंजन;** निर्विकल्प, मायाविरहित, शुद्ध असा परमेश्वर. **श्लोक ३५.** बालाबगला.; लहानसहान देवताविशेष. **श्लोक ३६.** मोरोपंतादि प्राचीन कवी बहुधा 'च्य', 'ज्य', 'झ्य' या पष्ठीच्या रूपांतील अक्षरांकरितां अनुक्रमें 'च', 'ज' व 'झ' हीं अक्षरें योजतात. **भीमकी;** भीमक राजाची कन्या रुक्मिणी. **नव्हसी;** न होसी. **वर-पंगतीचा;** ( १ ) वरकांती, वरपांगी. ( २ ) वराच्या पंक्तीचा.

**श्लोक ३७.** निजसोयरा; आपला नातेवाईक, प्रेमळ मित्र. **हें ब्रह्म;** परमात्मा परमेश्वर, श्रीहरि. **श्लोक ३९.** **परीक्षिती;** अभिमन्यूचा मुलगा व अर्जुनाचा नातू. **चरण २**-ज्याची कीर्ति चंद्राच्या कीर्तीस कसोटीला लावण्या-सारखी होती; चंद्राच्या कीर्तीची परीक्षा करण्यासारखी होती. सारांश, त्याच्या कीर्तीचा शुभ्रपणा चंद्राइतका होता. कीर्तीचा रंग पांढरा असा कविसंकेत आहे. **शुक;** यानें परीक्षितीला भागवत सांगितलें. **श्लोक ४०.** **द्वैपायन;** व्यासाचा मुलगा. 'द्वैपायन' हें वास्तविक व्यासाचें नांव असून तें शुकाला उद्देशून योजिलें आहे. ( श्लो. २९ टीप पहा. ) **योगिवर;** योग्यांमध्यें श्रेष्ठ. **द्विजेंद्र;** ब्राह्मणश्रेष्ठ. **सर्वकथासमुद्र;** सर्व कथांचा सागर; ज्याला सर्व कथा माहीत आहेत असा. **उद्गार;** उदात्त. **मनोविकार;** मनाचे कामक्रोधादि सहा विकार. **श्लोक ४१.** **कथारस;** भगवत्कथारूपी अमृत. गोरसादिकांनीं मन विटतें, पण कथामृतानें मन केव्हांही विटत नाहीं. **श्रीकृष्णपायींहुनि;** मराठींत कित्येक वेळां नामाच्या सप्तमीच्या रूपाला पुन्हा विभक्तिप्रत्यय लागून रूपें बनतात. अशीं रूपें प्रस्तुत काव्यांत अनेक आहेत. **चरण ४**-ही कथा ऐकून आपलें

शंकासमाधान कां करून घेऊं नये ? पुढील श्लोकांत शंका निवेदन केल्या आहेत. **श्लोक ४२.** देववर; देवश्रेष्ठ श्रीकृष्ण. वरोरु; सुंदर स्त्री. द्वारवती; द्वारावती = द्वारका. चरण ४–अर्थ:—श्रीकृष्णानें जें साहस केलें तें त्यानें कसें सावरलें = त्यांतून तो कसा पार पडला ? **श्लोक ४३.** मागध; मगध देशांतील. शाल्व = शाल्व देशांतील. राक्षसाचा विधि; याला 'राक्षस' किंवा 'राक्षसविवाह' असें म्हणतात. विवाहाच्या आठ प्रकारांपैकीं हा एक होय. यांत नवऱ्या मुलीच्या नातेवाइकांशीं युद्ध करून वर तिचें बळजबरीनें हरण करून तिच्याशीं लग्न लावतो. **श्लोक ४४.** चरण १–गर्भांत असतांनाच आत्मज्ञान झाल्यामुळें जो जन्मापासूनच योगी झाला होता. जन्मसुख; नरदेह प्राप्त झाल्यामुळें तद्द्वारें मिळणारें विषयाचें सुख. चरण ३–जो वस्त्रांस कधींहि न शिवतां नेहमीं दिगंबरवृत्तीनें रहात असे. **श्लोक ४५.** तो विप्र; वरच्या लोकांत वर्णिलेला द्विजश्रेष्ठ शुक. रक्षितीसी; रक्षील अशी, रक्षण करणारी. **श्लोक ४६.** साहित्यसारस्य; साहित्यशास्त्रांतील मर्म किंवा उत्तम भाग. साहित्य; साहित्यशास्त्र, या शास्त्रांत काव्य, काव्यगुणदोष, रस, अलंकार इत्यादिकांचें विवेचन येतें. चरण १–ही कथा वर्णन करण्यांत सर्व साहित्यशास्त्रांतील सार खर्चीं पडलें आहे. वेंचे (चरण १); खर्च होई. वेंचे (चरण २); निवडक भाग, उतारे. रसाला; रसाळ, सुरस. **श्लोक ४७.** चरण १ व २. **अर्थ**:—ज्या कृष्णकथेचा असा गंगेसारखा प्रवाह चालला आहे त्या ठिकाणीं 'हा काय' म्हणजे हें सर्व शरीर कसें वाहून जाणार नाहीं ? याला उत्तम गति कशी मिळणार नाहीं ? सावधानें; सावधान, जागृत. संस्कृत पद्धतीप्रमाणें विशेष्याच्या वचनाप्रमाणें विशेषणाचें रूप. हरिसंन्निधानें; हरिसन्निध. मनांत हरीचें सान्निध्य ठेवून. भक्तियुक्त अंतःकरणानें. **श्लोक ४८.** विराटरूपी; विश्वस्वरूप धारण केलेला. चराचर; जंगम व स्थावर. निरूपी; दाखवितो. देवईला; देवकीला. क्, ग्, च्, ज्, त्, द्, प्, य्, व् हीं व्यंजनें संस्कृत शब्दाच्या मध्यें आलीं असतां प्रायः प्राकृत भाषेंत व त्यामुळें मराठींत त्यांचा लोप होतो. जसें:— नकुल=णउल; सागर=साअर. याच नियमानें जुन्या मराठींत 'देवई' असें रूप झालें. **श्लोक ४९.** चैतन्यपणें; ब्रह्मस्वरूपानें. देवकीचा; देवकीच्या. जुनें षष्ठीचें रूप. **श्लोक ५०.** व्यक्तदशा; दृश्य साकाररूपाची अवस्था. सगुण अवतार. चरण २–श्रीकृष्ण परमात्म्यानें देवकीच्या उदरीं कारागृहांत जन्म घेतला. अवतीर्ण झाले; अवतार घेतला.

**श्लोक ५२.** मावसी; ( सं. मातृष्वसृका; प्रा. माउसिआ. ) पूतना, कंसाची अनुचर राक्षसी.तरुण स्त्रीचें रूप धारण करून ती नंदाच्या घरांत गेली व कृष्णाला मांडीवर घेऊन पाजूं लागली. स्तनांत दुधाच्या ऐवजीं विष भरलेलं होतें हें जाणून कृष्णानें विष प्राशन करून त्याबरोबर तिच्या प्राणांचेंही आकर्षण केलें. मावसी (चरण २); माया ( माव ) असावी अशी, कपटी. गाडा; कंसानें पाठविलेल्या शकटासुर नांवाच्या राक्षसानें गाड्याचें रूप घेतलें होतें. त्याचा गोकुळांत कृष्णानें चुराडा करून त्या राक्षसाला ठार केलें. **श्लोक ५३.** करीं करी;हातांत घेई. **श्लोक ५४.** भूतसृष्टि; उत्पन्न झालेलें अखिल चराचर जग.' भूत '– श्लिष्ट शब्द. बहु फार दृष्टी; या ठिकाणीं 'बहु' व 'फार' या शब्दांनीं विनाकारण द्विरुक्ति झाली आहे. **श्लोक ५५.** वृत्त शिखरिणी. श्वशुरसदनीं; सासऱ्याच्या घरीं,समुद्रांत.( समुद्रमंथन-समयीं निघालेल्या चवदा रत्नांत विष्णुपत्नी लक्ष्मी ही होती, म्हणून समुद्र हा विष्णूचा सासरा होतो.) योगींद्र;योग्यांमध्यें श्रेष्ठ,उत्तम प्रकारचा योगी. ('इंद्र' शब्द 'उत्तम,' 'श्रेष्ठ' अशा अर्थी वापरतात.जसें-नरेंद्र, गजेंद्र वगैरे.) पयःपानीं; दूध पाजण्याचे वेळीं. करयुगुलतल्प; ( कर+युगुल+तल्प ); दोन हातांच्या अंथरुणावर. **श्लोक ५६.** प्राग्जन्मीं; पूर्वजन्मीं. नंदगृहिणी; नंदस्त्री यशोदा. **श्लोक ५७.** घनरुचिर; मेघासारखी कांति आहे ज्याची असें. कुरल; ( सं.कुरुल-केशकलाप. ) निजछंदें; स्वेच्छेनें. चरण ४–श्रीकृष्णाला उखळाला बांधून यशोदा घरांत गेली, इतक्यांत कृष्ण उखळ ओढीत ओढीत जवळच असलेल्या दोन अर्जुन-वृक्षांकडे गेला. त्यांना त्याचा स्पर्श होतांच ते उन्मळून पडले. नारदमुनींच्या शापानें वृक्षरूप झालेल्या कुबेरपुत्रांचा अशा रीतीनें उद्धार झाला. **श्लोक ५८.** यदुदरदरीमाजि; ज्याच्या पोटांतील विशाल भागांत. व्रजकुळीं; गोकुळांत. **श्लोक ५९.** चरण १– निर्गुण निराकार परमात्मा असून त्यानें सगुण लीला धारण केल्या असा अर्थ. प्रत्यह; दररोज. माती ( चरण ३ ); मावती. **श्लोक ६०.** मनोद्वेयें; स्वेच्छेनें. बाळक घोंग; 'बाळकघोंग' असा समास घेऊन 'बाळकाचें घोंग म्ह० सोंग' असा अर्थ करावा.

**श्लोक ६३.** गोंविला;गुरफटला गेला. (कर्मणि प्र.)**श्लोक ६४.** वृषभास दोहे; ( मराठींत ज्या जनावराची धार काढावयाची त्याची षष्ठी विभक्ति घालतात. जसें-'कृष्णमाता यशोदा गाईची धार काढीत होती.' संस्कृतांत द्वितीया घालतात. जसें:–

' राजन् दुधुक्षसि यदि क्षितिधेनुमेताम्. ' ' वृषभास दोहे ' या ठिकाणीं संस्कृतच्या धर्तीवर द्वितीया योजिली आहे.) मुग्धा; मूढ, वेडावलेल्या. **श्लोक ६५.** चरण ३,४- आपण मोठा द्वाड व कपटी असूनही आपणांवर आळ येऊं देत नाहीं. **श्लोक ६७.** लगोऱ्या; एक प्रकारचा चेंडूचा खेळ. **श्लोक ६८.** यमुनाकदंबीं; यमुनेच्या तीरावरील कळंबाच्या वृक्षावर. **श्लोक ७०.** चरण ३ व ४-यांत ' अरिष्टें ' या एकाच शब्दानें साधलेलें यमक सदोष आहे. एकच शब्द भिन्नार्थी योजून यमक साधल्यास तें युक्त होतें. **श्लोक ७१.** वृत्त-स्वागता. **श्लोक ७३.** या श्लोकांत दोन वृत्तांची भेसळ झाली आहे. येथें मधले चरण गळले असावेत असें दिसतें.

**श्लोक ७५.** मायार्गल (माया+अर्गल); मायेची शृंखला; मायेचें, अज्ञानाचें पटल. उखळ; (सं. उलूखलम्). **श्लोक ७६.** अघासुर, बक, वत्सासुर, धेनुक (धेनुकासुर); कंसानें श्रीकृष्णास ठार मारण्याकरितां पाठविलेले राक्षस. या सर्वांना कृष्णानें ठार केलें. **श्लोक ७७.** तृण; तृणासुर, कृष्णानें ठार केलेला एक राक्षस. **श्लोक ७८.** श्यामलरूपधारी; सांवळें (श्यामल) रूप धारण करणारा. पवाडा; (सं. प्रवाद.) सवेत्रवंशीकर; हातांत काठी व वेणु घेतलेला. **श्लोक ७९.** हस्तलिखित प्रतींत कृत्यस्त असा पाठ आहे. प्रो. वामनराव जोशी यांनीं ' कृत्तिस्थ, ' प्रो. पुरंदरे यांनीं ' कृत्यस्त ' हा मूळचाच व श्री. कानिटकर यांनीं ' व्यत्यस्त्य ' असे पाठ सुचविले आहेत. त्यांचे अर्थ पुढीलप्रमाणें ते देतात. (१) ' कृत्तिस्थ ' –कृत्ति (वाहणा) + स्थ; = पायांत वाहणा असलेला. (सर्ग. ३. श्लो. १४ पहा). (२) ' कृत्यस्त ' (कृती+अस्त) = ' कृत्यस्त पादांबुज ' म्ह० कर्मांच्या लोपाला समर्थ असें पदकमळ. (३) ' व्यत्यस्त्य ' (विषम, उलट) =विषम (देहुडें) चरणकमल. **श्लोक ८०.** चरण १–अर्थ :— श्रीकृष्ण परमात्मा वास्तविक खाण्यापिण्याविषयीं उदास असतांना आपल्याबरोबर शिदोरी बाळगीत असे. कंस; कृष्णमाता देवकी इचा भाऊ व कृष्णाचा मामा. **श्लोक ८१.** कुब्जा; कंसाची दासी. ही तीन ठिकाणीं वांकडी असतांना सुद्धां तिनें कंसाकरितां नेत असलेल्या चंदनादि अनुलेपनांपैकीं थोडेंसें साहित्य कृष्णास दिल्यावरून त्याला फार प्रिय झाली. **चरण ४** -कंससभेमध्यें कृष्ण व बलराम मल्लयुद्धाचे प्रसंगीं जात असतां दरवाजावर कुवलयापीड नांवाचा गज आडवा आला, त्याला कृष्णानें ठार

केलें. **श्लोक ८२.** चाणूर; कंसाच्या दरबारांतील एक मल्ल. याला मल्लयुद्धांत कृष्णानें ठार केलें. **श्लोक ८३. मायबापें;** देवकी व वसुदेव. **श्लोक ८४.** या श्लोकांत ६ चरण आहेत. पहिले दोन चरण दुसऱ्या एखाद्या श्लोकाचे असावेत. पण त्याचे दुसरे चरण माहीत नाहींत. ( श्लोक ७३, टीप पहा. ) **व्यापार;** कार्य, उद्योग. चरण ५, ६–अर्थ :—ज्या परमात्म्याकरितां ती ( रुक्मिणी ) मत्स्यावतारीं मच्छीसुद्धां झाली, त्याच्या आतांच्या मानवी कृष्णावतारांत त्याच्याशीं सहवास घडण्याची तिला इच्छा कां होणार नाहीं ? **श्लोक ८५.** ' शिखरिणी. ' **सकलजगदानंदजननी;** अखिल जगाला आनंद देणारी.

---

## सर्ग दुसरा

**श्लोक १.** इंद्रवज्रा. **श्रीकृष्णपादांबुजकामुकी;** श्रीकृष्णाच्या चरणकमलाची इच्छा असलेली. **लक्ष्मीपतीचें घर;** वैकुंठ. **श्लोक २. विदर्भ;** वऱ्हाड. **उदारधामा;** उदार आहे धाम म्हणजे तेज ज्याचें असा, तेजस्वी. **लोकपाल;** अष्टदिक्पाल. **श्लोक ३.** चरण २–तो राजा कराच्या सबबीवर प्रजेचें अवास्तव हेम ( सुवर्ण, द्रव्य ) हरण करीत नसे. चरण ३–**प्रजा;** १ मुलें, अपत्यें; २ प्रजाजन; ( ' प्रजाः प्रजाः स्वा इव तंत्रयित्वा ' शाकुंतल, अंक ५ ) **निजान्वयीं;** आपल्या वंशांत. **श्लोक ४. मग;** ( पादपूरणार्थ. ) **श्लोक ६. ऋणानुबंधें;** पूर्वजन्मींचा संबंध. ( ' एकमेव नौ जीवितं द्विधास्थितं पुनः शरीरम् । ' शाकुंतल, अ. ६ ) **श्लोक. ७. इष्टें;** ( चरण १ ) हितावह गोष्टी; ( चरण २ ) यज्ञयागादि कर्मे. **पूर्तें;** दानधर्माचीं कृत्यें. **इष्ट;** ' अग्निहोत्रं तपः सत्यं वेदानां चैव पालनम् । आतिथ्यं वैश्वदेवश्च इष्टमित्यभिधीयते ॥ १ ॥ **पूर्त;** ' वापीकूपतडागादि देवतायतनानि च । अन्नप्रदानमारामः पूर्तमित्यभिधीयते ॥ २ ॥–मनुस्मृति. **श्लोक १०. भला;** ( सं. भद्र. ) **श्लोक १२.** चरण ४–दृष्टांत अलंकार. ( एकादी गोष्ट मनांत चांगली बिंबावी म्हणून तशाच प्रकारचें दुसऱ्या एकाद्या गोष्टीचें उदाहरण घेतलें म्हणजे त्या ठिकाणीं ' दृष्टांत ' अलंकार होतो. ) **श्लोक १३. न वजाय;** जात नसे. **संबंध पाडणें;** संबंध ठेवणें.

**श्लोक १४. चिंतावली;** ' चिंतावणें ' हें चिंता या नामापासून क्रियापद. चिंता उत्पन्न झाली. **ऊर पिकविणें;** अतिशय त्रास देणें, छळणें. **श्लोक १७. देवी;**

राणी, रुक्मिणीची आई. कमला; लक्ष्मी, देवी. श्लोक १९. 'शिखरिणी.' कमलनिलये; हे कमलनिवासिनि लक्ष्मी. स्वसा तूं धेनूची; समुद्रमंथनसमयीं जी चवदा रत्नें बाहेर पडलीं त्यांत धेनु व लक्ष्मी हीं होतीं; यास्तव लक्ष्मी धेनूची बहीण असें म्हटलें आहे. श्लोक २०. भवांभोधि; संसारसमुद्र. जननिर्वाण–लहरी; लोकांची सुटका करणारी किंवा लोकांस तारणारी लाट. 'रूपक' अलंकार. चरण २. आदिमाया ही परब्रह्माची सहचरी; कारण तिच्याशिवाय परब्रह्माला सगुणरूप घेतां येत नाहीं. अभयें; अभयकारक आशीर्वाद. श्लोक २१. परब्रह्मछाये; परमात्म्याला सावलीप्रमाणें अनुसरणारी; परमात्म्याची सहचारिणी. कपटवनिता; आदिशक्ति माया. चरण १ व २–अर्थ :–तूं जरी मला प्रपंचामध्यें साकार दिसतेस तरी तूं विष्णुपत्नी कमला आदिशक्ति महामाया आहेस. कटाक्षप्रक्षेपें; कृपादृष्टीनें. रत्नाकरसुते; समुद्रकन्ये लक्ष्मी. श्लोक २२. निर्वाहें; कार्यक्षमता दाखवून. ( निर्वाह; कार्यक्षमता ). चरण १– तुझें भजन करणें हें माझें कर्तव्य, पण तें पार पाडण्याचें सामर्थ्य माझे अंगीं नाहीं. श्लोक २३. प्रसंगें; प्रसंगोपात्त; हा प्रसंग आल्यानें. प्रतिपद; प्रत्येक पावलाला; प्रत्येक क्षणीं. अविहित; हा शब्द 'अव्याहत' ( अखंड, निरंतर ) अशा अर्थी योजिला आहे.

श्लोक २७. गर्भछाया; गर्भावस्थेमुळें मुखावर येणारी टवटवी. आदिमाया; लक्ष्मी. कुचचूचुकांला; स्तनाग्रांना. श्लोक २८. 'मालिनी' वृत्त. गजगति; जिची गति गजासारखी आहे; मंदगामिनी. त्रिवळी; पोटावरील कातडीच्या तीन वळ्या. श्लोक २९. जयिंहुनि, तयिंहुनि; जेव्हांपासून, तेव्हांपासून. डोहळा; ( सं. दोहद ). श्लोक ३०. फिरावी; फिरवी. ( वृत्तसुखास्तव ). श्लोक ३३. उच्छून; ( सं. उत्+श्वि ) गर्भारपणामुळें उंचावलेल्या, पुढें आलेल्या. नीवीनिचय; निऱ्यांचा समुदाय, निऱ्या. श्लोक ३४. चरण ३–मग ती डोहळ्यांला कां न पावे ? तिचे डोहाळे कां पुरविले जाणार नाहींत ? श्लोक ३५. निधान; गर्भरूपी निधि किंवा ठेवा. चरण ३—मुलगा व्हावा म्हणून औदुंबरी माळ म्ह० उंबराची माळ आठांगुळाचे वेळेस गळयांत घालतात. पण मुलगा होऊं नये अशी तिची इच्छा असल्यामुळें तिनें ती घातली नाहीं. जं; ( सं. यत् ) कारण. श्लोक ३७. तें स्वप्न; (श्लो. २५ पहा). देवी; भीमकीची आई. रतीचें; रतिमात्र; तिळमात्र. श्लोक ३८. चरण ३, ४–ब्रह्मदेवानें सर्व सुंदर व रमणीय वस्तु गोळा केल्या असाव्यात, व म्हणूनच त्याला ही सुंदर मूर्ति निर्माण करितां आली असावी. उपमा;

उपमानें. **श्लोक ३९.** आकारलें; ( सं. आकृ ) आकाराला आलें. **श्लोक ४१.** शालिनी' वृत्त. **श्लोक ४२.** बारसें ( सं. द्वादश, प्रा. बारह. ); वर्ग्य; बांधव, भाऊबंद. मतीचें; बुद्धिवान. **श्लोक ४४.** प्रत्यहं; दररोज. **श्लोक ४७.** पुत्रें करिं; पुत्राच्या हातून.

**श्लोक ४८.** दारुणाची; दुष्ट भावाची, रुक्मीची. चरण ३-ब्रह्मदेवानें मनुष्य-प्राण्यांत राहणारें प्रत्येक व्यंग तिच्यांतून नाहींसें केलें होतें. ती सर्वतोपरी अव्यंग होती हा भाव. **श्लोक ४९.** चरण २-रुक्मीच्या दुरुक्ती तिला शल्यासारख्या बोंचत. चरण ४-ती त्याला कधींही उलटून किंवा त्याच्या विरुद्ध बोलत नसे. **श्लोक ५०.** पर्कर; (सं. परिकर ) परकर. लेवबीलीं; (प्रयोजक ). चरण ४-तिला कानांत पानें ( एक प्रकारचा दागिना ) घालावयास लाविलें. **श्लोक ५२.** नितळे; सुंदर दिसूं लागली. यौवराज्याधिकरी; ( वास्तविक 'यौवनराज्याधिकारी' असें पाहिजे. 'यौवराज्य,' युवराजाचा अधिकार. ) शरीराचें तारुण्य हेंच राज्य, त्या राज्याचा स्वामी राज्यावर जशी राजाची मालकी चालते, तशी मदनाची मालकी तिच्या तारुण्ययुक्त शरीरावर चालूं लागली. मदनाचा पूर्ण अंमल तिच्या शरीरावर बसला. चरण ३-तारुण्यावस्थेमुळें तिच्या अवयवांनीं आपला बालपणींचा भाव, स्थिति, टाकून दिली. हृदयदेश; स्तन. **श्लोक ५३.** चरण १-क्रमाक्रमानें हळुहळू तिचे अवयव अधिकाधिक गोरे दिसूं लागले. चरण २-मदनानें जणूं काय तरुणांना ठार मारण्याकरितां ही एक राजकन्यारूपी सुरीच पाजळून ठेविली. चरण ३ व ४-अर्थ :— हिच्या शरीरावर तारुण्य ओथंबूं लागलें. बाल्यावस्थेनें इला इतक्यांतच कसें सोडलें ? **श्लोक ५४.** माज ( सं. मध्य ); कंबर, कटि. चरण २-( नितंब वाढूं लागल्यामुळें ) तिचा कटिभाग बारीक होऊं लागला. बारीक कंबर हें स्त्रीसौंदर्याचें लक्षण. उदा., 'सिंहकटि.' **श्लोक ५५.** लीलारसें; नानाप्रकारच्या क्रीडांत दंग होऊन. चरण २, ३ व ४-तिची मंदगति पाहून हंस तिच्या पाठोपाठ चालतात; आपल्या पंखांपेक्षां सुंदर केशकलाप पाहून मोरांनाही लाज वाटते, ( 'व्यतिरेक' अलंकार ); व चकोर तिच्या मुखाला पाहून हा चंद्रच आहे अशी भ्रांति उत्पन्न झाल्यामुळें चंद्रकिरणांच्या आशेनें तिच्या मुखाजवळ येतात. ( 'भ्रांतिमान' अलंकार. ) **श्लोक ५६.** सुवर्णपूगीफलयुग्म; सुवर्णाच्या सुपाऱ्यांची जोडी ( 'वक्षोरुहा'चें विशेषण ). **श्लोक ५७.** फेरुनि; बदलून. **श्लोक ५८.** केशवाचा गुण; कृष्णाचें परमेश्वरत्व,

ब्रह्मत्व. **श्लोक ६०.** मनोविपर्यास; मनांची अदलाबदल. चरण ४–मदनानें मध्यस्थी सुरू केल्यामुळें त्यांच्या मनांची अदलाबदल झाली, म्ह० रुक्मिणीचें मन कृष्णाकडे गुंतलें, व कृष्णाचें मन रुक्मिणीनें चोरलें. 'परिवृत्ति' अलंकार.

**श्लोक ६१.** गुण दूत; गुण हेच दूत. **श्लोक ६२.** अवतीर्ण झालें; (सं. अवतृ) अवतार घेतला. **श्लोक ६३.** प्रकृतिस्वभावें; स्वाभाविकपणें. तदाकार; ब्रह्मस्वरूप. स्वदेहभाव; स्वतांच्या शरीराच्या स्वभावाला किंवा देहधर्माला. **श्लोक ६४.** 'मालिनी' वृत्त. चरण १, २–श्रीकृष्णाच्या चरणकमलीं मन अनुरक्त होऊन ठिकाणावर नसल्यामुळें मदनाला तिच्यावर आपले बाण फेकण्यास अवसर मिळाला. **श्लोक ६६.** चरण ३–द्वारकेच्या दिशेकडून वाहणारा वायु जर कृष्णाच्या अंगावरून येत असेल तर तोसुद्धां तिला प्रिय होता. **श्लोक ६७.** तत्प्रापक; श्रीकृष्णाची प्राप्ति करून देणारें. **श्लोक ६८.** कृश-तनु; कृश आहे तनु म्ह० शरीर जिचें अशी 'तनु'. **श्लोक ६९.** घोण घालणें; (कोंकणी.) कोणाशीं न बोलतां फुरंगटून बसणें. कडमोड; (सं. क्वथ्=उकळणें.) आंग मोडून येणें, तापाची कणकण.

**श्लोक ७०.** भारी; जड. कैटभारी; कैटभ राक्षसाचा शत्रु श्रीकृष्ण. चरण ४–उशाला आपला बाहु (हात) घेऊन निजली. **श्लोक ७३.** चरण १, २–'निदर्शना' अलंकार. **श्लोक ७४.** चरण ३ व ४–तिला कृष्णवियोगानें इतकें दुःख सोसावें लागत होतें तरी ती तें बाहेर न दाखवितां लपवून ठेवीत असे. **श्लोक ७६.** कुसुमशर; मदन. मदनाचे बाण फुलांचे आहेत असा कविसंकेत आहे, व म्हणूनच त्याला 'पुष्पधन्वा', 'कुसुमसायक' वगैरे नांवें आहेत. शरतल्पीं; बाणांच्या शय्येवर. तिची शय्या तिला बाणांसारखी दुःखप्रद होऊं लागली. भगवंतीं थोर निर्वाह आहे; भगवंतावर विश्वास असल्यामुळें तिच्या अंगीं वियोगजन्य दुःख सहन करण्याची शक्ति होती. **श्लोक ७८.** अनियत; भलत्या वेळीं; अनियमित वेळीं. चरण ३–डोक्यांत नीट चांगले अगवळ घालून केंस न बांधतां कांहींतरी जाड्याभरड्या दोऱ्या (नाडे) घालून कसे तरी केंस बांधून फिरसी. अनाडे; हे अडाणी मुली. **श्लोक ७९.** चरण १–तुझी भूक व तहान तुला न कळतच नाहींशा होतात; म्ह० तुला त्यांचें भानही रहात नाहीं. आंगमोडे तापाची कणकण. अकालीं; भलत्याच वेळीं; वृद्धपणीं आचरण्याचा योग तूं तरुण-पणींच कसा आचरतेस? निजध्यास; चिंतन.

**श्लोक ८०.** अजुनि; ( सं. अद्यपुनः; प्रा. अज्जउण. ) अन्नभूली; अन्नद्वेष. **श्लोक ८१.** चरण ३ व ४–तुझा यांच्याशींच काय तो परिचय आहे; तुझ्याकडे दुसऱ्या कोणत्या अपरिचिताची नजर जाणार ? **श्लोक ८२.** परेशी; ( परा =श्रेष्ठ. ) **श्लोक ८३.** प्रतिगृहीं; प्रत्येक घरांत, घरोघरीं. **श्लोक ८४.** नवसिले; ( सं. नमस् ) नवस केले. ( नामापासून क्रियापदाचें रूप. ) कांसवाची दृष्टि; प्रेमळ दृष्टि. चरण ४–इच्या प्रकृतीला गुण देऊन म्हणजे आराम पाडून माझे सर्व संकल्प ( नवस ) फेडून घ्यावे. **श्लोक ८६.** हिला पिशाचबाधा झाली आहे का पहा.

**श्लोक ८७.** बोलती बोलणारी; भुताची झाडणी करतांना त्यांच्याशीं बोलणाऱ्या स्त्रिया तिला विचारूं लागल्या. **श्लोक ८८.** चरण १–या स्त्रियांचें शहाणपण राजकन्येपुढें फार तर एखादा क्षण टिके; म्हणजे तें मुळींच टिकत नसे. **श्लोक ८९.** ललाट; ( सं. निटिल. ) चरण ३–ऐश्वर्य. चरण ४–विभूति करणें; अंगारा लावणें. **श्लोक ९०.** चरण ३–आपल्या विविध ( हृदयंगम ) कृत्यांनीं श्रीकृष्ण हांसला, म्हणजे त्यानें तिचें मन मोहून टाकलें. चित्तचैतन्य; चित्त हेंच चैतन्य, किंवा प्राण, चित्तसर्वस्व. **श्लोक ९३.** चांगलीशी; चांगलीच. चरण ३–सर्पीण चावल्यामुळें लहरी येत आहेत कीं काय ? चरण ४–पापिणीचा पदर लागला काय ? म्ह० पापिणीचा पदरसंपर्क झाल्यामुळें तुझी अशी अवस्था झाली काय ?

**श्लोक ९४.** चरण २–मनोरथ पूर्ण होण्याचा मार्ग दिसत नाहीं. **श्लोक ९६.** कर्णेजप जागराचे; तुझे डोळे जागरण झाल्याची चहाडी करितात, जागरण दर्शवितात. चरण ४--डोळे अश्रूंनीं भरून त्यांना समुद्राचे बंधु करूं नकोस. चरण १ व २–' प्रतीप ' अलंकार. **श्लोक ९८.** त्रिवेणीं; गंगा, यमुना, सरस्वति यांच्या संगमामध्यें स्नान करून तुझ्या प्राप्तीकरितां कोणीं तपश्चर्या केली ? पिनाकपाणी; शंकर. ' पिनाक ' हें शिवधनुष्याचें नांव आहे. हुताशनप्राशन. अग्निकाष्ठभक्षण. **श्लोक ९९.** चरण २–ज्याची इच्छा परिपूर्ण झाली आहे. खड्गधाराव्रत; असिधाराव्रत; अतिशय प्रखर तपश्चर्या. **श्लोक १०१.** शंबरारी; शंबरासुराचा शत्रु प्रद्युम्न ( मदन ). **श्लोक १०२.** तटस्थ; उदासीन वृत्तीनें; उदास मनानें. **श्लोक १०४.** नियमितच; खरोखर. श्वासनिवास; श्वासोच्छ्वास.

मी तुझा बहिश्चर प्राणच आहें. **श्लोक १०५. हें स्त्रीजन्म;** 'जन्म' मराठींत पुल्लिंगी असतांही येथें संस्कृताप्रमाणें नपुंसकलिंगी वापरला आहे.

**श्लोक १०७.** चरण २–त्याचा (प्रद्युम्नाचा) तात (कृष्ण) तुला कसा माहीत नाहीं? (प्रद्युम्न हा कृष्ण व रुक्मिणी यांचा मुलगा. या ठिकाणीं लग्नाच्या पूर्वीच कृष्णाचा मुलगा असा उल्लेख व तो स्वतः रुक्मिणीनें केल्यानें कालविपर्यास झाला आहे.) शेवटच्या दोन चरणांत 'स्वभावोक्ति' अलंकार सुंदर साधला आहे. **श्लोक १०८. ईजला हे बुजावी;** ('बुजणें', घाबरणें, या क्रियापदापासून 'बुजावी' हें प्रयोजक रूप.) हिनें आईला घाबरविलें. **श्लोक १११. पदयुगुल;** चरणद्वय. **आदान आहे;** घेणें आहे, हवें आहे. **श्लोक ११२. विदर्भाधीश;** विदर्भ (वऱ्हाड) देशाचा राजा. चरण ३–माझें सर्व पुण्य आज चांगलें फळास आलें. **अघटितघटणेनें;** असंभाव्य किंवा विलक्षण तऱ्हेनें. **उदेलें;** (सं. उद्+इ) उदय पावलें; भाग्योदय झाला.

**श्लोक ११४.** चरण २-यांचे दोष कोण नाहींसे करील? चरण ४–उपमा अलंकार. **श्लोक ११५. विचाराकारणें;** विचार करण्याकरितां. **श्लोक ११६.** रुक्मीच्या मुखांतून निघालेली कृष्णनिंदा त्याच्या उत्तम प्रकाराच्या किंवा परमेश्वरी गुणांमुळें अतिस्तुतिपरच झाली. **वैखरी;** परा, पश्यंती, मध्यमा व वैखरी या चार वाणींपैकीं एक. हिच्यामुळें शब्दाचा उच्चार होतो.

---

## सर्ग तिसरा

**श्लोक २. विचारल्यावीण;** विचार केल्यावांचून. **श्लोक ३.** चरण १, २–हिमालयानें आपली कन्या पार्वती स्मशानवासी नरकपाल धारण करणाऱ्या शंकराला देण्याचा अविचार केला, त्याचें फळ तसेंच झालें. **कपाळी;** शंकर. नरकपाल (कवटी) धारण करणारा. **श्लोक ४.** चरण १–तूंही त्या हिमालयासारखाच वागत आहेस. **श्लोक ६. गुणग्राहक रानटांचा;** रानटी माणसांचे, गोवळ्यांचे, गुण घेणारा; त्यांची स्तुति करणारा. **श्लोक ७. मातुल;** मामा (कंस). **मात्रशी;** (सं. मातृष्वसृका) पूतना. **श्लोक ८. वक्षस्थळ;** छाती. चरण

२–पूर्वी एकदां सर्व ऋषिमंडळींत ब्रह्मा, विष्णु व महेश यांत श्रेष्ठ कोण असा वाद पडल्यामुळें भृगु नांवाचा एक ब्राह्मण ऋषि या तिन्ही देवांची परीक्षा पाहण्यास निघाला. ब्रह्मदेव व शंकर यांच्याकडे जाऊन वंदन वगैरे न करतां त्यांना त्यानें शिव्या देण्यास आरंभ केला, तेव्हां ते देव त्याच्यावर फार क्रुद्ध झाले. त्यांचा राग शांत करून तो विष्णूकडे गेला व ते शांतपणें निजले असतां त्यांच्या छातीवर त्यानें लत्ताप्रहार केला. परंतु ते त्याच्यावर न रागावतां उलट 'आपल्या पदकमलाला कांहीं इजा झाली नाहीं ना?' असें विचारून त्याचे चरण चुरूं लागले. **श्लोक ९.** चरण १,२–तुझी कन्या मोठी गुणाची आहे. ती सगुण असतां निर्गुण अशा कृष्णाची पत्नी कशी होईल? निर्गुण या शब्दावर श्लेष केला आहे. **निर्गुण;** (१) चांगले गुण नसलेला; (२) त्रिगुणबाह्य परमात्मा. **श्लोक १०.** **हेरि जाली;** उत्तम राजकुमारी असून हेरि (दूती) झाली. किंवा 'हे रिजाली' हा प्रो. वा. म. जोशी सुचवितात असा पाठ घेऊन 'ही नीच झाली' असा अर्थ घ्यावा. 'रिजाली' (अरबी)=नीच, हलकट. पहिला पाठ अधिक बरा दिसतो. **श्लोक ११.** **निःसंग;** (१) तटस्थ, उदासीन; (२) निर्लज्ज. **अकर्मी;** (१) कुकर्मे करणारा, दुराचारी; (२) कर्में न करणारा. श्लेष. चरण ४–मानवधर्म काय आहेत, मनुष्याची आवडनिवड काय असते इकडे त्याचें लक्ष नसतें. अशा पतीच्या संगतींत रुक्मिणीला कोणतें सुख लागणार? **श्लोक १२.** **वृंदावनभूविहारी;** वृंदावनाच्या भूमीवर क्रीडा करणारा. **श्लोक १३.** **सबाह्य अभ्यंतर;** आंत–बाहेर, शरीरानें व मनानें. चरण २–केव्हांही बोलण्यांत बोल नाहीं. **कपाटच्चरवृत्ति;** फट्याखोऱ्यांतून भटकण्याची वृत्ति.

**श्लोक १४.** चरण १–हा टोणगे कसे वळावे एवढेंच जाणतो. चरण २–**हुंबरी घालणें;** हुंबरी नांवाचा गोवळ्यांचा खेळ खेळणें. **श्लोक १५.** चरण १–याला कधीं कुळगोताची जरूर लागली नाहीं. **श्लोक १६.** **कुत्सितनांदणूक;** कुवर्तन. **श्लोक १८.** चरण १–**होउनि भूत;** भूत=(१) सृष्टपदार्थ, (२) पिशाच्च. **श्लोक १९.** ह्या व पुढील तीन श्लोकांत कृष्णावतारापर्यंत झालेल्या परमेश्वराच्या आठ अवतारांचा उल्लेख आला आहे. **अमासा;** (१) मांसरहित; निबर; (२) लहानसा. **विरूपी;** कुरूप. **श्लोक २०.** चरण १ व २–वामनअवतारीं परमेश्वरानें बळीजवळ त्रिपाद भूमीची याचना केली अशी कथा आहे. **भार्गव;** भृगूचा (जमदग्नीचा) मुलगा परशुराम. चरण ३–जमदग्नीची पत्नी रेणुका इच्यावर तो एकदां कांहीं कारणानें

फार क्रुद्ध झाला असतां त्यानें आपल्या मुलांस तिला ठार मारण्यास सांगितलें. चार मुलांनी त्याची ती आज्ञा पाळली नाहीं, पण परशुरामानें आपल्या हातांतील परशूनें आईचा शिरच्छेद केला व बाप प्रसन्न झाल्यावर, ती पुन्हां सजीव व्हावी असा वर मागून त्यानें तिला सजीव केलें. **श्लोक २२.** चरण ४–मोक्ष-प्राप्तीमुळे संसारसुखाला मुकतात. **श्लोक २५.** पुंसृष्टि; पुरुषांची जात.

**श्लोक २८.** विचारिलीं; विचारांत घेतलीं; त्यांच्याविषयीं विचार केला. **श्लोक ३०.** चरण ३–लग्न लवकर उरकून घेण्याकरितां त्यानें जोशीबुवां-कडून कसा तरी लग्नमुहूर्त काढविला. **श्लोक ३५.** आंदणाचे; आंदण देण्याचे. चरण २–उत्प्रेक्षा. **श्लोक ३६.** चरण २–महासंच; मोठ्या पुठ्याचे किंवा बांध्याचे. तख्तरावा; (फा. तख्त, सिंहासन; रावन्, चालणारें.) बैलाच्या गाडीवर फळ्या टाकून त्यावर कलावंतिणीचा गांवांतून फिरता नाच करितात त्याला किंवा त्या फळ्यांना 'तख्त (क्त) रावा' असें म्हणतात.

**श्लोक ३८.** कडें; (सं. कटक.). सांखळी; (सं. शृंखला). तरल; नजर न ठरणारे. **श्लोक ३९.** मंदील; (फा. मिंदील) पटुतर; अति तलम. **श्लोक ४०.** आठ गोली; पदराला आठ गोल, वर्तुळें, असलेले (शेले.) **श्लोक ४१.** 'स्रग्धरा'. भेद खंबायिताचे; नानाप्रकारचीं खंबायती लुगडीं. लुगडें; (सं. दुकूल). **श्लोक ४२.** 'शार्दूलविक्रीडित'. सत्कृष्णागरुनिर्मिता; हा सर्व एक समास पाहिजे, (सत्+कृष्णागरु+निर्मिता); चांगल्या प्रकारच्या कृष्णागरूच्या म्हणजे चंदनाच्या केलेल्या. श्रीखंडखंडे; चंदनाचे तुकडे. **श्लोक ४३** हांडा; (सं. हण्डा). तांब्या; (सं. ताम्र). तिवई; (सं. त्रिपदी). खुजा; (फा. कूझा). तबकडी; (फा. तबक).

**श्लोक ४४.** चौरंग; (सं. चतुरंग) पलंगपोस; (सं. पर्यंक; फा. पलङ्ग. फा. पोश, चादर) समई; (फा. शमअ; सं. सन्दीपिका). रुमाल, (फा.). तबक; (फा.). जडें; रत्नखचित.

**श्लोक ४६.** तक्या (फा.). दुलीचे; कापूस भरलेले (उ. 'दुलई'). चांदवा; (सं. चन्द्र). **श्लोक ४९.** ऊंस पुंडे; पुंड्या जातीचे ऊस. **श्लोक ५०.**

'वसंततिलका.' **श्लोक ५१.** 'द्रुतविलंबित.' चरण १–आयती; श्रमावांचून मिळालेली. चरण २–आयनी; काम, कष्ट, श्रम. अविचारिका; अविचारी रुक्मीला.

**श्लोक ५२.** पेषण; दळणें. प्रथम 'दळण' शब्द आला असून पुन्हां 'पेषण' शब्द आल्यानें एकाच क्रियेची पुनरुक्ति झाली आहे. **श्लोक ५५.** चरण २, ३–'सोयऱ्यांत खाष्ट आणि भोजनांत लाष्ट' अशी म्हण आहे. **श्लोक ५६.** मुकासे; मुका + असे. लेहवी; लिहवी. **श्लोक ५९.** चित्त वसणें; मन रमणें. **श्लोक ६०.** चरण १–येणाऱ्या आपत्तीची (शिशुपालाशीं होऊं घातलेल्या लग्नाची) फार घाई होत होती. मायसीं; मातेशीं.

**श्लोक ६५.** चरण ४–इतक्या यातना सोसून ती जणूं कांहीं मदनाचें ऋणच फेडीत होती. **श्लोक ६६.** विंजणें जाणवीनी; पंख्यांनीं वारा घालतात.

**श्लोक ७०.** मूर्च्छेयेलागिं जातां; मूर्च्छा जात असतां, मूर्च्छा गेली तेव्हां. चरण ४–तिच्या मृदु भाषणाशीं अमृताची काय तुलना होणार? त्याच्यापुढें अमृतही फिकें पडेल. या ठिकाणीं उपमानापेक्षां उपमेयाचें श्रेष्ठत्व दाखविलें आहे, म्हणून 'व्यतिरेक' अलंकार झाला. **श्लोक ७१.** कळत कळत; कळून सवरून, समजून उमजून. पाजळणें; (सं. प्रज्वल्). **श्लोक ७३.** चरण १–करवतीवर धरल्याप्रमाणें होणाऱ्या या यातना आतां किती दिवस सोसूं? वारा होणें; वाताहात होणें, वाऱ्याप्रमाणें चारी दिशांना भडकून जाणें. दैवदुर्गार-धारा; दुर्दैवाचा अनावर वर्षाव.

**श्लोक ७५.** वोडनी सर्व सांधा; शरिरांतील नाड्या आखडतात. **श्लोक ७६.** अघटित घटना; न घडून येणारी विलक्षण गोष्ट. निजकुलपुरुषार्थी; आपल्या कुलाचा पराक्रम किंवा महत्त्व गाजविण्याची इच्छा करणारा. (उपरोधिक). **श्लोक ७८.** कलि; भांडण. हा संस्कृत पुल्लिंगी शब्द असून या ठिकाणीं स्त्रीलिंगी म्हणून वापरला आहे. चरण ४–लागणें; गोंधळून जाणें. **श्लोक ७९.** श्रुतिनिवह अखिल वेद, किंवा सर्व श्रुति. चरण १–अखिल वेद ज्याचें वर्णन करतांना अमूक एक वस्तु म्हणजे परमेश्वर किंवा ब्रह्म असें न सांगतां नकारार्थी, म्हणजे ब्रह्म काय नाहीं तें, सांगतात. निजहृदयनिकेतीं; आपल्या हृदयाच्या ठिकाणीं; हृदयांत. चरण ३–जयाचाच; 'जपाचाच' असा पाठ पाहिजे. ज्याचें नाम

स्मरण करणें हाच श्रीशंकराचा रात्रंदिवस धंदा आहे. **श्लोक ८१.** धांवण्या धांवणें; रक्षण किंवा सहाय्य करण्याकरितां धांवणें.

**श्लोक ८२. चरण** १–नानाप्रकारच्या सुखोपभोगांच्या वासनेच्या दुस्तर प्रवाहांत. या श्लोकांत पहिल्या चरणांत विषयोपभोगांची तृष्णा हीच कोणी एक दुस्तर नदी अशा सुंदर रूपकाची योजना करून तें रूपक शेवटपर्यंत फार चतुराईनें पार पाडलें आहे. **श्लोक ८३.** विदेशीं; श्रीकृष्णाच्या चरणकमला-पासून फार लांब असल्यामुळें तिला आपली जन्मभूमी परकीच वाटूं लागली असा भाव. **चरण** २–तुझ्याशिवाय माझ्या हल्लींच्या चमत्कारिक राहण्याचा (वागण्याचा) कुणाला उलगडा होणार आहे ? रहाणें; वागण्याची पद्धत; रहाटी. **श्लोक ८४. चरण** ४–(१) रवितनय म्ह० सूर्यपुत्र यम; त्याचा लुलाय म्ह० रेडा; त्याच्यावर मी स्वतःला आरूढ झालेली केव्हां पाहीन ? मला मृत्यु केव्हां घेऊन जाईल ? ('रवितनयलुलायारूढ' असा एक समास घेतल्यास हा अर्थ) (२) 'रवितनय लुलायारूढ' असे दोन निराळे शब्द घेतले तर 'रेड्यावर बसलेल्या यमाला केव्हां पाहीन' असा अर्थ घ्यावा. ही एवढी साधी गोष्ट पर्यायानें विचारली आहे म्हणून या ठिकाणीं 'पर्याय' किंवा 'पर्यायोक्त' अलंकार होतो. **श्लोक ८६.** **मत्तद्विरदकरटस्फोटन**; माजलेल्या हत्तीच्या गंडस्थलाचें विदारण. **जंबूकापसदमन**; क्षुद्र अशा कोल्ह्याचा पराभव. दृष्टांत अलंकार. **श्लोक ८७.** द्रुपदतनया; द्रौपदी. प्रल्हाद; प्र्‍हा (ल्हा) द. हिरण्यकशिपु राक्षसाचा मुलगा. हा बालपणापासून विष्णु-भक्त असल्यामुळें बापाचा त्याच्यावर फार रोष असे. एकदां तुझा ईश्वर कोठें आहे तें सांग असें विचारल्यावरून तो सर्वत्र आहे असें प्रल्हादानें उत्तर दिलें. तो या खांबांतसुद्धां आहे असें त्यानें सांगितलें. तेव्हां हिरण्यकशिपूनें त्या खांबाला लाथ मारतांच त्यांतून नृसिंहाचें रूप धारण करून विष्णु प्रगट झाले व त्यांनीं त्या दैत्याला ठार मारलें अशी कथा आहे. **श्लोक ८८.** दुरितचय; पापांचा सांठा. **चरण** ३, ४– माझा पापसंचय तुझ्या या निष्ठुरपणाच्या रूपानें फलद्रूप होत आहे कीं काय ?

**श्लोक ८९.** सुराराध्या; देवांनींसुद्धां जिची आराधना करावी अशी. **श्लोक ९१.** **करीं धरणें**; हातांत धरणें, मदत करणें. **श्लोक ९३.** मला अन्याय घडला; 'मला', माझ्याकडून. बगला; एका देवीचें नांव. वदनस्तंभ करावा; तोंड बंद करावें; त्याची वाचा बंद कर. मन तुगलें; मन मोकळें होत नाहीं. **श्लोक ९५.** **मातंकवाटीं**; (वाटी=वाडी) मातंगाच्या वाड्यांत. **चरण** ४–(१) तुझा हा

मत्त वाटेंत मत्त हत्तीप्रमाणें उभा आहे. (प्रो. चिं. त्रि. जोशी हा अर्थ सुचवितात.) (२) हा मत्त मातंक (रुक्मी) मला तुझ्या भक्ताला वाटीत आहे, चिरडीत आहे. (प्रो. पंगु). पहिला अर्थ अधिक बरा दिसतो.

**श्लोक ९६.** त्वरिता; त्वरा करणारी. **श्लोक ९७.** अतिनिगूढपराशयसूचिका; अत्यंत गुप्त असें दुसऱ्याचें मनोगत सुचविणारी; **श्लोक ९८** वरयक्षिणी. उत्तम यक्षस्त्री. **श्लोक ९९.** ह्या व पुढील श्लोकांत उत्तम प्रकारचें सृष्टिवर्णन दृष्टीस पडतें. संध्याकाल, व तदनंतरचा चंद्रोदय वगैरे वर्णनें निःसंशय फार बहारीचीं आहेत. सांज; (सं. संध्या). दिनकरकरलक्ष्मी; सूर्यकिरणांचें ऐश्वर्य. कमलांचा बंधु; चंद्र. चरण ३, ४–आपल्या इतर कमलबांधवांप्रमाणेंच हें मुखकमल ग्लान झालें आहे असें पाहून चंद्र तिला सुख देण्याच्या हेतूनें त्या ठिकाणीं आला (उगवला). **श्लोक १००.** चरण २–सूर्यास्तानंतर रात्रीं चक्रवाक व चक्रवाकी या पक्ष्यांचा नेहमीं वियोग होऊन दिवसां पुन्हां समागम होतो असा कविसंकेत आहे. चरण ३, ४–ब्रह्मदेवाच्या योजनेप्रमाणें (विधिविहितनियोगें) सूर्यानें वारुणीचा (पश्चिम दिशेचा) अंगीकार केला म्हणून सायंसंध्येला (संध्याकाळ) राग येऊन ती आरक्त झाली आहे काय ? **श्लोक १०१.** चरण २, ३ व ४–चंद्र स्वतः निरिच्छ असून त्यानें या सुंदरीशीं याचकवृत्ति स्वीकारली. ब्राह्मणाची नेहमींची भिक्षा मागण्याची वृत्ति (द्विजपति=१ ब्राह्मणश्रेष्ठ; २ चंद्र) न विसरतां त्यानें आपले किरणरूपी हात (कर=१ किरण; २ हात) पसरून तिच्याजवळ तिचें मुखलावण्य मागितलें. उपमानापेक्षां उपमेयाचें श्रेष्ठत्व दाखविल्यामुळें ‘व्यतिरेक’ अलंकार होतो. श्लेषहि आहे. **श्लोक १०२.** कांतिपूर; चंद्रप्रभेचे पूर. चंद्रकांत; हा मणि चंद्रकिरणांच्या सान्निध्यानें पाझरूं लागतो असा कविसंकेत आहे. चरण ३–चकोर पक्षी केवळ चंद्रकिरणांवर आपली उपजीविका करितात असा कविसंकेत.

**श्लोक १०४.** बाल रत्नाकराचें; समुद्रमंथनाच्या प्रसंगीं निघालेल्या चौदा रत्नांतील चंद्र हा एक आहे. चरण ३, ४-हे चंद्रा, तूं रत्नाकराचें सुंदर अपत्य असतांना ‘दोषाकर’ असें नांव धारण करतोस. दोषाकर; (१) (दोषा=रात्र) चंद्र; (२) दोष+आकार=दोषांची खाण. ‘विरोध’ किंवा ‘विरोधाभास’ अलंकार. **श्लोक १०५.** गुरुदारगामी; ‘गुरु’, बृहस्पती; त्याची दारा (पत्नी) तारा; इच्याशीं गमन करणारा. चंद्राला गुरुपत्नीगमनाचें पातक लागलें

होतें. उपरिनिर्दिष्ट पातकामुळें चंद्राच्या मागें क्षय लागला अशी कथा आहे. श्लोक १०१ पहा. **श्लोक १०७.** तुहिनकर; (सं. तुहिन=थंड. कर=किरण) चंद्र. ‘ अपन्हुति ’ अलंकार. उपमेय तें उपमेय नव्हे तर उपमानच आहे असें वर्णन असतें तेथें हा अलंकार होतो. भारे; पीडित होतो; भारावतो. **श्लोक १०८.** प्रलयदहनकल्प; प्रलयाग्नीसारखा. **श्लोक ११०.** चरण ४–कृष्णाचा विरह आतां कायमचा झाला. ( कळाशी बसणें=बेमालुम होणें. कळाशी=बेमालुम सांधा ). सोले; दुःखित होतें. वचे; जाई, जातो. **श्लोक १११.** चरण १ – समुद्रमंथनाच्या वेळीं बाहेर पडलेल्या चौदा रत्नांपैकीं चंद्र व विष हीं असल्यानें चंद्र हा विषाचा भाऊ होतो.

**श्लोक ११४.** सांवळा; ( सं. श्यामल ). झडपणें; भूतबाधा होणें. झाडणी करणे; अंगांतून भूत काढणें. **श्लोक ११५.** उतरती; अवतार घेती. निजअंशीं; आपआपल्या अंशानें. **श्लोक ११६.** चरण २–‘ रूपक ’ अलंकार. **श्लोक १२१** पुरुष पंचविसावा=सांख्यमताप्रमाणें २५ वें तत्त्व ‘ सर्वसाक्षी पुरुष ’. **श्लोक १२४.** मनोगज; मनरूप हत्ती. प्रणतभक्तकदंबा; भक्तसमूहांनीं नमस्कारिलेली. **श्लोक १२५**, चरण ४–मदनाला जाळून जरी तूं त्याचें भस्म केलेंस तरी त्याचा तूं पुरा नायनाट केला नाहींस, कारण तो अद्याप मला त्रास देत आहे.

**श्लोक १२८.** चरण १–गौतम ऋषीची धर्मपत्नी अहल्या. चरण ३–दक्षाच्या सत्तावीस कन्यांना चंद्रानें वरिलें होतें, पण त्यांत त्याचें रोहिणीवर विशेष प्रेम होतें. यामुळें राग येऊन दक्षानें त्याला ‘ तूं क्षयरोगी होशील ’ असा शाप दिला; पण पुढें इतर मुलींनीं त्याची प्रार्थना केल्यामुळें ‘ हा क्षय सतत न टिकतां महिन्यांतून एक पंधरवडा राहील ’ असा त्यानें उःशाप दिला. चरण ४–कार्तिकेयाची कथा प्रसिद्धच आहे. जोगी; ( सं. योगी ). **श्लोक १३३.** चरण २–मग ती काय पत्रलेखनाला विलंब करणार ? **श्लोक १३४.** पूर्वीपूर्वक; पत्राच्या आरंभींचा मायना लिहून. स्वीयो…पठनीं; आपली वार्ता सांगण्याच्या अभ्यासांत. अध्यापिली; सुशिक्षित, शिकलेली.

---

# सर्ग चवथा

**श्लोक १.** दौत्यार्थ; दूताचें काम करण्याकरितां. **श्लोक २.** वेदांग; शिक्षा, कल्प, व्याकरण, छंदस्, ज्योतिष व निरुक्त यांतील प्रत्येक शास्त्र. **लौकिकरीति;** व्यवहार. **श्लोक ५.** मंत्राक्षता; वेदमंत्र म्हटल्यानंतर ब्राह्मण यजमानास आशीर्वादपर तांदळाचे दाणे देतात ते. **श्लोक ७.** विषयविषधर; विषय (काम) रूपी सर्प. **भारी** (चरण २); मारून टाकील. **श्लोक ८.** मुद्रामुद्रित; अंगठीची मुद्रा (छाप) करून. **चरण** २–भीमकसुतेला उजवी घालून गेला. **श्रीपतिपादपंकजयुगीं;** श्रीकृष्णाच्या चरणकमलाच्या ठिकाणीं.

**श्लोक १२.** चरण ४–हंसक्षीरन्यायानें तूं मनांत निवड कर. **श्लोक १३.** उच्चावच; उच्च व हलके. **श्लोक १६.** शोकार्णवकर्णधारा; शोकसमुद्रांतून पार वाहून नेणारा सुकाण्या. **श्लोक २३.** चरण २–जिवाची लाही करीन. **श्लोक २४.** प्रस्थान करणें; निघून जाणें.

**श्लोक २६.** फासां पडे; पाशांत (जाळ्यांत) सांपडे. फांसा, (सं. पाश). **श्लोक २७.** चरण ३–तुझ्या नाममुक्तांचा (नांव हेंच मोती) चारा. **श्लोक ३१.** वचनीय सीमा; बोलण्याची सीमा. **श्लोक ३२.** चरण ४–रुक्मिणीसारख्या राजकन्येच्या तोंडीं, विशेषंकरून ती सुदेवाबरोबर तोंडी निरोप सांगत असतांना, हे शब्द शोभत नाहींत. (सर्ग ३, श्लोक १२३ पहा.) **श्लोक ३३.** अनर्कसंपर्क; सूर्याशिवाय इतरांचा संपर्क **श्लोक ३६.** समयप्रतीक्षा; योग्य वेळेची वाट पाहणें. **श्लोक ३७.** जशातशाहां; वाटेल तिला, भलतीला. ठाव व्हावा; स्थान मिळावें. ठाव, (सं. स्थान.)

**श्लोक ४१.** धाकेत; धाक बाळगतात, भितात. **श्लोक ४३.** चरित्र; स्थिति. **श्लोक ४४.** विहंगमकुळें; पक्ष्यांचे समुदाय. बाहती; एकमेकाला बोलावतात. नुतिपाठक; स्तुतिपाठक. या व पुढील श्लोकांत प्रातःकाळचें फार सुंदर वर्णन आहे. जुन्या मराठी काव्यांत निसर्गाचें वर्णन नाहीं असें म्हणणारांनीं हे श्लोक, व तसेंच तिसऱ्या सर्गातील ९९ पासून पुढील श्लोक अवश्य वाचावेत. **श्लोक ४५.** निःश्रीक; निस्तेज, गतवैभव. **चरण** ३–प्रातःकाळच्या प्रकाशामुळें तारे अदृश्य होऊं लागले.

श्लोक ४६-५२. रम्य कल्पनेनें भरलेले आहेत. यांत पहाटेच्या वेळीं रुक्मिणीला स्वप्नांत झालेलें कृष्णदर्शन, कृष्णाची मनोहर मूर्ति, उभयतांचें प्रेमयुक्त संमीलन इ० शब्दचित्र कवीनें बहारीचें रेखलें आहे. श्लोक ४७. ध्यानीं वसे तें स्वप्नीं दिसे या म्हणीप्रमाणें रुक्मिणीला स्वप्नांत कृष्णभेट होते. श्लोक ५२. निधि; कृष्णरूपी संचय. श्लोक ५३. पक्षद्वार; बाजूचा दरवाजा. क्षेमशंसी; क्षेम ( हित किंवा कल्याण ) सुचविणारा. काकपक्षी, पाण्यानें भरलेल्या घागरी, सवत्स धेनु, सुवासिनी वगैरे शुभ शकुन होत.

श्लोक ५६. मधुकरपटली; भृंगसमूह. चरण ४- रात्रीं मिटलेलीं कमलदलें सूर्योदयानें उघडल्यामुळें त्यांत सांपडलेल्या भुंग्यांची आतां सुटका झाली. श्लोक ५८. निजपोष्यें; आपले आश्रित. श्लोक ५९. पृथ्वीवृत्त. स्मरणमालिका; जपमाळ, स्मरणी.

श्लोक ६५. गार्हपत्य; श्रौताग्नि धारण करणाऱ्या ब्राह्मणाच्या पांच अग्नींपैकीं एक. ते पांच अग्नि-दक्षिणाग्नि, गार्हपत्य, आहवनीय, सभ्य, आवसथ्य. श्लोक ६७. जीव देऊनि वाणि; जिवाला त्रास देऊन. वाणी; वाण, उणीव.

श्लोक ७३, कृष्णवर्त्मा; ( चरण १ ) अग्नि; ( चरण २ ) कृष्णाचा मार्ग. श्लोक ७६, ७७. सुंदर दीर्घ रूपक. तद्वपि; 'तदपि' असें पाहिजे. निजसुख, आत्मज्ञानाचें सुख. त्रिविध वारे; आध्यात्मिक, आधिदैविक व आधिभौतिक संकटें.

श्लोक ८०. हे मनाचे श्लोक सरस असून त्यांत कवीचें भावनानिदर्शन, भाषाप्रभुत्व व कल्पना हे गुण चांगले व्यक्त होतात. श्लोक ८१. चरण २ व ३- जिच्याकरितां ( पत्नीकरितां ) तूं इतकी लुडबूड करतोस ती तुला मुळींच विचारीत नाही; पण त्याबद्दल तुला वाईट वाटत नाहीं, किंवा रागही येत नाहीं. श्लोक ८३. शांतिकांता; शांतिरूप कांता.

श्लोक ८४. विषयविरति; विषयांपासून परावृत्त होणें. श्लोक ८५. चरण ४- या रसज्ञ जिव्हेनें माझे उपकार अशा रीतीनें हरिनाम न घेतां परनिंदा करून फेडले काय ? श्लोक ८८. विधिनिषेधी; धर्मनियम मोडण्यांत, धर्मनियमांचा निषेध करण्यांत .

श्लोक ९१. वासनाबंध; ( समास पाहिजे. ) श्लोक ९३. अपर गति; उत्कृष्ट गति, मोक्ष. जन्मा नयोनी; पुनर्जन्म न पावून. श्लोक ९४ चरण

३–तुझी कल्पना ( परमेश्वराव्यतिरिक्त मनांत येणाऱ्या कल्पना, विचार ) नष्ट व्हावी असें जर तुला वाटत असेल.कळस ढळणें; मोडून जाणें, नष्ट होणें. **श्लोक ९६.** विषयविषममार्गीं; विषयांच्या दुस्तर मार्गात. क्षेत्रसंन्यास; शरीराचा त्याग, मरणें. **श्लोक ९७.** यदुपतिपदवी; श्रीकृष्णाकडे ( परमेश्वराकडे ) जाण्याचा मार्ग. साही शत्रु; षड्विकार.

**श्लोक ९८.** चरण ४–हा परमेश्वरप्राप्तीचा योग मनुष्यजन्माशिवाय इतर कोणत्या उत्तम जन्मांत घडून येईल ! **श्लोक ९९.** तत्त्वमस्यादि; 'तत्त्वमसि'= तूंच तें ( ब्रह्म ) आहेस, तुला सहज ब्रह्मज्ञान होईल, हा अर्थ. **श्लोक १००.** ' यूथिका ' वृत्त. जगत्रय सावली; ' जगत्रयसावली ' असा एक समास पाहिजे. विसांवली; शांत झाली , हृदयांत उत्पन्न होणारे विचार व विकार शांत झाले. **श्लोक १०१.** वृत्त स्वागता. **श्लोक १०४.** परीस; ( सं. स्पर्श. ) नाकनायक; स्वर्गाधिपति इंद्र.

**श्लोक १०५.** द्वैतभान; परमेश्वर व जीव हे भिन्न अशी जाणीव. **श्लोक १०७.** अनादिसुख; ब्रह्मसुख. **श्लोक १०९.** मिळें; ( संस्कृताप्रमाणे नपुंसकलिंगी उपयोग ). **श्लोक ११०,** चरण ३–४ ( १ ) ममत्व ( व तदुद्भव द्वैतभाव ) नाहींसे होऊन जिवाशिवाची, जीवात्म्याची व परमात्म्याची, समता अधिकाधिक होऊं लागली. ( २ ) समदृष्टि होऊं लागते. **श्लोक ११३** चरण ३ विषयांकडे धांवणारें मन मागें परततें. **श्लोक ११७.** गुणत्रयफांसा; त्रिगुणात्मक संसाराचा पाश किंवा बंधन.

**श्लोक १२२.** अर्थ :-मायेची निद्रा ( मोह ) मला लागल्यामुळें मी तुला विसरलों होतों. आतां तूं मला त्या निद्रेंतून जागें केल्यामुळें झालेल्या ज्ञानानें माझ्या संचिताचा ( कर्मांचा ) नाश झाला आहे व सर्व संसारबंधनें तुटून गेलीं आहेत. परमेश्वरा, केवढी ही तुझी माझ्यावर दया ! **श्लोक १२३.** खेळ संसाररूपी खेळ. **श्लोक १२७.** परदेशीं; ऐहिक संसाररूपी परदेशांत. **श्लोक १३१** पाश; मोहपाश. उगवावा; मोकळा करावा. सोडवावा.

**श्लोक १३२.** हरिस्तव; कृष्णस्तुति, स्तोत्र. **श्लोक १३३.** हरिणी वृत्त.

---

# सर्ग पांचवा

**श्लोक** १. ' शिखरिणी.' **हेमनगरी;** द्वारका. **त्रिभुवननिधान;** तिन्ही लोकांना निधीप्रमाणें वाटणारा श्रीकृष्ण.

**श्लोक ४.** " अयोध्या मथुरा माया काशी काञ्ची अवन्तिका । पुरी द्वारावती चैव सप्तैते मोक्षदायिकाः ॥ " **श्लोक** ५. ' प्रतीप ' अलंकार. **अलका,** कुबेराची राजधानी. **अमरावती;** इंद्राची राजधानी. **श्लोक ७. सिद्धि;** अष्टसिद्धिः अणिमा, महिमा, गरिमा, लघिमा, प्राप्ति, प्राकाम्य, ईशित्व आणि वशित्व. **चरण** ४– ' जे ' ऐवजीं ' ते ' घेणें बरें. ' ते '=तेथील लोक. **श्लोक ८. बिदोबिदीं;** रस्तोरस्तीं. **श्लोक** १०. **अधिष्ठिनी;** उभ्या राहतात. **सज्यांला;** सज्जांत. **श्लोक** ११ **सबाळ;** आपल्या मुलांना बरोबर घेऊन. **कृष्णांघ्रिसरोरुहार्चा;** कृष्णाच्या चरण ( अंघ्रि )-कमलांची पूजा. **श्लोक १३. वेदान्तिक कारिका;** वेदान्तावरचे श्लोक किंवा सूत्रें.

**श्लोक १५.** ' मालिनी. ' **श्लोक १६. पीयूषवापी;** अमृताच्या विहिरी. **श्लोक** १९. **उच्चैःश्रवे;** इंद्राच्या घोड्यासारखे ( उच्चैःश्रव्यासारखे ) घोडे. **श्लोक २२.** चार **मुक्ति;** सलोकता, समीपता, सरूपता, सायुज्यता. ( भक्ताला परमेश्वरभक्तीपुढें चारी मुक्तांचीहि पर्वा नसते. ) **श्लोक २३. जयविजय;** वैकुंठलोकाचे विष्णूचे द्वारपाल. **चरण** ४– मुनिजनांचें मन ज्याकडे लागलें असा जो श्रीकृष्ण त्याला पहात आहे. **श्लोक २४. निगूढ;** त्याला न दिसेल अशा रीतीने, एकीकडे. **अक्रूर;** कृष्णाचा मित्र.

**श्लोक २५. चरण** ३ व ४– **वेत्रयष्टी;** ( १ ) भालदाराच्या हातांतील काठी. भालदाराची काठी हातांत घेतली, भालदाराची जागा पतकरण्यास तयार झालें, तरी सुद्धां श्रीकृष्ण दृष्टीस पडेना हा भाव; ( २ ) भालदार–चोपदार देवांची दाटी मोडण्याकरितां काठ्यांनीं मारीत असतां त्या काठ्या किरीटांवर बसल्या तरी सुद्धां दर्शन होत नव्हतें. ( कानिटकर ). **श्लोक २६. स्वर्लोकलोकाधिप,** स्वर्गाचा लोकाधिप म्ह. राजा, इंद्र. **चरण** ४–योग्यतेप्रमाणें आसनें दाखविणारा. **श्लोक २७. गंडूषविधि;** चूळ ( गंडूष ) भरणें, तोंड धुणें. **श्लोक २८. तांबूलकरंक;** विड्याची पेटी, करंडा. **पतद्ग्रही;** ( सं. पतद्ग्रह ) पिकदाणी, तस्त. **श्लोक**

२९. स्फुट होय; उमलतें. **श्लोक ३०.** आसा; धनुष्य (सं. आस; धनुष्य) **श्लोक ३२.** नादरीती; (न+आदरीती). **श्लोक ३४.** आपाद; पायांला लागणारी, पायांला पोहोंचणारी.

**श्लोक ३८.** चरण १ व २–धोतरानें कंबर कसली होती ती सोडून रुक्मिणीचें पत्र काढलें. राहवावे; राहूं द्यावें, बाजूला ठेवावें. **श्लोक ३९.** दिक्पती; अष्ट-दिक्पाल. **श्लोक ४०.** वाद्यध्वनि; वाद्यांचा आवाज. कलाली; कलली, वांकली. **श्लोक ४१.** समुत्थानवेळा; उठण्याची (कचेरी बरखास्त होण्याची) वेळ.

**श्लोक ५२.** उद्धव; कृष्णाचा चुलता व परमभक्त.

**श्लोक ५५.** अधरी; निराधार करतो, खालीं आणतो. **श्लोक ५६.** असदुद्योग; दुष्कर्मांचा व्यवसाय. सुरपतितरु; कल्पवृक्ष. **श्लोक ५७.** चरण १–जे (यती) मोठ्या प्रयासानें संसारांतील विषयपाशांचा उलगडा किंवा छेद करतात. अहं-बुद्धि; अभिमान. **श्लोक ५८.** निजानंद; ब्रह्मानंद. निजकर्में निचरणें; कर्मांचा निचरा करणें, म्हणजे कर्मांचा (कर्मफलाचा) आपल्यावर परिणाम होऊं न देणें. **श्लोक ५९.** धांवती; (नाम.) धांवणें. निजनिलयकारागृह; आपला देह (निलय=वसतिस्थान, घर) हाच कारागृह; देहबुद्धि नाहींशी होते हा भाव.

**श्लोक ६०.** जीवाभिधविहग; जीव नांवाचा पक्षी.. **श्लोक ६१.** दुरितचय-पाथोनिधि; (पाथोनिधि=समुद्र) पापसंचयाचा समुद्र. **श्लोक ६३.** स्वपरजन-वैषम्य; आपपराविषयीं विषमभाव. **श्लोक ६४.** चहूंमध्यें; चार आश्रमांत. १ ब्रह्मचर्य, २ गार्हस्थ (गृहस्थाश्रम), ३ वानप्रस्थ, ४ संन्यास. सुरपतिपुर; इंद्राची नगरी, अमरावती. **श्लोक ६५.** मूढप्रवरवर; अतिमूर्खांचा शिरोमणि. विप्रध्रुव; नांवाचा ब्राह्मण. **श्लोक ६६.** वंशविपिनीं; कुटुंबरूपी अरण्यांत. **महांधाचे**; याऐवजीं श्री. कानिटकरांनीं मदांधाचे असा योग्य पाठ सुचविला आहे.

**श्लोक ६९.** तदुद्देशें; त्यांच्यासाठीं.

**श्लोक ७३ व ७४.** यांत फार सुंदर रूपक साधलें आहे. जीवपथिक; जीव हाच प्रवासी. **श्लोक ७६.** सगुण भजन; परमेश्वराच्या सगुण मूर्तीचें भजन. चरण ३–मग तो सहजच सत्त्वगुणाच्या कसोटीला उतरतो, म्ह० पूर्णपणें सात्त्विक बनतो. चरण ४– मनाची क्रिया विचार करणें; तीच मन विसरतें. **श्लोक ७७.** वेदान्त, ब्रह्म हेंच सत्य, जग हें मिथ्या असें सांगणारें, व जीवात्मा व परमात्मा

यांच ऐक्य दाखविणारें मत. जिवशिवां; जीवात्मा व परमात्मा यांमध्यें. **श्लोक ७८. मुमुक्षा**; जन्ममरणांपासून मुक्त होण्याची इच्छा. **चरण ४**–ज्याप्रमाणें ख-पुष्पाला ( गगनकुसुम ) अस्तित्व नाहीं, त्याप्रमाणें बंधाभावीं मुमुक्षेलाही अस्तित्व नाहीं. बंधच नाहींत तर बंधापासून मोक्ष ( सुटका ) तरी कसा संभवणार ?

**श्लोक ८१**. तुरीयावस्था; सुषुप्ति, स्वप्न, जागृति व तुर्या ( किंवा तुरीया ) या चार अवस्थांपैकीं ब्रह्माशीं तादात्म्य होण्याची स्थिति. **श्लोक ८२. विदर्भ**; वऱ्हाड. **श्लोक ८५. चरण ३**–ओज, प्रसाद, माधुर्य इ० काव्यगुण आहेत. संपदा; काव्यगुणसंपत्ति. **श्लोक ८६. तीर्थस्वरूपचरण**, तीर्थाप्रमाणें पवित्र चरण असलेला. **समवाप्तकाम**; सर्व इच्छा पूर्ण झालेला. **श्लोक ८७. शिरोवतंसा**; शिरोमणि. **चरण ३**–मराठी पत्रांत नेहमीं येणारा मायना ' सह ' खेरीज करून असाच असतो.

**श्लोक ८९**. चरण २–योगिश्रेष्ठाच्या हृत्कमलरूपी पिंजऱ्यांत राहणारा पोपट. **श्लोक ९१. भवदीय गुणौघ**; तुमच्या गुणांचा प्रवाह. **ताप तीन्ही**; आधिभौतिक, आधिदैविक, आध्यात्मिक. **श्लोक ३. चरण ३**– विद्या, तरुण वय, संपत्ति, सौंदर्य व सद्गुण यांचें स्थान.

**श्लोक ९५. वीरभाग**; वीरालाच योग्य असा भाग. **चरण २**–वीरांमध्यें तुझी तत्काळ फजीती होईल; ते निंदाव्यंजक टाळ्या पिटतील. सिंहामिष; सिंहाचा भाग. **आमिष**; मांस. **श्लोक ९६ पाणिग्रहास करिजे**; पाणिग्रहण कर, लग्न कर. **श्लोक ९७**. रक्षोविवाह; कन्येला पळवून नेऊन बळजबरीनें केलेला विवाह. राक्षसविवाह. आठ विवाहप्रकारांपैकीं एक. **श्लोक ९९. निजमनोरथदायिकेचें**; आपले मनोरथ पूर्ण करणारीचें. **श्लोक १००**. पदांबुजरजस्नपनें; चरण-कमलाच्या धुळीच्या स्नानानें, विलेपनानें. **श्लोक १०१**. त्वत्प्रापकें; तुझी प्राप्ति करून देणारीं.

**श्लोक १०६ परावर**; अत्यंत श्रेष्ठ. **श्लोक १०७. करभोरु**; ( करभ=हाताच्या मनगटापासून बोटांपर्यंतचा भाग. ऊरु=मांडी. ) जिच्या मांड्या सुंदर आहेत अशी स्त्री. **श्लोक १०८.** जो; जो विधु ( चंद्र ). **श्लोक ११०. कपाळपाटी**, कपाळाचा भव्य पट्टा. **श्लोक १११. चरण २**—कान पाहिले

म्हणजे सुवर्णाच्या शिंगल्याच आहेत की काय असा भ्रम निर्माण होतो. तिलप्रसून; तिळाचें फूल.

**श्लोक ११४.** विळासभू; विलासस्थान. **श्लोक ११५.** माजे; कंवरेमुळें; कंवरेकडे पाहून. **श्लोक १२१.** सामुद्रिक लक्षणांनीं; ( सामुद्रिक; हातापायांवरच्या रेषा पाहून भविष्य सांगण्याचें शास्त्र ). हातांपायांवरील रेषांनीं. **श्लोक १२४.** गोरी, स्वच्छ, मोकळ्या मनाची.

**श्लोक १२७.** दशमी अवस्था; मूर्च्छा; प्रेमीजनाच्या दहा अवस्था सांगितल्या आहेत, त्यांना 'अवस्थादशक' असें म्हणतात. त्यांतील दहावी अवस्था, मूर्च्छा. अवस्थादशक पुढीलप्रमाणें वर्णिलें आहे :—"दृङ् मनःसंगसंकल्पौ जागरः कृशताऽरतिः। ऱ्हीत्यागोन्मादमूर्च्छांता इत्यनंगदशा दश ॥१॥ **श्लोक १३०.** नटनाट्य; कृष्णा, तूं अवतारधारी परमेश्वर नट आहेस, व हे सर्व तुझे खेळ आहेत. **श्लोक १३२.** दीर्घसूत्री; लांबण लावणारा, विलंब करणारा. **श्लोक १३७.** पेशलांगी; मृद्वंगी. **श्लोक १३८.** पणपूर्वं; शपथ घेऊन. प्रस्थाननक्षत्र; प्रवासास निघण्याकरितां अनुकूल नक्षत्र. गुरुपुष्य; गुरुवारीं पुष्य नक्षत्र आलें म्हणजे गुरुपुष्य योग म्हणतात. हा चांगला योग आहे. यालाच अमृतसिद्धियोग म्हणतात. **श्लोक १३९.** देवक; लग्नमुंज इत्यादि कार्यांच्या सिद्ध्यर्थ देवतास्थापन.

**श्लोक १४१.** दारुक; कृष्णाचा सारथी. **श्लोक १४३.** चरण २—प्राणप्रियेच्या सुंदर कथांनीं करमणूक करून. अनर्त; एक प्राचीन देश. हल्लींचा काठेवाड. त्याची द्वारका राजधानी होती. हिलाच आनर्तनगरी असें प्राचीन नांव होतें.

---

## सर्ग सहावा

**श्लोक १.** चतुरंगसेना; हत्ती, घोडे, रथ व पायदळ हीं चार अंगें ज्यांत आहेत असें सैन्य. रजोविशेषें; धुळीच्या लोटांनीं. **श्लोक २.** चरण १—रुक्मीनें

नगराबाहेर येऊन त्याचें स्वागत केलें. **श्लोक ५.** काश्मीरसंसेचित; केशराचा सडा घातलेली. सदंभा; गर्विष्ठ, मानी.

**श्लोक ८.** जरासंध; बृहद्रथाचा मुलगा व कंसाचा सासरा. याच्या शरीराचीं उपजतांच दोन छकलें होतीं. तीं 'जरा' नांवाच्या राक्षसीनें सांधलीं, व त्यामुळें त्याला जरासंध हें नांव प्राप्त झालें. **श्लोक १३.** अतिमृदुतरबाला; अतिशय मऊ केंसांच्या किंवा लेंकरीच्या.

**श्लोक १७.** चरण २–चौक; लग्नकार्यांत तांदूळ, गहूं वगैरेचा पाटावर घालतात तो. **श्लोक १९.** संप्रोछन; (सं+प्र+उच्छ्=पुसणें; प्राकृत· प्रोच्छन) अंग पुसणें. **श्लोक २०.** बाळातपीं; कोवळ्या उन्हांत. **श्लोक २४.** चरण १–कानांतील बाळ्यांचे प्रकार.

**श्लोक २७.** दशावतारांकित; परमेश्वराच्या दहा अवतारांचीं चित्रें काढलेल्या. **श्लोक २९.** अपेटी, अमाळा. पेट्या व माळा हे अलंकार निस्तेज झाले. (पंगु). **श्लोक ३०.** सज; सज्ज, सुशोभित. **श्लोक ३२.** कावरोधे; कां अवरोधे. (अवरोधे–अडथळा करतो, आड येतो.) **श्लोक ३६.** पुण्याहवाचन; विवाहादि मंगलकार्यांतील प्रारंभींचें धर्मकृत्य. नीरांजन करणें; औक्षण करणें, ओवाळणें.

**श्लोक ३७.** पद्मापदोपासक; लक्ष्मीच्या चरणाचे भक्त. **श्लोक ४३** वस्तुविवेक; तत्त्वाचा, सत्यब्रह्माचा विचार. **श्लोक ४५.** अजपा; 'हंस' नांवाचा मंत्र, यांत प्राणायामाचा संबंध येतो. **श्लोक ४६.** पांच्या; (सं. पंचिका=ऐतरेय ब्राह्मणग्रंथांतील प्रत्येक पुस्तकाचें नांव.) ऐतरेय ब्राह्मणग्रंथ. **श्लोक ४७.** श्रीशमुद्रा, विष्णुमुद्रा, वैष्णवांच्या मुद्रा. निद्रा, 'निद्रा' ऐवजीं 'रुद्रा' असा चांगला पाठ प्रो. पंगु सुचवितात. पण त्याला हस्तलिखित प्रतींत आधार नाहीं.

**श्लोक ५०.** गोडखे; गोडखाऊ. (कानिटकर) **श्लोक ६२.** कपालें; चरण १–कपालें (मनुष्याच्या कवट्या धारण करणारे कापालिक. निग्रहस्थान, पराजय. **श्लोक ६३.** चरण २–या श्लोकांत मीमांसक नैय्यायिकांना दोष देतात. नैय्यायिक पटाचें उपादान कारण सांगतांना 'वेमा' (मागाची फणी)

व 'तुरी' (धोटा), व घटाचें उपादानकारण सांगतांना 'चक्र' (कुंभाराचें चाक) हीं उदाहरणें देतात. 'तुमची बडबड केवळ बौद्धिक आहे; परमार्थ-दायक नाहीं' असा भाव. (पंगु).

**श्लोक ८२.** कर्कर; (?) **श्लोक ८६.** करजल पुतळी; करपुतळी. दिवा व काजळ लावलेलें भांडें घेऊन शकुन पहाण्याची तऱ्हा. **श्लोक ८७.** पदरेंसीं; एकस्या पदरानें; दुसरें कांहीं पांघरावयास न घेतां.

**श्लोक ९५.** सभाक्षोभ; सभा पाहून गांगरून जाणें.

**श्लोक १००.** कृष्णार्थ; द्रौपदीकरितां. **श्लोक १०१.** पांखरूं; गरुड, विष्णूचें वाहन. **श्लोक १०४, १०५.** रुक्मीला उद्देशून बोलते. **श्लोक १०८.** क्षितिधर-कुलोत्तंसकुलजा; गिरिकुलांत श्रेष्ठ अशा कुलांत जन्म पावलेली हिमनगतनया पार्वती. शरीरार्धपत्तिका; शरीरार्धाची स्वामिनी.

**श्लोक १०९** कारुण्य लहरी; 'कारुण्यलहरी' असा एक समास घ्यावा. **श्लोक ११०.** विश्वप्रणितचरित; ज्याचें चरित्र अखिल जगताच्यापुढें आहे, असा. या श्लोकाचे पहिले दोन चरण निर्यमक आहेत. पावेसि; पावशील. **श्लोक १११.** न मनिं; मानूं नको. **श्लोक ११२.** पहिल्या दोन चरणांत 'सम' अलंकार आहे. दोन पदार्थांचा यथायोग्य योग वर्णिला असतां 'सम' अलंकार होतो. हा योग दोन चांगल्या किंवा वाईट वस्तूंमध्ये असतो. **श्लोक ११५.** कुसुमशरनालीकनलिका; मदनाचे बाण ठेवण्याची नळी.

**श्लोक ११६.** मदन किंवा प्रद्युम्न हा रुक्मिणी व कृष्ण यांचा मुलगा असल्यामुळें, रुक्मिणीनें लग्नाच्या आधीं आपण त्याची माता असा उल्लेख केल्यानें या ठिकाणीं कालविपर्यास झाला आहे. **श्लोक ११९.** वितर्कां-वर्तीं; वितर्कांच्या भोवऱ्यांत. **श्लोक १२२.** प्रकृतिकमनीया; स्वभावतः सुंदर असलेली.

---

**श्लोक १२३.** रागेजासिल; रागावशील, **श्लोक १२६.** अवश्यंभावी; अवश्य घडून येणारें.

**श्लोक १३४.** चरण १-( १ ) सूर्याशिवाय मनुष्यांस रात्र कंठावी लागते तशी तुझ्याशिवाय माझी स्थिति झाली आहे. तुझ्याशिवाय मला सुखाचा प्रकाश मिळत नाही. **अवस;** अमावास्या. ( २ ) **अवस** = हौस, आवड, (फारशी ' हवस '=अवस ), ( कानिटकर ). पहिलाच अर्थ बरा वाटतो. **श्लोक १३८.** चरण ४-कृष्णाशिवाय तिच्या जिवाची उलघाल होत होती. **श्लोक १३९. प्रमद्‌विपिनगर्भी;** क्रीडोद्यानाच्या मध्यभागीं.

**श्लोक १४२. ध्रुव व गजेंद्र;** ( सर्ग १-श्लोक ९ टीप पहा ). **अंबरीष;** हा एक विष्णुभक्त राजा होता. त्याचें सत्त्व पहाण्याकरितां एका द्वादशीच्या दिवशीं पहांटेच दुर्वास ऋषि त्याच्याकडे गेले व 'स्नान करून भोजनास येतां' असें सांगून नदीतीरावर गेले व सूर्योदयापर्यंत परत आले नाहींत. इकडे सूर्योदयाला एकादशीचें पारणें फेडावयाचें असल्यामुळें राजाला मोठी अडचण पडली. अतिथीला टाकून आपण भोजन करणें योग्य नसल्यामुळें त्यानें एक तुळशीपत्र तोंडांत टाकून पारणें फेडलें, पण दुर्वास परत आल्यावर त्याला तेंही खपलें नाहीं, व त्यानें राजाचा फार छळ केला. शेवटीं, परमेश्वरानें आपलें सुदर्शन चक्र ऋषीच्या पाठीस लावून त्याला अंबरीषापुढें शरण जावयास भाग पाडलें. **श्लोक १४५. आठव्या;** कृष्णावतार आठवा होता.

**श्लोक १४९.** चरण ४-**भेद दिधला;** घरांतील भीमक व रुक्मी यांच्यामधील मतभेद कळविला. **अपराधीण;** ( उपरोधिक. ) **श्लोक १५२. पृथा;** पांडवांची आई, कुंती. धर्माच्या राजसूययज्ञांत श्रीकृष्णानें उष्टीं काढिलीं त्याला उद्देशून ही ओळ आहे.

**श्लोक १५७. व्रजयुवति दाटींतहि;** 'व्रजयुवतिदाटींतहि' असा एक समास घ्यावा. गोकुळांतील गोपींच्या दाटींत. **श्लोक १६२. मुरकुंडी पडणें;** गर्दी होणें.

# सर्ग सातवा

श्लोक १. हृद्यगत; मनांतील विचार, मनोगत.

श्लोक ४. कृष्णागमनभव; श्रीकृष्णाच्या आगमनानें उत्पन्न झालेला. श्लोक ५. सरोव्याजें; सरांच्या मिपानें. द्वंद्वींहुन; दोन नेत्रांतून. अतिशयोक्ति अलंकार. श्लोक ६. शुभाशंसी; शुभ दर्शविणारी. नेत्रशफरी; माशाप्रमाणें दिसणारे नेत्र. श्लोक १०. संजीवनसिद्धि; पुनर्जन्माची प्राप्ति.

श्लोक ११. निदाघकाळ; (निदाघ=उष्णता), उन्हाळा. श्लोक १२. चरण ४. मनांतील विचार जागच्या जागीं जिरून गेले. श्लोक १८. सांख्य; सांख्य, योग, न्याय, वैशेषिक, मीमांसा आणि वेदांत या सहा दर्शनांपैकीं एक. पातंजल; योगशास्त्र. वेदशिरोरहस्यें; वेदांतील मुख्य मुख्य गूढ तत्त्वें. तत्प्राप्ति: परमेश्वरप्राप्ति. सामरस्यें; तन्मय झाल्यानें. श्लोक २०. चरण ३ व ४–वागेति; वागतात. अति संचरूनी; ह्याचा अर्थ लागत नाहीं; शिवाय यमकाला जुळत नाहीं. तेव्हां कानिटकर म्हणतात त्याप्रमाणें 'अति संच' किंवा 'अतिसच्च' (फार चांगल्या) असा पाठ घ्यावा. पंचसूना (चरण ४). गृहस्थाश्रमांत घड-णाऱ्याच हत्या. त्यांचें परिमार्जन करण्याकरितां वैश्वदेवसमयीं 'पंचसूनादोष-परिहारार्थम्' असा संकल्प करावा लागतो. श्लोक २१. गोमती; (चरण १) नदीचें नांव; (चरण २) इंद्रियें व बुद्धि यांचा. श्लोक २४. छत्तीस गुण; वधूवरांच्या पत्रिकांत दिसून येणारे गुण. हे गुण एकंदर छत्तीस असतात. त्यांत कांहीं अनुकूल, कांहीं प्रतिकूल असे असतात. कृष्णाच्या व रुक्मिणीच्या पत्रिकेंत सर्वच गुण अनुकूल आहेत हा भाव.

श्लोक २७. तदर्थ; कृष्णप्राप्त्यर्थ. श्लोक ३०. चरण ४–जमिनींत टाकलेलें बी उगवून त्याला अंकुर आले म्हणजे त्याला फळें येण्याची आशा असते, त्याप्रमाणें माझ्या मनोरथांना आतां अंकुर फुटल्यामुळें ते फलप्रद होण्याच्या मार्गाला लागले आहेत. श्लोक ३२–३९. या श्लोकांत वर्णिलेल्या सुदेवाची स्थिति पाहून द्वारकेला श्रीकृष्णाला भेटून परत आलेल्या सुदामदेवाची आठवण होते.

**श्लोक ३५.** सुवर्णपीठ; सुवर्णासन. **श्लोक ३६.** वसनांचळानें; वस्त्राच्या लुगड्याच्या पदरानें. **श्लोक ३९.** अरणीयुग्म; अग्नि उत्पन्न करण्याचीं दोन काष्ठें. दपदुपल; वरवंटा. **श्लोक ४०.** धसासे पडति; छाती धडधडूं लागली.

**श्लोक ५२.** रुमाल वारणें; शेल्यासारखें वस्त्र ( रुमाल वगैरे ) चंवरीसारखें राजेरजवाड्यांवर वारणें. **श्लोक ५५.** सतखे करीती; भात, नारळ, वगैरे जिन्नस ओवाळून टाकतात. **श्लोक ५६.** राजवीथी; राजमार्ग.

**श्लोक ५८.** चरण ४–स्त्रियांचें पाऊल घरांत ठरेना. **श्लोक ६३.** भूषाविपर्यास; एक समास पाहिजे; दागिन्यांची अदलाबदल; भलता दागिना भलत्या जागीं घालणें. पादांगद; ( पाद + अंगद ) पायांतील भूषण. वास्तविक ‘ अंगद ’ शब्द मनगटांतील भूषणाला लावतात. **श्लोक ६५.** पुष्पिताग्रा वृत्त. कृतविपरीतदशा; ज्यांची मनाची स्थिति चमत्कारिक केली आहे, बदलून टाकली आहे, अशा. निरंजनानें; श्रीकृष्णानें. **श्लोक ६९.** स्मरवैजयंती; मदनाच्या ध्वजा.

**श्लोक ७१.** वलाग्रा घेणें; इडापिडा बाहेर घालविण्यासाठीं बोटें मोडून दृष्ट काढणें. **श्लोक ८०.** असूर्यंपश्या; सूर्याचें दर्शनही ज्यांना घडणार नाहीं अश्या. स्खळण पावेति; पडतात. चव्रघी; चतुर्विध मुक्ति.

**श्लोक ८३.** मुकुलितमुखी; जिचें तोंड मिटलें होतें, जिच्या मुखांतून एकही शब्द निघत नव्हता अशी. **श्लोक ८४.** प्रत्युमद्गनविधि; सामोरें जाऊन भेटण्याचा आचार. **श्लोक ८७.** नृपमूर्धन्य कुमरी; राजाधिराजाची कन्या. चरण ३ व ४–श्रीकृष्ण परमात्म्याच्या परमेश्वरी स्वरूपाची, सर्वत्र अणुरेणूसुद्धां व्यापून उरणाऱ्या स्वरूपाची, ओळख झाल्यामुळें, जिला ‘ कृष्ण आला, कृष्ण गेला ’ वगैरे सांगण्यांत कांहीं अर्थ नव्हता.

**श्लोक ९३.** चरण ४–अनिष्टद्योतक शिंक येऊन अपशकून झाला. **श्लोक ९९.** ग्रंथ उकले; या गोष्टीचा धागा लागला; कोडें उलगडलें.

**श्लोक १०२.** पूर्वीच्या आवृत्तींत येथें ‘ अंघ्रिळ ’ असा पाठ धरून चर्चा झाली. परंतु हस्तलिखित प्रतींत ‘ अंत्रिळ ’ असा पाठ आहे. **श्लोक १०३.** दुःखास्पद; दुःखाचें स्थान, दुःखदायक. **श्लोक १०४.** या व पुढील श्लोकांत

रुक्मिणीच्या आईनें तिला सासरीं कसें वागावें याविषयीं फार उत्तम उपदेश केला आहे. **श्लोक १०४.** तंती लागसी; ओळीला, मार्गाला लागलीस. **श्लोक १०५.** चरण २–मला तुझ्याविषयीं फार काळजी वाटते. **श्लोक १०६. पोटा-गीची माय;** जिच्या पोटांत मुलीविषयीं कालवाकालव होते अशी; आंतड्याला पीळ पाडणारी. **श्लोक १०८.** भावा; दीर. **श्लोक १०९.** तिरांचे माणुस; तिरसट, रागीट माणूस.

**श्लोक ११७.** चरण ३ व ४–जर तुझ्या मुखांतून अभिमानाचे उद्दाम शब्द आले तर तुझ्या सद्गुणांचें मूळच नाहींसें झालें असें समज. **श्लोक ११९.** सांडी धरणें; हार खाणें. **श्लोक १२०.** अनासक्तपणा; निरिच्छता. **श्लोक १२२.** खांडव; खांडववन. ह्या इंद्राच्या अरण्याचा अग्नीनें कृष्ण व अर्जुन यांच्या साहाय्यानें फडशा पाडला. कृष्णा; द्रौपदी. **श्लोक १२३.** बुद्बुदरूप; बुडबुड्यासारखा. बुद्बुद; बुडबुडा. **श्लोक १२७.** चरण २–पापाला पाठमोरी हो; पापाचरणापासून लांब रहा.

**श्लोक १३५.** अर्थ :–तुझा केशकलाप तमोमय प्रदेशाप्रमाणें दिसून त्यांतून मुखरूपी चंद्र रात्रंदिवस प्रकाशतो आहे, असा भास झाल्यामुळें काचोळीच्या आंत दडून बसलेलें स्तनरूपी चक्रवाक पक्ष्यांचें जोडपें या रात्रीमुळें होणाऱ्या वियोगाच्या कल्पनेनें भिऊन गेलें आहे. **श्लोक १३७.** चरण ३–हलक्या कानानें जर कोणाच्या चहाड्या ऐकणार नाहींस. **श्लोक. १४१.** चरण ३–जोंपर्यंत जिवंत आहों (ज्यावें) तोंपर्यंत दानधर्म करण्याकरितां हात नेहमीं वर केलेला असावा.

**श्लोक १४२. वेचेंकरून;** खर्च करून. **श्लोक १४५.** चरण १–तूं या संसारसुखांत आसक्ति न धरतां त्याच्याकडे दुर्लक्ष करून (उपेक्षाबुद्धीनें) रहा (विचर). **परुषवचनोच्चारण,** कठोर शब्दांचा उच्चार.

**श्लोक १४९.** हा श्लोक वामन पंडितांच्या स्फुट श्लोकांत आढळतो. **श्लोक १५५.** चरण ४–पतिवंचना करणाऱ्या स्त्रियांची गति वडाच्या शाखाग्रांवर पहावयास सांपडते. त्यांना वटवाघुळाचा जन्म येतो.

**श्लोक १५८.** हाड होणें; वाळून जाणें; रोड होणें; हाडें निघणें.

**श्लोक १६०.** शिक्षाविधि; शिकवण, उपदेश. **श्लोक १६७.** निर्वाहकर्ता. संकटांतून पार पाडणारा.

**श्लोक १७०.** ऐहिकामुष्मिक; इहपरलोकचें सुख. **श्लोक १७२.** उगऊन द्यावें, स्पष्ट करून सांगावें.

---

## सर्ग आठवा

**श्लोक ४.** हिलाटे घेति; टेंभा मिरवितात. **श्लोक ६.** कूडमंत्री; कपटाचा सल्ला देणारा, दगलबाज. (सं. कूट; म. कुडें)

**श्लोक १३.** राहो; (चरण २); राहु. **श्लोक १७.** कुसृष्टि; वाईट कल्पना; भलते विचार.

**श्लोक २८.** कपाट देणें; दार लावणें. **श्लोक ३५.** ताळ पडणें; ताळ सुटणें; बेबनाव होणें; खटका उडणें. **श्लोक ३७.** चरण १–हें ऐकून आईला आनंद झाला नाहीं, तर आईपणा कोठें राहिला; ती आई कसली? बीजाक्षरमंत्र; गूढ गोष्टीची सूचना. **श्लोक ३८.** शकुनग्रंथी; शुभ शकुनाची गांठ.

**श्लोक ४०.** संवरणार्थ; लग्नाच्या वेळीं माळ घालण्याकरितां. आगुल्फ; पायांच्या घोट्यापर्यंत. **श्लोक ४१.** विश्वेश्वरी; विश्वस्वामिनी रुक्मिणी. **श्लोक ४२.** मुक्ताफळस्तोम; मोत्यांचे घोस. **श्लोक ४५.** झांपाळ्याप्रमाणें अस्थिर वृत्ति. दोला; झोपाळा, झुला. **श्लोक ४८.** अवेक्षिता; पाहणारा, दृष्टि टाकणारा. नाकीं चुना लावणें; फसविणें, हातावर तुरी देणें. चरण ४–वाईट दुष्ट विचार ज्याचे त्यालाच फळतात; त्यांचीं फळें त्यांच्या पुढेंच दत्त म्हणून उभीं राहतात. **श्लोक ५०.** वारमुख्या; मुख्य मुख्य वारांगना. **श्लोक ५२.** पदातिफेरा; पायदळाचा घेर. **श्लोक ५३.** वन्हियंत्रें; तोफा. कट; सैन्याची तुकडी. ५१–५२ श्लोकांत सांगितलेल्या 'शिपाई,' 'पदातिफेरा,' 'स्वारसमूह,' 'रथ,' 'गज,' ,वन्हियंत्रें,' ह्या सैन्याच्या सहा विभागांची (कट) व्यवस्थित रचना केली होती.

**श्लोक ५५.** गूढलीला; जिची कृति गुप्त प्रकारची होती अशी. **श्लोक ५९.** **अगस्तिपत्नी;** लोपामुद्रा. **अत्रिपत्नी;** अनसूया. **मुद्गल;** एक ऋषि. **अरुंधती;** वसिष्ठ ऋषीची पत्नी. **अतिप्रबुद्धा;** अतिशय शहाण्या. **श्लोक ६६.** **पुन्नाम;** पुरुषाचें नांव.

**श्लोक ६९.** **मलापकर्षस्नपनीय;** मळ धुऊन काढण्याकरितां. **श्लोक ७१.** **प्रवाळपीठावर;** पोवळ्यांच्या आसनावर. चरण ३–केशर (काश्मीर) व कस्तुरी समभाग घेऊन. **श्लोक ७६** **यथास्थानदेशीं;** अवयवांच्या योग्य ठिकाणीं.

**श्लोक ७९.** एकार्तिक; आरतीचें एका वातीचें नीरांजन. **श्लोक ८३.** **सुवर्णपर्याणित;** सुवर्णाचें सामान (खोगीर वगैरे) घातलेले. (सं. पर्याण; पल्याण, खोगीर.) **श्लोक ८४.** **मृदूपधानान्वित;** मऊ उशांसहित. **श्लोक ८७.** **लोपामुद्रा;** अगस्त्य ऋषीची पत्नी. **अनसूया;** अत्री ऋषीची पत्नी. **मुद्गल;** ऋषिविशेष. **श्लोक ८८.** त्रिनयनगृहस्वामिनि; हे त्रिनयनाची म्हणजे शंकराची गृहिणी, पार्वती. **मृदुस्वांते;** हे कोमलहृदये. **श्लोक ८९.** **आनर्ताधिप;** आनर्त देशाचा (काठेवाड, यालाच 'सौराष्ट्र' असें पूर्वी नांव असे) अधिपति; कृष्ण.

**श्लोक ९०.** **स्मितज्योत्स्नाजालें;** सर्वत्र पसरलेल्या हास्यरूपी चांदण्यानें. **निजनिलय;** तिचें स्थान, देऊळ. **श्लोक ९२.** **पुरोभागीं;** देवळाच्या पुढें. **अतितत;** (सं. तन्.) अतिशय विस्तृत. **नानाविध निवह;** नाना प्रकारचे समुदाय. **वनवटे;** दाटी करी. समुदायांनीं दाटी झाली होती. **श्लोक ९४,** **उद्वर्तिति;** तोंडाला हळद लावतात. **रावबीलीं;** (अळित्यानें) रंगविलीं. **श्लोक ९५.** **कंठसूत्र;** मंगळसूत्र; गळेसरी. **श्लोक ९६.** क प्रतीप्रमाणें 'वोढी' असा पाठ घेतल्यास 'ओढ पूर्ण केली' असा अर्थ होतो. ख प्रतीचा 'वोटी' हा पाठ घेतल्यास 'ओटी भरली' असा अर्थ होईल. **श्लोक ९८.** **सोदरमुख्यजाया;** भावाची पट्टराणी. **दुलावी;** लबाड. **श्लोक ९९.** मेनका; एक अप्सरा. **सुरवार-मुख्या;** मुख्य मुख्य अप्सरा. **श्लोक १००.** **मल्ली कुसुमें;** मालतीचीं फुलें. **तत्केशसंस्कार;** तिची वेणीफणी. **सुकेशी व मंजुघोषा;** अप्सरांचीं नांवें. **विभूषा;** दागिने.

**श्लोक १०१.** तिलोत्तमा व रंभा; अप्सरांचीं नांवें. उठी; उत्थापन. **श्लोक १०२.** उर्वशी व घृताची; अप्सरांचीं नांवें. **श्लोक १०३.** संदेहसोपान; संशयांचा सोपान (जिना; पायऱ्या). **श्लोक १०५.** मरोन धापें; धाप किंवा दम लागल्यामुळें. **श्लोक १०८.** आलीकडे; तुझ्यापासून लांब. आत्मीय; खरोखर तुझा असा म्हणविणारा. **श्लोक १०९.** चरण ३–हें तुझें आचरण कोणत्या प्रकारचें आहे ? तूं असें कसें आचरण करतेस ? कोण; कोणत्या प्रकारचें. चरण ४–परब्रह्म श्रीकृष्ण तुझी वाट पहात आहे. **श्लोक ११०.** विवेकांजन; विचाररूपी काजळ. उदासपणें; निरासक्त वृत्तीनें. अद्वैत; श्रीकृष्ण परमात्मा. **श्लोक ११३.** क्षत्रियाधम; शिशुपाल. हताश; निराश. **श्लोक ११४.** चरण ३–चिलखतें, शस्त्रें, सैन्य व रथ यांनीं युक्त, सज्ज होऊन. संनद्ध; चिलखत घातलेला. वाहन; रथ.

**श्लोक ११५.** विविधभार; नाना प्रकारचीं सैन्यें. **श्लोक ११७.** व्युत्पत्तीला; मूळ स्थानाला, उत्पत्तिस्थानाला. रुक्मिणी ही आदिमाया प्रकृति असून, परमेश्वरापासून प्रकृति उत्पन्न झाल्यामुळें, श्रीकृष्ण परमात्मा हा तिचें मूलस्थान होय. श्रीकृष्णाला जाऊन मिळशील हा भाव. **श्लोक ११८.** चरण ३-वदननिहितवंशीं; मुरलीला तोंड लावलेला, मुखाशीं मुरली धरणारा. **श्लोक ११९.** कौस्तुभ; श्रीकृष्णाचा मणी. वैजयंती; कृष्णाची माला. **श्लोक १२०.** खगपति; गरुड. **श्लोक १२१.** न लक्षे; दिसत नाहीं. सत्ता; शक्ति. **श्लोक १२२.** स्वस्त्यस्तुते; तुझें कल्याण असो.

**श्लोक १२३.** मुळ; मूळ, बोलवणें. **श्लोक १२६.** पृथिवी-पुरुहूतपुत्री; पृथिवीपतीची, राजाची कन्या. विकचपद्मपलाशनेत्री; प्रफुल्ल कमलदलाप्रमाणें जिचे नेत्र आहेत अशी. चारुशीला; सुशील.

**श्लोक १३०.** सौंदर्यसाररसनिर्मित; उत्कृष्ट सौंदर्याच्या रसाची तयार केलेली. **श्लोक १३१.** चरण १–मुखचंद्र हा अमृताचा (पक्षीं, अधरसुधा) सिंधु. उधार, कर्ज. चरण ४–नाहीं तर हा चंद्र (हरिणलांछन) डाग असलेला असा कां ? **श्लोक १३२.** अभुक्ता; न वापरलेल्या, कोऱ्या (मुक्ता = मोतीं). सीमंतसीमपदवी; केसांतील भांगाचें स्थान. येकावळीयुक्त; एकावलीसहित. **श्लोक १३४** आकर्ण; कानांपर्यंत. षट्पदवृंद; भृंगसमूह. **श्लोक १३६.** व्यंजत्स्तनी;

जिचे स्तन स्पष्ट दिसून येण्याइतके उन्नत होते अशी. हेमशृंखला; सोन्याच्या ांखळ्या.

**श्लोक १३७.** मंडितेक्षणा; विकसित झालेल्या कळी ( कुड्मल ) प्रमाणें शोभायमान दिसणारे नयन असलेली. शुचिस्मिता; शुभ्रहास्याची (हास्याचा रंग पांढरा असतो असा कविसंकेत आहे.) पक्व....धरा; पिकलेल्या तोंडल्याचे भाऊच असे ओंठ असलेली. तिचे ओंठ तोंडल्यासारखे लाल होते हा भाव. **श्लोक १४०.** भगवदाप्तिस, परमेश्वरप्राप्तीला. **श्लोक १४१.** चरण १ व २–डाव्या करकमलानें केशराश सांवरून, व कटाक्षांच्या बाणांनीं ( अपांग-विशिखीं ) इतर राजांना दूर करून. **श्लोक १४३.** उमगीत; ओळखीत. मानसा; मानससरोवराला. परमहंसकुळावतंसी; परमयोग्यांच्या कुलाला ललामभूत होणाऱ्या श्रीकृष्णाच्या ठायीं. या व पुढील दोन श्लोकांतील उत्प्रेक्षा अलंकार फार सुंदर आहेत.

**श्लोक १४४.** चातकप्रणयिनी; चातकाची स्त्री. निदाघतप्ता; उन्हानें संतप्त झालेली. **श्लोक १४५.** विषयांकुरमात्रचारा; केवळ विषयरूपी कोंबांचा चारा ( कोंवळा व म्हणून त्याग करण्यास कठीण. ) **श्लोक १४६** प्रयागतीर्थावरील गंगा, यमुना, सरस्वती या तीन नद्यांच्या संगमाला ' त्रिवेणी संगम ' म्हणतात. या संगमावरील वटवृक्षावर पिंड दिला म्हणजे मोक्ष मिळतो अशी समजूत आहे. या श्लोकांत भीमकी व तिच्या सख्या यांचा त्रिवेणीसंगम कल्पिला असून श्रीकृष्ण परमात्मा हा ( वट महीरुह ) वटवृक्ष कल्पिला आहे. हें फार सुंदर रूपक आहे.

**श्लोक १५२.** हिरांगदें; हिरेजडित अंगदें; बाहुभूषणें. **श्लोक १५३.** श्रीवत्सलक्ष्मीस; श्रीवत्साच्या ऐश्वर्याला ( कृष्णाच्या वक्षस्थलावर विशेष शोभा येत होती. ) त्रिदिवस्रवंती; देवनदी जान्हवी ( गंगा ). **श्लोक १५५.** आविर्भवे; प्रकट होई. चरण २–किंवा शृंगाररसानें अवतार घेतला. **श्लोक १५६.** असुद्र; स्पष्ट, स्फुट. चरण ३, ४-रुक्मिणीची श्रीकृष्णाच्या पायांकडे खिळलेली दृष्टि जणुं काय मेघाच्या पृथ्वीवरील सिंचनाप्रमाणें होती. (प्रो. पंगु). **श्लोक १५९.** यदूद्वह; यदुवंशोद्भव कृष्ण. तिर्यङ्मुखी; वाकड्या नजरेनें ( चोरून ) पहाणारी. **श्लोक १६०.** सौजन्याचा निर्वाह; सौजन्याची वर्तणूक.

श्लोक १६१. नवोढत्वें; नवीन लग्न झाल्यामुळें. श्लोक १६२. पृथुश्रोणिश्रांता; स्थूल अशा जघनभागामुळे श्रांत झालेली. स्विन्नवदना; मुखावर घर्मबिंदु असलेली. श्लोक १६४. सत्वाचें; प्रेमाच्या सात्त्विक विकारांचें. श्लोक १६६. निवाडें; निश्चयानें. श्लोक १६७. प्रकृतिपुरुषां; रुक्मिणी ही प्रकृति किंवा माया, व श्रीकृष्ण हा पुरुष किंवा परमात्मा. प्रपंचाविष्टांचा; प्रपंचांत शिरलेल्या संसारी जनांचा. हृदयग्रंथि; मनाचा संशय.

श्लोक १६८. त्रिदशनगरी; देवनगरी अमरावती विमोक्ता बंधाचा; संसारबंधनांपासून मुक्त करणारा. चरण ४–आधीं ज्याच्यावर फुलें घातलीं होतीं अशा माथ्यावर, मस्तकावर, ( देवांनी ) कल्पवृक्षाच्या फुलांची वृष्टि केली. श्लोक १६९. कुरवंडी करणें; ओवाळून टाकणें. श्लोक १७०. विनीतत्वें; नम्रपणानें. श्लोक १७१. हाहाहूहूप्रभृति; 'हाहा' व 'हूहू' हे दोन गंधर्व होते. स्वारस्यें; सुरसपणामुळें. अधरिती; धिःकार करिती.

श्लोक १७७. पतितनिवहोद्धारक; पतितजनांचा उद्धार करणारा. निवहः समुदाय. श्लोक १७९. अनियत; अनिश्चित. सदसद्वस्तु; सत्य व असत्य पदार्थ. सुखसंदूक; सुखाची पेटी.

परिशिष्ट : १

# भावे-प्रत व हस्तलिखित प्रती

सामराजाचें ‘ रुक्मिणीहरण ’ हें काव्य प्रथम कै. वि. ल. भावे यांनीं इ. स. १९०५ मध्यें ‘ महाराष्ट्रकवि ’ या मासिक पुस्तकांतून प्रसिद्ध केलें. तेव्हां त्यांनीं तें ज्या दोन हस्तलिखित प्रतींवरून संपादित केलें त्या प्रतींतील कांहीं पाठ कै. भावे यांनीं स्वीकारलेल्या पाठांहून निराळे दिसतात. ते सर्वच अधिक सरस आहेत असें नाहीं. कांहीं ठिकाणीं मूळ हस्तलिखितांतील पाठ सदोष वाटल्यानें कै. भावे यांनीं ते दुरुस्त करून घेतले असावे असें वाटतें. कांहीं ठिकाणीं मुद्रण-दोषहि संभवतात. हस्तलिखितांतील कांहीं पाठ मात्र भावे-प्रतींतील पाठांहून निश्चितपणें सरस असून ते स्वीकारल्यास अर्थहि चांगला लागतो. या दृष्टीनें भावे-प्रत व हस्तलिखित प्रती यांमधील कांहीं ठळक पाठभेदांचें एक टिपण पुढें दिलें आहे. दोन्ही हस्तलिखित प्रती, कांहीं किरकोळ फरक सोडल्यास, पाठदृष्ट्या साधारणपणें सारख्या आहेत. त्यामुळें त्या दोन्ही प्रती या मूळ एका प्रतीच्या नकला होत असें मानून त्यांचा विचार पुढील टिपणांत एकत्र केला आहे. अर्थात् विशेष फरक दिसला तर तो त्याप्रमाणें नमूद केला आहे. ‘ ख ’ प्रतींत पहिला सर्ग नाहीं. त्यामुळें त्या सर्गापुरते हस्तलिखित पाठ एकाच, म्हणजे ‘ क ’ प्रतींतून दिले आहेत.

— शं. गो. तुळपुळे

| सर्ग, श्लोक, चरण | भावे-प्रत | हस्तलिखित प्रत |
|---|---|---|
| १· ५·४ | तरीच हें ज्ञानसरोज पावे। | तरी हे ज्ञानजलज पावे।[१] |
| १· २८·३ | जे काटली नित्य महानृतानें। | जे काटली —।[२] |
| १· ४६·१ | साहित्यस्वारस्य समस्त वेंचे। | साहित्यसारस्य—। |
| १· ६९·३ | चौढाळिलें गोकुळ सर्व येणें। | चोटाॅलिले—।[३] |
| १· ७७·२ | भंगूनियां सौख्यसुकाळ केला। | भंजूनिया—। |
| १· ७९·१ | कृत्यस्त्य पादांबुज माळ कंठीं। | कृत्यस्त —।[४] |
| २· २०·१ | नवांभोधीमध्यें असशि जननिर्वाणलहरी। | भवांभोधीमध्यें—। |
| २· ४२·२ | दे राव वर्ग्यांस अपार झाला। | दे रांतवर्ग्यांस—। |
| २· ५०·४ | निजे उसां घालुनियां स्वबाहे। | —घालुन वाम बाहे। |
| २· ७६·१ | कुसुमशरचरांनीं जर्जरीभूत झाली। | कुसुमशरशरांनी—।[५] |
| २· ७८·३ | सहज निजशिरीं हे नित्य घालून नाडे। | सहज निजशरीं—।[५] |
| ३· १२·४ | जो गोपकन्या वसनांस हारी। | जो गोपकन्यावसनापहारी। |
| ३·१५·३-४ | देऊं नको मूलि, लहान राया। जाणो नको गोष्टि अहा वराया। | देऊ नको मूलिल हाच राया। जाणां नको गोष्टि अहाच राया। |
| ३· ३९·२ | पटुतर पटकेंही जें अमोलीक मोलीं। | पटुतर—। |
| ३· ४१·१ | पाटाऊं म्यानबंधा ...। | पाटाऊ म्यानबंधा...। |

१. हस्तलिखितांत 'तरीच' मधील 'च' अनवधानानें गळला आहे.

२. हस्तलिखितांत 'काटली' असें असलें तरी तो पाठ खरोखर 'कीटली' असा असावा.

३. हस्तलिखितांतील पाटांत अश्लीलत्व आहे.

४. येथें निरनिराळे पाट सुचविण्यांत आले (टीपा पाहा). परंतु हस्तलिखितांतील पाटच बरोबर दिसतो.

५. वरील दोन्ही ठिकाणीं भावे प्रतींतील दुरुस्त पाठ स्वीकरणीय आहेत.

| सर्ग, श्लोक, चरण | भावे-प्रत | हस्तलिखित प्रत |
| --- | --- | --- |
| ३· ४४·३ | प्रस्तावे, समया, रुमाल तबकें...। | अस्तावे...। |
| ३· ७२·४ | निपटच, सखि, डोळेझांक केली प्रसूनें। | निपटच सखि ये येसां केली प्रसूनें। |
| ३·१०१·२ | अनभिलषित अर्थी होय ये उत्तमेचा। | अनभिनपित—। |
| ३·११५·३ | अंगनेस मज येव करावें। | अंगनेस मज येक वरावें। |
| ४· ३८·१ | कार्यांतरीं सक्त असेल जेव्हां। | कार्यांतरासक्त—। |
| ४· ४७·४ | यदुतिलक जिचे हा गुंतला पूर्ण भाके। | —पूर्व भाके। |
| ४· ५९·१ | प्रवासविधि आदरें त्वरित फार केला असे। | प्रयासविधि—। |
| ४·१२४·१ | नित्य संसृतिभयें सुखदुःखें। | नित्य संस्कृतिभवें—। |
| ५· १८·२ | स्वर्लोकवासी धरिती विमानें। | —विगानें। |
| ५· २३·४ | मुनिजनहृदयाचें लक्ष्य लक्षीत आहे। | —लक्षण—। |
| ५· ६३·१ | निजद्रोहाग्नीचा कण जरि पडे किंचित मनीं। | द्विजद्रोहाग्नीचा—। |
| ५· ८७·३ | राजश्रियासह विराजित राजमान्या। | राजश्रियासज—। |
| ५· ९२·३ | हे अच्युता, मन मला न कळेच्च तूझें। | —मन मना—। |
| ५·१४२·४ | महा हटी चासहि जाति डावे। | महां हठी तासहि—। |
| ६ ·३·४ | समस्त शृंगाटक नोप देती। | — वोप — |
| ६· ३१·१ | अनवट निटल्या ही जोड त्या जोडव्यांचा। | अनवट निट ल्याली- |
| ६· ४५·४ | पडेति ते कोठुन कर्मजालें ?। | —कर्मजेले। |
| ६· ६७·२ | ते सुदरी त्वरित पाकगृहांत आली। | — पाकघरांत — |

| सर्ग, श्लोक, चरण | भावे-प्रत | हस्तलिखित प्रत |
|---|---|---|
| ६· ८५·४ | मुखकमल तयेचें तद्गुणौघाभिलाषी। | — तद्गुणौघाभिभाषी। |
| ६·१०५·२ | तुजजवळि भल्यांचा काय सन्मान कांचे। | — वांचे। |
| ६·१०८·३ | न सोसे कांहींही शिवसुरत सप्रेम लतिके। | — शिवसुरतरुप्रेमलतिके। |
| ६·१०९·१ | उदारा मल्लारी, अति विषय चिंतानल हरीं। | — अतिविषमचिंतानल— |
| ६·११०·१ | हनूमंता विश्वप्रणितचरिता अंजनिसुता | — विश्वप्रथितचरिता— |
| ६·११८·३ | अभंगक्षोभें या सहज पडलीं थोर व्यसनीं। | अनंगक्षोभें— |
| ६·१४२·१ | न समजत गजेंद्रें काय हें काय केलें? | न समजसि गजेंद्रें काय हें कार्य केलें? |
| ७· २२·२ | वसेत बाळा अळशी मनाच्या। | नसेत[६] —। |
| ७· ४८·३ | वाढेल बोलें वरि बोल जेव्हां। | —करि—। |
| ७· ५८·४ | घरामधें हा न निवेच तारा। | — थारा। |
| ७· ८४·३ | करें छत्रच्छाया करुनि, वदनीं चंद्रवदना। | करछत्रछाया—। |
| ७· ८६·२ | मुखें बाळा कांहीं प्रकट करि हे बोलत नसे। | — परि—। |
| ७· ९०·४ | सांगीतलें यास कदा कळेना। | —फळेना। |
| ७·१०२·३ | आईक हे अंघ्रिल दृक्प्रसंगें। | —अंघ्रिळ—। |
| ७· ११९·३ | वाढेल वा ढंग उगाच जेव्हां। | वाढेल वाधंग— । |
| ७· १४८·३ | शहाणी तूं पोटांतुन शिकविलें काय तुजला | — सिकवणें — । |

६. येथें 'ख' प्रतींत 'तसेत' असा चुकीचा पाठ आहे.

| सर्ग, श्लोक, चरण | भावे-प्रत | हस्तलिखित प्रत |
|---|---|---|
| ७· १५४·४ | अचिंत्य श्रीकृष्ण प्रणविनितदुच्छिष्ट महिमा । | — प्रणयिनि तदुच्छिष्ट महिमा । |
| ७· १७१·२ | म्हणोन माझा वरि बोज जाला । | म्हणोन माझा (ह्या) वरि बोल जाला । |
| ७· १७५·४ | तयासाठीं कैसें विविध निरयद्वार उघडे ? | — नुघडे ? । |
| ८· ३·२ | म्हणेत हो या दमडीस वंदा । | — दगडीस — । |
| ८· ४·२ | पदोपदीं लाविती कर्म चेडें । | — कर्मवेडे ( = वेढे )[७] |
| ८· १५·४ | होईल येणें गति काय त्याची? । | — नेणों — । |
| ८· ७५·२ | विलसति जंव जाणे हे तसे मोतियांचे । | — जवदाणे— । |
| ८· ९१.४ | जनुज्ञा अंबेची ... । | अनुज्ञा ... । |
| ८·१०१·३ | रंभा स्वदभांस ( स्वदंभास ) धरूं न लाहे । | — घसून लाहे । |
| ८·१२१·१-२ | न लक्षे योग्यांला' अति तरळ ते लक्षिति कसें ? | — लक्षिन कसें ? |
| | करावेना बारी क्षणभरि मनीं चिंतन असें । | — वारी — । |
| ८·१५८·१ | मिळे शळांकास अहो विशाखा । | — शशांकास— । |
| ८·१७२·३ | निजप्रेमें नाचे, हरिचरण लाभे तरवरी । | — तवंवरी[८] । |

७. येथें 'ख' प्रतींत मात्र 'कर्म चेडें' असाच पाठ आहे.

८. येथें 'ख' प्रतींत 'तरवरी' असा चुकीचा पाठ आहे. तोच भावे-प्रतींत दिसतो.

# संस्कृत काव्यांतील कांहीं थोडे

## समानार्थक उतारे

## सर्ग दुसरा

श्लोक ३. प्रजाः प्रजाः स्वा इव तन्त्रयित्वा। ( शा. ५ )

श्लोक ६. एकमेव नौ जीवितं द्विधास्थितं पुनःशरीरम्। ( शा. ६. )

श्लोक २७. १ तदीयमानीलमुखं स्तनद्वयम्। ( रघु. ३–८. )
२ मुखेन सालक्ष्यत लोध्रपांडुना। ( रघु. ३–२. )

श्लोक ३०–३२. न मे ह्रिया शंसति किंचिदीप्सितं
स्पृहावती वस्तुषु केषु मागधी।
इति स्म पृच्छत्यनुवेलमादृतः
प्रिया सखीरुत्तरकोसलेश्वरः ॥ १ ॥ ( रघु. ३–५. )

श्लोक ३४. नहीष्टमस्य त्रिदिवेऽपि भूपतेरभूदनासाद्यमधिज्य-
धन्वनः। ( रघु. ३–६. )

श्लोक ३८. सर्वोपमद्रव्यसमुच्चयेन। यथा प्रदेशं विनिवेशितेन ॥
सा निर्मिता विश्वसृजा प्रयत्नात्। एकत्र सौंदर्य-
दिदृक्षयेव ॥ १ ॥ ( कुमारसंभव )

## सर्ग तिसरा

श्लोक ३७. पटुपटहध्वनिभिर्विनीतनिद्रः। ( रघु. ९ )

श्लोक १००. हला पश्य नलिनीपत्रांतरितमपि सहचरमपश्यंती
आतुरा चक्रवाक्यारटति। ( विक्रमो० )

श्लोक १०९. प्रजागरात् खिलीभूतस्तस्याः स्वप्ने समागमः ॥
बाष्पस्तु न ददात्येनां द्रष्टुं चित्रगतामपि ॥ १ ॥

श्लोक १२३. न पुनरेति गतं चतुरं वयः। (रघु. ९.)

## सर्ग पांचवा

श्लोक ८. सङ्क्रीडन्ते मणिभिरमरप्रार्थिता यत्र कन्याः ॥ (मेघदूत.)

संस्कृत काव्याशीं परिचय असलेल्या वाचकांना आणखी असे अनेक उतारे सांपडतील. स्थलसंकोचास्तव त्या सर्वांचा या ठिकाणीं उल्लेख करतां येत नाहीं. केवळ उदाहरणें म्हणून कांहीं थोडीं स्थळें वर दाखविलीं आहेत.

# शब्दकोश

### अ

**अगरु**– ( सं. ) चंदन. ३·४२

**अग्रण्य**– पुढारी. १·६२

**अंगद**– ( सं. ) बाहुभूषण. ५·४२, ७·६३

**अंघ्रिळ**– (सं. अंघ्रि·ल) चरण–,किंवा पादविषयक. ७·१०२

**अंचल**– (सं.) पदर. २·९१, ७·३६

**अचाट**– चावट, फाजील. १·६७

**अजिर**– ( सं.) अंगण. ६·८७

**अटाळी**– ( सं. अट्टाल ) माडी, गच्ची. ५·१२, ७·६८

**अतळस**– ( अ. अत्लस् ) काळसर लाल रंगाचें साटणीसारखें कापड, ३·४०

**आतिशय** (सं.) अतिप्रसंग. ६·१२५

**अत्यय**– ( सं. अति + इ ) शेवट, नाश. १·३९

**अत्याहित**– (सं.) अत्याचार. ८·११५

**अधरणें**– तुच्छ लेखणें. ८·१७१

**अधेला**– अर्धा पैसा. ४·६८

**अनवट**– पायाच्या अंगठ्यांतील चांदीचा दागिना. ६·३१

**अनर्ह**–(सं.) अयोग्य; अनुचित. १·७९

**अनवरत**– ( सं. ) सतत. ६·१५३

**अनियत**– ( सं. ) भलता; अनियमित. २·७८

**अनिश**–(सं. ) एकसारखा ; रात्रंदिवस. २·९१, ११५

**अनुपद**– ( सं.) पाठोपाठ; तत्काळ. २·१०६ ; ३·६६; ४·५५

**अंधकारि**–( सं. ) अंधकासुराचा शत्रु; शंकर. ३·१२५

**अंधंतम**– ( सं. ) अंधकारमय प्रदेश. ७·१३५

**अन्वय**– ( सं. ) वंश. ३·२३

**अन्हाड**– अडाणी. २·७८

**अपत्रप**- निर्लज्ज. ५·९२, ८·६५

**अपर्णा**-( सं. ) पार्वती. ८·८८

**अपसद**–( सं. ) दुरात्मा; दुष्ट. ३·८६; ५·६८

**अपन्हव**–लपवणूक. २·७४

**अपूर्त**- ( सं. ) अपूर्ण. २·७

**अपेटी**–पेटी ( अलंकारविशेष ) चा अभाव. ६२·९

**अभिधा**– ( सं. ) नांव. ८·९१

**अभिज्ञा**– ( सं. ) जाणती. २·८५

**अमासा**–( सं. अम्–लहान ) लहान; दुबळा. ३ १९; ६३

**अमाळ**–माळेचा अभाव. ६·२९.

**अमाळसा**–अंमळसा; क्षणभर. ७·७४

**अमोघ**–पराक्रमी; विजयी १·७१.

**अरणी**–अग्नि निर्माण करण्याचें काष्ठ. ७·३९.

**अरवार**–नाजूक; हलकें; सछिद्र. ६·७७
**अरास**–आरास; शोभा. ८·३१
**अलगट**–स्वतंत्र; फाजील. ४·६४
**अलिंद**– (सं.) ओटा. १·५७
**अवकाश**– (सं.) पोकळी; रिकामी जागा. ७·४६
**अवचट**–अवचित; अकस्मात्. ५·७२
**अवज्ञा**– (सं. अ–वह्य) जड; ओझें. ६·१६०
**अवतंस**- (सं.) दागिना; अलंकार. ८·१५१
**अवद्य**– (सं.) निंद्य कर्म. २·१०
**अवरोध**– (सं.) अंतःपुर. ५·४३
**अवस**–अमावास्या; आंवस. ६·१३४
**अविदग्ध**– (सं.) मूर्ख. ४·७१
**अविषय**– (सं.) अज्ञेय. ५·७१
**अविहित**–अव्याहत; अखंड.२·२३
**अव्हाट**– आडमार्ग; आडवाट. १·७; ४·७५
**अंशुक**- (सं.) वस्त्र. १·४४
**असाळी**– राक्षसीण. ४·७१
**असोसी**– उत्कट इच्छा. २·१७
**अस्तावा**- ( फा. आफ्ताबा ) पाण्याची झारी. ३·४४
**अहा**– खोटी, मिथ्या. ३·१५
**अहाळणें**– पोळणें. १·६
**अहेव**– सुवासिनी स्त्री. ७·१११
**अक्षवाण**– औक्षण; ओवाळून टाकणें. ८·९६

## आ

**आक्रोट**–अक्रोड; फलविशेष. ३·४८
**आखंडळ**– इंद्र. ७·१६
**आगळा**- (वि.) मोठा; श्रेष्ठ. १·५१
**आगळा**- ( सं. अर्गला ) अडसर. १·५१
**आंगमोडा**– तापाची कणकण; अंग मोडून येणें. २·७९
**आण**– शपथ. ५·९९
**आतपत्र**- (सं.) छत्र; छत्री. ३·३७; ७·५३
**आतळणें**– भेटणें; स्पर्श करणें. १·४४; ६·६८
**आतुडणें**–सापडणें. ४·१०३
**आतंक**-(सं.) भीति. ७·२
**आदर्श**-( सं.) आरसा.२·१२; ८·८१
**आदान**–स्वीकार्य; घेण्याचें. २·१११
**आनाय**-( सं. ) जाळें. ५·७७
**आंदोलिका**-( सं.) पालखीसारखें एक वहान. ८·८३.
**आपगा**-( सं.) नदी. ६·१०१
**आपण**-( सं. ) बाजार. ५·९
**आपती**-( सं. आपत्ति ) संकट. ३·६०
**आभा**-( सं. ) तेज; कांति. ७·७०
**आयती**-( वि. ) तयार;कष्टी; मेहनती. २·५१
**आरशी**– भिंग; बिलोरी कांच. ६·२७
**आरार्तिक**-( सं. आरात्रिक ) आरती. ७·५६

**आलोडणें**–पारंगत होणें; हस्तगत करणें. ६·६४
**आश्रयाश**–( सं. ) अग्नि. ४·५८
**आस**–( सं. ) धनुष्य. ५·३०
**आळका**–द्वाड; कपटी. १·६५
**आळीजन**–सखीजन. ६·२०

## इ – ई

**इंगळ**–निखारा.
**इष्ट**–( सं. ) यज्ञयागादि कर्म. २·७; ४·६५; ६·९७
**ईशान**–( सं. )शंकर. ५·२८

## उ – ऊ

**उगंड–डा** }–( सं. उत्+घट् ).
**उगंड–डा** }सुटका; उद्धार. ४·८४; ५·५७; ७·१७२
**उखळणें**–फोडणें; उघडणें. ५·८३
**उगवणें**–उलगडा करणें. ४·१३१
**उगला–ली**–व्यर्थ; मुकाट्यानें. २·१०२; ४·८३
**उच्छून**–फुगलेला;उंचावलेला. २·३३
**उटणें**–स्वच्छ करणें; लेप देणें. ५·१०८
**उटाळणें**–उत्पन्न होणें; उठणें; १·२८
**उठणें**–उठून दिसणें. २·५६
**उणठ**–उन्नतता; उठावदारपणा. २·५६
**उडु**–( सं. ) नक्षत्र; तारा. ४·४५
**उतटणें**–फाटणें; तुटणें. ७·९;८·१६५
**उतती**–खारीक. ३·४८
**उदन्त**– ( सं. ) वार्ता. ६·८
**उद्योत**– ( सं. ) प्रकाश. ८·१५२
**उद्वर्तणें**– अंगाला उटणें इ. लावणें. ८·७१;९४
**उद्वस**–उद्ध्वस्त. ३·२५
**उधंटा**–उद्धट आचरणाची. ७·१२८
**उधळणें**–नाहींसें होणें ५·६२
**उधार**–कमीपणा. ८·१३१
**उपकंठ**–आसपासचा प्रदेश. १·७९
**उपचडा**–उमाळा; आवेग. ६·१२८
**उपधान**- ( सं. ) उशी. ८·८४
**उपन्यास**- ( सं. ) विवरण. ६·६०
**उपस्थान** –पूजा, सेवा. ५·१४०
**उपरमाडी**–वरचा मजला, गच्ची. ७·८४
**उपायन**–नजर; भेट. १·३४; ५·२७
**उबाळा**–त्रास. २·७५
**उमगणें**–शोधणें. ८·१४३
**उमासा**–उसासा. ३·६३
**उसंत**–विश्रांति. २·१५
**ऊठी**–उत्थापन; उठणें. ८·१०१
**ऊर्मिका**- ( सं. ) अंगठी. ८·१५२

## क

**कचोळें**–विशिष्ट आकाराचें पूजापात्र. ७·९०
**कट**–सैन्याचा विभाग. ८·५३
**कडमोड**–अंग मोडून येणें; अस्वस्थ होणें. २·६९

**अरवार**–नाजूक; हलकें; सछिद्र. ६·७७
**अरास**–आरास; शोभा. ८·३१
**अलगट**–स्वतंत्र; फाजील. ४·६४
**अलिंद**– (सं.) ओटा. १·५७
**अवकाश**– (सं.) पोकळी; रिकामी जागा. ७·४६
**अवचट**–अवचित; अकस्मात्. ५·७२
**अवज्ञा**– (सं. अ–वह्य) जड; ओझें. ६·१६०
**अवतंस**- (सं.) दागिना; अलंकार. ८·१५१
**अवद्य**– (सं.) निंद्य कर्म. २·१०
**अवरोध**– (सं.) अंतःपुर. ५·४३
**अवस**–अमावास्या; आंवस. ६·१३४
**अविदग्ध**– (सं.) मूर्ख. ४·७१
**अविषय**– (सं.) अज्ञेय. ५·७१
**अविहित**– अव्याहत; अखंड. २·२३
**अव्हाट**– आडमार्ग; आडवाट. १·७; ८·७५
**अंशुक**- (सं.) वस्त्र. १·४४
**असाळी**– राक्षसीण. ४·७१
**असोसी**– उत्कट इच्छा. २·१७
**अस्तावा**- ( फा. आफ्ताबा ) पाण्याची झारी. ३·४८
**अहा**– खोटी. मिथ्या. ३·१५
**अहाळणें**– पोळणें. १·६
**अहेव**– सुवासिनी स्त्री. ७·१११
**अक्षवाण**– औक्षण; ओवाळून टाकणें. ८·९६

आ

**आक्रोट**–अक्रोड; फलविशेष. ३·४८
**आखंडळ**– इंद्र. ७·१६
**आगळा**– (वि.) मोठा; श्रेष्ठ. १·५१
**आगळा**– ( सं. अर्गला ) अडसर. १·५१
**आंगमोडा**– तापाची कणकण; अंग मोडून येणें. २·७९
**आण**– शपथ. ५·९९
**आतपत्र**- (सं.) छत्र; छत्री. ३·३७; ७·५३
**आतळणें**– भेटणें; स्पर्श करणें. १·४४; ६·६८
**आतुडणें**–सापडणें. ४·१०३
**आतंक**–(सं.) भीति. ७·२
**आदर्श**–( सं. ) आरसा. २·१२; ८·८१
**आदान**–स्वीकार्य; घेण्याचें. २·१११
**आनाय**–( सं. ) जाळें. ५·७७
**आंदोलिका**–( सं. ) पालखीसारखें एक वहान. ८·८३.
**आपगा**–( सं. ) नदी. ६·१०१
**आपण**–( सं. ) बाजार. ५·९
**आपती**–( सं. आपत्ति ) संकट. ३·६०
**आभा**–( सं. ) तेज; कांति. ७·७०
**आयती**–( वि. ) तयार; कष्टी; मेहनती. ३·५१
**आरशी**– भिंग; बिलोरी कांच. ६·२७
**आरार्तिक**–( सं. आरात्रिक ) आरती. ७·५६

**आलोडणें**–पारंगत होणें; हस्तगत करणें. ६·६४
**आश्रयाश**–( सं. ) अग्नि. ४·५८
**आस**–( सं. ) धनुष्य. ५·३०
**आळका**–द्वाड; कपटी. १·६५
**आळीजन**–सखीजन. ६·२०

इ – ई

**इंगळ**–निखारा.
**इष्ट**–( सं. ) यज्ञयागादि कर्म.२·७; ४·६५; ६·९७
**ईशान**–( सं. )शंकर.५·२८

उ – ऊ

**उगंड–डा** **उगांड–डा** –( सं. उत्+घट्). सुटका; उद्धार. ४·८४; ५·५७; ७·१७२
**उखळणें**–फोडणें; उघडणें. ५·८३
**उगवणें**–उलगडा करणें. ४·१३१
**उगला–ली**–व्यर्थ; मुकाट्यानें. २·१०२; ४·८३
**उच्छून**–फुगलेला;उंचावलेला. २·३३
**उटणें**–स्वच्छ करणें; लेप देणें.५·१०८
**उटाळणें**–उत्पन्न होणें; उठणें; १·२८
**उठणें**–उठून दिसणें. २·५६
**उणठ**-उन्नतता; उठावदारपणा. २·५६
**उडु**–( सं. ) नक्षत्र; तारा. ४·४५
**उतटणें**–फाटणें; तुटणें. ७·९;८·१६५
**उतती**–खारीक. ३·४८
**उदन्त**– ( सं. ) वार्ता. ६·८
**उद्योत**– ( सं. ) प्रकाश. ८·१५२
**उद्वर्तणें**– अंगाला उटणें इ. लावणें. ८·७१;९४
**उद्वस**-उद्ध्वस्त. ३·२५
**उधंटा**–उद्धट आचरणाची. ७·१२८
**उधळणें**–नाहींसें होणें ५·६२
**उधार**–कमीपणा. ८·१३१
**उपकंठ**–आसपासचा प्रदेश. १·७९
**उपचडा**–उमाळा; आवेग. ६·१२८
**उपधान**- ( सं. ) उशी. ८·८४
**उपन्यास**– ( सं. ) विवरण. ६·६०
**उपस्थान** –पूजा, सेवा. ५·१४०
**उपरमाडी**–वरचा मजला, गच्ची. ७·८४
**उपायन**–नजर; भेट. १·३४; ५·२७
**उबाळा**–त्रास. २·७५
**उमगणें**–शोधणें. ८·१४३
**उमासा**–उसासा. ३·६३
**उसंत**–विश्रांति. २·१५
**ऊठी**–उत्थापन; उठणें. ८·१०१
**ऊर्मिका**– ( सं. ) अंगठी. ८·१५२

क

**कचोळें**–विशिष्ट आकाराचें पूजापात्र. ७·९०
**कट**–सैन्याचा विभाग. ८·५३
**कडमोड**–अंग मोडून येणें; अस्वस्थ होणें. २·६९

**कंडा**–कंठा; गळ्यांतील दागिना ३·४५
**कतिपय**–कांही; कितीएक. ३·४१
**कंज**–कमळ. ६·१३०; ८·१४९
**कपाट**–दरवाजा. ८·२८
**कपाटच्चर**–लुटारू; ठक. ३·१३
**कपाळी**–शंकर. ३·३
**कपोती**–पारव्यांचीं जोडपीं. ४·४५
**कबरी**–केशकलाप. २·५५
**कमठी**–कांसवी. ६·१४४
**कमरख**–फलविशेष. ३·४९
**कमान**–धनुष्य. ३·३७
**करट**–गंडस्थळ. ३·८६
**करनाल**– कर्ण्यासारखें एक वाद्य. ८·१७३
**करपत्र**– करवत. ३·७३
**करि**- करणी.
**करीना**– (फा.) हकीगत; इतिहास. ३·८
**कर्कर**– गलबला; कलकलाट. ६·८२
**कर्णेजप**– चहाडखोर. २·९६
**कलकलणें**–किलबिलाट करणें. ४·४५
**कलापी**– मोर. ५·१६
**कषणें**– घासणें ५·४२
**कळासी**– अचूक बसविलेला सांधा; युति; जोड. ३·११०
**कार्लिंग**– कलिंगड. ३·४९
**कामणूक**– करमणूक. ३·१६
**कारी**– कुमारी. ८·४४
**कारुक**– कारागीर; चितारी. ६·१३
**कार्पण्य**–कंजुषपणा. ७·१६४
**काश्मीर**– केशर. ६·५; ८·७१, ७८
**कांची**– कंबरपट्टा. ६·२३, ३५
**किंकिणी**– लहान घंटा. ८·१५४
**किर्मीरित**– नाना रंगांचीं, चित्र-विचित्र. ६·२६
**किली**– किल्ली. १·४
**किसलय**– कोमल पल्लव, पालवी. ३·६५; ६·१२६
**कीटली**– किटलेली; किटण चढलेली. १·२८
**कीर**– पोपट. ५·८९
**कुचकुच**– ( सं. कुच् ) कुजबूज. ३·६१
**कुडें**– कुपरिणाम; वाईट फळ. ८·४८
**कुड्मल**– कळी. ५·११४
**कुतनी**– अर्धरेशमी कापड. ३·४०
**कुहिजणें**– कुजणें. ५·७०
**कूड**– कपटी. ८·६
**कूर्पासक**– चोळी, कांचोळी. ७·१३५; ८·९३
**कृत्यस्त**– पायांत वाहाणा असलेला. १·७९
**कृपाणी**– खंजीर; खड्ग. ५·२६; ६·१९
**कृशानु**– अग्नि. ५·२८
**कृष्णसार**– हरीण. ८·१४५
**कैं**– केव्हां. ४·९२
**कैतव**– (सं.) कपट, लबाडी.७·१२५

**कोक**– चक्रवाक पक्षी. ४·५६
**कोंचकी**– बांधलेलें पागोटें. ३·४०
**कोठी**–कोठार; साहित्य ठेवण्याची खोली. ३·३१
**कोथिंबिरी**–वाळ्या; कानांतील एक दागिना. ६·२४
**कोरका-कें**–कोरडें अन्न; कोरान्न. ४·६९; ६·७२
**कोरणें**–कोरडें अन्न; कोरडें. ४·६९
**कोरदार**-कंगणीदार. ३·४०
**क्रम**–वेदपठनाचा एक प्रकार. ६·४६
**क्वारी**-कुमारी; कुवारीण. ३·१०; ७·१७३; ८·१२, ४४, ६५

## ख

**खंज**–लंगडा. ५·१०९
**खंजन**–पक्षिविशेष. २·९६; ५·१०९, १३७.
**खडाणी**–लाथ मारणारी गाय. ४·१२
**खदिर**–कात; खदिरसार. ३·४८
**खंबाइत**-खंबायती लुगडें. ६·३३
**खळाळ**–पाण्याचा वेगवान प्रवाह. ६·११९
**खासा**–प्रमुख सरदार. ३·४६; ७·७०, ८८; ८·३०, ५१
**खाबगा**–वक्रग्रह. ३·४५
**खिरणी**–एक लहान फळ. ३·४९
**खिसमिस**–वेदाणा. ३·४८
**खोंचणें**–कष्टी होणें; ३·५७
**खोट-टी**–लगड ( सोन्याची ). ५·१२०
**खोती**–मक्ता. ५·६

## ग

**गंगालय**–घंगाळ. ८·७२
**गणक**–ज्योतिषी. ६·१२
**गंडूष**–चूक. ५·२७
**गरळा**–एखादें औषध चावून त्याचा तान्ह्या मुलास रस घालतात तो. १·५४
**गर्दपोश**–पलंगपोस, अभ्रा. ३·४६
**गंसणें**–शोधणें; मिळवणें. ३·१२२
**गवाळें**–पूजासाहित्याचें आसन. ६·४८
**गाढी**- मोठी. २·१२
**गागणें**–ओरडणें; मोठ्यानें बोलणें. ४·७२
**गाथा**–चरित्र, कीर्ति. ४·३०
**गुढी**–पताका. ७·१४७
**गुंडा**–पाणी सांठविण्याचें वाटोळ्या आकाराचें भांडें. ३·४३
**गुह्यक**–यक्षकिन्नरांसारखे कुबेरसेवक ८·६१
**गृहपति**–अग्नि. ४·५७
**गेहवापी**–घरांतील पुष्करिणी. २·७८
**गोठा**–गुरें बांधण्याची जागा. १·६१
**गोडंबी**–बिब्याच्या आंतील बीं. ३·४८
**गोंडाळ**–गोंडस. ६·२५
**गोपानशी**–सज्जाच्या खांबाखालील तुळईचा भाग. ५·२०

**गोमायु**–कोल्हा. ४·१९
**गोमेद**–एक रत्न. ३·४२
**गोडखा**–गोड खाऊ. ६·५०
**गोपुर**–शिखरवजा मनोरा. ७·६७
**गोसी**–गोष्ट. ३·३०

### घ

**घडीत**–घडण. २·३९
**घनवटणें**–एकत्र येणें; जमणें. ८·९२
**घरोबा**–गृहकृत्यें. ७·१२०
**घाणणें**–घाण येणें; वास मारणें. ३·१७, ११९
**घारी**–घारगा; एक खाद्य पदार्थ. ६·७८
**घालफेडी**–घालमेल; गडबड. ३·६५
**घालाघाली**–गोंधळ; धांदल. ७·१०६
**घुरट**–घाणेरडी. ३·११९
**घोंग**–सोंग. १·६०
**घोण**–खिन्नावस्था. २·६९
**घोंसवाळी**–स्त्रियांचें एक कर्णभूषण. ६·२४

### च

**चय**–समुदाय. ३·८८; ५·६१
**चरम**–अखेरची. ३·१००
**चवक**–चौक; चौरंग. ७·९५
**चवाळें**–कांबळ्याचा तुकडा; लहान कांबळें. ६·४८
**चळथ**–चवड; रास. ६·७८, १५२
**चळवळणें**–भीतीनें चळचळ कांपणें. ७·२
**चाट**–अचाट; वाटेल तें. ८·१५
**चांदवा**–छत्र. ३·४६
**चार**–चपळ; लबाड. ८·३२
**चार**–( सं. ) गुप्त हेर. ८·३२
**चास**–तास पक्षी. ५·१४२
**चाळणें**–चाळणा किंवा विचार करणें. ३·१२१
**चंडातक**–परकर, लेंगा. ८·७४
**चंद्रशाळा**–घराची गच्ची. ५·२०
**चिकसा**–उटणें; सुगंधी द्रव्य. ६·६६
**चिताक**–( सं. चित्र–अंक ) चितांक; एक गळ्यांतील दागिना ६·२८
**चिरंटी**–सुवासिनी. ८·९२
**चिरीट**–चिडखोर. ४·६१
**चीनी**–चिनी साखर ३·४८
**चूचुक**–स्तनाग्र. २·२७
**चूड**–आंगडी. ८·१३३
**चेत**–चित्त; मन. ३·६३
**चोखट**–स्वच्छ; सुखकर. ४·७५
**चोटाळणें**–व्यभिचारमय करणें. १·३९
**चोपड**–बुद्धिबळाचा पट ३·४६
**चोवा**–चंदनाची उटी ३·४२
**चौकी**–लहान चौरंग. ३·४४; ६·१७
**चौरडोल**–हत्तीवरील अंबारी. ७·५२

### छ

**छमीना**–शामियाना; डेरा. ३·४५
**छांदस**–छांदिष्ट. ७·९०
**छुरिका**–सुरी. २·५३

## ज

**जलयंत्र**-पाण्याचें कारंजें. ५·१७
**जव**-हातांतील एक दागिना. ८·७५
**जवदाणा**-त्रि. डें. ८·७५, १६५
**जवन**- वेगवान्. ३·३५
**जाकळणें**- पोळणें; कळवळणें. ८·१२४
**जागर**- जागरण. २·९६
**जातरूप**- सोनें. ५·९
**जानवसा**- लग्नाचें वऱ्हाड उतरण्याचें ठिकाण. ६·६
**जाव**- प्रत्युत्तर. ७·११६, १३१
**जार**- व्यभिचारी लोक ६·२६
**जांव**- ( फा. जाम्. ) पेला. ३·४३
**जांबूनद**- सोनें. ८·४२
**जिव्हार**- अंतःकरण. ३·५७
**जिव्हाला**- झरा; अंतःकरण. ३·७४; ५·१२६
**जुगवती**- जुळवून, घडवून आणणारी. ८·८८
**जुरा**- शिकारी पक्षी. ३·४७
**जे**- ( अ. ) कारण. २·३५
**जेटी**- मल्ल; पैलवान. १·८२; ५·१९
**जोटें**- जथा, समूह ८·३७
**जोहरी**- रत्नपारखी. ४·१४

## झ

**झलंबणें**- सतेज होणें. २·५३
**झळाळी**- तेज; चकाकी. ४·४८
**झाडणी**-भूतबाधेचा निरास. ३·११४
**झांस**- तळमळ. ४·११७

## ट

**टोपण**- स्त्रियांचें एक कर्णभूषण; बाळ्यांचा एक प्रकार. ६·२४

## ठ

**ठाव**- जागा; आसरा. ४·३७

## ड

**डाब**- कंबरपट्टा. ८·४४
**डाबणें**- खोचणें; आंत घालणें.८·४४
**डांभा** ( सं. दम्भ )- डौल; गर्व. ५·३०
**डालणें**- डावलणें; प्रतिकार करणें. २·७३
**डोल**- कल; तोल. ८·११

## ढ

**ढकल**- जोर; आग्रह. ७·२५
**ढाल**- ढंग; साहसकर्म. ४·६४

## त

**तकवा**-( फा. ) धीर; बळ ३·१३२; ६·१२६; १२९
**तख्तरावा**-( फा. ) गाडीवर ठेवून मिरवण्याचा तक्ता किंवा दृश्य. ३·३६
**तगटी**-भरजरी. ७·५३
**तडप**-वस्त्रविशेष. ३·४१; ५·४६
**तनुता**-क्षीणता. ४·४५
**तंती**-ओळ; मार्ग. ७·१०४

**तरळ**–अस्थिर; चकाकणारे. ३·३८; ५·४८

**तल्प**-शय्या; बिछाना. १·५५; २·७६; ३·६५

**तवली**–पात्रविशेष; लहान तपेली. ३·४३

**ताकघाटा**–ताकांत शिजविलेल्या कण्या. ३·१६

**तांखडी**-हुशार. ६·३५

**ताटक**–एक कर्णभूषण. ७·६४

**तानवडा**–एक कर्णभूषण. ६·२४

**ताफता**–( फा. ) उंची रेशमी वस्त्र. ३·४१

**तासक**–ताशीव. ३·४३

**ताळ**–मेळ; समजूत; ऐक्य. ८·३५

**ताळवृंत**–पंखा. ८·८१

**तितर**–पक्षिविशेष. ३·४७

**तिरकुट**–तिळकूट; तीळ कुटून केलेली चटणी. ३·५४

**तिरांचें**-तिरसट; तऱ्हेवाइक. ७·१०९

**तिवाटी**–विधुळवाटी. ४·६७

**तिवाशी**–(फा.) गादी; गालिचा. ६·१३

**तिळवा**–तिळाचा लाडू. ३·५५

**तीर्थगंडा**-तीर्थ ठेवण्याची झारी. ६·८८

**तुंद**–दांडगा; धिप्पाड. ७·४८

**तुरा**–( फा. ) श्रेष्ठ. ३·४७

**तुरी**–वस्त्र विणण्याच्या मागाचा धोटा. ६·६३

**तुरुत**–त्वरित; तत्काळ. ५.६६, ९५; ७·१७४

**तुहिनकर**–( सं. ) चंद्र. ३·१०७

**तूत**–तुतें; फलविशेष. ३·४९

**तेजी**–घोडा. ८·५१

**तेलवरी**–एक खाद्य पदार्थ. ६·७८

**तोडर**–पायांतील एक दागिना. ३·८५

**तोंडखोडी**–तोंड टाकून बोलण्याची खोड असणारा. ३.७८

**त्रपा**–( सं. ) लाज. ४·६; ८·२

## थ

**थर्टी**–कणगी; सांठवणाची जागा ३·३१

**थारणें**–स्थिरावणें. २·५८

**थिरमा**–लोकरी वस्त्र. ३·४०

**थोपणें**–थांबविणें; बंधन घालणें. २.११४

## द

**दगदणें**–त्रासणें. ६·१२८

**दमामा**–( फा. ) मोठा नगारा. ७·५३; ८·१६८

**दरोगीण**–( फा. ) दासींवर देखरेख करणारी मुख्य दासी. ५·५१

**दळदर**–दळदार; जाड. ३·५०

**दाड**–द्राड. ८·१३

**दापणें**–भिणें; धाक वाटणें. ७·१६

**दारिका**–( सं. ) कन्या. ४·७

**दाशार्ह**–( सं. ) यादव ५·४४

**दासेरक**–उंट. ३·४७

दिदृक्षा-(सं.) पाहण्याची इच्छा. ४·८६
दीक्षा (सं.) नेहमींची रीत. ४·३६; ८·१०९
दुकूळ-वस्त्र. ७·६६
दुचित-दुश्चित्त. ६·१६, १५६
दुरदुष्ट- दुरदृष्ट: दुर्दैव. १·१०
दुरस्ता-दोन्ही बाजूस. ८·४३
दुलीचा-कापूस भरलेली दुलई. ३·४६
दुरळ-कडक; तीव्र. ३·१११
दुलडी-गळ्यांतील दूड. ६·२३
दुलावी-लबाड. ८·९८
दूरदृष्ट-(सं.) अदृष्ट; दैव. १·१०
दृषदुपल- वरवंटा. ७·३९
दृखि-दृष्ट. २·८१
देवई-कृष्णमाता देवकी. १·४८
देवडें-ढें-वक्र; वाकडा. १·५३; ३·१२३; ८·११८
देहली-(सं.) उंबरठा. १·५९
दैवज्ञ-(सं.) ज्योतिषी. २·८९
दैवकरी-दैववान्. ६·९१
दोरा-एक बाहुभूषण. ६·२५
दोहणें-धार काढणें. १·६४
दौवारिक-(सं.) द्वारपाल; रक्षक. ८·४१
दौश्चित्य-(सं.) दुष्ट विचार. २·१
द्वारवती-(स.) द्वारावती; द्वारका नगरी. १·४२

## घ

घटी-मूल्यवान् रेशमी वस्त्र. ३·४१
घन्वी-(सं.) धनुर्विद्येंत प्रवीण असलेला; धनुर्धारी. २·७३
धम्मिल्ल-केशकलाप; वेणी. ७·१३५; ८·१५१
घसणें-घुसणें. ६·१५७
घसासा-भीतीनें धापा टाकणें. ७·४०
धाकणें-धाक किंवा भीति वाटणें. ४·६९
धाडी-पुतणी. ४·६६; ६·१५
धाणें-तृप्त होणें.
धात-युक्ति २·३८
धात्री-(सं.) दाई. २·४५
धापें-धाप; दम. ८·१०५
धाम-(सं.) तेज; वसतिस्थान. २·२
धारी-वस्त्राची किनार किंवा काठ· ६·५१
धांवणें-धांवा. ३·८१
धांवति-धांवाधांव. ५·५९
धुकधुकणें-धुकधूक किंवा भीति वाटणें. ७·८६
धुकधुकी-एक अलंकार: कंठाभरण. ३·४२
ध्वान्त-(सं.) अंधःकार; ६·३२
धुडावणें-धुडकावून लावणें; हाकरून देणें. ३·९४

## न

**नकासा**–( फा. नक्शा ) योजना; बेत. ३·५६

**नग**–दागिना ६·३१; ८·५५

**नर्द**–( फा. ) सोंगटी. ३·४६

**नवगजी**–राजमंडप. ३·४५

**नवोढा**–( सं. ) नववधू. ७·१२३

**नाराच**–( सं. ) बाण. २.६४

**नालीक**–( सं. ) बंदूक. ६·११५

**निकसी**–निकस; निःसत्त्व ६·१५४

**निगूढ**–गुप्तपणें; एकीकडे. ५·२४

**निचरणें**–निचरा होणें. ५·५८

**नितंबणें**–चकाकणें, शोभणें.

**नित्सुरी**–झोप लागलेली. ४·५१

**निदेश**–( सं. ) आज्ञा; निरोप. ४·५९

**निधायी**–विश्वासांतील स्त्री किंवा दासी. २·४३

**निपट**–खरोखर; सर्वस्वी. ३·७२, ८७; ४·४२, ६६; ५·७५

**नियत**–( सं. ) खरोखर. २·१९, ८०.

**निराजणें**–निरांजन ओवाळणें. ७·७२

**निराळ**–( सं. निरालय ) आकाश. ४·४८

**निरीह**–( सं. ) निरिच्छ. १·४९, ६८

**निर्वाह**–( सं. ) कार्यक्षमता; अंगीकृत कार्य पार पाडण्याचा निश्चय. २·२२, ७६; ५·६८.

**निलज**–निर्लज्ज. ४·८०

**निवह**–( सं. ) समुदाय. ३·७९; ६·१४९, ७·२, ८·९२

**निवाडें**–शेवटीं; अखेरीस. १·५१

**निवाणी**–वाईट. ४·६७

**निषद्या**–( सं. ) जागा; स्थान ५·१२२

**निसणें**–निवडणें. ३·५२

**निसांसणें**–निःश्वास टाकणें. ८·१०९

**निस्तुरी**– ( 'नित्सुरी' पहा. ) ८·५१

**नीलख**–जरतारी वस्त्र. ३·३९

**नीवि**–( सं. ) निऱ्या, निऱ्यांची गांठ २·३३

**नीशार**–(फा.) मच्छरदाणी; धाबळी. ३·४४

**नौपटी**–नऊपट लांबीची साडी. ३·४१

**न्यहाली**–(फा.) पराची किंवा पिसांची गादी. ३·४४

## प

**पटली**–समूह. ४·५६

**पटह**–( सं. ) नगारा; ढोल. ३·३७

**पडण**–संकट. २·९८

**पतद्ग्रही** (सं.)–तस्त. ५·२८; ८·८१

**पत्रशाक**–पालेभाजी. ६·७५

**पदवी**–मार्ग; वाट. ६·९४

**पद्मराग**–( सं. ) माणिक. ३·४२

**परभाग**–( सं. ) उत्तम गुण. २·११६

**परिपाटी**–रीत; परिपाठ. ३·७७

**परिवेषण**–( सं. ) अन्नाचें वाढप. ६·८१

**पल्ली**–( सं. ) पाल. ७·१५६

**पवाडा**–स्तुतिस्तोत्र. १·७८, ४·७४; ६·१२२

**पाखर**–घोड्याची किंवा हत्तीची झूल. ३·४५

**पाचीं**–एक रत्न. ५·१७

**पाटाउ**–पाटाव; उंची रेशमी वस्त्र. ३·४१

**पाड**–महत्त्व; मोठेपणा. २·८८

**पातशाही**–( फा. ) राज्य. ४·३७; ५·१०६

**पान**–एक कर्णभूषण. २·५०

**पांचीं**–ऐतरेय ब्राह्मणग्रंथ. ६·४६

**पांजण**–नव्या वस्त्रास खळ देणें. ३·४१

**पांडच**–एका देशाचें नांव. ६·१०

**पायसान्न**–खीर. ६·७६

**पालव**–पदर. २·९३

**पाला**–पालवी. ५·७३

**पाव**–पाय. १·७४

**पाशपाणी**–( सं. ) वरुण. ५·२७

**पाहाणी**–दृष्टि; पाहण्याची रीत. ८·१०४

**पाहुणोर**–पाहुणचार; आदरातिथ्य. ६·९६

**पाळा**–वेढा; समुदाय. ३·६७

**पिढें**–बसण्याचा पाट. ७·१११

**पिलसो**–खांबावरील किंवा टांगण्याचा दिवा. ३·४६

**पिसाळणें**–वेड्यासारखें वागणें. २·९

**पीठ**–( सं. ) आसन. ५·४२

**पुंडा**–पुंड्या जातीचा ( ऊस ). ३·४९

**पुरोडाश**–( सं. ) हविर्द्रव्य. ५·१२९

**पुष्पेषु**–( सं. ) मदन. ६·११६

**पूर्त्ति**–पूर्ति; पूर्णता. १·५

**पूर्त**–( सं. ) दानधर्माचें कृत्य. २·७

**पेशलांगी**–मृदु अंगाची. ५·१३७

**पेषण**–( सं. ) दळणें; वाटणें. ३·५२

**पैशुन्य**–( सं. ) लबाडी; चहाडखोरपणा. ७·१३७

**पोखती**–पोक्त; प्रौढ. २·८५, ९०

**पोटागी**–पोटतिडीक; जिव्हाळा. ७·१०६

**पोती**–पिशव्या; थैल्या. ५·६

**पोल्हार**–स्त्रियांचा पायाच्या अंगठ्यांत घालण्याचा एक दागिना. ६·३१

**पोहची**–पोंची; पुरुषांचा मनगटावरील एक दागिना. ३·४२

**पौंड्रक**–चिन्ह. ६·८

**प्रकृत**–(सं.) (१) प्रस्तुत. ५·७९,८४; (२) सध्यां. ६·१४५, १४८, १५९

**प्रतीहारिका**–( सं. ) द्वारपालिका. ५·४५

**प्रमाणगी**–परवानगी; हुकूम. ३·३१

**प्रवाह**–( सं. ) कार्यक्रम. ३·३४
**प्रस्ताव**–पश्चात्ताप. ६·१२७
**प्राकार**–( सं. ) तट. ५·२
**प्रोच्छन**–अंग पुसणें. ८·७३

## फ

**फरास**–( फा. ) बिछायत घालणारा. ६·१३
**फांटा**–मार्ग; वाट. ४·७५
**फाफावणें**–फोंफावणें; विस्तार पावणें. ३·९५
**फांसा**–पाश. ४·११७
**फुलेल**–फुलांचें अत्तर किंवा तेल. ५·४६
**फेरणें**–बदलणें. २·५७
**फेरा**–घेर; आवार. ५·२

## ब

**बचकनी**–बैठक; बिछायत. ३·४६
**बजागी**–हट्टी; भांडखोर. ४·६१
**बघणें**–घडून येणें; जमणें; वश होणें, ३·७,८१; ५.६३
**बनोस**–रंगविशेष. ३·४१
**बंदी**–भाट; स्तुतिपाठक. ५·३५; ८.५०
**बराडी**–भिकारी; आशाळभूत १.३६
**बर्हे**–( सं. ) पीस. १.७९
**बलाय**–( फा. ) इडापिडा; संकट. ७·७१
**बहळ**–विपुल; पुष्कळ. ८·९२
**बाज**–ससाणा; श्येनपक्षी. ३·४७
**बाट**–लवाड. ८·४
**बाड**–( फा. ) तंबूची कनात, पडदा ३·४५; ६·५४
**बाफता**–( फा. ) रेशमी वस्त्र. ३·४८
**बालाबगला**–देवताविशेष. १·३५; ३·९३
**बावनचंदन**–उत्कृष्ट चंदन. १·३८
**बाहणें**–बोलावणें. १·७३, २·७०; ६·११७; ७·४३; ८·६४, ९१, १२५
**बाहला**–दूध काढतांना जनावराच्या पायास बांधण्याची दोरी. ३·१४
**बाहे**–बाहु; हात, १·७३; ६·११७
**बिजवरा**–कपाळावरचा एक दागिना. ८·१३२
**बिडिश**–मासे पकडण्याच्या दोरीला बांधलेला गळ. ४·८२
**बिदी**–रस्ता. ५·८, १२
**बिरडें**–गांठ. १·१९
**बिरिंजी**–केशरी भात. ६·७९
**बीरुद**–ब्रीद; प्रतिज्ञा; बाणा. १·१२; ३·११३
**बुझावणें**–समजूत करणें. २·१०८
**बुंथि**–बुरखा. ८·४०
**बेसर**–( १ ) नाकांतील नथ किंवा चमकी. ६·२५
( २ ) घोडा. ३·४७
**बोटवा**–गव्हला; वळीव पदार्थ. ६.७७

## भ

**भंडार**- हळदीची पूड. ६•१०९
**भंजणें**-ठार मारणें. १•७७
**भसेंसीं**- —?— ३•१३०
**भांगटीळा**-केसांच्या भांगांत घालण्याचा एक अलंकार. ६•२२
**भाक**-वचन. ४•४७
**भान**-ज्ञान; प्रतीति. १•२९
**भावणें**-वाटणें. ३•९६
**भुजिष्या**-( सं. ) दासी. ७•१७३
**भेकी**-( स. ) बेडकी. ७•१५६
**भेणें**-( तृ. ) भीतीनें. १•६९
**भेरी**-( सं. ) नौबत. ६•२; ८•६१, १७३
**भोरें**-निष्प्रभ; फिकें. ६•२१

## म

**मछणें**-माखणें; व्यापून टाकणें. ६•१६४
**मजलि**-मजल; अखेर. ४•८९
**मणिबंध**-मनगट. ३.६७
**मधुपर्क**-( सं. ) अतिथीची पूजा. ५•३६;७•७५
**मनस्वी**-( सं. ) मनोजयी. ५•५४
**मंत्रवादी**-( सं. ) मांत्रिक. २•८९
**मरीच**-( सं. ) काळें मिरें. ३•४८
**मल्ली**-पांढऱ्या जाईची वेल. ४•३३; ८•१००
**महर्घ**-( सं. ) महाग; दुष्प्राप्य. १•२१ रु. ह. १३
**महाप्रस्थान**-मृत्यु. ६•१६०
**माग**-मार्ग. २•९४
**मांची**- ३•४१
**माज**-कंबर. २•५४;५•३८,११५
**माणें**-मावणें २•१८
**मातंकवाटी**-मातंगांची वाडी ( ? ) ३•९५
**मातुलिंग**-( सं. ) महाळुंग. ३•४९
**मालती**-गव्हल्यासारखा खीर करण्याचा पदार्थ. ६•७७
**माव**-माया; कपट. १•५२
**माष**-( सं. ) उडीद. ३•५०
**मिहिर**-( सं. ) सूर्य ५•८६
**मुकुलित**-( सं. ) मिटलेलें. ३•१०२; ४•५०
**मुखरणि**-मुखरण; मुख्य. ३•६९
**मुदराखडी**-अलंकारविशेष. ६•३५
**मुदा**-(फा.) मुद्दा; मुख्य गोष्ट. २•१९
**मुरकुंडी**-उडी; गर्दी. ६•१६२
**मुरणें**-तृप्त होणें. ४•९१; ७•१२
**मुसळी**-बलराम. ७•२
**मुहूर्त**-(सं.) कालयोग; समय. ४•५४
**मुळचिठ्ठी**-आमंत्रणपत्रिका. ३•३३
**मूर्धन्य**-श्रेष्ठ; मुकुटमणि. २•५
**मूस**-आटणी; साचा; घडण. २•३८
**मूळ**-बोलावणें. ३•२०; ८•३१
**मृषा**-खोटें. ६•१५५
**मेखळा**-कंबरपट्टा. ३•३८
**मेचक**-( सं. ) मेघ. ८•१५६

**मेचणें**–पर्वा करणें; जुमानणें. ४·९०
**मेट**–चौकी; पहारा. ४·३९
**मेध्या**–( सं. ) हुशार. ८·१४५
**मैंद**–घातकी; ठक. ४·११७
**मोकलणें**–सोडणें; पाठविणें. ८·१२५
**मोगरेल**–मोगऱ्याचें अत्तर. ६·६६
**मोट**–सांठा. १·७२
**मोर**–मोरणी; नाकांतील एक दागिना. ८·१३५
**मोरछल**–मोरचेल; मोराच्या पिसांची चंवरी. ३·४४
**मोळा**–वाग्ण्याची पद्धत. ७·२०
**म्यानवंद्या**– कटिवंधीं अलंकार घातलेली. ३·४१

### य

**यज्वा**–( सं. ) होमहवन करणारा. ७·१६
**यंत्र**–( सं. ) जादूटोण्याची मंत्राकृति. ६·५२
**यान**–( सं· ) रथ. ८·१३९
**यायजूक**-( सं. ) नेहमीं यज्ञ करणारा. ६·५४
**यावा**–डौल. २·५४
**यिंगल**–इंगळ; निखारा. २·७२
**येळा**–वेलची; वेलदोडा. ३.४८

### र

**रणसोडी**–रणछोड; श्रीकृष्ण.४·११८
**रती**–हिरे,मोतीं वजन करण्याचें अति लहान वजन. २·३७;६·१२३
**रदबदल**–रदबदली; मध्यस्थी. ५·३९
**रय**–( सं. ) वेग; गति. ३·३५
**रव**–( सं. ) आवाज; स्वर. ४·५१; ६·८२
**रशना**–( सं. ) कंबरपट्टा. ८·१५४
**रसज्ञा**–( सं. ) जीभ. ४·८५
**रसोद्रेक**–रसभरित. ५·७४
**रहवाळ**–राऊत; घोडेस्वार. ७·५४
**रहाण**-राहाणी; वागण्याची पद्धत. ३·८३
**रहाणें**–( फा. रहा ) परिचय होणें १·६
**राका**–( सं. ) पौर्णिमा. ६·२०
**राखडी**–स्त्रियांचें कर्णभूषण ७·६४
**राजक**–राजांचा समुदाय. ८·१४०
**राजन्य**–( सं. ) राजांचा समुदाय. ६·१२५; ८·१३८
**रातणें**–रममाण होणें. ३·११६
**रानट**–रानटी लोक. ३·६
**रावविणें**–रंगविणें. ८·९४
**रुक्म**–( सं. ) सोनें. ८·७७
**रोडेजणें**–रोड होणें; वाळणें ७·१५८
**ऱ्ही**–( सं. ) लज्जा. ७·८५

### ल

**लगड**–पाड; तुलना. ६·९८
**लहांसे**–डाग; लांछनचिन्ह. ३·२३
**लसणा**–वैदूर्यमणि; एक रत्न. ३·४२
**लाखोटा**–बंद लिफाफ्यावर केलेली लाखेची मुद्रा. ५·८३

**लाग**-पत्ता; शोध. ३·७४
**लागट**-लोचट; चिकटणारी. १·२२
**लागि**-भूतबाधा; लागिरें. २·८६
**लालस** (सं.) उत्कंठित. ५·१०३
**लांवा**-एक पक्षी; लाहुर. ३·४७
**लासणें**-भाजणें; डाग देणें. २·१०; ३·६३
**लांसी**-राक्षसीण. ४·६२
**लाहणें**-मिळणें; ४·२३
**लाहे**-धान्याची भाजून केलेली लाही. ४·२३
**लिगटणें**-चिकटणें. ५·६०; ८·१०७
**लिगाडा**-खोडसाळ; उलाढाल्या. १·५२
**लुलाय**-रेडा. ३·८४
**लेखा**-किंमत; पाड. ७·१६८
**लेवा**-लेप. ६·१२
**लौंद**-दांडगा. ७·४८

## व

**वइंचणें**-पाखडून घोळणें. ३·५२
**वचकणें**-आश्चर्यानें दचकणें. ७·३३
**वजणें**-जाणें. २·१३; ३·११०
**वडवडित**-तत्काळ;तत्परतेनें.६·११०
**वदान्य**-(सं.) उदार. ५·९३
**वंचणें**-फसणें; मुकणें. १·३२
**वयस्या**-(सं) सखी; मैत्रीण. २·७५; ६·१३८
**वरपंगती**-वरकांती;वरवर. १·३६
**वराकी**-(सं.) गरीब, दुर्दैवी स्त्री २·१९; ३·९; ४·१२९
**वरान्न**-वरण. ६·७६
**वरिपडणें**-चालून येणें; अंगावर येणें, ६·१६२
**वरोरू**-(सं.) सुंदर स्त्री. १·४२
**वर्ग्य**-बांधव; भाऊबंद. २·४२
**वऱ्हाडी**-लग्नकार्यासाठीं जमलेले लोक. १·३६
**वसीला**-ओळख. ८·१०२
**वळवट**-गव्हले, शेवया इ० वळून केलेले पदार्थ. ३·५३
**वळसा**-घोंटाळा. ६·१२४
**वक्षोरुह**-(सं.) स्तन. २·५६
**वाखा**-(फा.) नाश: त्रास; पडझड. ५·२५
**वाजपेयी**-वाजपेय नांवाचा यज्ञ करणारा. ६·३७
**वाण**-उणीव; अभाव. ३·५४
**वातायन**-(सं.) खिडकी. ५·२१
**वादित्र**-वाजंत्री. २·४१
**वाधंग**-वाद; वादंग. ७·११९
**वामणें**-दुःखी होणें. ७·५३
**वारा**-घालमेल; उलघाल. ६·१३८
**वारि**-वारावार; पांगापांग ५·४१
**वारुणी**-(सं.) पश्चिम दिशा. ३·१००
**वावडणें**-भटकणें. ८·६६
**वावहणें**-पळून जाणें. १·७४
**वाकळ**-वाळुक; काकडी. ३·४९

**वाळित**–वाळींत टाकलें जाणें; बहिष्कार. ५·५७

**विकत्थन**–(सं.) गर्व; प्रौढी. ८·१८

**विखळ**–दुष्ट. ४·६७

**विखंडणें**–दुःखित करणें. ३·७७

**विछाय**–फिकें; पांढरें. ३·५७

**विजवटी**–द्वाड; व्रात्य. ४·६६

**विट**–(सं.) छंदीफंदी मनुष्य. ६·५५

**विटंक**–(सं.) खुराडें. ५·१४

**वि्णें**–जन्म देणें. ७·१३९, १५७

**विदग्ध**–(सं.) शाहाणा माणूस. ४·१३

**विधुर**–(सं.) विरहव्यथित. ६·१२०, १२७

**विधेयी**–(सं.) कर्तव्यदक्ष. ७·१६९

**वीजणें**–पंखा. ३·६६

**विंधणें**–भेदणें. ८·२१

**विपंची**–(सं.) वीणा. १·२; ६·३५

**विपारी**–विरूप; कुरूप. ३·२४; ८·१२८

**विप्रतिपत्ति**–मतभिन्नता. ५·१०४

**विप्रश्निक**–भविष्य सांगणारा; ज्योतिषी. ६·८६

**विभूति**–(सं.) राख. २·८९

**विरुद**–विरुद; ब्रीद. ६·१४८

**विरोदी**–विरोली; पायाच्या बोटांतील चांदीचा दागिना. ६·३१

**विलपणें**–विलाप करणें. ४·१२७ १३०

**विलुठणें**–लोळणें. ५·४२

**विशाखा**–(सं.) एक नक्षत्र. ८·१५८

**विहिरा**–विहीर. ७·१४२

**विज्ञ**–(सं.) ज्ञानी पुरुष. २·८९; ४·३८

**वीचि**–(सं.) लाट; लहर. १·३२

**वीजण**–वारा; पंखा. ३·६६

**वीथि**–(सं.) मार्ग ७·३३

**वीरगुंठी**–विशिष्ट केशरचना. ८·११८

**वेंघणें**–वर चढणें. २·६५; ५·२२

**वेंच**–खर्च. ७·१४२

**वेंचणें**–खर्च करणें. १·४६; ४·८८

**वेंचे**– (अ. व.) ग्रंथांतील उतारे. १·४६

**वेठ**–बिगारी; मजूर. ३·३१

**वेत्रधारी**–(सं.) चोपदार. ८·१२२

**वेदिका**–(सं.) ओटा. ६·१३९

**वेदी**–(सं.) यज्ञाचा ओटा. ६·३९; ७·५

**वेधा**–(सं.) ब्रह्मदेव. २·४८

**वेमा**–वस्त्र विणण्याच्या मागाची फणी. ६·६३

**वोचकणें**–भिणें; वचकणें. ५·३६

**वोटी**–ओटी; पदर. १·१३; २·३५

**वोड**–आपत्ति.

**वोडवणें**–पुढें येणें. ८·२

**वोढी**–ओढ. १·२०
**वोप**–तेज; झळाळी; शोभा. ६·३
**वोरस**–पान्हा; स्तन्य. ४·१२६
**वोली**–रेशमी वस्त्र. ३·३९
**वोवणी**–गुंफण. ५·८५
**वोसजणें**–ओसरणें; कमी होणें. १·२४
**वोहट**–ओहटी. ४·११०
**वोळगणें**– वळणें. ७·११
**व्यवसित**–(सं.) व्यवसाय.६·१०६
**व्रज**–(सं.) गोकुळ. १·७७; ६·१५३, १५७
**व्युत्पाति**–मूळ स्थान. ८·११७

## श

**शची**–(सं.) इंद्राणी. ६·१७; ७·१५
**शफरी**–(सं.) मत्स्यी; मासोळी. ७·६
**शर्वाणी**–(सं.) पार्वती. ८·८८
**शलाका**-(सं.) सळई. ८·७७
**शशी**–(सं.) कापूर. ३·४८
**शाटिका**-(सं.) साडी; पैठणी. ८·७४
**शाळी**–साळी; भात. ३·५०
**शिक्षापन**-(सं.) शिकवण. ३·१३२
**शीक**–शिकवण. २·६२
**शूर्प**–(सं.) सूप. ८·९५
**शृंगाटक**–(सं.) रस्त्यांतील चौक. ६·३
**शेप**-सफरचंद. ३·४९
**शैवळ**–शेवाळ. ३·६६
**शोण**–(सं.) तांबडें. ३·४१
**शौरी**–(सं.) कृष्ण. ५·२५,१३८; ६·९१; ८·१७६
**श्लथ**–(सं.) सैल. ७·६६

## स

**सखर**–ठांशीव; घट्ट विणीचें. ३·४०
**सखलाद**–(फा.) लोकरीचें जाडेंभरडें कापड. १·४०
**सखवार**–सुकुमार. ६·७७
**सज**–सज्ज; सुशोभित; योग्य. ६·३०; ७·२,२१, १४८; ८·७५, ९३
**सजण**–मित्र; सखा. ४·१०६; ५·९२
**सजणें**–जमणें; घडणें; शोभणें. १·२४
**सजहुमा**–अलंकारविशेष. ३·४५
**सजा**–घराचा सज्जा; माडीपुढील भाग. ५·१०
**सतखा** (फा.)–ओवाळून टाकलेला पदार्थ. ७·५५
**सतरंज** (फा.)–बुद्धिबळें. ३·४६
**सदेव**–सुदैवी; भाग्यवान. ४·२१
**संच**–बांधा; पुष्टा. ३·३६
**संदुक**–पेटी. ५·१०
**सताळ**–एक प्रकारचें फळ. ३·४९
**समीक्षा** (सं.)–शोधपूर्वक पाहणें. ६·१५७
**संप्रोछन**–अंग पुसणें. ६·१९
**संभ्रम**–समारंभ. ८·१०३
**संमार्जनी** (सं.)–केरसुणी. ८·१३

**संविधान** ( सं. )–व्यवस्था; तयारी. ६·३

**सरपाड**–जोड; परस्परानुकूलता. ७·१०१

**सरवळा**–गव्हल्यासारखा खिरींत घालण्याचा पदार्थ. ६·७७

**सरीसृपी**–सर्पीण. २·७२

**सर्जा**–अलंकारविशेष ( ? ). ३·४५

**सवारणें**–शृंगारणें. ३·३२

**सवे**–संवय. ६·१३२, १४६

**सहकार** ( सं. ) आम्रवृक्ष. ४·३३; ८·१५८

**सहार**–आंबराई. ५·१४३

**सांकडें**–संकट. ७·११८

**साची**–सुंदर. ८·१४१

**साजिरा**–सुंदर. ३·४७

**सांडणें**–ओवाळून टाकलेला पदार्थ. २·८७

**सांडी**–त्याग. ४·८३; ७·११९

**साध्वस**–( सं. ) भीति. ४·४

**सायी**–छाया; सावली. ७·१४१

**साली**–मेहुणी. ६·१५

**साव**–प्रामाणिक मनुष्य. ६·९२

**सांव**–नाडी; शीर. ३·७५

**साहिवी**–राजवस्त्र. ३·४०

**साळस**–कर्तव्यदक्ष. ७·७४

**सित**–( सं. ) टोंक असलेला; कुशाग्र. ३·३७

**सिंजारव**–नूपुरांचा आवाज. ७·७९

**सिंपा**–मुलाला दूध पाजण्याचें शिंपल्याच्या आकाराचें बोंडलें. १·५३

**सिसफूल**–केसांत घालण्याचें चंद्राकार फूल. ६·२२; ८·१३५

**सीला**–( फा. सिलह् ) हत्यारी; हत्यारबंद. ३·४५

**सुजनी**–चादर. ३·४६

**सुजि**–सूज; वाढ. १·२४

**सुपानी**–पाणीदार; सतेज. ६·३४

**सुरवाड**–सुख; समृद्धि. ३·९५

**सुरवार**–( फा. )विजार; पायचोळणा. ३·३९

**सूद**–सुग्रण; पाककुशल. ३·५३

**सेटा**–श्रेष्ठी; व्यापारी. ३·३१

**सेला**–शेला ८·७३

**सोपशाला**–झाडाच्या सालीपासून बनविलेले कापड. ३·४०

**सोमयाजी**–सोमयाग करणारा. ४·१

**सोय**–मार्ग; स्मरण. १·३७

**सोलणें**–व्यथित होणें. ३·११०

**सौनिक**–खाटिक; कसाई. ३·१२९

**स्छगित**–( सं. ) विचारांत गढून गेलेली; तल्लीन; दुंग. ५·५३

**स्छविर**–( सं. स्थविर ) श्रेष्ठ; सुदेव ब्राह्मण. ५·५१

**स्मेर**–( सं. ) हास्य. ८·६५, १४२

**स्वन**–( सं. ) आवाज; नाद. १·६४; ६·६६; ७·५३

**स्वाप**–( सं. ) निद्रा. ५·५२

ह

हरिता-दिशा. २·६६
हल्या-रेडा. ३·१४
हविष्य-(सं.) उपवासाचे खाद्य पदार्थ. ६.८३
हंसतुळिका-हंसाच्या परांची गादी. ८·८४
हळधर-बळराम. ५·४९; ६·१५१
हळी-बळराम ७·२
हाट-बाजार. ३·१६
हाटक-सोनें. ८·७४
हातरोखा-हातानें लिहिलेली हुंडी; दस्तऐवज इ. ३·३४
हातसर-हातांत घालण्याचे मनगटयांसारखे सर. ६·२६
हिलाट-हिलाल. ८·४
हिलाली-मशाल धरणारा. ५·४०
हिंसा-हिंवसा; थंडगार. ४·१७
हीरांकुर-हिरकणी. ? ७·२१
हीरांगद-बाहुभूषणें. ३·४२; ८·१५२
हुरुप-कल्लोळ; उत्साह. ५·८१
हुंवरी-गवळ्यांचा एक खेळ. ३·१४
हेकरि-हट्ट, हेकटपणा ८·३५
हेजीब (फा.) दूत. ५·१०४
हेरि-('हेर' याचें स्त्रीलिंग) दूती. ३·१०
हेला-(सं.) हेळसांड; धिक्कार. २·२२
होराडि-...

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ७५५६२
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रमांक ७७३९१
१८३८ ७४/३६२